# १

# पुरातत्त्वशास्त्राची उद्दिष्टये व पद्धती

**अ) पुरातत्त्वाच्या व्याख्या , उद्दिष्टये व पुरातत्त्वशास्त्राचा विकास**

**ब) पुरातत्त्व आणि इतिहास; पुरातत्त्व आणि इतर शास्त्रे**

**क) क्षेत्रीय पुरातत्त्व : समन्वेषण, उत्खनन आणि कालमापनाच्या पद्धती; पुरातत्त्वशास्त्राचे महत्व .**

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ पुरातत्त्वाच्या व्याख्या व उद्दिष्टये

१.३ भारतीय पुरातत्त्वशास्त्राचा विकास

१.४ पुरातत्त्व आणि इतिहास

१.५ पुरातत्त्व आणि इतर शास्त्रे यांचा संबंध

१.६ क्षेत्रीय पुरातत्त्व : समन्वेषण, उत्खनन आणि कालमापन पद्धती

१.७ पुरातत्त्वशास्त्राचे महत्व

१.८ सारांश

१.९ प्रश्न

१.१० संदर्भ

**अ) पुरातत्त्वाच्या व्याख्या, उद्दिष्टये व भारतीय पुरातत्त्व शास्त्राचा विकास**

## १.० उद्दिष्टये

१) सदर पाठात आपण पुरातत्त्वाच्या व्याख्या आणि अर्थ समजावून घेणार आहोत.

२) पुरातत्त्वशास्त्र आणि इतिहास, पुरातत्त्व आणि इतर सामाजिक व नैसर्गिक शास्त्रे यांच्याशी असलेला संबंधही जाणून घेणार आहोत.

३) याच पाठात आपण भारतीय पुरातत्त्वाचा इतिहास जाणून घेणार आहोत व पुरातत्त्वाची उद्दिष्टये वेळोवेळी कशी बदलत गेली, यांचाही आढावा घेणार आहोत.

munotes.in

## १.१ प्रस्तावना

मानवजातीच्या उदयापासून मानवाने अनेक क्षेत्रांत नेत्रदीपक प्रगती केली आहे. मानवाने सामाजिक, आर्थिक, भौतिक, तत्वज्ञानाविषयक आणि वैज्ञानिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. ही प्रगती मानवाने विविध टप्प्यांमध्ये साध्य केलेली असून त्यात विविध घडामोडींचा समावेश होतो. अशा ह्या गतकाळातील मानवी जीवनातील घडामोडींचा अभ्यास म्हणजे इतिहास होय.

इतिहास जाणून घेण्यासाठी आपणांस ऐतिहासिक साधनांची जरुरी असते. या साधनांचे दोन प्रमुख प्रकार म्हणजे पुरातत्त्वीय साधने आणि वाङ्मयीन साधने. यापैकी पुरातत्त्वीय साधने ही प्राचीन अवशेष स्मारके, आलेख, नाणी, पुराणवस्तू अवशेष, शस्त्रे आणि उपकरणे, हाडांचे सांगाडे इ. उत्खननात सापडलेले विविध अवशेष होत. या पुरातत्त्वीय अवशेषांच्या अभ्यासातून आपण इतिहासाची जुळवणी अधिक विश्वसनीयरित्या करू शकतो. पुरातत्त्वीय साधने ही तत्कालीन इतिहासाचे प्रत्यक्ष पुरावे म्हणून वाङ्मयीन साधनापेक्षा अधिक विश्वसनीय मानली जातात आणि त्यामुळेच इतिहासामध्ये पुरातत्त्वीय साधनांचे अतिशय महत्व आहे. अशा ह्या पुरातत्त्वीय साधनांचा म्हणजे जुन्या वस्तू किंवा प्राचीन अवशेष यांचा अभ्यास करणारे शास्त्र अथवा ज्ञानशाखा म्हणजे पुरातत्त्वशास्त्र होय.

## १.२ पुरातत्त्वाच्या व्याख्या व उद्दिष्टये

पुरातत्त्वशास्त्र हे फारसे जुने नसले तरी त्याला अधिक महत्त्व आहे. इंग्रजीमध्ये पुरातत्त्व हे Archaeology म्हणून ओळखले जाते. हा शब्द मूळ ग्रीक भाषेतून आलेला असून त्याची व्युत्पत्ती ही Archeois (अर्किऑस) म्हणजे ' प्राचीन ' अथवा 'सुरुवात' आणि Logos (लोगोस) म्हणजे विवेचण या शब्दांपासून झालेली आहे. या दोन शब्दांपासून तयार झालेल्या 'Archaeology' या इंग्रजी शब्दाचा शब्दशः अर्थ म्हणजे प्राचीन मानवाच्या उत्पत्तीचे विश्लेषण हे होय. थोडक्यात सांगावयाचे तर मानवाची उत्पत्ती, विकास व संस्कृतीचा पुरातत्त्वीय अवशेषाद्वारे अभ्यास करणे म्हणजेच पुरातत्त्वशास्त्र होय, अनेक पुरातत्त्वज्ञांनी पुरातत्त्वाच्या व्याख्या केल्या आहेत. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे :

१) **सर मॉर्टीमर व्हीलर** हे भारतातील एक अग्रगण्य पुरातत्त्ववेत्ते व भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे महानिर्देशक ( १९४४ - ४८ ) होते. त्यांनी केलेली पुरातत्त्वाची व्याख्या म्हणजे, " पुरातत्त्वज्ञ हा केवळ मानवी वापरातील वस्तूंचे उत्खनन करत नसतो, तर तो मानवाच्या गतइतिहासातील बारकावे समजून घेण्यासाठी वस्तूंचे उत्खनन करत असतो."

२) **आर. जे. ब्रेडवुड यांच्या मतानुसार** " पुरातत्त्व हे असे एक माध्यम आहे की ज्याद्वारे आपण मानवी जीवनाचा अभ्यास केवळ त्यांच्या उक्तीद्वारे नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीद्वारे करू शकतो.

३) **ओ. जी. एस. कॉफ्रोड यांच्यामते,** " पुरातत्त्व ही अशा शास्त्राची शाखा आहे, की जे शास्त्र मानवी संस्कृतीच्या भूतकाळातील स्वरूपाचा अभ्यास करते.

४) **ग्रॅहम क्लार्क यांच्या मते,** " भूतकाळातील मानवी जीवनाची घडण जाणण्यासाठी केलेला अवशेषांचा पद्धतशीर व शास्त्रीय अभ्यास म्हणजे पुरातत्त्वशास्त्र होय. "

५) **स्टूअर्ट पिगॉट यांनी केलेली व्याख्या म्हणजे ,** " पुरातत्त्वज्ञ हा उपलब्ध वस्तूंच्याद्वारे नष्ट झालेल्या लोकसमूहांच्या सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास करतो."

६) **एस. जे. डी. लाएत यांच्यामते,** " पुरातत्त्व म्हणजे नष्ट झालेल्या संस्कृतीच्या सर्व पुराव्यांचा अभ्यास आणि ऐतिहासिक मूल्यमापनाचे शास्त्र होय."

वर पाहिलेल्या विविध व्याख्यांद्वारा पुरातत्त्वाचा निश्चित अर्थ, त्याचे स्वरूप आणि व्याप्ती यांविषयी सविस्तर कल्पना येते.

**पुरातत्त्वशास्त्राची उद्दिष्टये :**

भूतकाळाचा अभ्यास करणे तेही पुरातत्त्वीय म्हणजेच भौतिक साधनांद्वारे हे पुरातत्त्वशास्त्राचे मुख्य उद्दिष्ट असते. वर दिलेल्या व्याख्यांद्वारे पुरातत्त्व या विषयांचे महत्त्व स्पष्ट झालेले आहेच. त्यामुळेच प्राचीन मानवी वसाहतींचा शोध लावून त्याचे शास्त्रशुद्ध उत्खनन करणे आणि त्याद्वारे मानवनिर्मित वस्तूंचे अवशेष मिळवून त्यांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे असते. कारण गतकालीन मानवी जीवन आणि संस्कृतीचा अभ्यास करणे हे पुरातत्त्वशास्त्राचे प्रमुख उद्दिष्ट असते तसेच मानवी विकास आणि संस्कृतीचे विविध टप्पे अभ्यासणे , मानवी संस्कृतीच्या विकासात कसकशी स्थित्यंतरे होत गेली याविषयी जाणून घेणे आणि पुरातत्त्वीय अवशेष आणि सांस्कृतिक विकास यांची संगती लावणे ही सुद्धा पुरातत्त्वशास्त्राची उद्दिष्टये ठरतात. थोडक्यात म्हणजे मानवी विकास आणि संस्कृती यांचा मागोवा घेणे हे पुरातत्त्वशास्त्राचे व्यापक ध्येय ठरते. अर्थात हा अभ्यास करण्याचे मुख्य साधन म्हणजे पुरावस्तू (artefact) होय. प्राचीन मानवी वसाहतींचा शोध लावून त्यांचे शास्त्रशुद्ध रित्या अन्वेषण करून उत्खननाद्वारे मानवी अस्तित्वाचे पुरावे म्हणजे पुरावस्तू (artefacts) गोळा करणे आणि त्यांचा अभ्यास करून इतिहासाची कालक्रमानुसार संगती लावणे या सर्वांचाच पुरातत्त्वाच्या उद्दिष्टांमध्ये समावेश होतो.

munotes.in

## १.३ भारतीय पुरातत्त्वशास्त्राचा इतिहास

**पार्श्वभूमी :**

पुरातत्त्वीय संशोधनाची सुरुवात ही गेल्या काही शतकांमध्ये सुरु झाली. इ. स. च्या १५ व्या आणि १६ व्या शतकात युरोपात प्रबोधनयुग सुरु झाले, त्यावेळी तेथे विविध कला आणि विद्या यांचे पुनरुज्जीवन झाले. यावेळी प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतींच्या अभ्यासाविषयी लोकांना आवड निर्माण झाली. श्रीमंत लोकांनी दिलेल्या उत्तेजनामुळे आणि अर्थपुरवठ्यामुळे अनेक प्राचीन स्थळांचे उत्खनन होऊ लागले. या उत्खननांमध्ये मिळणाऱ्या पुरावस्तू, विविध पुतळे व इतर कलावस्तू मिळवून आपल्या घरांच्या सजावटीमध्ये त्यांचा वापर करणे हा मुख्य उद्देश त्यामागे होता. तरीही या निमित्ताने युरोपातील अनेक शहरांमध्ये प्राचीन कलावस्तूंचे मोठमोठे संग्रह तयार झाले आणि त्यातूनच पुरातत्त्वाचा पाया घातला गेला.

उत्खननाबरोबरच प्राचीन कला आणि स्थापत्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासासाठी विविध किल्ले, मंदिर, राजवाडे, इतर स्मारके आणि प्राचीन वस्तू तसेच प्राचीन शिल्पे आणि नाण्यांचे पद्धतशीर सर्वेषण सुरु झाले. या सर्वेषणाच्या  वाढत्या व्यापाराबरोबर नवनवीन जाणिवा निर्माण होत गेल्या आणि त्यानुसार नवनवीन गरजाही पुढे येत गेल्या. आणि त्यातूनच इ. स. च्या १६ व्या शतकात पुरातत्त्वाच्या रूपाने एका स्वतंत्र ज्ञानशाखेचा उगम झाला.

प्रबोधनानंतरच्या काळात पुरातत्त्वशास्त्राच्या क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती होत गेली अनेक विद्वानांनी प्राचीन ऐतिहासिक स्थलांचे अन्वेषण आणि उत्खनन करून त्या स्थलांविषयीच्या इतिहासावर नवीन प्रकश टाकणारी महत्त्वपूर्ण माहिती प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. लोकांना इतिहास आणि पुरातत्त्व या विषयांमध्ये अधिक रुची वाढू लागली. इतिहासाचा पद्धतशीर व शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी वाङ्मयीन साधनांबरोबर मानवनिर्मित वस्तुरूप पुरावे गोळा करून त्यांचा अभ्यास करून इतिहासलेखन केले जाऊ लागले. सुरुवातीस पुरातत्त्वाचे स्वरूप हे निश्चित नव्हते. त्यातही स्थलांचे अन्वेषण आणि उत्खननात शास्त्रशुद्धतेचा अभाव होता. त्यातील तांत्रिक बाजू अविकसित होती.

मात्र हळूहळू पुरातत्त्वाचे शास्त्र विकसित होऊ लागले. त्याला तंत्रज्ञानाची जोड मिळाली. त्यामुळे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पुरातत्त्वास शास्त्राचे स्वरूप प्राप्त झाले. या कालखंडात अनेक पुरातत्त्वज्ञांनी अन्वेषण, उत्खनन आणि प्राचीन अवशेषांच्या जतनाच्या क्षेत्रात नवीन प्रयोग करून या विषयास प्रगतीपथावर नेले आणि पुरातत्त्वास एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान्यता मिळाली. पुरातत्त्वाच्या विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

इ. स. च्या १७ व्या शतकात म्हणजे इ. १६६६ मध्ये इंग्लंडमध्ये 'द रॉयल एशियाटिक सोसायटी' तर १८ व्या शतकात इ. स. १७१८ मध्ये 'सोसायटी ऑफ अँटीक़्वेरिज ऑफ लंडन' या संस्थांची स्थापना झाली होती. खरे म्हणजे, प्राचीन इतिहास, नैसर्गिक शास्त्रे आणि उत्खननाद्वारे प्राचीन मानवी संस्कृतीचे वस्तुरूप पुरावे मिळविण्यासाठी समविचारी लोकांनी एकत्र येऊन त्यांची स्थापना केली होती. या संस्थांनी प्राचीन स्थलांच्या उत्खननात प्रत्यक्ष सहभाग घेतला होता.

याच काळात इजिप्त , मेसोपोटेमिया, ग्रीस, इ. भागांमध्ये पुरातत्त्वीय उत्खनने हाती घेण्यात आली. या उत्खननांमध्ये नवनवीन तंत्रांचा वापर करण्यात आला. उत्खनित वस्तूंची आणि स्तरांची अचूक नोंदणी , भूगर्भशास्त्रातील स्तरशास्त्र सिद्धांताचा अवलंब , उत्खनित वस्तूंचे वर्गीकरण आणि युगपद्धती  इ. तत्त्वांचा आणि तंत्राचा अवलंब  केल्यामुळे पुरातत्त्वाचा  मोठा विकास घडून आला. पुढील काळात म्हणजे १९ व्या शतकात तर अनेक सामाजिक शास्त्रे आणि नैसर्गिक शास्त्रे यांच्या अभ्यासाद्वारा पुरातत्त्वशास्त्रात मोठी क्रांती घडून आली.

१८ व्या शतकांत भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग बनला होता. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी भारताच्या बंगाल प्रांतावर अंमल बसविला. कलकत्ता ही त्यांची राजधानी बनली होती. या भारतातील इंग्रजी राजकर्त्यांना भारतातील प्राचीन वास्तूंचे अवशेष, स्मारके, कोरीव लेख (जरी ते वाचता येतच नसले तरी) आणि शिल्पकृतीं विषयी मोठे कुतूहल होते. ह्या सर्व प्राचीन इमारती, अवशेष स्मारके यांविषयी अभ्यास करावा,



munotes.in

प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीवर संशोधनाद्वारे प्रकाश टाकावा. या हेतूने इ. स. १७८४ मध्ये काही समविचारी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेची कलकत्ता येथे स्थापना केली. या कामी कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सर विल्यम जोन्स हे अग्रणी होते. त्यांनीच भारतात पुरातत्त्वाचा पाया घातला. भारतीय पुरातत्त्वाच्या विकासाची ती मुहूर्तमेढ ठरली.

या एशियाटिक सोसायटीच्या विद्वान सदस्यांच्या सभा होत असत. त्यात ते आणि संशोधक सदस्य एकत्र येऊन मिळविलेल्या साधनांच्या आधारे भारतीय इतिहासावर शोधनिबंध वाचून त्यावर चर्चा करीत असत. अनेक नामवंतांचा या संस्थेस पाठिंबा होता. नवनवीन शोधांची माहिती या संस्थेकडे येऊ लागल्यावर त्यांना प्रसिद्धी देणे आवश्यक वाटू लागले. त्यामुळे १७८८ मध्ये या संस्थेने 'एशियाटिक रिसर्चेस' हे स्वत:चे नियतकालिक सुरु केले व त्यात संशोधनविषयक माहिती लेखरूपाने प्रसिद्ध होऊ लागली.

सुरुवातीस बहुतेक सर्व संशोधन हे पाश्चात्य संशोधकांनी केले व संशोधनावर आधारित विविध लेख लिहिले. ते शैक्षणिक क्षेत्रातील नसूनही त्यांनी ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय संशोधनाचे काम अतिशय उत्साहाने आणि चिकाटीने केले. ऐतिहासिक दस्तऐवज, कोरीवलेख, नाणी, प्राचीन शिल्पे, पुराणवस्तू इ. अवशेष गोळा करून त्यांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करणे अशी त्याची कार्यपद्धती होती.

त्यातील माहितीच्या आधारे ग्रीक वाङ्मयात उल्लेखिलेल्या भारतीय राजांच्या नावांची निश्चिती करून तत्कालीन इतिहासाची जुळणी ते करीत असत. ग्रीक वाङ्मयात 'संद्रोकोटस' या नावाने एका भारतीय राजाची माहिती आली आहे. तो संद्रोकोटस म्हणजेच भारतीय चंद्रगुप्त मौर्य होय असे निश्चित प्रतिपादन करून मौर्यकाळावर सर विल्यम जोन्स यांनी प्रकाश पाडला. त्यांनी मौर्यकाळावर मौलिक संशोधन केले व त्या आधारे संशोधकांनाही प्राचीन भारतीय इतिहाससंशोधनाच्या कामी निश्चित दिशा मिळाली.

इ. स. १८३६ - ३७ मध्ये जेम्स प्रिन्सेप या कलकत्ता येथील टांकसाळीत काम करणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्याने प्रथमतः 'अशोककालीन ब्राम्ही' लिपीचे वाचन यशस्वीपणे करून भारतीय पुरातत्त्व संशोधनाचा द्वितिय टप्पा पार केला. ब्राह्मी लिपीचे वाचन यशस्वीपणे करता आल्यामुळे ब्राह्म लिपीतील हजारो कोरीव लेखांचे वाचन होऊ त्यातील ऐतिहासिक माहिती उजेडात आली. इतिहासाचे ते एक बहुमूल्य साधन ठरले या माहितीचा उपयोग इतिहासलेखनात केल्यामुळे इतिहासात अव्वल दर्जाची माहिती समाविष्ट झाली. हे कोरीव लेख पुराभिलेख म्हणून ओळखले जातात. अर्थातच पुराभिलेख हे पुरातत्त्वाचे एक महत्त्वाचे अंग बनले.

जेम्स प्रिन्सेप यांने सर्व प्रथम 'क्षेत्रीय पुरातत्त्व' किंवा Field Archaeology या संज्ञेचा वापर केला. पुढील काळात हेच क्षेत्रीय पुरातत्त्व ही पुरातत्त्व संशोधनातील प्रमुख शाखा बनली या क्षेत्रीय पुरातत्त्वाविषयी आपण सविस्तर अभ्यास पुढील पाठात करणारच आहोत.

एशियाटिक सोसायटीचे एक सदस्य डॉ. सॅम्युअल जॉन्सन यांनी तत्कालीन गव्हर्नर जनरल श्री वॉरन हेस्टींगज यांना पुरातत्त्वीय संशोधनाचे महत्त्व पटवून दिले. तसेच शासनाद्वारे संस्कृत, पर्शियन आणि इतर भारतीय भाषा यांच्या अध्ययन आणि अध्यापनासाठी

शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. मुंबई आणि मद्रास या शहरांमध्ये एशियाटिक सोसायटीच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे पुरातत्त्वीय संशोधनास अधिक चालना मिळाली. श्री जॉन विल्सन हे एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे प्रमुख होते. मुंबईतील भाऊ दाजी लाड आणि भगवानलाल इंद्रजी या भारतीय संशोधकांनी देखील पुरातत्त्वीय संशोधनात प्रत्यक्ष सहभाग घेवून पुरातत्त्वाच्या प्रगतीस मोठाच हातभार लावला.

जसजसे पुरातत्त्वीय संशोधन हे व्यापक स्वरूपाचे होऊ लागले, तसतसे ते आता सुनियोजितपणे करावे लागेल हे जाणवू लागले. अर्थातच त्यासाठी शासकीय प्रयत्नांची आणि सहाय्याची नितांत गरज होती. याच जाणिवेतून १८६० साली भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (Archaeological Survey at India) हे स्वतंत्र खाते ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतात स्थापन केले व आलेक्झांडर कनिंगहॅम यांची महानिदेशक (सरसंचालक) म्हणून नेमणूक केली.

आलेक्झांडर कनिंगहॅम यांना 'भारतीय पुरातत्त्वाचे जनक' म्हणून संबोधले जाते. १९ व्या शतकातील ते एक प्रमुख पुरातत्त्वज्ञ होते. त्यांनी भारतात प्राचीन काळी येऊन गेलेल्या चीनी प्रवाशांच्या वृतांतातील स्थलांचे निश्चितीकरण करण्याचे काम हाती घेतले. त्यात मुख्यत्वे फाहियान आणि हयूएनत्संग यांच्या वृत्तांताचा समावेश होतो. कनिंगहॅम हे मुळात सैनिकी अधिकारी होते. शिवाय जेम्स प्रिन्सेप यांचेबरोबर त्यांनी ब्राम्ही लिपीच्या वाचनासाठी झालेल्या संशोधनातही हातभार लावला होता. त्यांनी भारतातील प्राचीन शहरे आणि स्मारकांच्या अभ्यासातही मोठा उत्साह दाखविला. या प्राचीन शहरांचे आणि वास्तूंचे पद्धतशीर सर्वेक्षण करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले व तशी योजनाच भारताचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड कॅनिंग यांच्याकडे केल्यामुळेच भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाची स्थापना झाली होती. ( इ. स. १८६१ मध्ये)

१८६१ मध्ये जेव्हा 'पुरातत्त्व सर्वेक्षण' खात्यांची स्थापना झाली, तेव्हा भारतातील प्राचीन अवशेषांची नासधूस करणे व प्राचीन स्थलांचे अवैधपणे उत्खनन करणे यांवर सरकारने कायदा करून बंदी घातली. कनिंगहॅम आणि त्यांचे सहकारी आता पद्धतशीर योजना आखू लागले. त्यांनी भारताच्या वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब आणि उत्तर हिंदुस्तानावर लक्ष केंद्रीत केले. इ. स. १८६१ ते १८६५ या चार वर्षात त्यांनी बौद्ध वास्तूचे शास्त्रशुद्ध पद्धतीने आरेखन केले. मौर्यकालीन पाषाणस्तंभ, भारहूतचा स्तूप, तक्षशीला, कौशांबी, श्रावस्ती या प्राचीन नगरांचा शोध, गुप्तकालीन मंदिरे, बुद्धगयेचे मंदिर व गुप्त सम्राटांचे लेख शोधून काढले. त्यामुळे पुरातत्त्वीय संशोधनास मोठी चालना मिळाली. त्या सर्व संशोधनास मोठी प्रसिद्धीही दिली. ती वाचून अनेक अभ्यासक, संशोधक, इतिहासतज्ञ पुरातत्त्वीय संशोधनाकडे आकर्षित झाले.

आतापर्यंत पुरातत्त्वीय संशोधनास अनेक पुरातत्त्वज्ञांचा हातभार लागला होता. त्यातील प्रमुख म्हणजे हेन्री कझेन्स, जेम्स बर्गेस आणि फर्ग्युसन हे होते. त्यांनी पश्चिम भारतातील प्राचीन वास्तूंच्या सर्वेक्षणाचे कार्य केले. त्यात प्रामुख्याने प्राचीन गुहामंदिरे (लेणीस्थापत्य) आणि मंदिराचा समावेश होता. त्यातूनच कला, स्थापत्य आणि शिल्प तसेच मूर्तिविज्ञान या एकत्रित क्षेत्रांचा पुरातत्त्वाची एक ज्ञानशाखा म्हणून स्वतंत्रपणे विकास झाला.

munotes.in

याच काळात भारतीय संस्कृतीच्या प्रागैतिहासिक कालखंडावर प्रकाश टाकण्याचाही प्रयत्न करण्यात आला. श्री ब्रूस फूट यांनी अश्मयुगीन मानवाने निर्माण केलेल्या दगडी हत्यारांचा शोध लावला. यानंतरच्या काळात विविध विद्वानांनी प्रागैतिहासिक, प्रतिऐतिहासिक, ऐतिहासिक पुराभिलेखशास्त्र, नाणकशास्त्र, शिल्पकला, चित्रकला आणि मूर्तिविज्ञान यांसारख्या पुरातत्त्वाच्या विविध उपशाखांतर्गत विशेष संशोधन करून त्यांच्या ज्ञानकक्षा विस्तृत केल्या. याचाच परिणाम होऊन यातील प्रत्येक शाखेस पुढील काळात स्वतंत्र ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त झाला.

अलेक्झांडर कनिंगहॅम यांच्या नंतर श्री जेम्स बर्गेस ह्यांची भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे सरसंचालक म्हणून नेमणूक झाली. त्यांच्या कारकिर्दीत इ.स. १८७२ मध्ये 'इंडियन अँटिक्वेरी' आणि १८८८ मध्ये 'एपिग्राफिया इंडिका' ही नियतकालिके सुरु झाली . या नियतकालिका द्वारा अनेक राजघराण्यांचे कोरीव लेख संपादन करण्याचे कार्य सुरु झाले. शिवाय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्यातर्फे जे सर्वेक्षण करण्यात येईल, त्यांचे अहवालही प्रसिध्द होत. हे अहवाल 'पुरातत्त्व सर्वेक्षण अहवाल' आणि 'न्यू इंपिरियल सेरीज' या द्वारे २० खंडांमध्ये प्रसिद्ध करण्यात आले.

इसवी सनाच्या १९ व्या शतकाच्या अखेरीस लॉर्ड कर्झन यांची भारताचे गव्हर्नर जनरल आणि व्हाईसरॉय म्हणून नेमणूक झाली. लॉर्ड कर्झन (१८९९-१९०५) यांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाची संपूर्ण पुनर्रचना केली. शिवाय या कामासाठी आवश्यक त्या तरतुदी केल्या व पुरातत्त्वे खात्याच्या कामकाजास गती प्राप्त करून दिली. कर्झन हा त्यांच्या साम्राज्यवादी धोरणांमुळे राजकीयदृष्टया अतिशय अप्रिय झाला होता. परंतु पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने त्यांने भरीव कार्य केले. भारताच्या विविध भागात अनेक महत्त्वपूर्ण स्थळे व स्मारकांच्या शोध लागला होता. परंतु त्यांचे योग्य पद्धतीने जतन व संरक्षण होत नव्हते. यासाठी लॉर्ड कर्झन यांनी १९०४ मध्ये प्राचीन स्मारके संरक्षण कायदा पारित केला व स्मारकांना संरक्षित दर्जा दिला. स्मारकांच्या नासधूस करणाऱ्यांना दंड व कारावासाच्या शिक्षेची तरतूद केली.

कर्झनने १९०४ मध्ये एक तरुण बिटिश पुरातत्त्वज्ञ सर जॉन मार्शल यांची भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या सरसंचालकपदी नियुक्ती केली. सर जॉन मार्शल यांनी १९०२ मध्ये वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी विभागाच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेतली. त्यांनी आपल्या कारकीर्दीत भारताचा एक फार मोठा संसाकृतिक ठेवा ठरेल अशा प्राचीन अवशेषांच्या उत्खननाचा आणि त्याचे जतन करण्याचा मोठाच कार्यक्रम अमलात आणला. नालंदा, सारनाथ, राजगृह, सांची, पाटलीपुत्र, तक्षशिला इ. प्राचीन नगरांचे उत्खनन केले. त्यापैकी तक्षशिला येथील उत्खाननाद्वारे इ. स. चे ५ वे शतक असा एक हजार वर्षाचा कालपट म्हणजेच इतिहास त्यांनी उजेडात आणला.

मार्शल यांच्याच काळात सिंधू संस्कृतीचाही शोध लागला. हा शोध जरी अवचितपणे लागला, तरी मार्शल यांनी पुरातत्त्वाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले असल्याने अन्वेषण आणि उत्खनन तंत्रात त्यांच्या प्राविण्यामुळे सिंधू संस्कृतीचे उत्खनन पद्धतशीरपणे केले गेले. या सिंधू संस्कृतीच्या शोधामुळे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या क्षेत्रात फार मोठे स्थित्यंतर घडून आले. कारण त्यामुळे भारतीय संस्कृतीची प्राचीनता ३००० वर्षे मागे गेली आणि

जगातील प्राचीनतम संस्कृतींच्या मालिकेत भारतातील सिंधु संस्कृतीस स्थान प्राप्त झाले आणि भारतीय पुरातत्त्वात मोठी क्रांती घडून आली.

श्री मार्शल यांच्या उत्खनन तंत्रामुळे सिंधू संस्कृतीचा शोध लागला, तरी उत्खाननशास्त्रात समकालीन जगत जे स्तरशास्त्राचे तंत्र अवलंबिले जात असे, त्या स्तरशास्त्र पद्धतीनुसार हे उत्खनन केले नव्हते. त्यामुळे सिंधू संस्कृतीचा सांस्कृतिक कालक्रम सविस्तर अभ्यासणे शक्य झाले नाही. तरीही, त्यांचे योगदान मोठे आहे. भारतीय पुरातत्त्वज्ञांची पहिली पिढी तयार करण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. त्यातील अग्रणी म्हणजेच श्री. राखलदास बैनर्जी, श्री. दयाराम साहनी, श्री. के. एन. दीक्षित, श्री. एच. जी. संकालिया इ. होत.

भारतीय पुरातत्त्वाच्या विकासाचा प्रभाव संस्थानी राज्यांवरही पडला. त्यामुळे अनेक संस्थानिकांनी आपल्या राज्यात पुरातत्त्व विभागाची स्थापना केली. त्याशिवाय काहींनी व्यक्तीशः आणि संस्थापातळीवरही पुरातत्त्वीय संशोधन हाती घेतले. अशा संस्थांमधील पुण्यातील डेक्कन कॉलेज हे अग्रेसर होते. तर वैयक्तिक पातळीवर मुंबईतील फादर हेन्री हेरास हे प्रमुख असून त्यांनी पुरातत्त्वीय संशोधनात स्वतःला वाहून घेतले होते. नंतर फादर हेरास यांच्या स्मरणार्थ मुंबईतील सेंट झेव्हियर कॉलेजद्वारा 'फादर हेरास इन्स्टिटयुट' ची स्थापना करण्यात आली.

याच काळात भारतीय उत्खननशास्त्रात अधिक शास्त्रशुद्ध तंत्राचा अवलंब कसा करता येईल, त्याचा विचार सुरु झाला. त्यासाठी मध्यपूर्वेत उत्खननाचे प्रगत तंत्र वापरून ख्यातनाम झालेले सर लिओनार्ड वुली यांना आमंत्रित केले गेले. त्यांनी भारतीय उत्खनन तंत्राचा अभ्यास करून त्यात कशी सुधारणा करता येईल याबद्दल आपला अहवाल सदर केला. त्यात त्यांनी भारतीय उत्खननतंत्रावर कठोर टीका केली व भारतातील उत्खननतंत्र हे कालबाह्य झाले असून आता युरोप व अमेरिकेत वापरात असलेले प्रगत तंत्रज्ञान भारतात वापरले जावे अशी शिफारस केली. मात्र आता पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे सरसंचालक श्री के. एन. दीक्षित यांनी कुलींच्या टीकेतील फोलपणा दाखवून दिला.

श्री. के. एन. दीक्षित यांनी आपल्या कारकार्दीत स्तरवार उत्खननपद्धतीचा वापर केला. स्तरशास्त्र पद्धतीचा अवलंब करून प्राचीन मानवी वसाहतींचे निरनिराळे एकावरील एक थर, पापुद्रे काळजीपूर्वक उलगडले . प्रत्येक स्तरातील हाती आलेले अवशेष वेगळे ठेवले व त्याची नोंद केली. त्यामुळे प्रत्येक स्तराचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे शक्य झाले व सांस्कृतिक कालपट [Cultural chronology] उलगडण्यात पुरातत्त्वज्ञांना मोठे यश मिळाले.

१९४४ साली सर मॉर्टिमर व्हीलर यांची पुरातत्त्व खात्याच्या सरसंचालकपदी नेमणूक करण्यात आली. व्हीलर हे विश्वविख्यात पुरातत्त्वज्ञ होते त्याची नेमणूक पुरातत्त्वविकासात मोठी उपकारक ठरली. व्हीलर यांनी ऐतिहासिक कालखंडाच्या पुरातत्त्वीय संशोधनास प्राधान्य दिले. त्यांनी स्वत: पाँडिचेरीजवळील अरीकामेडू या स्थळाचे उत्खनन करून प्राचीन भारत आणि रोमन साम्राज्य यांच्यातील वाढत्या व्यापारी संबंधांवर प्रकाश टाकला.

व्हीलर यांच्या कारकीर्दीत पुरातत्त्वखात्याचा विस्तार करून उत्खनन आणि अवशेषांचे जतन करण्याचा कार्यक्रम सक्षमपणे राबविला गेला. याशिवाय उत्खननात त्यांनी तरुण

संशोधकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविला. त्यानुसार उत्खननाच्या आधुनिक तंत्राचे प्रशिक्षण देण्यासाठी भारतातील विविध विद्यापीठांमधून हुशार व अभ्यासू विद्यार्थ्यांना आमंत्रित केले गेले. या विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणावर उत्खनन करून उत्खननासंबंधीचे आपले संशोधन अहवाल प्रसिद्ध केले. त्यासाठी 'एन्शंट इंडिया' आणि 'इंडियन आर्किऑलॉजी' या दोन ग्रंथमालिका प्रकाशित केल्या.

तरुण भारतीय संशोधकांना प्रशिक्षण देण्यासाठी तक्षशीला येथे एक प्रशिक्षण केंद्रही उभारले. स्वातंत्र्योत्तर काळात तर भारतीय पुरातत्त्व संशोधकाने प्रगतीच्या नवीन दालनात प्रवेश केला आहे. पुरातत्त्व विभागाची पुनर्रचना करून भारताच्या विविध भागांत पुरातत्त्वीय मंडळे स्थापन करण्यात येऊन त्यावर आवश्यक त्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. भारतीय विद्यापीठांमधूनही पुरातत्त्वशास्त्र हा एक विषय म्हणून शिकवण्यात येऊ लागला. अनेक भारतीय पुरातत्त्वज्ञांना पाश्चात्य जगात विकसित झालेले तंत्र शिकून घेण्यासाठी परदेशी पाठविण्यात आले. अशा तऱ्हेने श्री व्हीलर आणि स्वातंत्र्योत्तर काळातील पुरातत्त्वखात्याने घेतलेल्या परिश्रमांमुळे भारतीय पुरातत्त्वास आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला.

अशा तऱ्हेने पुरातत्त्वीय संशोधनाच्या क्षेत्राचा उतरोत्तर विकास होतच आहे. नवनवीन पुरातत्त्वीय शोध लागत आहेत आणि त्यामुळे अधिकाधिक पुरातत्त्वीय साधने इतिहासात लेखनासाठी उपलब्ध होत आहेत. या नव्या साधनांमुळे इतिहासातील अज्ञात दुवे मिळून अज्ञात कालखंडाच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत झाली. भारतीय पुरातत्त्वीय संशोधनामुळे प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे लेखन करणे शक्य झाले.

## ब) पुरातत्त्व आणि इतिहास; पुरातत्त्व आणि इतर शास्त्रे

## १.४ पुरातत्त्वशास्त्र आणि इतिहास

इतिहास म्हणजे गतकालीन मानवी जीवनातील घडामोडींविषयी पुराव्यांद्वारा म्हणजेच ऐतिहासिक साधनांद्वारा मिळवलेली माहिती होय. मानवी जीवनाच्या विकासातील विविध टप्प्यांचा आणि विविध पैलूंचा अभ्यास म्हणजे इतिहास होय. अशा या इतिहास विषयाचा आणि पुरातत्त्वशास्त्राचा अगदी निकटचा संबंध आहे. मानवी संस्कृतीचा अभ्यास करणे हे इतिहासाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. अगदी हेच उद्दिष्ट पुरातत्त्वशास्त्राचेही आहे. इतिहासकार हे उपलब्ध सर्व पुरावे गोळा करून विश्लेषण करून गतकालीन मानवी जीवनातील घडामोडींचा अन्वयार्थ लावतात तर पुरातत्त्व ज्ञ हे वस्तुरूप (पुरावस्तू अथवा पुरातत्त्वीय अवशेष) पुराव्यांद्वारा मानवी संस्कृतीचा अभ्यास करतात. इतिहास आणि पुरातत्त्व या दोनही विषयांचा केंद्रबिंदू म्हणजे मानवी संस्कृतींचा अभ्यास होय.

इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वाङमयीन साधने उपलब्ध असलेला काळ हा पुरातत्त्वीय साधनांच्या उपलब्धीच्या तुलनेत अगदी छोटा आहे. एका अर्थाने पुरातत्त्वाची व्याप्ती ही इतिहासापेक्षा अधिक विस्तृत आहे. कारण पुरातत्त्वीय म्हणजेच भौतिक साधने ही कैक हजार, लाख वर्षापूर्वीच्या मानवी समूहांनी निर्मिलेल्या वस्तूंद्वारा उपलब्ध आहेत तर वाङमयीन साधने मात्र काही हजार वर्षापूर्वीच विकसित झाली आहेत व तो काळ

ऐतिहासिक कालखंड म्हणून ओळखला जातो. अर्थातच, याही कालखंडातील भौतिक पुरावे उपलब्ध असतात.

अशा तऱ्हेने ऐतिहासिक कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी वाङमयीन तसेच पुरातत्त्वीय साधने उपलब्ध असतात. परंतु इतिहासपूर्व (प्रागैतिहासिक) कालखंडातही विविध मानवी समूह आणि त्यांचा संस्कृती जगाच्या वेगवेगळ्या भागांत नांदत होत्या, त्यांच्या विषयी अभ्यास करण्यासाठी कोणतेही वाङमयीन पुरावे उपलब्ध नाहीत. अशा वेळी अशा कालखंडातील मानवी संस्कृतीचा अभ्यास करण्याचे एकमात्र साधन म्हणजे पुरातत्त्वीय साधने होय. अर्थातच ही साधने आपणांस प्रयत्नपूर्वक मिळवावी लागतात आणि नेमके हेच काम पुरातत्त्वज्ञ करत असतो. मानवनिर्मित वस्तू समन्वेषण आणि उत्खननाद्वारे मिळवून, त्यांचा पद्धतशीर अभ्यास करून, त्यांचे वर्गीकरण करून, त्यातून अन्वयार्थ काढून मगच त्या पुरावस्तूद्वारे तत्कालीन मानवी संस्कृतीवर प्रकाश टाकता येतो.

आधी पाहिल्याप्रमाणे, मानवी संस्कृतींच्या विविध पैलूंचा, घटकांचा अभ्यास करणे हे इतिहास आणि पुरातत्त्व या दोन्ही विषयांचे समान हेतु असल्यामुळे या दोन्ही विषयांचा अगदी निकटचा सबंध आहे.

## १.५ पुरातत्त्व आणि इतर शास्त्रे यांचा संबंध

पुरातत्त्वशास्त्र ज्या प्रमाणे इतिहासाशी संबंधित आहे, त्याप्रमाणेच इतर अनेक शास्त्रांशी म्हणजे सामाजिक शास्त्रे आणि नैसर्गिक शास्त्रे यांच्याशी संबंधित आहे. पुरातत्त्वज्ञ हे समाजशास्त्र, अर्थशास्त्र; भूगोल इ. विविध शास्त्रांची मदत घेवून पुरातत्त्वीय अन्वेषण आणि उत्खनन करून त्याद्वारे पुरावस्तूंचा शोध घेतात. तसेच पुरावस्तूंचा अन्वयार्थ लावताना या समाजिक शास्त्रांची पुरातत्त्वज्ञांना फार मदत होते. त्यामुळे पुरातत्त्व हे या सामाजिक शास्त्रांशी संबंधित असते.

**पुरातत्त्व आणि पर्यावरण:**

पुरातत्त्व हे सामाजिक तसेच नैसर्गिक शास्त्रांना साधणारे शास्त्र असल्याचे मानले जाते. त्यामुळे सामाजिक शास्त्रांप्रमाणेच नैसर्गिक शास्त्रांशी देखील पुरातत्त्वाचे निकटचे संबंध आहेत. त्यापैकी पर्यावरणशास्त्राशी पुरातत्त्वाचा घनिष्ट संबंध आहे.

पृथ्वीचे बदलते पर्यावरण हे पुरातत्त्वाद्वारे ज्ञात होते. पुरातत्त्वीय अवशेषांद्वारे गतकाळात पृथ्वीच्या पर्यावरणात कसकसे बदल होत गेले ते आपणांस समजू शकते. पर्यावरणाचा सजीव सृष्टीवर फार मोठा परिणाम झालेला आहे. त्यामुळे पर्यावरणातील बदलांचाही सजीव सृष्टीवर परिणाम झालेले दिसून येतात. किंबहुना, मानवी जीवनाची निर्मितीच मुळी पर्यावरणाच्या बदलत्या स्वरूपामुळे झालेली आहे.

पुरातत्त्वज्ञ हा उत्खननातून ज्या पुरावस्तूंचा शोध घेतो, त्या मानवी संस्कृतीशी निगडित असतात. अर्थातच अशा वस्तू ह्या त्या त्या काळातील पर्यावरणातील घटकांशी निगडीत असतात. एखाद्या मानवी संस्कृतीचा अभ्यास करीत असताना, त्या विशिष्ट कालखंडातील सामाजिक आणि आर्थिक जीवनाचे संदर्भ समजून घेण्यासाठी तत्कालीन वातावरणाचा म्हणजेच पर्यावरणाचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. उदा. नद्या, पर्वत, पठारे, समुद्रे इ.



munotes.in

भौगोलिक घटक हे त्या-त्या भागातील जनजीवनाशी निगडीत असतात. त्यांचा मोठा प्रभाव मानवी जीवनावर पडत असतो. किंबहुना मानवी जीवन हे त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीस अनुसुरून असते आणि म्हणूनच तत्कालीन पर्यावरणाविषयी माहिती घेतल्याशिवाय तेथील संस्कृतीचा वस्तुरूप पुराव्यांच्या आधारे अन्वयार्थ लावणे कठीण असते.

बदलत्या पर्यावरणाशी मानवाने चांगलेच समायोजन केलेले आहे. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही बदलत्या पर्यावरणाचे प्रतिबिंब दिसून येते. उदा. कोकण ही महाराष्ट्राची किनारपट्टी. एके काळी संपूर्ण कोकणपट्टी ही अरबी समुद्राने व्यापलेली होती. पृथ्वीवरील पर्यावरणीय बदलांमुळे समुद्र पातळी हळूहळू कमी झाली व हा भूभाग उघडला गेला. कालांतराने या पट्टीतही मानवी वस्ती निर्माण झाल्या. हा समुद्राकाठचा प्रदेश असल्याने येथे अनेक बंदरे उदा. सोपारा, कल्याण, चौल, दाभोळ इ. उदयास आली. त्यामुळे जलमार्गाने (सागरी मार्ग) भारताचा विदेश व्यापार सुरु झाला आणि व्यापार हे येथील लोकांचे अर्थार्जनाचे साधन बनले. साहजिकच व्यापारी जमातींचा आणि दर्यावर्दी जमातींचा येथे उदय झाल्याचे दिसून येते.

पुढील काळातही येथील पर्यावरणीय बदलांमुळे काही बंदरे गाळाने भरून गेली व मानवी जीवनात परत एकदा बदल झाले. व्यापार कमी झाला. काही बंदरांचे महत्त्व लोप पावले. तसेच पर्जन्यमान जेव्हा कमी झाले तेव्हा कृषी व्यवसायावरही त्याचे परिणाम झाले. कृषीउत्पन्न घटले व जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले. या उदाहरणावरून पुरातत्त्वाच्या अभ्यासात पर्यावरणशास्त्राचा अभ्यास फारच महत्त्वाचा आहे हे दिसून येते. या क्षेत्रात विशेष संशोधन करणारी एक उपशाखाही विकसित झालेली असून तीला 'पुरातन पर्यावरण' या नावाने ओळखली जाते.

पुरातन पर्यावरणाचा अभ्यास हा इतिहास कालखंडाच्या अभ्यासाठी उपयुक्त तर ठरतोच परंतु त्याहीपेक्षा अधिक म्हणजे प्रागैतिहासिक काळाच्या अभ्यासासाठी अधिक उपयुक्त ठरतो. अर्थातच या पद्धतीने मानवी समाजाचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी इतरही अनेक शास्त्रांची माहिती आणि मदत घेणे आवश्यक ठरते.

**पुरातत्त्व आणि मानववंशशास्त्र :**

पुरातत्त्व आणि मानववंशशास्त्र यांचाही घनिष्ट संबंध आहे. प्राचीन मानवी संस्कृतीचा अभ्यास करणे हे पुरातत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तर मानवजातीच्या विकासाचा मागोवा घेणे हा मानववंशशास्त्राचाही उद्देश असतो. प्रचलित मानवी टोळ्यांचा, समूहाचा वांशिकदृष्टया अभ्यास करून त्याविषयी अधिकाधिक माहिती मिळविणे हा त्यांचा उद्देश आहे. अर्थातच मानववंशशास्त्राच्या विकासाचा मागोवा घेण्यासाठी आपणांस पुरातत्त्वाची मदत घ्यावी लागते. मानववंशशास्त्राचा अभ्यास करताना प्राचीन काळातील मानविय अस्थींचे अवशेष आवश्यक असतात. काही ठिकाणी अश्मीभूत हाडे सापडतात. अर्थातच ही हाडे मिळविण्यासाठी पुरातत्त्वीय उत्खनने करावी लागतात. खरे पहावयाचे तर पुरातत्त्वाची जी साधने आहेत, ती इतिहास, मानववंशशास्त्र, भूगर्भशास्त्र, इ. विषयांचा अभ्यास करण्याचीही साधने आहेत. पुरातत्त्वीय उत्खननांद्वारे जे अवशेष मिळविले जातात, त्यात जी हाडे, सांगाडे, कवटया इत्यादी मिळतात. त्यांचा अभ्यास करून प्राचीन काळातील मानवी

शरीररचनेविषयी माहिती मिळते. त्याचप्रमाणे या हाडांच्या सहाय्याने आपणांस विविध भागांत राहिलेल्या अथवा स्थलांतरित झालेल्या विविध मानववंश समूहांची अथवा जातींची माहिती मिळते. याविषयीचे उत्तम उदाहरण द्यावयाचे झाले तर आपणास सिंधु संस्कृतीच्या मोहेंजोदरो आणि हडप्पा या शहरांविषयी देता येईल. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात ही संस्कृती अचानकपणे उघडकीस आली. त्यानंतर तेथे पद्धतशीर उत्खनन केले गेले. या उत्खननात हाती आलेल्या अवशेषांच्या हाडे, सांगाडेही होते. अर्थातच अशा मानवी हाडे व सांगाडे यांच्या अभ्यासाद्वारे अशी माहिती मिळाली की तेथे रहाणारे लोक हे 'प्रोटो-ऑस्ट्रोलॉईड', 'मेडीटरेनियन', 'अल्पाइन' आणि 'मंगोलियन' या चार मानववंशजातींचे होते. यावरून पुरातत्त्व आणि मानववंशशास्त्र यांचा परस्परसंबंध किती घनिष्ट आहे हे आपणांस समजू शकेल.

**पुरातत्त्व आणि भूगर्भशास्त्र :**

भूगर्भशास्त्र हे पृथ्वीच्या आतील भागातील भूरचना व भूस्तरांच्या अभ्यासावर आधारित आहे. यात पृथ्वीच्या उत्क्रांतीतील विविध अवस्थांचा सूक्ष्म अभ्यास केला जातो. त्यात खडकांचे प्रकार, त्यांची उत्पत्ती, खनिजद्रव्य, माती आणि तिच्या स्तरांचा समावेश असतो.

मानव वंशशास्त्राप्रमाणे पुरातत्त्वास भूगर्भशास्त्राचीही मदत मोठया प्रमाणावर होते. कारण भूगर्भशास्त्रात स्तरपद्धतीचा मोठया प्रमाणावर अभ्यास केला जातो. या स्तरपद्धतीचा पुरातत्त्वाच्या अभ्यासास मोठया प्रमाणावर उपयोग झालेला आहे. उत्खननातील विविध थरांचा अभ्यास या स्तरपद्धतीनुसार केला जातो. शिवाय प्राचीन भूरचना, नद्या वाहण्याची दिशा, त्यांचे बदललेले प्रवाह, मानवाने निर्माण केलेल्या हत्यारांसाठी लागणारा दगड हा त्या विशिष्ट प्रदेशात उपलब्ध होता की नाही, याविषयी माहिती मिळवण्यासाठी पुरातत्त्वज्ञानास भूगर्भशास्त्राची माहिती असणे आवश्यक असते. या व्यतिरिक्त निरनिराळी खनिजे, धातू, इत्यादींची उपलब्धताही भूगर्भशास्त्राच्या अभ्यासावरून समजते. त्याचप्रमाणे पृथ्वीवर जे पर्यावरणीय बदल झालेले आहेत, उदा. विविध हिमयुगे व आंतरहिमयुगाच्या कालगणनेच्या आधारे प्रागैतिहासिक मानवी संस्कृतीची कालगणना निश्चित करणे शक्य झाले आहे.

भूगर्भशास्त्रात मातीच्या निर्मितीच्या प्रक्रियाही अभ्यासली जाते. अर्थात ह्यातून मिळणारी माहिती ही पुरातत्त्व अन्वेषण आणि उत्खननास सहाय्यकारक ठरली आहे. उदा. पुरातत्त्वीय अन्वेषणाच्या वेळी जेव्हा एखादे पांढरट, फिक्कट मातीचे, जुन्या वस्तू असलेले टेकाड / उंचवटा असलेली जागा जेव्हा संशोधकास दिसते, तेव्हा ते प्राचीन स्थळ असल्याचे अनुमान तो करतो व ते स्थळ उत्खननासाठी संभाव्य आहे हे जाणतो. कारण जेथे जेथे मानवी वसाहती अस्तित्वात आल्या तेथे तेथे मूळ काळ्या जमिनीचा रंग लोप पावून तो फिक्कट / पांढरट झाला असे दिसून येते. अशा पांढरट जमिनींच्या उंचावटयास 'पांढरीचे टेकाड' असे संबोधले जाते.

**पुरातत्त्व आणि पदार्थविज्ञान (भौतिकशास्त्र) :**

पुरातत्त्वीय संशोधनाच्या कामी भौतिकशास्त्राच्या अभ्यासाचीही फार मोठी मदत होते असे दिसून आले आहे. उदा. पुरातत्त्वीय सर्वेक्षण करत असताना प्रोटॉन चुंबक (Proton

Magnatometre) सारख्या भौतिकशास्त्रीय उपकरणांचा वापर केला जातो. याव्यतिरिक्त आणखीही काही उपकरणे व त्यांचे उपयोग पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्रोटॉन चुंबक – प्राचीन स्थळाच्या आंतरभागाची माहिती उत्खननापूर्वी मिळविता येते व त्या स्थळांचे उत्खनन करावयाचे की नाही या विषयी निर्णय घेता येतो.

२) थर्मोरेमनंट चुंबक – या उपकरणांद्वारा जेथे उत्खनन करावयाचे आहे, तेथील जमिनीत मातीपासून बनवून भाजून बनविलेल्या वस्तू उदा. मृदाभांडी, विटांनी केलेले बांधकाम इ. अवशेषांचा अदमास घेण्यासाठी मदत होते.

३) विद्युतशक्ती आणि मेट्रिक मापन पद्धती – याचाही उपयोग पुरातत्त्वीय संशोधनात केला जातो. यामुळे संशोधनास मोठी चालना मिळाली आहे.

४) 'थर्मोल्युमिनेसन्स', 'आर्किओमॅग्नेटीझम', 'पोटॅशिअम अरगॉन' इ. कालमापन पद्धती – पुरातत्त्वीय उत्खननात विविध प्रकारचे अवशेष हाती येतात. या अवशेषांचे कालमापन करण्याचे ते जमिनीच्या ज्या स्तरात मिळालेले आहेत, त्या स्तराचे कालमापन करण्यासाठी संशोधनास भौतिकशास्त्र अनेक मार्गांनी सहाय्यकारी ठरते.

**पुरातत्त्व आणि रसायनशास्त्र :**

उत्खानित अवशेषांचा अभ्यास करणे हे पुरातत्त्व ज्ञांचे काम आहे तर हे उत्खनित अवशेष आधी शुद्ध करून (साफ करून) त्यांचे जतन करण्याचे काम हे रसायनशास्त्रज्ञांचे आहे. त्यामुळेच असे म्हणता येईल की, रसायनशास्त्र हे पुरातत्त्वास सर्वात जवळचे असे नैसर्गिक शास्त्र आहे. सुरुवातीपासूनच पुरातत्त्वीय संशोधनात जी काही प्रगती होत गेली त्यात रसायनशास्त्राचा सिंहाचा वाटा आहे.

उत्खननात जे विविध अवशेष हाती येतात ते सेंद्रिय व असेंद्रिय स्वरूपाचे असतात. हे अवशेष हाती आल्यावर सर्वप्रथम ते साफसूफ करून त्यांचे जतन करावे लागते. अर्थातच त्यासाठी त्यांच्यावर विविध प्रकारच्या, म्हणजे वस्तूंचा जो प्रकार असेल, त्याप्रमाणे प्रक्रिया करावी लागते. नेमके हेच काम रसायनशास्त्रज्ञ करतात. उदा. उत्खननामध्ये लोखंडी वस्तू, उदा. कृषी अवजारे, गृहोपयोगी उपकरणे, भाले, सुऱ्या, बाण इ. वस्तू मिळतात. त्यांचे जतन करणे हे अतिशय कठीण काम असते. कारण लोखंडी वस्तूंना गंज चढलेला असतो. अशा वस्तू स्वच्छ करून त्या पूर्णपणे कोरड्या केल्या जातात व सीलबंद पॉलिथिन पिशव्यात वाळूमध्ये ठेवल्या जातात. तसेच तुटलेल्या लोखंडी वस्तू या पॅराफिन वॅक्स किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिस या रसायनांद्वारा जोडून त्या लाकडी फळीच्या आधारे ठेवतात.

या शिवाय अवशेषांचे कालमापन अनेक कालमापन पद्धती विकसित झाल्या आहेत. ज्या रसायानशास्त्राशी संबंधित आहेत. तसेच रसायनशास्त्राची आणखीही मदत म्हणजे प्राचीन स्मारके जतन करणे, अजिंठ्यासारख्या लेण्यांमधील भित्तीचित्रे जतन करणे वगैरे होय. अलिकडील काळात पुरातत्त्वीय संशोधनात 'इलेक्ट्रो-केमिकल' व 'इलेक्ट्रिक रिडक्शन' पद्धतींचा देखील वापर सुरु झाला असून 'युरेनियम नायट्रोजन' कालमापन पद्धती नावाची रसायनशास्त्राशी संबंधित अशी नवी कालमापन पद्धती विकसित करण्यात आली आहे.

**पुरातत्त्व आणि वनस्पतीशास्त्र :**

पुरातत्त्वीय उत्खननात जे विविध अवशेष हाती येतात, त्यात मानवाने वापरलेल्या विविध वस्तूंबरोबर अनेक प्रकारच्या वनस्पती आणि धान्य अथवा बियाणांचे अवशेष आढळतात. उदाहरणार्थ मोहेंजोदारो आणि हडप्पा येथे सिंधुकालीन नगरांमधील धान्य कोठारांमध्ये गव्हाचे अवशेष विपुल प्रमाणावर आढळले. त्यावरून तेथील लोकांच्या अन्नधान्यातील तो एक प्रकार होता हे आपण समजू शकतो. तसेच विविध ठिकाणांतील उत्खननात विविध धान्यांचे, बहुधा जळीत (जळालेल्या) धान्यांचे अवशेष मिळतात. त्यावरून तेथील लोकांच्या अन्नधान्याचा अंदाज आपणास घेता येतो.

याव्यतिरिक्त विविध स्तरांमधील वनस्पतींचे जे अवशेष मिळतात, त्या त्या काळातील पर्जन्यमान आणि हवामानाविषयी माहिती आपणांस घेता येते. उत्खननातील वनस्पतींच्या आधारे प्राचीन वनस्पतींचा अभ्यास करणारी 'पॅलिओबॉटनी' ही एक विशेष शाखा वनस्पतीशास्त्रात निर्माण झालेली आहे. तसेच पुरातत्त्वीय उत्खान्नांमध्ये मिळालेल्या अवशेषांवरून आपणांस कित्येक नष्टप्राय झालेल्या वनस्पतींचीही माहिती मिळते.

**पुरातत्त्व आणि प्राणिशास्त्र :**

प्राण्यांच्या शरीररचनेचा अभ्यास प्राणिशास्त्र होय. प्राण्यांच्या विविध जातींचे वर्गीकरण आणि त्याची शरीररचना या गोष्टींचा अभ्यास प्राणिशास्त्रात केला जातो. प्राचीन काळातील प्राणिजीवानाच्या अभ्यासात पुरातत्त्वाचे मोठे योगदान आहे. उत्खननातील विविध स्तरांमध्ये इतर अवशेषांबरोबरच त्या त्या काळातील प्राण्याच्या हाडांचे सांगाडे आढळतात. त्याआधारे आपण विविध काळांतील प्राणी आणि विशेषतः पाळीव जनावरांविषयीही माहिती मिळवू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्राचीन काळी अस्तित्वात असलेल्या परंतु. आज नष्ट झालेल्या डायनॉसॉर या महाकाय प्राण्यांचे सांगाडे हे पुरातत्त्वामुळेच उपलब्ध झाले आहेत. अती प्राचीन काळापासून आजपर्यंत जे प्राणी अस्तित्वात आहेत, त्यांच्या शरीररचनेतही कालानुरूप काय बदल झाले आहेत हे देखील उत्खननातील प्राण्यांच्या हाडे, सांगाडे, दात, कवटया या अवशेषांच्या अभ्यासाद्वारे आपणास सांगता येते.

**पुरातत्त्व आणि संख्याशास्त्र व संगणकशास्त्र :**

संख्याशास्त्र हे एक महत्त्वाचे शास्त्र असून जवळ जवळ प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यासासाठी ते उपयुक्त ठरते. पुरातत्त्वीय संशोधनात वेळोवेळी नवनवीन तंत्रांचा आणि पद्धतींचा अवलंब केला जाऊ लागला. त्यांपैकी एक महत्त्वाची पद्धत म्हणजे संख्याशास्त्रीय पद्धत होय. पुरातत्त्वीय अवशेषांचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करून विविध काळांतील संस्कृतीचे निश्चित स्वरूप आणि व्याप्ती यांविषयी अनुमान करता येते. पुरातत्त्वीय संशोधनात अचूकता आणण्याचे कार्य संख्याशास्त्राद्वारा सुलभ झाले आहे. या कामात अलिकडे संगणकाचा वापर होत असल्यामुळे हे काम जलद गतीने होते.

# क) क्षेत्रीय पुरातत्त्व: समन्वेषण, उत्खनन आणि कालमापनाच्या पद्धती; पुरातत्त्वशास्त्राचे महत्त्व

## १.६ क्षेत्रीय पुरातत्त्व

**प्रस्तावना :**

क्षेत्रीय पुरातत्त्व म्हणजे बाह्य क्षेत्रात जाऊन केलेले पुरातत्त्वीय संशोधन होय. क्षेत्रीय पुरातत्त्वाचेही दोन प्रकार पडतात. १) अन्वेषण किंवा पुरातत्त्वीय सर्वेक्षण आणि २) प्रत्यक्ष उत्खनन कार्य एखाद्या प्राचीन स्थलाचे उत्खनन करण्यापूर्वी त्या स्थलाचे बाह्य सर्वेक्षण करणे आवश्यक असते. अशा सर्वेक्षणास अन्वेषण असे म्हणतात. अन्वेषणांतर्गत प्रथम प्राचीन स्थलाची भौगोलिक माहिती मिळविली जाते. त्यानंतर त्या स्थलांचे भूपृष्ठ सर्वेक्षण करून तिथे मिळणारे प्राचीन अवशेष गोळा करून त्यांची नोंद केली जाते. याच अवशेषांच्या आधारे त्या स्थलांचे स्वरूप, त्यांची प्राचीनता व तेथील प्राचीन संस्कृतीवर प्रकाश टाकणाऱ्या अवशेषांची मुबलकता याविषयी अंदाज केले जातात.

**प्राचीन स्थलांची ओळख व स्थलनिश्चिती**

उत्खननापूर्वी प्राचीन स्थळे शोधून काढणे हे अत्यंत आवश्यक असते. अशा प्राचीन स्थलाचा शोध लागल्यानंतर त्याच्याविषयी भौगोलिक माहिती मिळविली जाते. त्यानंतर त्या स्थळाचे पुरातत्त्वीय संशोधन सुरु होते. अनेक प्राचीन स्थलांचा शोध हा आकस्मितपणे लागला आहे. तर काही वेळा जाणीवपूर्वक सर्वेक्षण करून तो शोध घेतला जातो., असा प्राचीन स्थलांचा शोध विविध मार्गांनी लावला जातो.

स्वतंत्र्यप्राप्तीनंतर आणि त्याहीपूर्वी आपल्या देशात रस्ते, रेल्वे मार्गांचा विस्तार, धरण बांधने, रस्ते बांधने इत्यादी विकासकामे हाती घेण्यात आली होती. अशा कामांच्या निमित्ताने जे खोदकाम केले जाते, त्यावेळी बऱ्याच वेळा प्राचीन स्थलांचा शोध लागतो. उदा. रेल्वेमार्ग बांधण्यासाठी केल्या गेलेल्या खोदकामांमुळे भारताच्या वायव्य भागात सिंधु संस्कृतीसारख्या प्राचीनतम संस्कृतीचा शोध लागला गेला.

जगातील सर्व सजीवांसाठी पाणी हे अत्यंत आवश्यक असलेली गोष्ट होय. त्यामुळे जगातील बहुतेक सर्व स्थिर नागरी संस्कृतीच्या केंद्रांचा विकास नद्यांच्या काठी झाला असल्याचे आपणांस आढळून येते. प्राचीन काळात मानवाच्या भटक्या जीवनाचा शेवट होऊन मानवाने जेव्हा एका ठिकाणी वास्तव्य करण्यास सुरुवात केली, तेव्हा पाण्याच्या उपलब्धीमुळे त्याने प्रामुख्याने नदीकाठावरील जागा निवडली व तेथे घरे बांधून वस्ती करण्यास सुरुवात केली. ही घरे मुख्यत्वे चिखल व मातीच्या कच्च्या विटांची असत. वस्तीच्या लोकांनी जवळपासच्या मोकळ्या जागेत शेती करण्यास सुरुवात केली व त्यामुळे त्यांचे आयुष्य स्थिर झाले. उपलब्ध असलेल्या मातीपासून त्यांनी भांडी बनवून तसेच हस्तकलेच्या इतर वस्तू निर्माण करून आपल्या वसाहतींची प्रगती केली. समृद्धी निर्माण केली व ही वसाहत स्थिर नागरी संस्कृतीचे केंद्र बनले.

munotes.in

त्या काळातही आजच्याप्रमाणे अनेक नैसर्गिक आपत्ती येत असत. महापूर, वणवा, साथीचे रोग, परकीय आक्रमणे इ. मुळे मानवी जीवन आणि अर्थातच मानवी वसाहती ह्या उधवस्त होण्याची शक्यता असे. अशी संकटे आल्यास माणसे आपल्या संरक्षणार्थ आपली चीजवस्तू तेथेच सोडून जे उचलून नेणे शक्य आहे, तेच बरोबर घेऊन दुसऱ्या ठिकाणी निवारा शोधीत जात असे. आपली घरे, मातीची भांडी व इतर चीजवस्तू जी सोडून जात असे त्या वस्तू आणि घरे या तेथेच राहत व घरांची पडझड होऊन त्या मातीच्या ढिगाऱ्याखाली दडल्या जात. अशा प्रकारे एकेकाळची वसाहत ही निर्जन होई. व तिथे उंचवटा अथवा मातीचे टेकाड निर्माण होत असे. असे मानवनिर्मित टेकाडचा रंग शेतजमिनीच्या काळ्या रंगापेक्षा फिक्का बनलेला असे म्हणून त्याला 'पांढरीचे टेकाड' असे म्हणत. अर्थातच असे टेकाड म्हणजे आपले पुरातत्त्वीय स्थल असते.

याचप्रमाणे अशा काही टेकाडांवर जी नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे निर्जनता आलेली असते. अशा ठिकाणची आपत्ती दूर होताच तेथे पुन्हा मानवी वसाहती झाल्याचेही दिसते. निर्जनता दूर होऊन पुनश्च नागरी जीवनास तेथे प्रारंभ होई व पुन्हा अचानक नैसर्गिक आपत्ती व पुन्हा तेथील लोकांचे स्थलांतर असे चक्र चालू असल्याचे दिसते. एखाद्या टेकाडावर जेवढया वेळा वसाहती होत आणि परत स्थलांतर होऊन भावी काळात परत नवीन वसाहत होई, तेवढया प्रमाणात अशा टेकाडांची उंची वाढत असे. जितक्या वसाहती जास्त, तितक्या प्रमाणात तेथे पुरातत्त्वीय अवशेषांची उपलब्धताही वाढत असे. अशा तऱ्हेने पुरातत्त्वीय स्थलांची निर्मिती होत असे. विविध काळात वस्ती होत असल्याने त्या स्थलात विविध काळचे अवशेष आढळतात. मानवी वस्तीच्या प्रत्येक टप्प्यानुसार टेकाडात वेगवेगळे थर निर्माण होत व त्या त्या थरात त्या - त्या काळातील संस्कृतीचे अवशेष मिळतात.

काही वेळा भूकंपासारखे उत्पात होऊन शहरेच्या शहरे अथवा मानवी वसाहती भूगर्भात गाडली जात तर काही वेळा समुद्रकाठच्या वसाहती आणि नगरे जलार्पण होत. उदा. इटालीमधील पॉम्पी हे शहर भूकंपामुळे पूर्णपणे जमिनीत गाडले गेले. तर भारतातील सौराष्ट्र किनाऱ्यावरील द्वारका हे शहर संपूर्णपणे पाण्यात बुडालेले आहे.

अशा तऱ्हेने पुरातत्त्वीय स्थलांची निश्चिती करणे हा पुरातत्त्वातील पहिला आणि महत्त्वाचा टप्पा आहे. स्थलनिश्चिती केल्यावर त्यांचे उत्खननाच्या दृष्टीने परीक्षण करून मगच तेथे उत्खननाविषयी निर्णय घेणे योग्य असते. अशा या उत्खननाविषयी पूर्वीच्या पूर्व परीक्षणास पुरातत्त्वीय अन्वेषण असे म्हणतात . त्यास क्षेत्रीय पुरातत्त्वाचा पुढचा टप्पा मानले जाते.

**पुरातत्त्वीय अन्वेषण (समन्वेषण) :**

अन्वेषण म्हणजे प्राचीन स्थलाचे प्राथमिक अथवा भूपृष्ठीय सर्वेक्षण. याचबरोबर प्राचीन अवशेषांचे अथवा स्मारकांचे, वस्तूंचे परीक्षण आणि सूक्ष्म निरिक्षण यांचाही अन्वेषणात समावेश होतो. हे अन्वेषण करणारा अभ्यासक आपल्या उद्दिष्टानुसार आणि विषयानुसार अन्वेषण करत असतो. ते वेगवेगळ्या स्वरूपाचे असू शकते. प्रागैतिहासिक संशोधनात आवड असलेले प्रागैतिहासिक स्थलांचे अन्वेषण करतील तर एखाद्यास ऐतिहासिक काळाचे अन्वेषण करावयाची आवड असेल. ज्याप्रमाणे हेतु असेल, त्याप्रमाणे पुरातत्त्वीय अन्वेषण करून त्याला हवे असलेले उद्दिष्ट साध्य करण्याचा पुरातत्त्वज्ञ करत असतो. अशा अन्वेषणांतून त्याला पुरातत्त्वीय अवशेष उदा. मृदा भांडी (मातीची भांडी), खापरांचे तुकडे,

विटांच्या भिंती, शिक्के, मुद्रा, पुतळे इ. प्राप्त होतात. प्रत्यक्ष उत्खननकार्ये तेथे करावयाचे की नाही, तेही ठरवावयाचे असते कारण काही वेळा प्रत्यक्ष उत्खनन करूनही मोठा खर्च होण्याशिवाय व वेळ वाया जाण्याशिवाय कोणतीच गोष्ट हाती येत नाही म्हणूनच पुरातत्त्वीय अन्वेषणास पुरातत्त्वीय संशोधनात अतिशय महत्त्व आहे.

एखाद्या स्थलांचे पुरातत्त्वीय संशोधन करण्यासाठी संशोधन करण्यास प्रथम त्या स्थलांच्या म्हणजे पांढरीच्या टेकाडाच्या पृष्ठभागावर आढळून येणाऱ्या अवशेषांचे परीक्षण करून त्यांची नोंद करतो. संपूर्ण टेकाडाचे सूक्ष्म निरिक्षण केले जाते. ज्या टेकाडावर मोठया प्रमाणावर अवशेष मिळवण्याची शक्यता असेल, असे स्थळच पुढे उत्खननासाठी निवडले जाते.

पुरातत्त्वीय अन्वेषण हे विविध देशांमध्ये विविध संज्ञांनी संबोधले जाते. भारतात त्यास 'अन्वेषण' म्हणतात. तर अमेरिकेत त्यासाठी 'स्थल सर्वेक्षण' किंवा 'भूभागाची पाहाणी' असे म्हटले जाते. प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ ओ. जी. एस. क्रॉफर्ड याच्या मते तर अन्वेषण म्हणजे उत्खननरहित पुरातत्त्वीय सर्वेक्षण' होय.

पुरातत्त्वीय उत्खननाचे यश हे त्यासाठी निवडलेल्या टेकाडाच्या अवस्थेवर असते. काही टेकाडांवर नंतरच्या काळात मानवी घडामोडींमुळे काही बदल होऊ शकतात. उदा. घरे बांधण्यासाठी खोदकाम झालेले असल्यास, तेथील थरांच्या पातळीत बदल होतो आणि एका स्तरातील अवशेष खालच्या स्तरात जाण्याची शक्यता असते. त्यामुळे तेथील स्तरपद्धती बदलते. इ. त्यामुळे अशा ठिकाणच्या उत्खननास स्तरशास्त्र पद्धतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे बदल न झालेले पांढरीचे टेकाड आपण उत्खननासाठी निवडले तर अधिक फायदा होतो. तसेच जेथे काही बदल झालेले आहेत अशा टेकाडांचेही उत्खनन करून आपण तेथील अवशेषांचे परीक्षण करून बरीच ऐतिहासिक माहिती मिळवू शकतो. काही ठिकाणी तर नाणी, हाडे, आणि इतर अवशेषदेखील सापडतात. अर्थातच हे अवशेष सर्वप्रथम भूपृष्ठीय सर्वेक्षणाद्वारे मिळत असतात. या अवशेषांवरून त्यांचा कालनिर्णय होत असतो. त्यासाठी कालमापनाच्या निरपेक्ष आणि सापेक्ष पद्धतींचा वापर केला जातो. विशेषतः तेथे कालनिर्णयाक अशा पुरावस्तू न मिळाल्यास तेथे आढळून येणाऱ्या विविध प्राण्याच्या हाडांद्वारे तसेच मानवी सांगाडे जर मिळाले तर त्याद्वारा कार्बन १४ पद्धतीच्या माध्यमातून त्या टेकाडावरील संस्कृतींचा काल निश्चित केला जाऊ शकतो. अर्थातच त्याद्वारे मिळणाऱ्या माहितीचे स्वरूप हे मर्यादित असते. थोडक्यात म्हणजे भूपृष्ठीय अन्वेषण अथवा सर्वेक्षणाद्वारे आपण एखाद्या  संस्कृतीचा कला तसेच तेथील लोकांच्या जीवनमानाविषयी माहिती जरी सखोल आणि सविस्तर नसली तरी ती मिळवू शकतो.

**प्राचीन स्थलांविषयी ऐतिहासिक माहिती :**

प्राचीन स्थलांचे अन्वेषण सुरु करण्यापूर्वी प्रथम संशोधकाने त्या स्थलाविषयी भौगोलिक आणि ऐतिहासिक माहिती मिळविणे आवश्यक असते. अशा प्राचीन स्थलांची / टेकाडांची माहिती आपण सर्वेक्षण नकाशांद्वारे (Survey Maps) मिळवू शकतो. भारतीय सर्वेक्षणाद्वारे हे नकाशे प्रकाशित होतात. त्याद्वारे विशिष्ट स्थलविषयी भौगोलिक माहिती एकत्र करता येते, हे नकाशे १ इंचास १ मैल या मोजमापाप्रमाणे बनविलेले असून त्यात नद्या, त्याची वळणे, गाळे, पर्वत, मैदान, जंगले, पानवठयाच्या जागा, गुंफा, प्राचीन मंदिरे, सध्या निर्जन

झालेल्या वस्त्या ही वैशिष्टये दाखविलेली असतात. त्या विशिष्ट प्रदेशातील जमिनीचा उंच - सखलपणा तेथील नदी अथवा पाणवठ्याच्या पातळीपासून निरनिराळ्या प्रदेशाची उंची, नदीच्या काठचे थर, नदीच्या कडेच्या छेदाची उंची यांसारखी भूविज्ञान विषयक वैशिष्टयेही अशा नकाशांमध्ये पहावयास मिळतात. शिवाय तेथील प्रमुख रस्ते राज्य व राष्ट्रीय महामार्ग, रेल्वेमार्ग, प्रमुख स्टेशन तेथील हॉटेल व तेथील विश्रामगृहे इ. विषयी माहितीही मिळते. अशा तऱ्हेने संशोधकास नकाशांच्या मदतीने प्राचीन टेकाडांनविषयी माहिती तर मिळतेच परंतु तेथे कसे पोहोचावे याविषयीही उत्तम मार्गदर्शन होते.

अशा तऱ्हेने प्राचीन स्थल निश्चित करून अन्वेषण करत असताना, त्या स्थलाच्या गत इतिहासाविषयी वाङमयीन साधने, जी उपलब्ध आहेत त्याद्वारे अथवा तेथील स्थानिक आख्यायिकांद्वारे सखोल माहिती मिळवावी लागते. अनेक वेळा ऐतिहासिक माहिती कोरीव लेखांद्वारे मिळत असते. अर्थातच अशी माहिती फक्त ऐतिहासिक माहिती कालखंडातील स्थलाच्या अन्वेषणासाठी मिळते. प्राचीन धर्मग्रंथ आणि लोकवाङ्मयात तत्कालीन अनेक नगरे व गावांचे उल्लेख आढळतात. उदा. रामायण, महाभारत, पुराणे, बौद्ध, जातककथा इ. सारख्या ग्रंथांमधून प्राचीन स्थलांचे उल्लेख येतात. शिवाय अनेक धार्मिक तीर्थक्षेत्रांची माहितीही त्यात येते. अशा स्थलांचा शोध लावणे आणि त्याविषयीची अधिक माहिती प्राप्त करणे संशोधक करत असतात. अशा स्थलांविषयी अधिकाधिक माहिती मिळवून त्याद्वारे अन्वेषण करून उत्खननाविषयी निर्णय घेणे शक्य असते.

प्राचीन स्थलांविषयी बरीच ऐतिहासिक माहिती आपणांस कोरीव लेखांद्वारे मिळते. विशेषतः शिलाशासनांत आणि ताम्रपटांमधून भूमिदान आणि ग्रामदानांचे उल्लेख फार मोठ्या प्रमाणावर आढळतात. अशा दान दिलेल्या गावांची माहितीही त्याच्या चतु:सीमांसह दिलेली असते. त्यामुळे बऱ्याच प्राचीन गावांची माहिती आपणांस मिळत असते.

ऐतिहासिक माहिती प्राप्त करून घेण्यासाठी आपणांस परकीयांची इतिवृत्तेही अतिशय उपयुक्त ठरतात. प्राचीन काळापासूनचे भारताचे पाश्चात्य जगाशी मोठे व्यापारी संबंध होते हे एक ऐतिहासिक सत्य आहे. प्राचीन काळापासूनच भारतात अनेक परकीय प्रवासी आणि राज्यकर्ते येवून गेले. त्यांनी आपल्या इतिवृत्तांतून भारतातील अनेक प्राचीन स्थलांचे उल्लेख करून त्यांविषयीचे वर्णनही केलेले आढळते. उदा. मेगॅस्थेनिसचे 'इंडिका', चीनी प्रवासी फाहियान, ह्युएनत्संग, इत्सिंग, तसेच नंतरच्या काळात आलेला आल्बेरुनी व इतर प्रवासी यांनी भारताविषयक जे अहवाल किंवा इतिवृत्ते लिहून ठेवली आहेत ती पुरातत्त्वीय सर्वेक्षणात (प्राचीन स्थलांच्या) अतिशय उपयुक्त ठरलेली असून त्यातील चीनी प्रवासवृत्तांतामध्ये उल्लेख असलेल्या प्राचीन स्थलांचे संशोधन खुद्द आलेक्झांडर कनिंगहॅम यांनी केले होते. तसेच टॉलेमीने लिहिलेल्या ग्रंथात भारताच्या भौगोलिक परिस्थितीचा काही उल्लेख केलेला आहे. सर्व परकीय इतिवृत्तांमध्ये अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या शतकात 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या एका अज्ञात ग्रीक खलाशाने लिहिलेल्या ग्रंथात ग्रीसचा भारताबरोबर चालत असणाऱ्या व्यापाराविषयी बरीचशी माहिती मिळते. ग्रीसपासून निघून नंतर काहीं काळ भूमार्गाचा वापर करून तेथून तांबड्या समुद्रात व्यापारासाठी जहाजावर माल चढविला जाई व तेथून तो मोसमी वाऱ्यांच्या अनुकुलतेमुळे भारताच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत यावयाचा मार्ग, या मार्गावरील बंदरे, बंदरात आयात-निर्यात होणारा माल, तो माल जेथून येत असे ती औद्योगिक शहरे

व्यापारी पेठा व एकंदरच अतिशय बहुमोल अशी माहिती मिळते. अर्थातच पुरातत्त्वीय सर्वेक्षणात अशी माहिती अत्यंत मोलाची ठरते.

वाङ्मयीन अथवा कोरीव लेखांच्या व्यतिरिक्त काही स्थलांना पौराणिक दृष्टीने महत्त्व असते व त्या गावांविषयी आख्यायिका अथवा पौराणिक परंपरा रूढ असतात. त्या लिखित स्वरूपात नसल्या तरी त्या पुराणसंशोधकास उपयुक्त ठरतात. कारण अशा पुराणकथांमागे काही ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक घटना लपलेली असते व त्या घटना ह्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने सांगितल्या जात असतात. म्हणून पुरातत्त्व संशोधकास एखाद्या स्थलाविषयी अशा परंपरांची माहिती मिळाली. तर ती त्यांनी जाणून घेणे व त्यामागील ऐतिहासिक घटनेचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

**पुरातत्त्वीय सर्वेक्षण / अन्वेषणाचे साहित्य :**

पुरातत्त्वीय अन्वेषणाला निघणे ही एकतऱ्हेची मोहीमच असते. अर्थातच उत्खननापूर्वी अन्वेषण करणे हे अत्यंत महत्त्वाचे काम असून ते अत्यंत काळजीपूर्वकरित्या केले पाहिजे. अर्थातच अन्वेषकाने या मोहिमेवर जाताना सुसज्ज असले पाहिजे. त्यासाठी खालील साहित्य बरोबर नेणे जरुरीचे असते.

१) मोजणी टेप.

२) उत्खनन सुरी.

३) दिशादर्शक यंत्र .

४) विविध वस्तू सामावल्या जातील अशी मोठी जाड वीणाची पिशवी किंवा पिशव्या.

५) मृदा भांड्यांचे तुकडे म्हणजेच मातीची खापरे ठेवण्यासाठी छोट्या छोट्या कापडी पिशव्या .

६) सर्वेक्षणातील इतर छोट्या वस्तू म्हणजे मणी, बांगड्या वगैरे ठेवण्यासाठी पॉलिथीनच्या पिशव्या.

७) प्रवासात सहजपणे बाळगता येईल असा कॅमेरा व इतर फोटोसाहित्य .

८) स्थलांची सविस्तर माहिती ज्यात नोंदवली आहे ती वही किंवा डायरी नकाशा व इतर लिखाणाचे साहित्य.

९) प्रथमोपचार पेटी.

१०) शक्य असल्यास स्वतंत्र वाहन.

११) अन्वेषणाचे स्थल अतिशय निर्जन अथवा दुर्गम ठिकाणी असेल तर जेवणाखाण्याची सोयही स्वतःलाच करावी लागते. त्यासाठीही आवश्यक तो शिधासामुग्री घ्यावी लागते.

munotes.in

या व्यतिरिक्त स्थलांचे आणि कामाचे स्वरूप जसे असेल तशी काही विशिष्ट सामुग्रीही घ्यावी लागते. अलिकडील काळात विविध शास्त्रीय उपकरणे (उदा. प्रोटॉन मॅग्नेटोमीटरसारखी) उपलब्ध असून त्यांचाही पुरातत्त्वीय संशोधनात मोठाच उपयोग होतो.

थोडक्यात सांगावयाचे झाले तर प्राचीन स्थलांच्या पुरातत्त्वीय सर्वेक्षणाचे माध्यम म्हणून पुरातत्त्वीय अन्वेषणास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः ज्या ठिकाणी उत्खनन शक्य अथवा इष्ट नसते, अशा स्थलांच्या पुरातत्त्वीय अभ्यासास फक्त अन्वेषणच उपयुक्त ठरते आणि म्हणून अन्वेषणास उत्खननरहित पुरातत्त्व म्हणून ओळखले जाते.

**पुरातत्त्वीय उत्खनन :**

ज्या स्थलाचे उत्खनन करावयाचे आहे, त्यांचे संपूर्ण सर्वेक्षण आवश्यक ठरते. किंबहुना पुरातत्त्वीय स्थलांचे अन्वेषण केल्यानंतर आणि ते स्थल उत्खनन करण्याच्या दृष्टीने योग्य असल्याची खात्री पटल्यानंतर तेथे उत्खनन करण्यात येते. उत्खनन ही अतिशय खर्चिक बाब असून त्यासाठी भरपूर वेळ आणि मनुष्यबळ आवश्यक असते. उत्खनन हे पद्धतशीर खोदकाम असते. त्याची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**पुरातत्त्वीय उत्खननाची वैशिष्टये -**

१) पुरातत्त्वीय उत्खनन हे निश्चित उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेऊन केले जाते.

२) असे उत्खनन अत्यंत काळजीपूर्वक केले जाते. उत्खननात मिळणाऱ्या सर्व पुरावस्तुंचे चांगले जतन केले जाते.

३) पुरातत्त्वीय उत्खनन हे अत्यंत नियोजनबद्ध असते.

४) संपूर्ण उत्खनप्रक्रियेविषयी सविस्तर नोंद ठेवली जाते. अशा नोंदीमुळे पुढील काळात तेथेच उत्खनन हाती घेणाऱ्या संशोधकास ती माहिती उपलब्ध होऊ शकते.

५) अशा उत्खनित स्थलांची पर्यावरणीय परिस्थितीचीही नोंद केली जाते की जेणेकरून त्या पर्यावरणात तेथील जनजीवनाचे समायोजन कसे झाले असेल याविषयी अंदाज येतो.

६) सर्व उत्खननांचे अहवाल प्रसिद्ध केले जातात.

उत्खननातील कर्मचारी प्रत्यक्ष उत्खननाच्या मोहिमेत विविध क्षेत्रांत प्राविण्य आणणाऱ्या तंत्रज्ञ शास्त्रज्ञांचा समावेश असतो. त्याशिवाय आवश्यक तो कर्मचारीवर्गही असावा लागतो या सर्वांना उत्खनन पूर्ण होईपर्यत उत्खननस्थलावर मुक्काम करणे आवश्यक असते. या कर्मचारीवर्ग पुढीलप्रमाणे असतो.

१) मोहिमेचा प्रमुख संचालक - तोच उत्खननकार्याचा प्रमुख अधिकारी असतो.

२) उपसंचालक - संचालकाचा सहाय्यक.

३) उत्खनन सहाय्यक अथवा तांत्रिक सहाय्यक.



munotes.in

४) स्थलनिरीक्षक हा तांत्रिक सहाय्यकाचा मदतनीस असतो.

५) मृदाभांड्यांचा सहाय्यक (मृदाभांड्यांची जबाबदारी सांभाळणारा ).

६) अवशेष सहाय्यक (अवशेषांचे जतन करणारा).

७) छायाचित्रकार - छायाचित्रे काढणारा.

८) सर्वेक्षक - भूपृष्ठाचे सर्वेक्षण करणारा.

९) नकाशाकार - उत्खननाच्या योजनेचा, स्थलाचा नकाशा बनविणारा.

१०) मार्क्समन - घेतलेल्या खड्ड्यांमध्ये विविध थरांवर खुणा करणारा.

११) भांडारप्रमुख - उत्खननाच्या ठिकाणी असलेल्या सर्व साधनसामुग्रीची जबाबदारी यांच्यावर असते.

१२) रसायनशास्त्रज्ञ - उत्खननातील वस्तूंवर रासायनिक प्रक्रिया करून त्यांचे जतन करतात.

१३) मजूरवर्ग - प्रत्यक्ष खोदकाम करण्यासाठी पगारी मजूर भारतात नेमले जातात.

**उत्खननाच्या पद्धती :**

पुरातत्त्वीय उत्खनन हे पुरातत्त्वीय संकेत आणि तंत्राच्या आधारे केले जाते. स्थलांचे स्वरूप आणि उत्खननाची उद्दिष्टये यांना अनुसुरून उत्खननासाठी पद्धती ठरविली जाते. उत्खननाचे मुख्य प्रकार म्हणजे १) चाचणी खड्डा घेणे, २) उभे अथवा उत्सेध उत्खनन आणि ३) आडवे अथवा आयात उत्खनन. या तीन प्रमुख प्रकारांव्यतिरिक्त प्रत्येक सत्राचे संपूर्ण उत्खनन संपवल्यावर मगच पुढील थराचे उत्खनन हाती घेतले जाते तसेच स्तूप अथवा टेका डाचे उत्खनन करण्यासाठी काही विशिष्ट पद्धतींचा अवलंब केला जातो.

**चाचणी उत्खनन -** एखाद्या स्थलाचे स्वरूप आणि अवशेष क्षमता जाणून घेण्यासाठी करण्यात येणाऱ्या खोदकामास चाचणी उत्खनन किंवा खड्डा असे म्हणतात. वास्तविक पाहता चाचणी खड्डा घेतानाचे उद्दिष्टये म्हणजे तेथील अवशेष क्षमता जाणून घेणे.

चाचणी खड्डा घेत असताना उत्खननाच्या टेकाडावर साधारणपणे मध्यावर वरपासून खालपर्यंत एक लहान आकाराचा खोल खड्डा खोडला जातो. त्या ठिकाणी निरनिराळ्या थरांचे निरिक्षण करून त्यातील अवशेषांची नोंद ठेवली जाते. असे चाचणी खड्डे अगदी तळापर्यंत म्हणजे ज्या खोलीवर मानवी वसाहतींचे पुरावे मिळणे बंद होते तेथेपर्यंत खड्डा घेतला जातो. अशा चाचणी खड्ड्यांचा हेतु हा तेथील अवशेषांचे स्वरूप व त्यांचा ढोबळमानाने क्रम जाणणे हा असतो. त्यामुळे अशा उत्खननास वेळ आणि खर्चही कमी येतो.

**उभे (उत्सेध) उत्खनन :**

उभे उत्खनन हे उत्सेध उत्खनन म्हणूनही ओळखले जाते. निवडलेल्या प्राचीन स्थळांचे अथवा पांढरीच्या टेकाडाचे वरपासून तळापर्यंत करण्यात येणारे खोदकाम म्हणजे उभे उत्खनन होय. या पद्धतीत प्राचीन स्थळाच्या विविध भागात आयताकृती खड्ड्यांची आखणी करण्यात येते व त्याप्रमाणे वरपासून खालपर्यंत जेथे नैसर्गिक मातीचा स्तर लागेपर्यंत त्या खड्ड्यात खोदकाम केले जाते.

अशा तऱ्हेने आयताकृती खड्ड्यांमध्ये चारही बाजूंनी विविध मातीचे थर एकावर एक स्पष्टपणे दिसतात. त्यामुळेच तेथील स्तरपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी अशा प्रकारचे उत्खनन अत्यंत ठरते. एखाद्या स्थलावर सर्वात प्राचीन स्तर म्हणजे खोदकामातील सर्वात खालचा स्तर होय. तेथील सर्वात प्राचीन मानवी वसाहत कोणती? तेथे ती वसाहत स्थलांतरित झाली का? त्यानंतर तेथे दुसऱ्या वसाहती आल्या का? एकावर एक असलेले स्तर हे विविध सांस्कृतिक गट अथवा विविध ठिकाणाहून आलेले आहेत का? अशा तऱ्हेच्या प्रश्नांना उभ्या उत्खननाद्वारे उत्तर मिळते. म्हणजेच एखाद्या प्राचीन स्थलाचा सांस्कृतिक क्रम जाणून घेण्यासाठी अशा उत्खननाचे कार्यक्रम हाती घेतले जातात.

उभ्या उत्खननकूपाचे खोदकाम हे अत्यंत काळजीपूर्वक केले जाते. उदा. दायमाबादचे उत्खनन हे उभ्या पद्धतीने केल्यावर तेथील सांस्कृतिक क्रम आपण जाणून घेऊ शकतो. तसेच मोहेंजोदारो येथील उत्खननातील उभ्या उत्खनित कूपांतून (खड्ड्यातून) एकूण सात थर एकावर एक असलेले आढळले. त्यावरून तेथे एकाखाली एक अशी सात गाडलेली शहरे आहेत हे सिद्ध झाले. प्रत्येक थराची काही वेगवेगळी वैशिष्ट्ये होती. म्हणून प्रत्येक थर हा एक विशिष्ट कालखंड होता असे जाणून घेऊन तेथील सांस्कृतिक क्रम सुस्पष्ट झाला.

**आडवे उत्खनन (आयात पद्धत) :**

आडवे उत्खनन हे ग्रिड किंवा समांतर पद्धती म्हणून ओळखली जाते. आडव्या उत्खननात दोन उपपद्धतींचा वापर केला जातो. पहिली समांतर पद्धती असून या पद्धतीनुसार समांतर रेषेत अनेक चौकोनी खड्डे करून ते तळापर्यंत खोदले जातात. तर दुसऱ्या पद्धतीत केवळ काही खड्डे न घेता संपूर्ण स्थलाचेच आडवे उत्खनन केले जाते. उदा. मोहेंजोदडो, लोथल, तक्षशीला, नागार्जुनकोंडा वगैरेसारख्या प्राचीन नगरांचे उत्खनन या पद्धतीने केले गेले. त्यामुळेच त्या संपूर्ण नगरांचे मूळ स्वरूप कसे असावे, याविषयी अंदाज बांधता आला. त्यातूनच प्राचीन नगररचनेचा अभ्यास करता आला.

अशा स्थळांचे उत्खनन आयात पद्धतीने करतात. उत्खनन तंत्रानुसार काही समभुज अथवा समांतर चौकोनांची आखणी केली जाते. बहुधा ५ मीटर १० मीटर मध्ये खड्डे खोदले जातात तर प्रत्येक चौकोनाची व्यवस्थित आखणी करून प्रत्यक्ष उत्खननात सुरुवात केली जाते. यापैकी प्रत्येक खड्ड्यासाठी एका स्थलपर्यवेक्षकाची गरज असते.

आयत उत्खननाची पद्धत ही जेव्हा फार मोठ्या क्षेत्रफळाचे उत्खनन करावयाचे असते, तेव्हा उपयुक्त ठरते.

**स्ट्रिपिंग पद्धत :**

वरील तीन मुख्य पद्धतींशिवाय आणखी काही पद्धती उत्खननाच्या काही उपयोगात येतात. त्यापैकी एक म्हणजे स्ट्रिपिंग पद्धत होय. या पद्धतीत विशिष्ट स्थलाचा एक स्तर खोदला जातो. त्या स्तरातील अवशेषांचा बारकाईने अभ्यास करून त्याविषयी नोंद ठेवली जाते आणि त्यानंतरच त्याच्या खालील दुसऱ्या स्तराचे उत्खनन केले जाते. जास्तीत जास्त स्तराचे कमीत कमी वेळेत आणि खर्चात उत्खनन करावयाचे असते तेव्हा ही पद्धत उपयोगात आणतात.

**क्वाड्रंट पध्दत : (Quadrent Method स्तूप, टेकडी यांच्या उत्खननाची पद्धत) :**

क्वाड्रंट पध्दत अथवा चतकोर पद्धत ही उत्खननाची आणखी एक पद्धत असून तिचा उपयोग वर्तुळाकार टेकाड किंवा स्तूप यांच्या उत्खननासाठी केला जातो. सर्वसाधारणपणे स्तूप-टेकडीचा आकार गोल असतो. अशा टेकाडाच्या आतील स्तूपाच्या अवशेषांना बाधा पोहोचू नये म्हणून त्या वर्तुळाकार, वर निमुळती होत जाणाऱ्या टेकडीची विभागणी चार उभ्या भागांत करून एका वेळी त्यातील एक चतकोर म्हणजे एक चतुर्थांश भागाचे उत्खनन केले जाते. अशा उत्खननात स्तर पध्दती किंवा इतर अवशेष मिळण्याची शक्यता नसते. कारण त्या ठिकाणी विटांचा घुमटाकार बौद्ध स्तूप किंवा टेकाडाच्या आत गाडला गेलेला असतो. या प्रकारच्या उत्खननाचे उदाहरण म्हणजे नालासोपाऱ्याजवळ झालेले स्तूपाचे उत्खनन. ह्या उत्खननात इ.स.पहिल्या दुसऱ्या शतकात बांधल्या गेलेल्या स्तूपाचे संपूर्ण अवशेष हाती आले आहेत.

अशा तऱ्हेने उत्खनन करणे हे मोठे तयारीचे काम असते आणि त्यासाठी अतिशय दक्ष असा कर्मचारी वर्ग असला पाहिजे. योग्य ती पद्धत विशेषत: उत्खननाचा हेतू आणि उद्दिष्ट्ये ध्यानात घेऊन निवडली पाहिजे आणि त्यानुसार पद्धतशीर उत्खनन केले पाहिजे.

**कालमापन पद्धती :**

पुरातत्त्वीय उत्खननात उत्खनित अवशेषांच्या कालमापनास किंवा कालनिश्चितीस अतिशय महत्त्व असते. त्यासाठी दोन प्रकारच्या कालमापन पद्धतींचा प्रामुख्याने वापर होतो, त्या म्हणजे –

१) निश्चित कालमापन पद्धती

२) सापेक्ष अथवा तौलनिक अथवा कालमापन पद्धती

**निश्चित कालमापन पद्धती :**

या पद्धती द्वारे अवशेषांचे निश्चित आणि अचूक कालमापन ठरविणे शक्य असते. कारण या पद्धतीत कोरीव लेख अथवा नाणी यांसारख्या काल सूचित करणाऱ्या निश्चित साधनांची मदत घेतली जाते. बऱ्याचशा नाण्यांवर राजाचे नाव, काही वेळा विशिष्ट संवत अथवा राजाच्या राज्याभिषेक वर्षाच्या काळाचा उल्लेख असतो. त्यामुळे उत्खननात ही नाणी ज्या थरात आढळतात. त्या थराचा काळ निश्चित होतो. नाण्यांवर काहीवेळा राजा व राजवंशाचे नाव असते पण काळाचा उल्लेख केलेला नसतो. तरीही ह्या नाण्यांच्या थरात आढळलेले



munotes.in

अवशेष त्या राजवंशाचा कालखंड निश्चित करतो. विशेषत: ज्या राजवंशाचा ऐतिहासिक साधनांच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे. त्यांच्या नाण्यावर काळाचा उल्लेख नसला तरी काळ सांगता येतो. उदा. सातवाहन राजांच्या बहुतेक नाण्यांवर काळाचा उल्लेख नाही, तरी त्या राजवंशाचा काळ निश्चित असल्यामुळे त्यांचा म्हणजे ज्या थरात ती नाणी सापडतात त्यातील इतर अवशेषांचा काळ आपण सांगू शकतो.

कोरीव लेखांचे तर कालमापनासाठी अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण प्रत्यक्ष काळाचा उल्लेख असो वा नसो, त्यांच्या लिपीच्या वळणावरून आपणांस तो काळ ओळखता येतो. व ज्या स्तरात हे कोरीव लेख सापडतात त्या स्तरातील इतर अवशेषांचा काळ ठरवता येतो. परंतु उत्खननात कोरीव लेख आणि नाणी सापडतातच असे नसल्यामुळे पुरातत्त्वास इतर म्हणजे सापेक्ष अशा कालमापन पद्धतीवर अवलंबून राहावे लागते.

**सापेक्ष अथवा तौलनिक कालमापन पद्धती :**

अशा सापेक्ष पद्धती ह्या कालमापनाच्या कामी उपयुक्त असल्या तरी, निश्चित कालमापनाच्या तुलनेत त्या निश्चित व अचूक काळ काही सांगू शकत नाहीत त्यामुळे त्यांच्या आधारे केलेले कालमापन हे काही शतके कमीअधिक होऊ शकते. त्यामुळे अशी कालनिश्चिती केवळ ढोबळ मानानेच सांगता येते.

**प्रकाराधिष्ठित कालमापन पद्धती :**

या पद्धतीत उत्खननात सापडणारे अवशेष, त्यांचे प्रकार, आकार व सापडणाऱ्या इतर अवशेषांच्या आधारे वर्गीकरण केले जाते. उदा. भारतातील लोहयुग हे इसवीसनपूर्व ६ व्या शतकापासून सुरु झाले असे समजले जाते. त्यामुळे लोखंडी वस्तू उत्खननात आढळल्यास त्यांचा काळ हा इसवीसनपूर्व ६ व्या शतकानंतरचा ठरवण्यात येतो व अर्थातच ज्या स्तरात त्या वस्तू आहेत, त्यांचा बरोबरच्या इतर अवशेषांचा काळही इसवीसनपूर्व ६ व्या शतकाच्या नंतरचा ठरविला जातो.

या पद्धतीनुसार जे निष्कर्ष काढण्यात येतात त्यात फारशी अचूकता नसते. व केवल ढोबळमानानेच त्यांचे वर्गीकरण आपण करू शकतो व अशी कालगणना इतर साधनांद्वारे जेव्हा सिद्ध होते तेव्हाचा ती निर्णायक म्हणून स्वीकारली जाते.

**स्तराधिष्ठित कालमापन पद्धती :**

स्तरशास्त्र ही पद्धत भूगर्भीय स्तरपद्धती सिद्धांतावर आधारीत आहे. आजच्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जी जमीन दिसते ती विविध पदार्थांनी मिळून बनलेली आहे. तिची प्रक्रिया हजारो, लाखो वर्षाच्या काळात घडलेली आहे. विल्यम स्मिथ या शास्त्रज्ञाने तिचा प्रथम प्रयोग केला त्यामुळे तिला 'स्ट्रॅटस् स्मिथ' पद्धत म्हणून संबोधले जाते. याच पद्धतीचा वापर नंतर पुरातत्त्वीय उत्खननामध्ये केला जाऊ लागला. जेव्हा कालमापनासाठी इतर कोणतेही साधन नसते तेव्हा अशा स्तरशास्त्रपद्धतीला कालमापनाचे साधन मानले जाते. या पद्धतीनुसार उत्खननातील विविध स्तरांमधील मानवी वसाहतींचे पुरावे अभ्यासले जातात. त्यांचा सखोल अभ्यास केला जातो. उत्खनन कूपात एकूण किती स्तर आहेत बघून प्रत्येक स्तराची घडण ही सुमारे ५०० वर्षांच्या काळात होते हे गृहीतक मांडले जाते. अर्थातच

जेवढे स्तर असतील त्यास ५०० ने गुणून त्याप्रमाणे विविध स्तरांचे कालमापन केले जाते. अशा तऱ्हेने स्तरशास्त्र पद्धतीचा कालमापनासाठी उपयोग होतो.

**कार्बन कालमापन पद्धती :**

हि पद्धत रसायनशास्त्रीय सिद्धांतावर आधारित असून ती 'सी – १४' या नावाने ओळखली जाते. अमेरिकेतील शिकागो विद्यापीठातील शास्त्रज्ञ डॉ.एफ.डब्ल्यू.लिबी यांनी १९४८-४९ साली तिचा शोध लावला या शोधामुळे पुढे त्यांना रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषिकही देण्यात आले. ही पध्दत पुढीलप्रमाणे :

पृथ्वीवरील प्रत्येक सजीव गोष्ट म्हणजे प्राणी अथवा वनस्पती या जिवंत अवस्थेत असताना हवेतील कार्बनडायऑक्साईड आत्मसात करण्याची सचेतन सेंद्रिय वस्तूंची ही क्रिया सतत चालूच असते या कार्बन डायऑक्साईडमध्ये कार्बन १४ या नावाचा घटक असतो. हा घटक म्हणजे कार्बन १४ हे किरणोत्सर्गी आहे. प्राणी जीवंत असताना एकीकडे त्याच्या शरीरात कार्बन १४ प्रवेश करीत असतो व त्याचवेळी त्या घटकाच्या किरणोत्सर्जनाची प्रक्रिया चालूच असते.

ज्यावेळी प्राणी व वनस्पती मृत्यू पावतात त्यावेळी त्यांच्या शरीरात कार्बन १४ ग्रहण करण्याची क्रिया प्रक्रिया थांबते व जिवंतपणी जो कार्बन १४ घटक शरीरात साठलेला असतो त्याचे विघटन सुरूच राहते. विविध तऱ्हेच्या सजीव गोष्टीत म्हणजे पशुपक्षी यात जिवंत असताना तिच्यातील कार्बन १४ घटकाचे प्रमाण किती असेल म्हणजेच तिच्यातून किती प्रमाणात किरणोत्सर्जन होत असेल याचे आडाखे शास्त्रज्ञानी बांधलेले आहेत. सचेतन वस्तू अचेतन झाल्यावर तिच्यातील कार्बन १४ हा घटक बाहेर पडतो. व जिवंतपणी असलेला कार्बन १४ चा अर्धाभाग मृत्यूनंतर ५५६८ वर्षांनी नाहीसा होतो. या कालावधीला कार्बन १४ घटकाचे अर्धे आयुष्य असे म्हणतात. (Hife Life)

कार्बन १४ घटकाचा ३/४ भाग २ अर्धा आयुष्यानंतर नाहीसा होतो व याच गतीने पूर्णपणे नाहीसा होतो. आधुनिक काळातील कार्बनच्या किरणोत्सर्जनाची तुलना मृत प्राण्याच्या किरणोत्सर्जनाशी केली जाते व यावरून त्या प्राण्याचा मृत्यू केव्हा झाला हे ठरवता येते.

स्थूलमानाने सांगायचे झाले तर सजीव प्राणी अथवा वनस्पती मृत झाल्यावेळी जेवेढे किरणोत्सर्जन होत असेल त्याच्या निम्मेच उत्सर्जन ५५६८ वर्षांनी होते. पुढील ५५६८ वर्षांनी त्याच्याही निम्मे उत्सर्जन होते म्हणजेच उत्सर्जनाचे प्रमाण व वेग कमी कमी होत जातो. अखेर ७० हजार वर्षांनी उत्सर्जन जवळ जवळ थांबते. अर्थातच या माहितीचा उपयोग करून उत्खननात सापडलेल्या सेंद्रिय अवशेषातून किती प्रमाणत उत्सर्जन होत आहे तिचा काळ सांगता येतो. उत्खननात जळालेल्या स्वरूपातील धान्य, लाकडी तुकडे व कापड, कापडाचे तुकडे, वस्तू शेण, हाडे, शिंपले इत्यादी सर्व सेंद्रिय पदार्थांचे कालमापन या पद्धतीद्वारे करता येत.

कार्बन १४ पद्धतीने उत्खननातील वस्तूंचे पृथक्करण करण्यासाठी भारतात अनेक संस्था आहेत. पुरातत्त्व ज्ञ आपणास मिळालेले अवशेष या प्रयोग शाळांत तपासून घेतात व

munotes.in

त्यावरून निश्चित कालमापन व सांस्कृतिक कालखंड सांगितला जातो. कार्बन १४ पृथक्करण करणाऱ्या भारतातील प्रमुख संस्था पुढीलप्रमाणे आहे.

१) **'द टाटा इन्स्टीटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च' मुंबई.**

२) **'द बिर्बल सहानी इन्स्टीटयुट ऑफ पॅलीओ, बॉटनी'** लखनऊ.

३) **'द फिजीकल सायन्स लॅबोरेटरी,' अहमदाबाद.**

या संस्थांमध्ये विविध ठिकाणच्या अवशेषाचे पृथक्करण करून त्याद्वारे विविध संस्कृतीचा कालखंड ठरवण्यात मोठेच यश प्राप्त झाले आहे.

या व्यतिरिक्त निश्चित कालमापन करण्यासाठी **तप्त - दीपन कालमापन, पोटॅशिअम अरगॉन कालमापन, फ्लोरीन कालमापन, युरेनिअम** आणि **नायट्रोजन कालमापन पद्धतीचाही** पुरातन हा सांस्कृतिक कालखंड ठरवण्यास पुरातत्त्व ज्ञ उपयोग करत असतात.

## १.७ पुरातत्त्वशास्त्राचे महत्त्व

मानवी संस्कृतीचा विकास कसकसा होत गेला ते जाणून घेण्यासाठी सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे पुरावस्तूंचा चिकित्सक अभ्यास. अर्थात या पुरावस्तू मिळवून त्यांचा चिकित्सक अभ्यास करून पुरातत्त्वीय पुरावे आणि मानवी सांस्कृतिक कालक्रम जाणणे केवल पुरातत्त्वानेच शक्य होते.

मानवाने निर्मिलेल्या सर्व वस्तूंना 'पुरावस्तू' (Artefact) अशी संज्ञा आहे. या पुरावस्तुंच्या सहाय्याने आपणांस तत्कालीन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचा अन्वयार्थ लावता येतो. पुरातत्त्वशास्त्राच्या मदतीने आपण ऐतिहासिक कालखंडाचा अभ्यास तर करू शकतोच, शिवाय मानवाने लेखनकला हस्तगत करण्यापूर्वीचा जो प्रागैतिहासिक अथवा इतिहासपूर्व कालखंड आहे. त्या कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी पुरातत्त्वीय साधने ही एकमेव साधने ठरतात. या काळाविषयी कोणतीही लिखित साधने उपलब्ध नसतात. त्यामुळे पुरातत्त्वीय साधने आणि अर्थातच पुरातत्त्वशास्त्राचे महत्त्व अधोरेखित होते.

पुरातत्त्वशास्त्रीय अभ्यासात वस्तुरूप पुराव्यानेच अभ्यास केला जातो आणि म्हणूनच असे पुरावे उत्खननाद्वारे मिळवणे हे पुरातत्त्वशास्त्राचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट ठरते. गॉर्डन चाइल्ड ह्या इतिहासकाराच्या मते, “मानव हा एक सामाजिक प्राणी असून त्याने निर्मिलेली अवजारे आणि हत्यारे हे एक सामाजिक उत्पादन आहे.” अशा मानवनिर्मित पुरावस्तू ह्या पुरातत्त्वीय सर्वेक्षण आणि उत्खननातून प्राप्त करण्याचे काम हे पुरातत्त्व ज्ञांचे असते त्यामुळेच श्री मॉर्टीयर व्हीलर म्हणतात की पुरातत्त्वज्ञ (उत्खनक) हा केवळ वस्तुरूप पुरावे खणून काढत नही, तर तो गतकालीन मानवी समाजाच्जे व्यक्तिमत्वच खणून काढत असतो.

पुरातत्त्वाचा अभ्यासक हा मानवी समाजाने उत्पन्न केलेल्या साधनांद्वारे (पुराणवस्तूंद्वारा) जो अभ्यास करतो, त्यास आधिभौतिक संस्कृतीचा (Material Culture) अभ्यास असे म्हणतात. थोडक्यात सांगायचे झाले तर पुरातत्त्वशास्त्र म्हणजे गतकालीन मानवी जीवनाच्या विविध पैलूंचा वस्तुरूप पुराव्यांनुसार केलेला अभ्यास होय.

या शिवाय पुरातत्त्वीय पद्धतींचा आणि शास्त्रीय पद्धतींचा योग्य वापर करून मानवी संस्कृतीच्या अभ्यासाबरोबरच इतर विषयांच्या प्राचीन काळातील अभ्यासासही मोलाची मदत होते.

## १.८ सारांश

अशा तऱ्हेने या पाठात पुरातत्त्व शास्त्राचा अर्थ समजावून घेतला. त्याचबरोबर पुरात्तवाच्या विविध व्याख्यांचा परामर्श घेतला. पुरातत्त्व हे विविध ज्ञानशाखांशी कसे संबंधित आहे याचाही परामर्श घेतला. भारतामध्ये पुरातत्त्वविद्या ही शाखा कश्याप्रकारे विकसित झाली हे आपण पहिले. पुरातत्त्वशास्त्राच्या विकासामुळे प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती अभ्यासण्यास मदत होते हे जाणले.

## १.९ प्रश्न

१) पुरातत्त्व म्हणजे काय? त्याच्या विविध व्याख्यांचे चिकित्सक परिक्षण करा.

२) पुरातत्त्व आणि इतिहास यांच्यातील परस्पर संबंधांचे वर्णन करा.

३) पुरातत्त्व हे इतर सामाजिक शास्त्रे यांच्याशी कशा प्रकारे संबंधित आहेत.

४) पुरातत्त्वाच्या अभ्यासात नैसर्गिक शास्त्रांची मदत कशी घेतली जाते ते स्पष्ट करा.

५) भारतीय पुरातत्त्वाच्या उद्दिष्टांचे टीकात्मक परिक्षण करा. ही उद्दिष्टये विविध काळात कशी बदलत गेली?

६) भारतीय पुरातत्त्वाच्या इतिहासाचा आढावा घ्या.

७) विविध काळात पुरातत्त्वीय संशोधनात विकसित होत गेलेल्या विविध तंत्रे आणि पद्धतींचा मागोवा घेऊन त्यांच्या परिणामांविषयी चर्चा करा.

## १.१० संदर्भ


- देगलूरकर गो.ब., प्राचीन भारत इतिहास आणि संस्कृती, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१५
- देव एस.बी., महाराष्ट्राचा इतिहास, प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड-I, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
- देव एस बी, पुरातत्वविद्या, कॉन्टिनेंटल प्रकाशन, मुंबई, २००८ (दुसरी आवृत्ती)
- ढवळीकर एम के, भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१७.
- ढवळीकर एम के, कोणे एके काळी सिंधू संस्कृती, राजहंस प्रकाशन, पुणे, २००६.
- रायरीकर कल्पना आणि भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार, डायमंड प्रकाशन, पुणे, २००९.

सांकलिया एच. डी. आणि माटे एम.एस., महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.


❖❖❖❖

munotes.in

# २

# प्रागैतिहासिक (Pre History), आद्य ऐतिहासिक (Proto Hiastory) आणि ऐतिहासिक प्रारंभकाळ (Early History Period)

**अ) पुराश्मयुग (Palaeolithic Age) आणि मध्याश्मयुग (Mesolithic Age) -**

**ब) नवाश्मयुग (Neolithic Age) आणि ताम्रपाषाण युग (Chalcolithic Age)**

**क) महापाषाणीय (Megalithic Cultures) आणि प्रारंभिक कालखंड (Early Historic Period)**

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टये

२.१ पुराश्मयुग (Palaeolithic Age)

२.२ मध्याश्मयुग (Mesolithic Age)

२.३ नवाश्मयुग (Neolithic Age)

२.४ ताम्रपषाण युग (Chalcolithic Age)

२.५ महापाषाणीय संस्कृती (Megalithic Culture)

२.६ ऐतिहासिक प्रारंभकाळ (Early Historic Period)

२.७ प्रश्न

२.८ संदर्भ

## २.० उद्दिष्टये

या पाठात आपण मानवी संस्कृतीच्या विकासाचा क्रम जाणून घेणार आहोत. सृष्टीतील इतर प्राण्यांपासून वेगळा, वैशिष्ट्यपूर्ण असा मानवाचा विकास झाला आहे. या विकासप्रक्रियेची सुरुवात पुराश्मयुगाने होते. पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग, ताम्रपाषाण युग, वैशिष्ट्यपूर्ण दफनपद्धती असलेल्या महापाषाणीय संस्कृती आणि त्यानंतर ऐतिहासिक प्रारंभकाळ या क्रमाने मानवी संस्कृतीचा विकास कसकसा होत गेला ते आपण सविस्तरपणे अभ्यासणार आहोत. या संपूर्ण कालखंडाने दोबळमानाने तीन टप्पे सांगता येतील. ते म्हणजे-प्रागैतिहासिक (Pre-History) आद्य ऐतिहासिक (proto-History) आणि ऐतिहासिक प्रारंभकाळ होय.



munotes.in

## अ) पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग (Palaeolithic and Mesolithic Age)

## २.१ पुराश्मयुग

मानवाने जीवन जगण्यासाठी अश्म म्हणजे दगडांचाच वापर केला. त्या कालखंडाला 'पुराश्मयुग' असे म्हणतात. या काळातील मानव सभोवतालच्या निसर्गावर अवलंबून होता. राहण्यासाठी गुहांचा वापर, हत्यारांसाठी दगडाचा वापर याच काळात सर्वप्रथम सुरु झाला आणि मानवी जीवनाची सुरुवात झाली. या काळातील मानवाने दगडी हत्यारे बनवून त्यापासून आपली शिकार मिळवली. येथपासून अश्मयुगाची सुरुवात होते. त्यातील पहिला टप्पा म्हणजे पुराश्मयुग होय. पुराश्मयुगाचे एकूण तीन कालखंडात विभाजन केले जाते.

१. पूर्व पुराश्मयुग

२. मध्य पुराश्मयुग

३. उत्तर पुराश्मयुग

### १) पूर्व पुराश्मयुग (Lower Palaeolithic Age) :

पुराश्मयुगीन मानवाची जीवनपद्धती : ही केवळ शिकार करणे, अन्न गोळा करणे यासाठी सतत भटकत राहणे अशी होती. तो या काळात स्थिर जीवन जगत नव्हता. त्यामुळे त्याच्या ज्या मुख्य दोन गरजा अन्न व पाणी या जिथे पूर्ण होतील त्याच ठिकाणी त्याच्या अस्तित्वाच्या खुणा आढळतात. त्यामुळेच या काळातील  मानव नदी खोऱ्यात वावरताना आढळतो.

भारतामध्ये या मानवाचे अस्तित्व पंजाब आणि काश्मीरमध्ये आढळते. सोहन नदीच्या खोऱ्यात सापडलेल्या हत्यारामुळे या काळातील मानवी जीवनाला सोहन संस्कृती असे म्हटले जाऊ लागले.

**हत्यारे :**

या काळातील मानवाने 'क्वार्टझाईट' या दगडाचा हत्यारे तयार करण्यासाठी वापर केला होता. या दगडाची हात कुऱ्हाड व फरशी अशा प्रकारची हत्यारे संशोधकांच्या हाती लागली आहेत. या काळातील मानवी हत्यारे ही ओबडधोबड होती. त्यांना 'ॲबेव्हिलियम' वा 'शेलियन' हत्यारे असे म्हटले जाते.

जसजसा काळ पुढे जाऊ लागला तसतसा पुराश्मयुगीन मानवाच्या हत्यारांमध्येही बदल घडून आले. हत्यारे प्रमाणबद्ध, सुबक, धारदार कडा असलेली उत्खननात सापडली आहेत. यांना 'ॲश्युलियन' हत्यारे असे म्हटले जाते. अशाप्रकारची हत्यारे भारतात मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यात आढळतात.

munotes.in

**पूर्व पुराश्मयुगीन मानवाचे जीवन :**

पूर्व पुराश्मयुगीन मानवाचे अवशेष जगाच्या निरनिराळ्या भागात सापडले आहेत. पूर्व पुराश्मयुगीन मानवाचे अवशेष चीनमध्ये 'चौकुतीन' नावाच्या गुंहेत आढळले आहेत. सापडलेल्या सांगाडयांचे आयुर्मान जवळजवळ पाच लाख वर्षे असावे असे विद्वानांचे मत आहे. या काळातील मानव हा बहुधा नरमांसभक्षकही असल्याचा अंदाज वर्तवला जातो असे असले तरी युरोपात ह्या मानवात काही प्रमाणात प्रगत अवस्था आढळते ते म्हणजे त्यांच्या हत्यारांमध्ये काही प्रमाणात सुबकता आढळली आहे. मात्र भारतामध्ये सुरुवातीची अश्मयुगीन हत्यारे ही सोहन नदीच्या परिसरात दगडी गोट्यावर एक दोन छिलके काढून बनवली जात होती.

पूर्व पुराश्मयुगीन मानव मानवसदृश्य प्राण्यांच्या जीवन पद्धतीप्रमाणेच राहत असावा. कळपात राहणे, कळपाचा एखादा म्होरक्या असणे, छोट्या छोट्या टोळ्या, शिकार करणे अशा पद्धतीचे जीवनमान असावे तसेच कच्चे मांस खाणे, थंडी, ऊन, पाऊस या नैसर्गिक हवामानापासून वाचण्यासाठी शैलाश्रयाचा आधार घेत असावेत.

**२) मध्य पुराश्मयुग (Middle Palaeolithic Age) :**

पूर्व पुराश्मयुगीन मानवाप्रमाणेच या काळातील मानवही अन्न संग्रहाक, शिकारी, भटका असल्याचे दिसते. सतत होणाऱ्या वातावरणातील बदलामुळे वनस्पती आणि जीवसृष्टीतही बदल घडू लागले आणि अशा बदलत्या परिस्थितीत या युगातल्या मानवाच्या हत्यारांमध्येही बदल घडून आले.

**हत्यारे :**

या मध्य पुराश्मयुगातील अश्मयुगातील हत्यारे ही पूर्वपराश्मयुगीन कालखंडातील हत्यारांपेक्षा थोड्या वेगळ्या पद्धतीची आणि निरनिराळ्या दगडांची आढळतात. ती आकाराने लहान असून त्यामध्ये तासण्या (Screepers), अणकुचीदार टोक असलेले टोचे (Awl) व वेधण्या इ. चा समावेश आहे. उत्खननात सापडलेली हत्यारे ही चार्ट, ॲगेट, चाल्सेडोनी इ. प्रकारच्या खनिजापासून केली असावीत. या हत्यारांचे आकार विविध आहेत, जसे गोल, अंडाकृती, आयताकृती अथवा अणकुचीदार टोक असलेले आहेत. ही हत्यारे क्वार्टझाईट पासून तयार केली आहेत आणि क्वार्टझाईट दगडापासून तयार केलेली हत्यारे अनेक ठिकाणी सापडतात. ही सर्व हत्यारे छिलक्यापासून तयार केलेली आहेत म्हणून त्यांना 'छिलका हत्यार समूह' असे म्हणतात. छिलका हत्यारांचा उपयोग प्रामुख्याने लाकडाच्या वा हाडाच्या सहाय्याने मोठया प्राण्यांची शिकार करण्यासाठी केला जाई. टोकदार टोच्यांचा उपयोग तीराग्रे किंवा छिद्र पाडण्यासाठी होत असे. तासण्यांचा उपयोग बाण तयार करण्यासाठी अथवा प्राण्यांची कातडी साफ करण्यासाठी केला जाई. भारतात ही सर्व हत्यारे नदीकाठांवर आढळली आहेत.

**मध्य पुराश्मयुगीन मानवाचे जीवन :**

या काळातील मानवाला शिकार तंत्र अवगत झाल्यामुळे त्याच्या हत्यारातही बदल झाले आणि लहान आकाराच्या हत्यारांद्वारे तो चपळ, जलद प्राण्यांचीही शिकार करु लागला. या काळातील मानव नदीकाठी वस्ती करु लागला आणि डोंगराळ भागात डोंगरपायथ्याशी वस्ती करु लागला. या काळातील मानवाच्या वस्ती ह्या त्याला हत्यारासाठी लागणाऱ्या दगड गोटयांच्या जवळपास आढळू लागल्या. हा मानवही भटक्या अवस्थेत होता. कळपांने राहणे, अन्नासाठी शिकार करणे, अन्नाचा संग्रह करणे यामुळे अस्थिर जीवन जगत होता.

या काळात हवामान अत्यंत थंड असल्यामुळे झोंबणाऱ्या गार वाऱ्यापासून संरक्षण व्हावे म्हणून राहण्यासाठी नैसर्गिक गुहांचा आणि निसर्गत: छपरासारख्या पुढे आलेल्या खडकाचा आश्रय घेऊ लागला. अनेक गट एकत्र आल्याने कदाचित निरनिराळ्या गटांमध्ये सामाजिक भावनेचा उगम होऊन कुटुंब संस्थेची खरी सुरुवात या काळापासून झाली असावी. कारण एखाद्या मृत व्यक्तीचे दफन करण्याची प्रथा या काळात प्रचलित झाली. या काळातील फ्रान्स, चीन व पॅलेस्टाईनमधील लहान मुलांची अत्यंत काळजीपूर्वक केलेली दफने या भावनेची साक्ष देतात. भारतात या काळातील हत्यारे आकाराने लहान परंतु अत्यंत काळजीपूर्वक व रंगीबेरंगी दगडांची केलेली आढळतात. परंतु या काळातील मानवी अवशेष मात्र भारतात अद्यापही मिळालेली नाहीत.

**उत्तर पुराश्मयुग (Upper Palaeolithic Age) :**

संशोधकांनी या काळातील मानवाचा शोध घेतांना भूशास्त्रीयदृष्टया या काळातील मानवाची हत्यारे ज्या स्तरात उपलब्ध झाली आहेत त्या स्तराचा अभ्यास करताना त्या काळातील हवामानातील बदल याची माहिती उपलब्ध झाली आहे. वनस्पतीशास्त्र व प्राणिशास्त्राच्या अभ्यासातून असे दिसते की उत्तर पुराश्मयुगातील पशु-पक्षी, वनस्पतींचीही माहिती मिळते. याचाच अर्थ या काळात पृथ्वीतलावर मोठ्या प्रमाणात प्राणी वनस्पती पक्षी निर्माण झाले असावेत. जंगले, कुरणे, नद्या, ओढे यांचीही या काळात विपुल प्रमाणावर निर्मिती झाली असावी.

**हत्यारे :**

उत्तर पुराश्मयुगातील मानवाची हत्यारे पातळ दगडी छिलक्यापासून उत्कृष्ट बारीक आणि नाजूक असून आणखी छिलके काढून, पिंपळाच्या पानासारखी अथवा लांबट छिलक्यांसारखी केली जात. पुराश्मयुगातील मध्य आणि उत्तर कालखंडात मानवाची रानटी आणि भटकी अवस्था बदललेली नव्हती तरी त्याच्या हत्यारांच्या बनावटीच्या तंत्रात मात्र बदल झाले होते.

उत्तर पुराश्मयुगातील मानवाच्या हत्यारांचे प्रकार म्हणजे प्रामुख्याने क्वार्टझाइट प्रकारच्या खनिजापासून बनवली जात. अण्या, छिन्नी (burin with chisel) व इतर प्रकार यांचा उपयोग कदाचित लाकूडकाम व दैनंदिन जीवनात लागणाऱ्या इतर वस्तू बनविण्यासाठी केला जात असावा. उत्तर पुराश्मयुगीन मानवाच्या हत्याराचे वैशिष्ट म्हणजे दुधारी पाती बनवण्याचे तंत्र. मध्य पुराश्मयुग आणि उत्तरपुराश्मयुग या दोन्ही कालखंडात हत्यारांच्या

बनावटीत विविधता आणि बौद्धिक विकासाची झलक दिसून येते. त्यात पातेतंत्र, दाबतंत्र, टोलातंत्र (Percussion Technique) व सुसंस्करण (Retouching) दिसते. पाते तंत्र वापरताना दगडाच्या छिलक्यापासून पाते बनवले जाई तर दाबतंत्राद्वारेही काही प्रमाणात पाती बनली जात. टोलातंत्र म्हणजे दगडाच्या एका टोकावर लाकडी अणकुचीदार लाकडी टोक ठेवून लाकडी हातोडीने आघात करुन छिलके काढत तर सुसंस्करण म्हणजे लांब धारदार पाते तयार केल्यावर ते लाकडाच्या व हाडाच्या खाचेत कोणत्यातरी नैसर्गिक प्रकारच्या डिंकाने पक्के बसविले जाई.

**उत्तर पुराश्मयुगीन मानवी जीवन :**

उत्तर पुराश्मयुगातील मानव हा अत्यंत प्रगत असल्याचे दिसून येते. हा मानव **'होमो सेपियन'** म्हणून ओळखला जाई. (विचार करणारा मानव) बौद्धिकदृष्ट्या प्रगत असलेल्या या मानवाने निरनिराळ्या प्रदेशात वस्त्या केल्याचे दिसते. या काळातही मानवाची रानटी व भटकी अवस्था बदलली नव्हती तरी त्याच्या हत्यारांच्या घडवणूकीचे तंत्र बदलले. जनावरांची शिकार आपल्या उत्कृष्ट हत्यारांच्या सहाय्याने करी.

या काळात मानवाचे छोटे छोटे समूह असावेत कारण ज्या गृहांमध्ये या मानवाची वस्ती असे त्या ठिकाणी या काळातील मानवाने रंगीत चित्रे रेखाटल्याचे आढळते. मध्य पुराश्मयुगीन मानव हा भावनिक होता तर या काळातील मानव हा भावनिक, रसिक, कलाप्रेमी होता असे दिसते. या चित्रांमध्ये शिकार करण्याची दृष्ये आढळतात. या काळातील मानवाने आणखी काही वस्तू बनविण्याचे तंत्र ही अवगत केले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्र राज्यातील पाटणे या ठिकाणी उत्तर पुराश्मयुगीन मानवाच्या वस्तीचे (वसाहतीचे) उत्खनन केले असता शहामृगाच्या कवचापासून बनवलेले मणीसुद्धा उपलब्ध झाले आहेत.

munotes.in

## २.२ मध्याश्मयुग (Mesolithic Age)

आधीच्या पुराश्मयुग आणि नंतरच्या नवाश्मयुग यांच्या मधल्या स्थित्यतराचा काळ म्हणजे 'मध्याश्मयुग' होय. मध्याश्मयुगाला 'क्षुद्राश्मयुग' असेही म्हटले जाते कारण या काळात लहान आकारांच्या हत्याराचा मोठ्या प्रमाणात उपयोग होते होता. हा कालखंड या पूर्वीच्या म्हणजे उत्तर पुराश्म युगाच्या शेवटच्या काळानंतर आणि नवाश्मयुगाच्या सुरुवातीच्या काळात होऊन गेला असावा. याबाबत पुरातत्व शास्त्रज्ञांच्या मतांमध्ये भिन्नता आढळून येते. काही शास्त्रज्ञांच्या मते हा उत्तर पुराश्मयुगाचाच एक भाग होता तर काहींच्या मते मध्याश्मयुग हा एक वेगळा सांस्कृतिक कालखंड होता. काहींनी याला स्थित्यतराचा काळ मानला आहे. पुरातत्वज्ञ श्री. शंकरराव साळवी यांच्याही मते ह्या मध्याश्मयुगातील क्षुद्राश्म संस्कृतीचा कालखंड हा उत्तर पुराश्मयुगाचा भाग असावा.

**मध्याश्मयुगीन मानवी वसाहती :**

मध्याश्मयुगामध्ये हवामानात थोडेफार बदल घडून आले. उत्तर पुराश्मयुगातील कडाक्याची थंडी थोडी कमी होऊन या काळात हवामान थोडे उबदार झाले. त्यामुळे आश्रय घेत असलेल्या गुहांची आवश्यकता काही प्रमाणात कमी झाली त्याचबरोबर आधीच्या काळात

प्रागैतिहासिक (Pre History), आद्य ऐतिहासिक (Proto Hiastory) आणि ऐतिहासिक प्रारंभकाळ (Early History Period)

अस्तित्वात असलेले महाकाय प्राणी नष्ट होऊ लागले त्यामुळे हा मानव नदीकाठी मासेमारी करुन उदरनिर्वाह करु लागला. अनेक जण एकत्र समूहात राहू लागले.

या कालखंडातील वसाहती भारतात अनेक ठिकाणी आढळून आलेल्या आहेत. जसे गंगेच्या परिसरात, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, दख्खन आणि दक्षिण भारत पश्चिम बंगाल इ. ठिकाणी. या काळातील मानवाचे अस्तित्व अशाच परिसरात सापडते ज्या ठिकाणी नैसर्गिक घटक व अन्नधान्याची उपलब्धी आहे. त्यामुळे या वसाहती सपाट प्रदेश, पठारे, डोंगराळ प्रदेश, नदी किनारी, खडकाळ गुहा इ. होत. भारतात पुरातत्वज्ञांनी उत्खनन केले असता, गुजरातमध्ये जवळजवळ ८० च्यावर वसाहती आढळल्या त्यामध्ये एक म्हणजे लांघणज. राजस्थानमध्ये बागोर, मध्यप्रदेशात भीमबेटका, आदमगड, उत्तर प्रदेशात सराय नाहरराय, चोपानी मांडो, मोरहाना पहार, पश्चिम बंगालमध्ये बीरभानपूर, कर्नाटकात संगनकल्लू तामिळनाडूत टेरी या ठिकाणी मध्याश्मयुगीन मानवाच्या वसाहतींचे पुरावे आढळून आले आहेत.

**हत्यारे :**

मध्याश्मयुगातील वसाहतीचे उत्खनन झाले असता अनेक प्रकारच्या हत्यारांची प्राप्ती झाली त्यामध्ये एक विशिष्ट लक्षवेधक गोष्ट म्हणजे लहान आकाराची हत्यारे होत. त्याच्या याच आकारावरुन त्यांना लघुहत्यारे अथवा क्षुद्रास्त्रे असे म्हणतात. मध्याश्मयुगातील हत्यारे ही आकाराने अत्यंत लहान असून ती मध्य आशियातील 'मॉस्टेरियन' स्वरूपाच्या हत्यारांशी बरेच साधर्म्य दाखविणारी आहेत.

आता हत्यारे तयार करण्यासाठी गारगोटीचा उपयोग सुरु झाला होता. त्यामुळेच त्रिकोण, समांतर बाजू असलेले लांबट छिलके, चंद्रकोर, समांतर द्विभूज चौकोन अशा भौमितिक आकारांमध्ये आढळतात. हत्यारे बनविण्यासाठी दाबतंत्र, पातेतंत्र, टोलातंत्र यांचा उपयोग केलेला आढळतो. ही छोटी छोटी हत्यारे हाडांमध्ये अथवा लाकडी दांडयांमध्ये डिंकाच्या सहाय्याने घट्ट बसवून अथवा लाकडाच्या काटकीस बांधून त्यांचा भाल्यासारखा अथवा करवतीसारखा उपयोग केला जाई. त्यांच्या हत्यारांमध्ये बाणाग्रे (Arrow - heads), हार्पून (Bares), त्रिकोणी किंवा चतुष्कोनी छिलके हाडांमध्ये बसविले जात असत. अशा हत्यारांना 'संयुक्त हत्यारे' असे म्हटले जाते. या हत्यारांमध्ये तासण्या , वेधण्या, अणकूचीदार टोक असलेले टोचे यांचा समावेश होतो. ही हत्यारे तयार करण्यासाठी गारगोटी समूहातील चार्ट, अगेट, चाल्सेडोनी इ. चांगल्या प्रतिच्या खनिजांचा उपयोग केला होता. त्याच बरोबर क्कार्टझाईट दगडापासून तयार केलेली हत्यारे काही ठिकाणी आढळतात. मध्याश्मयुगीन हत्यारांचे आकार गोल, अंडाकृती, आयताकृती किंवा अणकूचीदार टोक असलेले आढळतात. ही हत्यारे बनविण्याची पद्धत म्हणजे दगडी गोटयांपासून जे आकाराने मोठे आहेत त्यापासून छिलके म्हणजेच एक तुकडा काढून बनवली जात असत. त्यामुळेच तासलेल्या छिलक्यांपासून बनवलेल्या हत्यारांना 'छिलका समूह हत्यारे' असे म्हणतात.

अशा छिलक्यांवर विविध तंत्र वापरुन त्यांच्यावर संस्करण करुन त्यांना विविध आकार देऊन त्यांना चाकूप्रमाणे धारदार कडा असलेली हत्यारे तयार केली जात. त्यात काही दुधारी हत्यारे असत; ही हत्यारे लाकडाच्या वा हाडांच्या सहाय्याने मोठया प्राण्यांची शिकार

munotes.in

करण्यासाठी वापरली जात. तासण्यांचा उपयोग बाण तयार करण्यासाठी किंवा इतर कामासाठी केला जात असावा. तर टोकदार टोच्यांचा उपयोग तीराग्रे म्हणून अथवा छिद्रे पाडण्यासाठी केला जात असावा.

मध्याश्मयुगीन हत्यारे ही ज्या ठिकाणी जे खनिज आणि दगड उपलब्ध असेल त्याचा उपयोग करुन बनवली जात. भारतात या हत्यारांमध्ये विविधता आढळून येते. भारतात अनेक ठिकाणी मध्याश्मयुगीन हत्यारे सापडली आहेत. त्यात मध्य भारत आणि दख्खन मधील हत्यारे ही भारतातील वायव्येकडील वाळवंटी भागात सापडलेल्या हत्यारांपेक्षा वेगळी असल्याचे दिसते.

**मध्याश्मयुगीन मानवाची हत्यारे :**

मध्याश्मयुगातील हत्यारे ही आकाराने अत्यंत लहान असून ती मध्य आशियातील 'मॉस्टेरियन' स्वरूपाच्या हत्यारांशी बरेच साधर्म्य दाखविणारी आहेत.

या हत्यारांमध्ये तासण्या (Sereepers, वेधण्या, अणकूचीदार टोक असलेले टोचे (Awl) यांचा समावेश होतो. ही हत्यारे तयार करण्यासाठी गारगोटी समूहातील चार्ट, ॲगेट, चाल्सेडोनी इ. चांगल्या प्रतिच्या खनिजांचा उपयोग केला होता. त्याच बरोबर क्कार्टझाईट दगडापासून तयार केलेली हत्यारे काही ठिकाणी आढळतात. मध्याश्मयुगीन हत्यारांचे आकार गोल, अंडाकृती, आयताकृती किंवा अणकूचीदार टोक असलेले आढळतात. ही हत्यारे बनविण्याची पद्धत म्हणजे दगडी गोटयापासून जे आकाराने मोठे आहेत त्यापासून छिलके म्हणजेच एक तुकडा काढून बनवली जात असत. त्यामुळेच तासलेल्या छिलक्यांपासून बनवलेल्या हत्यारांना 'छिलका समूह हत्यारे' असे म्हणतात.

अशा छिलक्यांवर विविध तंत्र वापरून त्यांच्यावर संस्करण करून त्यांना विविध आकार देऊन त्यांना चाकूप्रमाणे धारदार कडा असलेली हत्यारे तयार केली जात. त्यात काही दुधारी हत्यारे असत; ही हत्यारे लाकडाच्या वा हाडांच्या सहाय्याने मोठया प्राण्यांची शिकार करण्यासाठी वापरली जात. तासण्यांचा उपयोग बाण तयार करण्यासाठी किंवा इतर कामासाठी केला जात असावा. तर टोकदार टोच्यांचा उपयोग तीराग्रे म्हणून अथवा छिद्रे पाडण्यासाठी केला जात असावा.

मध्याश्मयुगीन हत्यारे ही ज्या ठिकाणी जे खनिज आणि दगड उपलब्ध असेल त्याचा उपयोग करून बनवली जात. भारतात या हत्यारांमध्ये विविधता आढळून येते. भारतात अनेक ठिकाणी मध्याश्मयुगीन हत्यारे सापडली आहेत. त्यात मध्य भारत आणि दख्खन मधील हत्यारे ही भारतातील वायव्येकडील वाळवंटी भागात सापडलेल्या हत्यारांपेक्षा वेगळी असल्याचे दिसते.

**मध्याश्मयुगीन मानवी जीवन :**

मध्याश्मयुगात हवामानात बदल झाले आणि कडाक्याच्या थंडीचे रूपांतर हळूहळू उबदार हवामानात होऊ लागले. पुराश्मयुगातील महाकाय प्राणी बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास असमर्थ ठरले म्हणून त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊन त्या प्रजाती नष्ट होऊ लागल्या. असे असले तरी या काळातील मानव हा अजूनही दगडी गुहांचा आश्रय घेत होता.

तरी काही ठिकाणी मानव मासेमारी करीत असल्यामुळे अनेकजण एकत्र राहू लागले आणि ते झोपड्या बांधून राहू लागले. मध्याश्मयुगात हवामान उबदार झाल्यामुळे मध्याश्मयुगाच्या शेवटच्या टप्प्यात 'रानगहू' आणि 'बार्ली' यांचाही समावेश आहारात होऊ लागला याचाच अर्थ मांसाहाराबरोबर मानव शाकाहारही करु लागला. कंदमुळे, फळेही त्याच्या अन्नात होती.

मध्याश्मयुगात रानटी बैल, हत्ती या प्राण्यांव्यतिरिक्त हरणे, माकडे, रानडुक्कर या प्राण्यांचाही समावेश झाला. लहान हत्यारांचा वापर या काळातील मानवाने प्राण्यांना कापण्यासाठी, चिरण्यासाठी आणि कातडी सोलण्यासाठी होत होता. मध्याश्मयुगाच्या अखेरच्या टप्प्यात काळवीट, कुत्रा, नीलगाय, मुंगूस, उंदिर, घूस व खारी यांचाही समावेश प्राणिजगतात झाला.

मध्याश्मयुगीन मानवाचा मात्र मरणोत्तर जीवनावर विश्वास असावा असे दिसते. त्यामुळे त्याने काही धार्मिक परंपरांना जन्म दिला होता. त्याच्या काही समजूती बनल्या होत्या याचे उत्तम उदाहरण म्हणजे गुजरात मधील लांघणज येथे झालेल्या उत्खननात कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तीची कृपादृष्टी राहावी म्हणून मृताला राहत्या ठिकाणीच पुरले जाई आणि त्याच्या सोबत तो वापरीत असलेल्या त्याच्या वस्तू देखील पुरल्या जात.

## २.३ नवाश्मयुग (Neolithic Age)

नवाश्मयुग म्हणजे नवीन अश्मयुग. ज्या युगात मानवी जीवनात अनेक बदल झाले. हा अश्मयुगातला शेवटचा टप्पा होता. या काळात मानवाने अनेक बाबतीत प्रगती साध्य केली. या काळातला मानव हा फक्त शिकारी, अन्न संग्राहकच न रहाता तो आता उत्पादकही बनू लागला. या काळातला मानव हा स्थिर जीवन जगू लागला कारण शेतीचे तंत्रज्ञान त्याने अवगत केले. या काळातील मानवाच्या हत्यारांमध्ये, अन्नपदार्थांमध्ये, राहणीमानामध्ये बदल घडून येऊ लागले. या काळातील मानवाने आपल्या अन्नाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्राण्यांना माणसाळवले ते प्रामुख्याने दुध-दुभते आणि मांस मिळावे म्हणून.

अनेक नवीन समजूती, प्रथा जन्म घेऊ लागल्या. थोडक्यात म्हणजे या काळातील मानवी जीवनात शेती, नवीन अवजारे, त्यांची बदललेली जीवनशैली यात मोठे बदल होत गेले आणि असे क्रांतीकारक बदल झाले की विद्वानांनी या युगाला 'नवाश्मयुगीन क्रांती' असे म्हटले आहे.

नवाश्मयुगीन काळाची व्याप्ती दक्षिण, मध्य आणि पूर्व भारतात आढळते. पश्चिम आशियातही नवाश्मयुगीन क्रांती सुमारे दहा हजार वर्षापूर्वी सुरु झाली असावी. या काळातील मानवाच्या वापरातील दैनंदिन वस्तू, अवजारे, मातीची भांडी, लाकडी वस्तू यात वैविध्य आढळते. त्यात प्रगत तंत्रज्ञानाची झलकही दिसून येते. या काळात शिकारीवरून किंवा राहण्याच्या प्रदेशांवरून जर गटांमध्ये संघर्ष घडून आले तर लढाईसाठी कुऱ्हाडींचा उपयोग करीत. तसेच टोकदार व काटेरी बाणही युद्धात वापरत असत.

भारतात अश्मयुगाच्या विविध अवस्थांचा पुरावा वेगवेगळ्या हत्यारांच्या स्वरुपात मिळालेला आहे. भारतात पुराश्मयुगीन हत्यारे काश्मिर व पंजाब येथे सापडली आहेत, परंतु ती ओबडधोबड स्वरुपात.

नवाश्मयुगातला सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे शेती. या काळातील मानवाला शेती करण्याचे तंत्र अवगत झाल्यामुळे तो स्थिर जीवन जगू लागला. या काळातील हत्यारांमध्येही बदल घडून आला. शेतीला उपयोगी असलेली अवजारे तयार केली जाऊ लागली.

**नवाश्मयुगीन मानवी जीवन :**

**निवासस्थान :** पुराश्मयुगीन व मध्याश्मयुगीन मानव ऊन-वारा-थंडी यापासून बचावासाठी गुहांचा आश्रय घेत असे. पण नवाश्मयुगात शेती केली जाऊ लागल्यामुळे स्थिर जीवन जगू लागला आणि त्याचा परिणाम त्याने राहण्यासाठी घरे बांधण्याची कला अवगत केली. काश्मिरमध्ये या मानवाने जमिनीत खड्डे करून भूमीगत घरे तयार केली. श्रीनगरमधील बुर्ज होम या गावी अशा पद्धतीचे खड्डे आढळले आहेत. खड्डयांच्या घरात खापरांचे तुकडे हाडांची हत्यारे आणि भरपूर राख मिळाली. यावरून असे आढळते की खड्डयांच्या तोंडाशी चूल आणि अन्न साठविण्यासाठी उथळ खड्डे केले जात. या खड्ड्यातून जनावरांची हाडे सापडली आहेत. हे त्यांचे पाळीव प्राणी असावेत.

दक्षिण भारतातील नवाश्मयुगीन शेतकरी झोपड्यात राहत होते. टेक्कलकोटा या आंध्रप्रदेशातील ठिकाणच्या उत्खननात या प्रकारची निवासस्थाने उघडकीस आली. या झोपड्या गोलाकार व भिंती मातीने लिंपलेल्या तसेच चुन्याने रंगविलेल्या असत.

या काळातील मानव स्थिर जीवन जगू लागल्यामुळे पशुधनही तो जवळ बाळगू लागला. जनावरांसाठी गुरांचे गोठे उभारण्यात येत. आंध्र प्रदेशातील उतणूर या गावी एक मोठा गोठा आढळला आहे.

**नवाश्मयुगीन वसाहत स्थळे :**

भारतात नवाश्मयुगीन वसाहती अनेक ठिकाणी आढळून आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

मेहेरगढ – पाकिस्तान (बलुचिस्तान)
राखीगढी – हरियाणा
बुर्झोम – काश्मिर
गुफ्फकराल – काश्मिर
चोपानी मांजे – उत्तरप्रदेश
कोल्जीवहा – उत्तरप्रदेश
महागार – उत्तरप्रदेश
गुंटुर – आंध्रप्रदेश
उटनूर – कर्नाटक
मास्की – कर्नाटक
टेक्कलकोटा – कर्नाटक

चिरांद – बिहार
दौजली – आसाम
सेल्बलगिरी – आसाम (गुवाहाटी)
साकतरी – आसाम
छोटा नागपूर – आसाम
नागार्जुन कोंडा – आंध्रप्रदेश
नरसीफर – कर्नाटक
ब्रम्हगिरी – आंध्रप्रदेश
पिकलीहाळ – कर्नाटक
संगणकल्लू – कर्नाटक
हल्लूर – कर्नाटक



munotes.in

**नवाश्मयुगीन हत्यारे :**

पुराश्मयुगातील मानव वापरत असलेली हत्यारे आणि नवाश्मयुगातील मानवाने त्यात केलेले बदल ह्यातील फरक मानवाची प्रगत अवस्था दाखविते. म्हणूनच या काळातील मानवाला 'हत्यारे बनविणारा प्राणी' असे म्हटले जाते.

नवाश्मयुगीन मानवाने गरजेनुसार हत्यारांमध्ये बदल केले. ही हत्यारे उत्तम प्रतीच्या दगडाची व घासून घासून धारदार व गुळगुळीत केलेली आढळतात. ही हत्यारे बनविण्यासाठी बेसॉल्ट दगडाचा वापर केलेला आढळतो. या हत्यारांमध्ये कुऱ्हाडी, छिन्न्या, वाकस यासारखी हत्यारे त्याने बनविली. तसेच शेतीकामास लागणारी अवजारे, लाकूडकाम करण्यास गरजेची असलेली हत्यारे, नांगरण्यासाठी व जमीन खोदण्यासाठी लागणारी हत्यारे इ. बनवली. त्याचबरोबर नवाश्मयुगीन मानवाने धान्यांवर प्रक्रिया करण्यासाठी दगडी बत्ता, पाटे व वरवंटा यासारख्या उपयुक्त वस्तूही बनवल्या.

**मातीची भांडी :**

नवाश्मयुगीन मानवाच्या स्थिर जीवनपद्धतीमुळे तो शेती करू लागला व धान्योत्पादक बनला आणि त्यामुळेच हे धान्य साठविण्यासाठी निर्माण झालेली गरजेतूनच मातीच्या मोठमोठया मृदापात्रांची निर्मिती झाली. रांजणासारख्या भांडयामध्ये तो धान्य साठवू लागला. नवाश्मयुगाच्या सुरुवातीच्या काळात क्वचितच दगडांची किंवा लाकडाची भांडी बनविली जात. नवाश्मयुगीन मानवाने हळूहळू नित्योपयोगी जीवनात वापरता येतील अशी मातीची भांडी बनवली. मातीची भांडी घडविण्याची कला थोडी वेगळी होती. कारण या काळात चाकावर बनविलेल्या भांडयाच्या पुरावा सापडला नाही.

भारतामध्ये नवाश्मयुगीन मृदभांडी प्रामुख्याने राखी रंगाची व विविध आकारांची आढळून येतात. चंबू, तोटीची भांडी, छिद्रयुक्त भांडी कप व कटोरे हे प्रमुख आकार आढळून येतात. यामधील काही भांडयाच्या काठावर तांबडया गेरूचा पट्टा ओढल्याचे आढळून येते. या काळातही विविध रंगाची मातीची भांडी उत्खननात आढळून आली आहेत. त्यात काळ्या मातीची, तांबडया मातीची, करडया मातीची भांडी आढळतात.

**इतर वस्तू :**

या काळातील मानवाला शखांपासून बनविलेले दागिने, मण्यांचे दागिने, गोमेद, शंख यांचे मणी वापरून दागिने बनवून वापरण्याची हौस होती. याच काळात दक्षिणेत दगडाचे, भाजक्या मातीचे आणि संगजिऱ्याचे मणी अलंकारासाठी वापरीत असत. म्हैसूर या ठिकाणी सोन्याच्या खाणीचा शोध लागल्यामुळे अतिशय तुरळक प्रमाणात सोन्याच्या मण्यांचाही दागिण्यांसाठी वापर करीत असावेत यावरून अंदाज येतो की अलंकार वापरून शरीराला सजवण्याची आवड या मानवाला होती असे दिसते.

**कलेतील प्रगती :**

या काळातील मानवाने कलाक्षेत्रातही प्रगती केल्याचे दिसते. मातीची शिल्पे, भांडयांवरील रंगीत नक्ष्मीकाम, दगडावर रंगवलेली, काढलेली विविध दृश्ये इत्यादींमधून या कलेचे प्रदर्शन होते. दक्षिण भारतात्तील आंध्रप्रदेशातील एक प्रस्तरावरील चित्रांच्या बनावटीत या काळातील चित्रांशी बरेच साम्य आहे. यावरून ही कलेची सुरुवात याच काळातील आहे हे निश्चित होते. या चित्रांमध्ये विविध दृश्ये बैलाच्या आकृत्या काही प्रसंगी दोन गटातील लढाई प्रसंग, समूह नृत्य प्रकार, अवती भोवतीच्या प्राण्यांचे चित्रांकन जसे हत्ती, साप, मगर इ. होत.

**आहार :**

या काळातील मानवाच्या आहारात मांसाहार व शाकाहार दोन्ही आढळून येतो. ज्या प्रदेशात जे प्राणी उपलब्ध असत, त्या प्राण्यांची शिकार करून त्यांचा मांसाहार केला जाई. हत्ती, वनगाय, गेंडा, उंट, घोडा, लांडगा इ. प्राण्यांची शिकार केली जाई. शाकाहारी जेवणात शेतीतून उत्पादीत धान्य, कंदमुळे, दूध, फळे यांचा समावेश असे. मासेमारी करून माशांचाही आहारात समावेश केला होता. दक्षिण भारतात गळिताची पिके घेतली जात कारण कर्नाटकातील टेक्कलकोटा येथील उत्खननात कुळीथाचे पीक घेत याचे पुरावे मिळाले आहेत.

**धार्मिक समजुती :**

नवाश्मयुगात धार्मिक कल्पनांचा उदय झाला असावा. हा मानव स्थिर जीवन जगू लागल्यामुळे त्याच्या रोजच्या जीवनात निसर्गातील ज्या ज्या गोष्टींचा उपयोग होतो किंवा मदत होते, त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्याविषयी समजुती निर्माण होऊ लागल्या. जसे सूर्य, पाणी, जमीन यांचा उपयोग जीवन जगताना होत होता आणि म्हणूनच त्यातून सूर्य, जल, भूमी या देवतांचा उदय झाला. शेतीसाठी बैलाचा महत्वाचा वाटा असल्यामुळे त्याला धार्मिक महत्त्व आहे. गाईपासून दूध आणि पशुवर्धन होते म्हणून गाईचे महत्त्व वाढले. वडीलधाऱ्यांचा आशिर्वाद सदैव सोबत राहावा यासाठी त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांना राहत असलेल्याच ठिकाणी दफन करावे आणि त्याच्या सोबत त्याने वापरलेल्या वस्तूंचेही दफन करण्याची प्रथा जन्माला आली. यातूनच मरणोत्तर जीवनाची कल्पना उगम पावली.

नवाश्मयुगीन मानव हळूहळू भावनाशील बनू लागला.

## २.४ ताम्रपाषाण संस्कृती

दगडा बरोबरच तांबे या धातूचाही वापर ज्या काळात केला जाऊ लागला त्या कालखंडाला 'ताम्रपाषाण' युग असे संबोधले जाते. तसे पाहता अभ्यासाच्या सोयीसाठी इतिहासाचे अनेक कालखंड पाडले आहेत. प्रागैतिहासिक काळ, इतिहासपूर्व काळ आणि ऐतिहासिक काळ असे वर्गीकरण केले जाते.

प्रागैतिहासिक काळाच्या शेवटच्या टप्प्यात धातूंचे शोध लागले आणि मानव दगडा सोबत धातूचाही वापर करु लागता त्यातही प्रथम तांबे या धातूचा शोध लागला आणि त्या

काळातील मानवाने धातू शुद्ध करण्याची प्रक्रिया, त्यापासून हत्यारे बनविण्याचे तंत्र, त्यापासून अवजारे बनविण्याचे तंत्र, भांडी बनविण्याची कला हळूहळू अवगत केली त्याचा वापर दैनंदिन जीवनात होऊ लागला यालाच ताम्रपाषाण युगीन संस्कृती असे म्हणतात.

या ताम्रपाणाषयुगीन संस्कृतीचेही काही टप्पे भारतीय पुरातत्वज्ञांनी सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे.

१) हडप्पा पूर्वकालीन ताम्रपाषाण संस्कृती

२) हडप्पा कालीन ताम्रपाषाण संस्कृती

३) हडप्पोत्तर ताम्रपाषाण संस्कृती

**१) हडप्पा पूर्वकालीन ताम्रपाषाण युग :**

हडप्पा संस्कृतीच्या अगोदर ज्या काळात तांबे धातूचा वापर केला जात असे तो हा काळ होय. ताम्रपाषाण काळातील सुरुवातीची अवस्था म्हणजे हडप्पा काळात जी विकसित अवस्था पहायला मिळते, तिची सुरुवातीची वाटचाल म्हणजे हडप्पा पूर्व काळ होय.

हडप्पापूर्व काळ म्हणजे शेती करणारे लोक, ज्यांचे राहणीमान ग्रामीण आहे अशा लोकांच्या वसाहती. या वसाहती भारताच्या वायव्य सरहद्दीच्या परिसरात आढळतात. तेथे झालेल्या उत्खननात सुरुवातीच्या ताम्रपाषाण काळातील वसाहती उजेडात आल्या. वायव्य सरहद्दीकडून गुजरातपर्यंत त्यांचा प्रसार झाला होता. या वसाहती बलुचिस्थान, गोमल खोरे, सिंधचा सपाटीचा प्रदेश, घग्गर नदीचे खोरे, राजस्थान, हरियाणा या भागात होत्या तर मेहेरगढ, किलीगुल महंमद, डोंब सादत, लोरलाई खोऱ्यात राणा घुंडनानी, पेरियन, कुल्ली, नल आणि बालाकोट या वसाहती बलुचिस्थानात होत्या. अफगाणिस्तानात असलेल्या वसाहती म्हणजे गोमल खोऱ्यातील गुमला व रेहमान ढेरी. सिंध भागातील अमरी व कोटदिजी. पाकिस्तानमधील भवालपूर, राजस्थानातील कालीबंगन, हरियाणामध्ये हिस्सार, बाणवली ह्या ठिकाणी हडप्पापूर्व कालीन संस्कृतीच्या खुणा उत्खननात आढळल्या आहेत. त्या काळात वाहत असलेल्या नद्या ह्या नंतरच्या काळात शुष्क झालेल्या आपणास दिसतात. परंतू सिंधु व तिच्या उपनद्या, घग्गर नदी, सरस्वती नदी याच्या परिसरात ही संस्कृती विकसित झाली होती. हडप्पापूर्वकालीन ताम्रपाषाण संस्कृतींचा विकास हा विस्तृत प्रदेशात झालेला दिसतो.

**मृदाभांडी :**

या काळातील हाक्रा प्रदेशात केलेल्या उत्खननात जी भांडी सापडली त्यांना त्यांच्या वैशिष्टयामुळे 'हाक्रा मृदाभांडी' असे म्हटले जाते. या मृदा-भांडयांमध्ये गोल आकाराचे रांजण आढळले आहेत. विशेषत: गोल आकाराची मृदाभांडी ही हाताने घडविली जात. तसेच ती अर्धकच्ची म्हणजेच कमी भाजलेली आहेत. चोलिस्तान वाळवंटात या काळातील सुमारे शंभरहून अधिक वसाहतींमध्ये अशा प्रकारच्या भांडयांचा वापर होता असे दिसते.

कोटदिजी वसाहतींमध्ये एक बांधकामाचा विशिष्ट प्रकार दिसून येतो तो म्हणजे उंच ठिकाणी बालेकिल्ला व सखल ठिकाणी वसाहती. येथेही उत्खननाच्या वेळी मोठया प्रमाणात



munotes.in

मातीच्या भांडयाचा साठा आढळला त्यात टेराकोटाची खेळणी, रंगीत व साध्या बांगडया अशा वस्तूही सापडल्या आहेत. कोटदिजी संस्कृतीचे वैशिष्टय म्हणजे ‘हडप्पा पूर्व कालीन संस्कृतीची’ वैशिष्टये खुद्द हडप्पा, कालीबंगन आणि बाणवली येथे आपणास दिसून येतात. काही वसाहती राजस्थानच्या अरवली भागात व गुजरात मध्येही आढळून येतात. राजस्थानातील वसाहती म्हणजे गणेश्वर व गुजरातमधील वसाहत म्हणजे धोलवीरा.

**हत्यारे :**

हडप्पापूर्व काळातील लोक हे धातू आणि दगड या दोन्हींचा वापर करीत हत्यारे बनविण्यासाठी ते तांबे या धातूबरोबरच कमी दर्जाचा कांस्य धातू ही वापरत तर क्वचित प्रसंगी लोखंड ही वापरीत. तसे उत्खननात सापडलेल्या वस्तूवरुन अंदाज लावता येतो. या काळात छोटया आकाराची दगडाची हत्यारे आणि शस्त्रे ही वापरीत. साधारणत: दगडापासून तयार केलेली साधी पाती व दुधारी पाती अशी हत्यारेही वापरीत.

**जीवनपद्धती :**

हडप्पापूर्व काळातील लोक शेतीवर आधारीत ग्रामीण जीवन जगत असत. शेतीसाठी आवश्यक असलेल्या घटकांशेजारीच या लोकांच्या वसाहती असत. त्यामुळे नदी किनारी, डोंगराळ प्रदेशात यांच्या वसाहती आढळून येतात. शेती बरोबरच ते पशुपालनही करीत असत.

**हडप्पाकालीन ताम्रपाषाण युग :**

हडप्पाकालीन संस्कृती ही मोहेंजोदडो-हडप्पा संस्कृती या नावाने प्रसिद्ध आहे. जिला सिंधु संस्कृती असेही म्हटले जाई. भारताच्या वायव्य भागात तसेच पंजाब, हरियाणा, गुजरात, राजस्थान आणि उत्तर प्रदेश, पाकिस्तानातील सिंध आणि बलुचिस्थान ह्या परिसरात या संस्कृतीचा प्रसार झाला होता.

दयाराम साहनी आणि राखलदास बॅनर्जी यांनी मोहेंजोदडो आणि हडप्पा या दोन महान शहरांच्या उत्खननाचे कार्य केले. या संस्कृतीचा शोध हा कराची-लाहोर लोह मार्ग टाकण्याचे काम करीत असताना तेथील कामगारांना / मजुरांना विटा सापडल्या व पुरातत्व खात्याला त्याची खबर पोचवली गेली. बौद्ध स्तूपाचे उत्खनन करत असतांना मोहेंजोदडो शहराचा शोध लागला. लगेचच सर जॉन मार्शल यांच्या नेतृत्वाखाली एक पथक या दोन शहराच्या उत्खनन कार्याच्या कामाला लागले आणि जगातल्या प्राचीन संस्कृतीपैकी एका महान, सुनियोजित प्रगत संस्कृतीचा शोध लागला.

१९२० ते १९३२ या काळात या दोन्ही शहरांचे विस्तृत उत्खनन झाले आणि भारताचा इतिहास ५००० वर्षे मागे गेला. १९४७ साली झालेल्या फाळणी मुळे आज ही दोन्ही शहरे पाकिस्तानात गेली आहेत. म्हणूनच भारतीय पुरातत्वज्ञांनी या संस्कृतीचे धागेदोरे भारतात सापडतात का ? या प्रश्नाचे उत्तर मिळावे म्हणून तसे प्रयत्न सुरु केले आणि त्यांना त्यात यशही आले. या संस्कृतीचे भारतातील अवशेष पंजाब, बलुचिस्तान, राजस्थान, गुजरात येथे सापडले आहेत.

सिंधु संस्कृतींच्या वसाहतींचे जे उत्खनन झाले त्यात त्या काळातील अनेक शिक्के आणि त्यावर कोरलेली लिपी किंवा ठसे उमटविलेली चिन्हे यांचा समावेश आहे. परंतु अजूनही शिक्क्यांवरील चिन्हांचा अर्थ लावणे किंवा त्याचे वाचन करणे शक्य झाले नाही. जर यांचा अर्थ आपणास लावता आला असता तर महान संस्कृतीचा मोठा खुलासा झाला असता. लेखनकला ही या संस्कृतीची विशेष गोष्ट आहे.

**हडप्पा संस्कृतीच्या तीन अवस्था :**

हडप्पा संस्कृती ही प्रगत नागरी संस्कृती होती हडप्पा संस्कृतीच्या एकूण तीन अवस्था दिसून येतात. ही संस्कृती सिंधु नदी व तिच्या उपनद्यांच्या काठावर विकसित झालेली होती. या संस्कृतीची पहिली अवस्था म्हणजे प्रगत दुसरी अवस्था म्हणजे विकसित आणि तिसरी अवस्था म्हणजे उत्तरकालीन होय. हडप्पा संस्कृतीच्या प्रगत अवस्थेचे विविध टप्पे आपणास ढोलावीरा, कालीबंगा, हडप्पा, कुणाल या ठिकाणी पहावयास मिळतात. नगररचना, रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, बांधकाम इ. गोष्टी आश्चर्य निर्माण करणाऱ्या आहेत.

**कालनिर्णय :**

सिंधु संस्कृतीच्या कालखंडाबद्दल अनेक इतिहास तज्ञांमध्ये मतभेद आहेत. त्यांच्या मते या काळातील लोकांना लोह धातूचा उपयोग माहित नव्हता त्यावरुन ही लोहयुगापूर्वीची संस्कृती होती हे निश्चित ठरते. सर जॉन मार्शल यांनी ही संस्कृती इ.स. पूर्व ३५०० वर्ष इतकी प्राचीन असल्याचे म्हटले आहे. तर कार्बन - १४ च्या कालनिर्णयानुसार तिचा काळ इ.स. पूर्व २५०० ते १७०० असा सांगितला आहे. मोहेंजोदडो आणि लोथल येथील अवशेषांचा काळ स्थूलमानाने इ.स. पूर्व २३५० ते १७५० असा मानण्यात आला आहे. यामुळे ही संस्कृती जगातील इतर प्राचीन संस्कृत्यांइतकी प्राचीन होती हे सिद्ध होते.

**नगररचना :**

नगररचना हे हडप्पा संस्कृतीचे एक प्रमुख वैशिष्टय आहे. या लोकांच्या बौद्धीक कुशलतेचा या ठिकाणी कस लागलेला दिसतो. अतिशय सुनियोजितरित्या केलेले शहरांचे नियोजन, राहत्या वस्तीचा विभाग हा कार्यालयीन किंवा शासनाच्या वस्त्यांच्यापेक्षा वेगळा असलेला. भक्कम तटबंदी इ. मोहेंजोदडो व हडप्पा येथे नगराच्या पश्चिमेस किल्लेवजा गढी (१३००' x ६५०' x ५०') आहे व ती ४० फूट जाडीच्या तटबंदीने संरक्षित आहे. या गढीमध्ये मोठाले वाडे व महास्नान गृह बांधलेले असून त्या ठिकाणी सत्ताधीश वर्ग राहत असावा. या किल्ल्याच्या पूर्वेस गावठाण, उत्तरेस औद्योगिक वसाहत व कामगारांच्या वाडया, पूर्व पश्चिम व दक्षिणोत्तर एकमेकांना काटकोनात छेदणारे रस्ते होय. रस्त्याच्या दुतर्फा घरे असत. घरांचे आकार लहान मोठे असून हवेशील बांधकाम रचना आढळते. गढीच्या भागात भव्य इमारती आढळून येतात. कदाचित याचा उपयोग धान्याचे कोठार, महास्नानगृह, प्रार्थना गृह यासाठी केलेला असावा. मोहेंजोदडो, हडप्पा, कालाबंगन, लोथल, बानवली, ढोलावीरा या उत्खनित स्थळांमधून हडप्पा या नागरी संस्कृतीच्या शहरांच्या नगररचने विषयी महत्त्वाची माहिती मिळते.

munotes.in

आधुनिक काळात ज्या पद्धतीने नियोजन करुन बांधकाम केले जाते त्याच पद्धतीने कदाचित हडप्पा व मोहेंजोदडो या शहरांचे नियोजन करुन बांधकाम केले असावे असे वाटते कारण घरे, रस्ते, पाणीपुरवठा, बंदिस्त गटारे, सार्वजनिक महास्नान गृह, धान्यकोठार इ. चे नियोजनबद्ध बांधकाम आहे.

**गृहरचना :**

मोहेंजोदडो व हडप्पा येथील बरीचशी घरे ही एकमजली, दुमजली तर काही घरे तिमजली असत. प्रत्येक घरात मध्यभागी चौक व त्याच्या चारही बाजूस खोल्यांची व्यवस्था केलेली असे. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पक्क्या विटांनी बांधलेला अरुंद व उंच जिना असे. प्रत्येक घरात स्नानगृह, मोरी, मध्यभागी एखादी विहिर आढळते. दुमजली घरात सुद्धा वरच्या बाजूस स्नान गृहाची रचना केलेली होती व ते पाणी व्यवस्थितरित्या पन्हळीमार्फत खालील मुख्य सांडपाण्याच्या नलिकेला जोडले जाई. घरे ही पक्का विटांनी बांधलेली असत. घरांची प्रवेशद्वारे ही मुख्य रस्त्याच्या बाजूने उघडणारी नव्हती तर एका गल्लीबोळातून आलेली असत. कोणत्याही घराला खिडक्या रस्त्याच्या बाजूला नसत. भिंतीना बाहेरुन गिलावाही नसे. रस्त्यावरील धुळीपासून व चोराचिलटांपासून बचाव व्हावा हा त्यामागचा हेतू असावा. सामायिक भिंतीवरुन कोणत्याही प्रकारचा वाद होऊ नये म्हणून प्रत्येक घर दुसऱ्या घरापासून अलग असे. पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी मातीचे पन्हळ असे. तुळ्या, दारे, चौकटी या लाकडाच्या असत. प्रत्येक घरातील मोरी व स्नानगृह हे रस्त्याच्या बाजूला असे. कारण सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा व्हावा हा त्यामागील हेतू होता.

**सांडपाण्याची व्यवस्था :**

सिंधु संस्कृतीत सांडपाण्याचे योग्य नियोजन केलेले दिसते. विटांनी पक्के बांधून काढलेली गटारे ही रस्त्याच्या दुतर्फा असत आणि प्रत्येक घरातील सांडपाणी पन्हळीमार्फत त्यात सोडले जाई. अशी मोठी गटारे रस्त्याच्या मध्यभागी १/२ फूट खोलीवर बांधलेली असत. अशा नहरांचे (गटारांचे) जाळे गावभर पसरलेले असे. गटारे साफ करता यावी म्हणून मध्ये मध्ये छेद असत व ती बंद करण्यासाठी मोठया दगडाचा झाकण म्हणून वापर केला जाई. घाणीमुळे गटारे तुंबून सांडपाणी रस्त्यावर वाहू नये म्हणून ठिकठिकाणी मलवापी असत. अशा मलवापी वेळोवेळी साफ करुन गटारे वाहती ठेवण्याची व्यवस्था केलेली होती. सर्व सांडपाणी शहराच्या बाहेर लांब खड्डा खणून त्यात सोडले जाई. यावरुन त्यांची स्वच्छता व आरोग्याची काळजी घेण्याची दूरदृष्टी दिसते.

**पाणी व्यवस्था :**

मोहेंजोंदडो शहरात पाणीपुरवठयाची उत्तम सोय होती. येथील घरांना दोन किंवा तीन मजले असून घराशेजारी विहिरीही सापडलेल्या आहेत. अनेक विहीरी ह्या स्वतंत्र मालकीच्या असाव्यात काही सार्वजनिक स्वरूपाच्या विहिरींची व्यवस्था दिसते. या विहिरीसुद्धा पक्कां विटांनी बांधलेल्या होत्या.

**दिवा बत्तीची सोय :**

हडप्पा संस्कृतीतील लोकांनी सायंकाळच्या वेळी वाटसरुना मार्गदर्शक ठरावे म्हणून ठिकठिकाणी चौथरे बांधून दिवाबत्तीची सोय केल्याचे दिसते. हा उत्खननात समोर आलेल्या अवशेषांद्वारे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**रस्ते :**

हडप्पा संस्कृतीतील रस्ते हे एकमेकांना ९०° च्या कोनात छेदणारे लांब व सरळ होते. नगरातील मुख्य रस्ता दक्षिणोत्तर ३३ फूट रुंद असून या रस्त्यावरुन एकाच वेळी अनेक वाहने जाऊ शकतील अशी व्यवस्था असे. मोहेंजोदडो शहरातील मुख्य रस्ता हा पक्क्या विटांनी बांधलेला होता. दक्षिणोत्तर रस्त्याप्रमाणे पूर्व-पश्चिम असाही रस्ता असून नगरातील रस्त्यांची रुंदी ९ फूट ते ३३ फूटांपर्यंत असल्याची दिसते.

**सार्वजनिक महास्नानगृह The Great Bath :**

munotes.in

मोहेंजोदडोमधील किल्यात एक विस्तीर्ण स्नानगृह आढळले आहे. त्याचा विस्तार सुमारे १८०' x १०८' एवढा असून मध्यभागी ३९' x २३' x ८' एवढे स्नानकुंड आहे. कुंडात उतरण्यासाठी उत्तरेच्या बाजूस पायऱ्या असून लहान मुलांच्या सोयीसाठी पायऱ्यांजवळ कुंडाची खोली कमी ठेवलेली आहे. या तलावाच्या भिंती ८ फूट रुंद असून पाणी मुरु नये अथवा झिरपू नये म्हणून विशेष खबरदारी घेतलेली दिसते. तलावात उतरण्यासाठी पायऱ्या व सभोवती कपडे बदलण्यासाठी किंवा धार्मिक प्रार्थनेसाठी लहान लहान खोल्या बांधलेल्या दिसतात. तलावात पाणी सोडण्यासाठी शेजारी विहीर असलेली दिसते. तलावातील अस्वच्छ पाणी बाहेर काढण्याचीही व्यवस्था केली होती. या गटारांची उंची सहा फूटांहूनही अधिक दिसते. उपलब्ध अवशेषांवरुन या शहरातील वास्तूकाम साधेपण भक्कम स्वरूपाचे होते.

**धान्य कोठारे :**

सिंधु संस्कृतीत आणखी एक प्रशस्त अशी इमारत सापडली आहे. पुरातत्त्वज्ञांच्या मते त्याचे महत्त्व हे साठवणूकीसाठी याचा वापर केला जात असावा. मोहेंजोदडो या शहरातही अशी प्रशस्त इमारत आहे. तर हडप्पा येथे ही धान्य साठवणूकीसाठी वापरात असलेली इमारत आहे. परंतु या ठिकाणचे विशेषत्व म्हणजे याच्या शेजारीच कर्मचाऱ्यांच्या खोल्या आहे. दोन ओळीत साधारणत: १४ घरे कोठाराजवळच बांधलेली होती. त्या शेजारीच धान्य कांडण करणाऱ्या उखळीसुद्धा आहेत. कारण तशा पद्धतीचे अवशेष उत्खननात सापडले आहेत. या कोठारांची लांबी रुंदी ५६ मी x ४५ मी एवढी आहे. धान्याचे कोठार हे सम प्रमाणात मधोमध विभागले आहे. प्रत्येक विभागात ६ दालने होती. हे कोठार पक्क्यां भाजलेल्या विटांनी बांधलेले होते. संपूर्ण गावातील अतिरिक्त धान्याची साठवण या ठिकाणी केली होती. कोठारात धान्याच्या दृष्टीने विचार करुन हवा खेळती ठेवण्याची व्यवस्था केलेली आढळते. जेणेकरुन कोणत्याही प्रकारे धान्याला हानी पोहचू नये याकडेही पद्धतशीरित्या लक्ष पुरविलेले आपणास पहावयास मिळते. प्रत्येक विभागात पुरापासून संरक्षण व्हावे यासाठी उंच व्हरंडा अथवा जोते बांधलेले आढळते. काही ठिकाणी धान्य सडण्यासाठी भाजक्या विटांचे गोलाकार कट्ट केलेलेही आढळले आहेत.

**सभागृह :**

सिंधु संस्कृतीत आठ मीटर लांबी रुंदीचे बांधकाम केलेले एक सभागृह आढळले आहे. पुरातत्वज्ञांच्या मते या इमारतीला कदाचित धार्मिक महत्त्व असावे असे म्हटले जाते तर काही इतिहास तज्ञांच्या मते हे सार्वजनिक देवाण घेवाण करणारे व्यापारी केंद्रांसारखे काहीतरी ठिकाण असावे. ह्या सभागृहात २० विटांचे खांब आहेत आणि त्यांच्या पाच पाच स्तंभांच्या चार ओळी आहे म्हणून या सभागृहा बद्दल वरील दोन अंदाज बांधले जातात की एक तर हे ठिकाण धार्मिक प्रार्थना करण्याचे असेल नाहितर दुसरे म्हणजे सर्व प्रकारच्या मालाची देवाण घेवाण करणारी बाजारपेठ असावी.

**जहाजाची गोदी :**

सिंधु संस्कृतीतील आणखी एक वैशिष्ट म्हणजे 'जहाजाची गोदी' होय. गुजरात या राज्यात लोथल येथे भव्य जहाजाची गोदी आढळून आली आहे. या ठिकाणचे उत्खनन पुरातत्त्वज्ञ श्री.एस.आर. राव यांनी केले होते व त्यांनीच ही जहाजाची गोदी उजेडात आणली. ही गोदी २३७ मी x ४० मी एवढया आकाराची होती. तसेच या गोदीला संरक्षण भिंत ४ मीटर एवढया आकाराची होती. ही गोदी पक्क्या विटांनी बांधलेली असून भरती ओहोटीच्या वेळी समुद्रातील पाणी आत-बाहेर घेण्यासाठीची व्यवस्था होती. या पाण्यासाठी स्वतंत्र नाल्याची व्यवस्था केली होती. या गोदीतून मालाची ने-आण करण्यासाठी तसेच जहाज बांधणी व दुरुस्ती करण्याची व्यवस्थाही केलेली होती. या सर्वांवरुन असे दिसते की हे एक जगातले अतिप्राचीन पण सुव्यवस्थित, योजनाबद्ध असे बंदर होते.

**राजस्थान :**

सिंधु संस्कृतीचे उत्खनन झालेल्या ठिकाणांपैकी कालीबंगन जे राजस्थान या राज्यात आहे येथे अशाच पक्क्या विटांनी बांधलेली उंच जोती आढळून येतात. कालव्याद्वारे ती खंबातच्या आखाताशी जोडलेली दिसून येतात. या ठिकाणी उत्खनन केले असता एका खोलीत चार ते पाच अग्नीवेदी आढळून आलेल्या आहेत. या अग्निवेदीचे महत्व लक्षात घेता कदाचित ते अग्निपूजा करण्यासाठी किंवा यज्ञासारख्या विधी करण्यासाठी केला जात असावेत असे वाटते.

**व्यापारी बंदर :**

सिंध प्रांतात उत्खनन केले असता आणखी एक प्राचीनत्व असलेले ठिकाण आढळले. मकरानचा समुद्र किनाऱ्यावर सूतकाजेनडोर या शहरात अशीच एक प्राचीन इमारत आढळते. यात उंचावरील गढी सारखा भाग आणि सखल भागात नागरिकांची वसाहत आढळून येते. कदाचित हे तत्कालीन व्यापारासाठी उपयुक्त बंदर असावे म्हणजेच त्या काळात मकरानच्या किनाऱ्याचा वापर व्यापारासाठी केला जात असावा. सिंधु काळातील लोकांचा व्यापार समुद्रमार्गे होत होता याची प्रत्यक्ष साक्ष देणारे सूतकाजेनडोर हे एक बंदर आहे.

**सिंधुकालीन लोकांचे सामाजिक जीवन :**

सिंधु काळातील लोक हे खूप आनंदी जीवन जगणारे होते असे उत्खननात सापडलेल्या त्यांच्या वस्तूंवरुन आपण अनुमान काढू शकतो. स्त्री व पुरुष यांना नटण्याची आवड होती. उत्खननात आढळलेल्या शिल्पाकृतीवरुन आपण असे म्हणू शकतो की ते एक नेसण्याचे वस्त्र आणि उत्तरीय अशी वस्त्रे परीधान करीत असत. ही वस्त्रे बहुधा कापसापासून आणि लोकरीपासून तयार केला जात. दोघांनाही आभूषणांची आवड होती असे दिसते. सोने, चांदी, तांबे या धातूच्या दागिण्यांबरोबर मातीचे अलंकारही बनविले जात. या अलंकारामध्ये त्या काळातील अंगठया, बांगडया, मेखला, कर्णफूले, पैंजण, पायातल्या बोटांमधील अंलकार, नूपुरे, गळसऱ्या इ. चा समावेश असे. स्त्रियांना नटण्याची खूपच आवड होती हे चन्हूदारो येथे झालेल्या उत्खननात एक ब्रॉन्झ धातूची पेटी सापडली आहे त्यात काजळ, ओष्ठ शलाका, पावडर, विविध रंग, केसांचे आकडे, कान कोरण्या, हस्तीदंती फण्या, आरसा इ. गोष्टी सापडलेल्या आहेत. स्त्री व पुरुष दोघेही लांब केस राखत. पुरुष पाठीवर केस सोडीत, मधे भांग पाडून क्वचित वेणीही घालीत. दाढी राखीत व कल्ले देखील काढीत तर स्त्रिया आंबाडा, वेणी आणि सुशोभिकरणासाठी पंख्याच्या आकाराची केशभूषा करीत.

**आहार :**

सिंधु काळात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे शेतीतून गहू, बार्ली, तांदूळ ही पिके घेतली जात होती. अलिकडील माहिती नुसार लोथल येथे जगातील सर्वात प्राचीन तांदूळ सापडला आहे. याबरोबरच दूध (शेळीचे, गायीचे) खजूर, डाळींब, केळी, कलिंगड, घेवडा, वाटाणा, मासे, गोमांस, मांस, अंडी, पक्षांचे मास इ. पदार्थ त्यांच्या आहारात असत. यासर्व प्राण्यांची हाडे तेथे आढळून आली आहेत. याशिवाय तेथे पाटा-वरवंटा सापडला आहे. त्याच बरोबर वाशिंड असलेला बैल, कुत्रा, गाय, शेळी, मेंढ्या, बोकड, उंट, हत्ती, म्हैस, गवा, गेंडा, अस्वल इ. प्राणी त्यांनी माणसाळलेले दिसतात. माकड, ससे, कबूतर, पोपट ह्या व इतर पक्षांबरोबरच रानटी बैल वाघ, सांबर इत्यादी रानटी जनावरांचे अवशेषही सापडले आहेत.

**विविध वस्तू :**

सिंधु संस्कृतीतील लोकांना सर्वच गोष्टीमध्ये रस होता त्यांना कलात्मक वस्तू बनवून वापरायला फार आवडत. त्यांनी स्वयंपाकासाठी देखील भाडलेल्या मातीची अतिशय कलात्मक भांडी बनवली होती. विविध आकाराची, विविध प्रकारची वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळी भांडी बनवली होती जसे फुल-झाडांना पाणी घालण्यासाठी झारी सारखे भांडे, तोटी सारखे भांडे, धूपदान इ. स्वयंपाक घरात पाटा, वरवंटा, थाळ्या, सुऱ्या, गळ, दिवलाणे हे तांब्याचे होते. त्याच बरोबर खुर्च्या, मेज, घडबंची, पलंग हे अर्थातच लाकडी होते. याशिवाय कुऱ्हाड, भाले कटयारी, बाण धनुष्य, गोफणी, ढाली, चिलखते कमी प्रमाणात गदा या वस्तूही आढळल्या आहेत. या वस्तू तांबे आणि ब्राँझ धातूपासून तयार केलेल्या आहे.

**औषधे :**

सिंधु-काळातील शहरांचे उत्खनन झाले असता एका मातीच्या भांडयात अतिशय काळजीपूर्वक औषधांसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू ठेवल्या होत्या. त्यामध्ये शिलाजीत, समुद्रफेन आणि सांबरशिंग यांचा समावेश आहे.

**मनोरंजनाची साधने :**

सिंधु संस्कृतीतील लोकांना स्वत:चे मनोरंजन करण्याचीही आवड असलेली दिसते. उत्खननात त्या काळातील गोटया, सोंगटया, हस्तिदंती वस्तू, धातूचे आणि हस्तिदंताचे फासे इत्यादी वस्तू मिळाल्या आहेत. तसेच त्यावेळी नृत्य, गायन, विविध प्राण्यांच्या झुंजी, शिकार करणे या सारखे मनोरंजनाचे खेळ खेळले जात होते. लहान मुलांसाठी भाजलेल्या मातीपासून विविध वस्तू तयार केल्या जात. शाडूच्या मातीपासून विविध पशू-पक्षांचे आकार असलेली खेळणी बनविली जात. स्त्रिया आपल्या मनोरंजनासाठी विणकाम, भरतकाम, टोपल्या विणणे इ. कामे करीत. त्याचबरोबर ते गायन व नृत्य देखील शिकत.

**शस्त्रे :**

सिंधु काळातील लोक खूप आक्रमक होते असे जाणवत नाही. त्यांच्या शस्त्रांवरुन आपणास असे अनुमान काढता येते की हे लोक शांतताप्रिय होता. चोरांपासून संरक्षण व्हावे म्हणून त्यांनी नगरांची रचनाच करताना संरक्षणाची खबरदारी घेतली होती. त्याच्या शस्त्रांमध्ये चाकू, सूरी, तलवार, धनुष्यबाण, बाणाची टोके, कुऱ्हाडी यांचा समावेश होतो. त्याच बरोबर त्यांना शिकारीची आवड असल्यामुळे अशा शस्त्रांचा वापर होत असावा असा अंदाज काढला जातो.

**सिंधु काळातील लोकांचे आर्थिक जीवन :**

सिंधुकालीन लोकांचे आर्थिक जीवन अतिशय समृद्ध होते. नदीकाठी वस्ती असल्यामुळे शेतीसाठी उत्तम प्रकारची परिस्थिती आणि व्यापारासाठीची सोय दोन्ही गोष्टी साध्य केल्या जात.

**शेती :**

सिंधुकालीन लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा असल्याने ते शेतातून विविध पद्धतीची पिके उत्पादीत करीत त्यामध्ये गहू, तांदूळ, यव, कापूस, बार्ली, वाटाणा, डाळी इ. पिके घेत. कारण सुपीक जमीन आणि मुबलक पाणी पुरवठा असे म्हणून याचबरोबर या काळातील लोक हे फळे, पालभाज्या यांचेही उत्पादन घेत. शेतीच्या मशागतीसाठी बैलाचा उपयोग केला जाई. शेतीच्या जोडीला पशुपालनही केले जाई. ज्या प्राण्यांचा उपयोग दैनंदिन जीवनात आहे अशा प्राण्यांचे पालन केले जाई. त्यामध्ये गाय, म्हैस, शेळी, कुत्रा, घोडा हे प्राणी आणि कोंबडी, बदके यांचा मांस व अंडी देणारे पक्षी म्हणून पालन केले जाई. उत्खननात नांगरलेल्या शेताचेही अवशेष सापडले आहेत.

**उद्योगधंदे :**

सिंधु काळात विविध प्रकारच्या उद्योगांचा समावेश केला जाऊ शकतो. त्यामध्ये बांधकामासाठी लागणाऱ्या विटा तयार करणे, इमारतीचे बांधकाम करणे, शेतीला लागणारी अवजारे बनविणे, घरात लागणाऱ्या वस्तू तयार करणे, धातू शुद्धीकरणाचा व्यवसाय, धातूची भांडी तयार करणे, मातीची भांडी तयार करणे, जहाज बांधणी आणि दुरुस्ती व्यवसाय. असे विविध उद्योगधंदे समाजात प्रचलित होते. प्रत्येक व्यवसायात तरबेज असलेला स्वतंत्र वर्गही अस्तित्वात असावा असे इतिहासकारांचे मत आहे.

**व्यापार :**

सिंधु काळातील लोकांचा अंतर्गत आणि परराष्ट्रीय व्यापार होत होता. अंतर्गत व्यापार हा जमिनीवरुन आणि नदीमार्गाने केला जात असे तर समुद्राचा वापर परराष्ट्रीय व्यापारासाठी केला जाई. अंतर्गत व्यापार करताना त्यांनी बैलगाडया, घोडागाडया यांचा तसेच होडया, नावा यांचाही उपयोग केला जाई. अंतर्गत व्यापारात अलंकार, सौंदर्य प्रसाधने, विविध आकाराची भांडी, धान्य यांचा व्यापार केला जाई. विविध ठिकाणाहून तयार करायला लागणाऱ्या वस्तू आणल्या जात. त्यात राजस्थानातून तांबे, बंगाल व अफगाणिस्तान मधून ब्रॉन्झ, म्हैसूर मधून सोने, काही ठिकाणाहून चांदी आणली जात असावी.

सिंधु संस्कृतीतील लोकांचा समुद्रमार्गे मेसोपोटेमिया, बॅबिलोन, इजिप्त, सुमेरियन संस्कृती, इराण यांच्याशी व्यापारी संबंध होते. तसे पुरावे दोन्हीकडील उत्खननात आढळले आहेत. बॅबिलोन संस्कृतीच्या आलेखात सिंधु संस्कृतीतील एका प्रदेशाचा उल्लेख 'यहुना' असा आढळतो. यहुना येथील व्यापारी 'आसरानी' हा होता. इजिप्त बरोबरील व्यापारात सोने, चांदी, तांबे, नीळ, रंगीत दगडाचे मणी, हस्तिदंती वस्तू सौंदर्य प्रसाधनांची साधने. लाकडी सामान, मोती या वस्तूंचा समावेश होता. सुमेरियन संस्कृतीशी व्यापार हा मकरानच्या बंदरातून केला जाई. उंट, बैल व घोडा यांचा दळणवळणाच्या कामात वापर करुन घेतला जाई. गुजरातमधील लोथल हे ठिकाण खूप प्रसिद्ध होते. परदेशातून मालाची ने-आण करण्यासाठी याच बंदराचा वापर केला जाई.

**वजन व मापे :**

सिंधु काळातील लोक व्यापारात प्रवीण होते. त्याचप्रमाणे व्यापार करण्यासाठी लागणाऱ्या जरुरीच्या साधनांचाही त्यांनी शोध लावला होता याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची वजने व मापे उत्खननात सापडली आहेत. या लोकांना दशमान पद्धत अवगत होती. सिंधु लोक दगडापासून वजने तयार करीत. या वजनांमध्ये खूप विविधता आढळते. त्यात म्हणजे धान्य मोजणीसाठी वापरात असलेली वजने, मौल्यवान धातू तोलण्यासाठीची वजने इत्यादी. अवजड वजनांपासून ते सोनाराला उपयोगी पडणाऱ्या लहान वजनापर्यंतचे प्रकार या वजनांमध्ये दिसतात. उत्खननात एक तराजू सापडला आहे त्याची दांडी ही ब्रॉन्झ धातूपासून बनविलेली आहे तर पारडी ही तांबे या धातूपासून, लांबी मोजण्यासाठी कोणत्या परिमाणाचा वापर करीत याचे पुरावे सापडले नाहीत. शिंपल्यांचा वापर, ब्रॉन्झचा वापर हे वजनासाठी व मापनासाठी केला जाई. हडप्पा, लोथल व काली बंगन या उत्खनित ठिकाणी त्या काळातील वजने व मापे सापडली आहेत.

**सिंधुकालीन शिक्के मुद्रा (Seals) :**

सिंधु संस्कृतीच्या लोकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उत्खननात सापडलेले विविध खुणा असलेले शिक्के होय. उत्खनन झालेल्या अनेक ठिकाणी शिक्के सापडले आहे. हे शिक्के स्टिएटाईट दगडावर कोरल्या जात तर काही संगमरवरी आणि मृण्मय याचे देखील शिक्के सापडले आहेत. ह्या शिक्क्यांचा आकार चौकोनी, आयताकृती आहे. ह्या शिक्यांची समोरील बाजू घासून गुळगुळीत केली जाई आणि मागील बाजूस पकडण्यासाठी उपयोगी पडेल अशी मूठ तयार केली जाई. गुळगुळीत असलेल्या भागावर विविध आकृत्या कोरल्या जात. त्यानंतर शिक्के पक्के करण्यासाठी भाजून घेतले जात. या शिक्यांवर शिव, शक्ती, प्राणी यांच्या प्रतिमा कोरलेल्या दिसतात. कोरलेल्या प्रतिमांच्या बाजूला एखादी लिपीमध्ये अक्षरे लिहिलेली दिसतात. या शिक्यांचा वापर गेटपास किंवा एखादा माल भरुन झाल्यावर त्यावर सील करण्यासाठी केला जाई असे अनुमान आहे.

**सिंधु कालीन लिपी :**

सिंधु कालीन लोकांची शिक्यांवर, क्वचित मातीच्या भांडयावर कोरलेली लिपी आढळते. ही लिपी कदाचित चित्रलिपी असावी असे इतिहास तज्ञांचे मत आहे. सिंधुकालीन या लिपीचे वाचन यशस्वी अद्यापही झालेले नाही. त्यामुळे त्या काळातला खूप मोठा इतिहास अजूनही उजेडात येऊ शकलेला नाही. या लिपीत सुमारे चारशे चिन्हे आढळली आहेत. ही लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली जात असावी असे दिसते. आधुनिक काळात अनेक इतिहास तज्ञ ही लिपी वाचण्याचा प्रयत्न करित आहेत. डॉ. एस.आर. राव व डॉ. वाकणकर यांनी असे अनुमान काढले आहे की ही चित्रलिपी नसून वर्णलिपी असावी. काही इतिहासकारांनी द्रविड लिपीशी संबंध लावला आहे. तर काही इतिहासकारांनी देवनागरी लिपीशी असे विविध मतप्रवाह सिंधुकालीन लिपी संदर्भात आहेत. धोलावीरा येथे झालेल्या उत्खननात पहिल्यांदाच दगडावर अभिलेख असलेला पुरावा सापडला आहे. त्यापैकी एक Sign Board आहे असा अंदाज आहे तर दुसरा शिलालेख आहे असे मानतात. सिंधुकालीन लिपीचे वाचन करण्यात यश मिळाले तर त्यांच्या अनेक अज्ञात बाबींवर प्रकाश टाकता येईल.

**सिंधुकालीन लोकांचे धार्मिक जीवन :**

आतापर्यंत झालेल्या उत्खननात कोणत्याही प्रकारच्या मंदिर स्थापत्याचे अवशेष सापडले नाहीत. त्यामुळे यांच्या धार्मिक कल्पनांचा विचार करता निश्चित असे ठोस पुरावे न आढळल्यामुळे त्यांच्या धार्मिक जीवनावर प्रकाश टाकता येत नाही. तरी उपलब्ध झालेल्या शिक्क्यांवरुन ताईत, भाजलेल्या मातीच्या किंवा धातूच्या मूर्तीवरुन काही धार्मिक जीवनावर प्रकाश टाकता येतो. त्यांच्या या शिक्यांवर शिव, शक्ती, विविध प्राणी, वृक्ष, निसर्गातील प्रतिके यावरुन या चिन्हांना त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असून त्यांना देवदेवता मानून त्यांची पूजा केली जात असावी असे इतिहास तज्ञांचे मत आहे. या संस्कृतीतही लिंगपूजा व योनीपूजा अस्तित्वात असावी असे दिसते.

उत्खननात सापडलेल्या शिक्क्यांवर धुरांचे डाग व प्रतिमेतील प्राणी व नरबळी करण्याच्या चित्रांवरुन या संस्कृतीत दिवा लावण्याची अथवा धूप जाळण्याची प्रथा असावी असे



munotes.in

अनुमान काढता येते. शिक्यांवर आढळणाऱ्या प्रतिमा, मातीच्या मूर्ती, धातूच्या मूर्ती यावरुन तत्कालीन समाज हा निसर्गपूजना बरोबर मूर्तीपूजकही होता असे वाटते. शिक्क्यांवर वड, पिंपळ यांच्या प्रतिमा आहेत. तर एका शिक्यांवर दोन फांद्यामध्ये उभी असलेली त्रिशूला सारखे शिरस्त्राण असलेली, लांब केसाची नग्न देवता असून तिच्यापुढे गुडघे टेकलेल्या उपासकाची प्रतिमा आहे. निसर्गातील अग्नी, जल, सूर्य, नाग या देवतांची पूजा केली जात होती. या सर्वांवरुन इतिहासकारांनी सिंधुकालीन लोकांच्या धार्मिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

### अंत्य संस्काराच्या पद्धती :

या काळातील लोकांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता असे अनुमान केले जाते. व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्यावर संपूर्ण संस्कार करुनच मृत व्यक्तीस दहन किंवा दफन केले जाई. दफनभूमी ही गावाबाहेर असे. मृताचे शरीर खड्डा खणून त्यात डोके उत्तरेकडे आणि पाय दक्षिणेकडे करुन पुरले जाई. तसेच त्याला अलंकार घातले जात. त्याच्या सोबत मातीची भांडी दिली जात, अन्न, पाणी ठेवले जाई. क्वचित प्रसंगी शवपेटीतही शव ठेवलेले पुरावे आढळतात. लोथल येथे उत्खनन झाले असता तेथे दोन सांगाडे सापडले. कार्बन-१४ पद्धतीने निदान केले असता ते स्त्री व पुरुषाचे आहेत असे आढळले. कालीबंगन येथे तर दफनभूमीत फक्त अस्थी आढळल्या आहेत. दहन करून, उरलेली हाडे अस्थीकलशात भरुन दफन केली जात असावी. या संस्कृतीत राख असलेली मातीची भांडी देखील सापडली यावरुनही दहन प्रथा देखील प्रचलित होती असे दिसते.

### सिंधु संस्कृतीचा विनाश :

एवढ्या प्रगत संस्कृतीचा नाश कसा झाला असावा याबाबत इतिहासकारांमध्ये एकवाक्यता नाही. इतिहासकारांची याबाबत विविध मते ऐकावयास मिळतात. सर मॉर्टिमर व्हिलर यांच्यामते सिंधु संस्कृतीच्या विनाशाला आर्य आक्रमक जबाबदार होते. कारण सिंधु लोकांचे शस्त्रविषयक ज्ञान अथवा त्यातील प्रगती ही आर्यांच्या शस्त्रांपेक्षा कमी होती म्हणूनच त्यांना विजय मिळाला असावा. काही इतिहास संशोधकांच्या मते सिंधु व तिच्या उपनद्यांना वारंवार येणाऱ्या पुरांमुळे ही संस्कृती नष्ट झाली असावी. काहींच्या मते, साथीचे रोग, जमिनीची धूप, भूकंप या नैसर्गिक आपत्तींमुळे नष्ट झाली असावी. काही इतिहासकारांच्या मते वातावरणातील बदलामुळे ही संस्कृती नष्ट झाली असावी. या सर्व इतिहासतज्ञांच्या मतांमध्ये एकवाक्यता नाही. त्यामुळे ही संस्कृती नेमकी कशी नष्ट झाली हे निश्चितपणे कळू शकलेले नाही.

### हडपोत्तर कालीन ताम्रपाषाण संस्कृती :

विकसित असलेल्या नागरी संस्कृतीचा म्हणजे सिंधु संस्कृतीचा नाश झाला. सिंधु संस्कृती ही अचानक नष्ट झालेली नसून तिचा हळूहळू विनाश होत गेला आणि त्यानंतर पुन्हा एकदा ग्रामीण संस्कृती उदयास आलेली दिसते. या संस्कृतीमध्ये सिंधु काळाप्रमाणे शिक्के व त्यावर कोरलेल्या लिपीचा अभाव दिसतो. यांचे असे कोणतेही पुरावे आढळत नाहीत. त्याचबरोबर सिंधु काळात प्रचलित असलेल्या अनेक कला देखील या काळात लुप्त झालेल्या आढळतात. हडप्पोत्तर काळ म्हणजे ग्रामीण संस्कृतीचा पुनश्च प्रारंभ. या

संस्कृतीची व्याप्ती सिंधु नदीच्या खोऱ्यात व तिच्या आजूबाजूच्या प्रदेशात आढळते. पुरातत्वज्ञांनी ज्यावेळी या परिसरात उत्खनन केले तेव्हा त्यांना ग्रामीण संस्कृतीच्या अवशेषांची प्राप्ती झाली. तिची कालमर्यादाही विविध पद्धतींचा वापर करुन निश्चित केलेली आढळते. हडप्पोत्तर काळात ज्या संस्कृत्या आजुबाजूच्या परिसरात उदयाला आल्या त्या पुढीलप्रमाणे.

| संस्कृती | | | कालखंड |
|---|---|---|---|
| १) झुकर - संस्कृती | - | सिंध प्रांत | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १८०० |
| २) कायथा संस्कृती | - | मध्यप्रदेश | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १६०० |
| ३) आहर / बनास संस्कृती | - | राजस्थान | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १४०० |
| ४) माळवा संस्कृती | - | | इ.स. पूर्व १७०० ते इ.स. पूर्व १२०० |
| ५) प्रभास संस्कृती | - | गुजरात | इ.स. पूर्व १८०० ते इ.स. पूर्व १२०० |
| ६) रंगपूर संस्कृती | - | गुजरात | इ.स. पूर्व १५०० ते इ.स. पूर्व ७०० |
| ७) सावळदा संस्कृती | - | महाराष्ट्र | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १८०० |
| ८) जोर्वे संस्कृती | - | महाराष्ट्र | इ.स. पूर्व १४०० ते इ.स. पूर्व ७०० |

### ३) हडप्पोत्तरकालीन ताम्रपाषाण संस्कृती :

भारतात हडप्पापूर्व ताम्रपाषाण संस्कृतीपासून सुरुवात होऊन नंतर हडप्पा संस्कृतीची विकसित अवस्था सुरु होते हे आपण यापूर्वी पाहिले. तांबे या धातूचा वापर आणि त्यापासून विविध संयुगे तयार करून त्यांचा वापर हे हडप्पा - सिंधू संस्कृतीच्या विकसित अवस्थेचे ठळक लक्षण होते. सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाल्यानंतर ताम्रपाषाण संस्कृती ही एका एकी लुप्त झाली नसून ती हळूहळू लोप पावत गेली. सिंधू संस्कृती या प्रथम नागरी संस्कृतीचा विनाश झाला. यानंतर पुःनश्च ग्राम संस्कृतीचा उदय झाला. भारतातील विविध भागात या काळात काही ताम्रपाषाण संस्कृतीचे अस्तित्व होते हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. अर्थात यांचा उदय हा हडप्पोत्तर (सिंधू) ताम्रपाषाण संस्कृतीच्या विनाशानंतर झालेला असल्या कारणाने यांना हडप्पोत्तर सिंधू संस्कृती असे म्हणतात.

**हडप्पोत्तर ताम्रपाषाण संस्कृतीची वैशिष्टये :-**

हडप्पोत्तर ताम्रपाषाण संस्कृतीची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

- नागरी स्वरूपाची असलेल्या सिंधू संस्कृतीपेक्षा हडप्पोत्तरकालीन ताम्रपाषाण संस्कृतींचे स्वरूप हे अगदी वेगळे असून या संस्कृती नागरी नसून ग्रामीण स्वरूपाच्या होत्या.

- या ताम्रपाषाण संस्कृतींमध्ये लिपीबद्ध केलेले शिक्के आणि लेखन कलेचा संपूर्ण अभाव दिसतो.

munotes.in

- सिंधू संस्कृतीप्रमाणे या संस्कृतीमध्ये नगर रचना स्थापत्य कला यांचाही अभाव दिसतो.
- या संस्कृतीमध्ये सिंधू संस्कृतीत विकसित पावलेली फर्नेस बनविण्याची कला लुप्त झालेली दिसते.
- त्याचप्रमाणे या संस्कृतीत सुवर्ण अलंकारांचा अभाव दिसतो. इ,

उत्तर हडप्पा अवस्था असलेल्या ग्राम संस्कृतीच्या बऱ्याच वस्त्या सिंधू नदी खोऱ्या पलीकडेही विविध भागांमध्ये आढळलेल्या आहेत. सिंधू नदीखोऱ्यांच्या प्रदेश आणि तिच्या अलीकडे - पलिकडेही अनेक वसाहती उत्खननाद्वारे ज्ञात झालेल्या आहेत. ही सर्व वसतिस्थाने शहरीकरणाचा अभाव असलेली पण ग्रामसंस्कृतीचा प्रभाव असलेली आढळली.

या हडप्पोत्तर ताम्रपाषाण वस्त्यांमध्ये ग्रामीण संस्कृती दर्शक गोल, झोपडया, पशुपालनाची पध्दत दर्शविणारे मानवी संस्कृतीचे तात्पुरत्या स्वरूपाचे तळ आढळून आले. हडप्पोत्तर काळातील संस्कृती ह्या भारताच्या विविध भागांमध्ये विकसित झाल्या आणि त्या सर्व संस्कृतीच्या मृदभांडयांच्या वैशिष्टयांवरून ओळखल्या जातात. या संस्कृतींमधील वस्त्या ह्या गुजरात, माळवा, दख्खन प्रदेश इ. विविध भागात आढळून आलेल्या आहेत. यापैकी काही संस्कृतींवर हडप्पाच्या नागरीकरणाचा थोडा बहुत प्रभाव शिल्लक राहिल्याचे दिसून येते तर काही संस्कृतीचा आविष्कार हा स्वतंत्रपणे झाला असल्याचे दिसते. हडप्पोत्तर काळात ज्या अनेक ताम्रपाषाण संस्कृती उदयास आल्या परंतु हडप्पा विकसित संस्कृतींशी विशेष संबंधित नव्हत्या अशा संस्कृती विविध भागातील उत्खननाद्वारे ज्ञात झाल्या आहेत. यापैकी काही उत्खनित स्थळे जी हडप्पोत्तर काळातील ताम्रपाषाण संस्कृतीची स्थळे म्हणून सांगता येतील ती म्हणजे गणेश्वर, आहर, एरण, कायथा, डांगवाला, नावडातोली, बहाळ, आपेगाव, दायमाबाद, जोर्वे, नेवासा, खेडगाव, चांदोली, इनामगाव, सोनगांव इ.

| | संस्कृती | | कालखंड |
|---|---|---|---|
| १ | झुकर संस्कृती | - | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १८०० |
| २ | कायथा संस्कृती | - | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १६०० |
| ३ | आहर अथवा बनास संस्कृती | - | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १४०० |
| ४ | माळवा संस्कृती | - | इ.स. पूर्व १७०० ते इ.स. पूर्व १२०० |
| ५ | प्रभास संस्कृती | - | इ.स. पूर्व १८०० ते इ.स. पूर्व १२०० |
| ६ | रंगपूर | - | इ.स. पूर्व १५०० ते इ.स. पूर्व ७०० |
| ७ | सावळदा संस्कृती | - | इ.स. पूर्व २००० ते इ.स. पूर्व १८०० |
| ८ | जोर्वे संस्कृती | - | इ.स. पूर्व १४०० ते इ.स. पूर्व ७०० |

### १) झुकर संस्कृती : -

हडप्पोत्तर काळातील महत्त्वाची एक संस्कृती म्हणजे झुकर संस्कृती होय. झुकर संस्कृतीचा काळ हा साधारणतः इ.स.पूर्व २००० ते इ.स.पूर्व १८०० इतका मानला जातो. झुकर संस्कृती ही सिंध प्रांतातील अनेक ठिकाणी दिसून आलेली आहे. या संस्कृतीचा प्रभाव



munotes.in

झुकर, छन्नूदारो, अमरी या ठिकाणी असलेला दिसतो. ही संस्कृती तिच्या वैशिष्टयपूर्ण मृदभांडयांमुळे 'झुकर संस्कृती' या नावाने ओळखली जाते. याच काळात पंजाबमध्ये सिमेटरी - एच (H) ही संस्कृती उदयास आली. या संस्कृतीची मृदाभांडी मुलतः बफ रंगाची असून त्यावर तांबडया अथवा दुधी पिवळदार रंगाचा लेप दिलेला असतो व त्यावर काळ्या रंगात चित्रण केलेले दिसून येते.

**२) कायथा संस्कृती :-**

कायथा संस्कृतीचा उदय मध्यप्रदेशात झाला. या संस्कृतीचा काळ हा साधारणतः इ.स.पूर्व २००० ते इ.स.पूर्व १६०० असा मानला जातो. ही संस्कृती मध्य प्रदेशातील कालीसिंध नदीच्या काठी आढळून येते. इथे झालेल्या उत्खननात सांस्कृतिक क्रम आढळला असून त्यातील पहिली वस्ती कायथा संस्कृतीची आहे. पुरातत्ववेत्यांच्या मते ही संस्कृती हडप्पा संस्कृतीशी जवळीक दाखवते. विशेष म्हणजे या संस्कृतीच्या मृदभांडयावर वेगवेगळ्या आकारांचे चित्रण केले आहे. तसेच येथे तांब्यांच्या कुऱ्हाडी, मण्यांच्या माळा, बांगडया, धारदार पाती इ. वस्तू उपलब्ध झालेल्या आहेत.

**३) आहर संस्कृती :-**

याचा काळात राजस्थानात आहर नदीच्या तीरावर या संस्कृतीचे अवशेष दिसून आलेले आहेत. यावरूनच या संस्कृतीला आहर असे नाव पडले तर काही अवशेष हे बनास या नदीच्या खोऱ्यातही आढळून आलेले आहेत. म्हणून तिला बनास असे नावही देण्यात आले. या संस्कृतीचा विस्तार हा माळव्यातील चंबळ नदीपर्यंत झालेला दिसतो. या संस्कृतीतील काळी आणि तांबडी मृद भांडी तसेच त्यावर पांढऱ्या रंगात ठिपक्यांची व रेषांची नक्षी काढलेली दिसते. हे या संस्कृतीचे वैशिष्टय होय. हिचा सांस्कृतिक कालक्रम हा इ.स.पूर्व २००० ते इ.स.पूर्व १४०० असा आहे. उत्खनित ठिकाणी तांब्याच्या चपटया कुऱ्हाडी व मासेमारीचे गळही आढळून आलेले आहे. मात्र अश्मअस्त्रे अथवा दगडी हत्यारे येथे आढळून आलेली नाहीत.

या संस्कृतीतील आणखी एक वसाहत म्हणजे गिलुंड. या वसाहतीच्या उत्खननात दगडी पात्यांचा अस्तित्वात असल्याचे पुरावे तसेच टेराकोटा आकृती आणि इमारतींचे अवशेष आढळून येतात.

**४) माळवा संस्कृती :-**

मध्यप्रदेशात दोन नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशात या संस्कृतीचा उगम झाला. उत्तरेकडे चंबळ नदीच्या व दक्षिणेकडे नर्मदा नदी या दोन नद्यांच्या पटटयास माळवा प्रांत म्हटले जाते. या प्रांतात जे ताम्रपाषायुगीन संस्कृतीचे अवशेष सापडले तेच माळवा संस्कृती या नावाने ओळखले जातात. या संस्कृतीचे अवशेष अनेक ठिकाणी झालेल्या उत्खननात हाती आलेले आहेत. ती ठिकाणे म्हणजे मध्यप्रदेशातील कायथा, नावडातोली, महाराष्ट्रातील दायमाबाद इ. या संस्कृतीतींल मृदभांडी वैशिष्टयपूर्ण असून ती प्रामुख्याने चाकावर घडवलेली पण कमी भाजलेली तसेच विविध आकारांची असून मृदभांडयांवर लालसर व नारंगी पृष्ठभागावर काळ्या रंगात केलेले चित्रण आढळून येते.

**५) रंगपूर आणि प्रभास संस्कृती :-**

हडप्पोत्तर काळातील ताम्रपाषाण संस्कृतीचा विस्तार हा गुजराथ - कच्छ या प्रदेशातील झाला असल्याचे दिसते. तेथे रंगपूर संस्कृती आणि प्रभास संस्कृती या ठिकाणी विकसित झाल्या. कच्छ भागात हे अवशेष दिसून आलेले आहेत ते प्रामुख्याने रंगपूर, राजगड व लोथल या ठिकाणी केलेल्या उत्खननाद्वारे.

हडप्पा संस्कृतीच्या नंतरच्या काळात सौराष्ट्रातील सोमनाथ, प्रभास, पाटण या ठिकाणी आणखी एक संस्कृतीचे अवशेष मिळालेले असून त्याला 'प्रभास संस्कृती' असे नाव दिलेले आहे. प्रभास येथील मृदभांडी मध्यम जाडीची, गुलाबी गाभ्याची, पिवळसर दुधी लेप असलेली, चाकावर घडवलेली व लालसर रंगात चित्रीत केलेली आहेत. हडप्पा संस्कृती नंतर रंगपूर येथे मिळणाऱ्या चमकदार लाल मृदा भांडयांच्या आधी ही वापरत होती असे प्रभास येथील उत्खननात आढळून आलेले आहे.

**६) सावळदा संस्कृती :-**

सावळदा हे महाराष्ट्रातील एक ठिकाण असून खानदेशातील तापी नदीच्या काठी सावळदा येथे ताम्रपाषाण युगातील वस्ती आढळली आहे. सर्वप्रथम हे अवशेष सावळदा या ठिकाणी मिळाले म्हणून तिला सावळदा संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीचे अवशेष दायमाबाद येथेही आढळले आहेत. यात राखी रंगाचे कफन कुंभ (Urns) मिळालेले आहेत. काही विद्वानांच्या मते येथील मृदाभांडी ही सावळदा प्रकारचीच असून काहींच्या मते तिचा सिंधू संस्कृतीशी दुरान्वये संबंध असावा.

**७) जोर्वे संस्कृती :-**

या काळातील आणखी एक महत्वाची संस्कृती म्हणजे जोर्वे संस्कृती. ही संस्कृती महाराष्ट्राच्या नगर जिल्यातील प्रवरा नदीच्या काठी आढळून आली. या ठिकाणी उत्खनन झाले असता तेथील अवशेष हे ताम्रपाषाण संस्कृतीशी साम्य असलेले आहेत. या संस्कृतीचे सर्वप्रथम पुरावे जोर्वे या ठिकाणी सापडल्यामुळे या संस्कृतीला 'जोर्वे संस्कृती' असे म्हणतात. या संस्कृतीचा प्रभाव महाराष्ट्रात आणि मध्य प्रदेशात प्रामुख्याने आढळून येतो.

जोर्वे संस्कृतीतील मृदा भांडी ही चाकावर घडवलेली पण पक्क्या भाजणीची आहेत तसेच त्यांच्या पृष्ठभाग विटक्या लाल रंगाचा आहे. विशेष म्हणजे तोटीयुक्त भांडी हे या संस्कृतीचे वैशिष्टये आहे. त्यावर प्रामुख्याने भौमितिक आकाराचे व काही प्राण्यांचे चित्रण केलेले आढळून येते. या ठिकाणी सापडलेल्या अवशेषांमध्ये तांब्यांच्या पसरट चपटया कुऱ्हाडी, छीन्न्या, तांब्यांचे मनी इ. वस्तू आढळून येतात.

अशा तऱ्हेने भारतात विविध प्रदेशात या ताम्रपाषाण युगीन संस्कृती उदयास आल्या होत्या. विशेष म्हणजे या सर्वच संस्कृतींचा उदय हा इ.स.पूर्व दुसऱ्या सहस्त्रकात झाला होता. त्यांची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे.

- त्यांना स्वतःची सुनिश्चित अशी अर्थव्यवस्था होती. ते केवळ भटके नसून स्थिर जीवन जगत होते. हे त्यांच्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेतून कळून येते. याशिवाय शेतीतील

अतिरिक्त धान्य ते साठवून ठेवत असत. शेती बरोबरच शिकार व मासेमारी हे ही त्यांचे व्यवसाय होते.

- या ताम्रपाषाण युगीन लोकांनी अत्यंत उत्कृष्ट दर्जाची व धारदार अशी दगडी व धातूची हत्यारे बनवण्याची कला अतिशय विकसित केलेली होती. या लोकांची विविध आकारांची विविध पद्धतींची उत्कृष्ट दर्जाची अशी धारधार पाती व इतर हत्यारे आपणास मोठया प्रमाणावर उत्खननात मिळालेली आहेत.

- या सर्व उत्तर सिंधूकालीन संस्कृतीचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची रंग व आकृतींनी चित्रीत केलेली मातीची भांडी. सर्वसामान्यपणे भांडी ही लाल मातीची असून त्यावर काळ्या रंगांनी आकृती काढलेल्या आढळून येतात.

आत्ता पर्यंत पाहिलेल्या हडप्पोत्तर कालीन ताम्रपाषाण युगीन संस्कृती या प्रामुख्याने राजस्थान, गुजरात, कच्छ, माळवा, महाराष्ट्र आणि दख्खनच्या काही भागात उदयास आल्याचे दिसते. या संस्कृतीप्रमाणेच भारताच्या पूर्वेकडील आणि दक्षिणेकडील काही भागातही ताम्रपाषाण संस्कृतीचा उदय झाल्याचे दिसते. त्याबाबत पुढील माहिती सांगता येईल.

**पूर्वेकडील ताम्रपाषाण संस्कृती (इ.स. पू. १५०० - इ.स.पू.७००)**

भारताच्या पूर्वेकडील विशेषतः गंगा यमुनेच्या दोआबात आणि बिहार, तसेच बंगाल या राज्यांमध्येही ताम्रपाषाण संस्कृतीचे अस्तित्व दिसून येते. येथील प्रमुख वसाहती म्हणजे गोरखपूर जिल्ह्यातील चिरांद आणि पश्चिम बंगाल मधील बिरभूम जिल्ह्यातील म्हैसदळ येथील वसाहती प्रमुख आहेत.

या संस्कृतीच्या विशेष म्हणजे येथील मृदा भांडी ही काळी आणि तांबडी पांढऱ्या रंगात नक्षी असलेली आहेत. या वसाहतीच्या उत्खननामधून तांब्यांच्या कितीतरी वस्तू आढळून आलेल्या आहेत त्या म्हणजे बांगडया आणि कडया तसेच येथे हाडांची व जनावरांच्या शिंगांची तसेच हस्तीदंतांची बाणाग्रे, दगडी पाती, मौल्यवान दगड इ. वस्तू उपलब्ध झालेल्या आहेत. काही ठिकाणी वैशिष्टयपूर्ण ताम्रनिधी सापडलेले आहेत. त्यात विविध प्रकारच्या चपटया, कुऱ्हाडी, मनुष्याकृती वस्तू, दंतूर मत्स्य बाण, कडया, भाल्याची पाती, मुठी असलेल्या तलवारी आढळून येतात. काही विद्वान या ताम्रनिधींचा संबंध गेरुचित्रित मृदभांडयांशी लावतात.

**दक्षिण भारतातील ताम्रपाषाण संस्कृती :-**

इ.स.पूर्व २००० ते इ.स.पूर्व १८०० या काळात दक्षिण भारतातही या ताम्रपाषाण संस्कृती उदयास आल्या होत्या. खरेतर दक्षिणेत असलेल्या नवाश्मयुगीन वसाहतींची परिनती या काळात ताम्रपाषाणयुगात झाली होती म्हणून दक्षिणेतील काही वसाहती - ताम्रपाषाणयुगीन म्हणून ओळखल्या जातात. दक्षिण भारतात ही संस्कृती आधी विकसित झाली. त्यानंतर महाराष्ट्र, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये विकसित झाल्या असल्याचे दिसतात.

वर उल्लेखलेल्या प्रमाणे भारताच्या अनेक भागात ताम्रनिधी सापडले असून उत्तरे प्रमाणेच ते मध्यभारत, छोटा नागपूर, ओरिसा, आंध्रप्रदेश तसेच गुजरात आणि हरियाणामध्येही आढळलेले आहेत. यांचाही संबंध गेरू चित्रित मृदाभांडयांशी लावला जातो व त्याचा काळ अंदाजे इ.स.पूर्व २००० ते इ.स.पूर्व १८०० या दरम्यानचा मानला जातो.



अशा तऱ्हेने ताम्रपाषाण युगाचे एकूण तीन टप्पे मानले जातात. ते पुढील प्रमाणे .

१. हडप्पा कालखंड

२. विकसित हडप्पा कालखंड

३. हडप्पोत्तर कालखंड

वरील ताम्रपाषाण युगीन संस्कृतीचे वेगवेगळ्या टप्प्यात वेगवेगळी लक्षणे आढळून येतात. विशेष म्हणजे तांब्याच्या खाणीतून तांबे मिळवून ते शुद्ध करून त्यापासून हत्यारे बनवण्याची कला त्यांनी अवगत केली होती. मात्र बहुसंख्य वसाहतींमध्ये पूर्वीच्या दगडी हत्यारांचाही वापर होत असल्याचे आढळून येते. आणि जवळजवळ सर्वच ताम्रपाषाण वसाहती कुंभाराच्या चाकावर बनवलेली लाल आणि काळी मृदा भांडी असलेली आढळून येतात.

### क) महापाषाणीय संस्कृती (Megalithic Culture) आणि ऐतिहासिक कालखंड ऐतिहासिक प्रारंभकाळ (Early Historic Period) :

## २.५ महापाषाणीय संस्कृती (Megalithic Cultures)

प्रागैतिहासिक काळात विशेषत: दूसरे व पहिले सहस्त्रक या काळात युरोपात या संस्कृतीचा उगम झाला. या काळातील लोकांना मोठमोठ्या ओबडधोबड शिला रचण्याची व स्मारके उभारण्याची कला अवगत होती. अशा लोकांच्या संस्कृतीलाच महापाषाण किंवा महाश्मयुग असे म्हणतात. या संस्कृतीचे वैशिष्ट म्हणजे त्यांच्या दफनविधीचा विशिष्ट प्रकार होय.

भारतातही महापाषाणीय संस्कृतीचे अवशेष काही ठिकाणी सापडले आहेत. प्रामुख्याने दक्षिण भारतात केरळ, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक या भागात महापाषाण काळातील लोकांनी उभारलेली दफने मोठया प्रमाणावर आहेत. दक्षिण भारताव्यतिरिक्त राजस्थानमधील दवसा, उत्तर प्रदेशातील खेरी देवधुरा, अलाहाबाद, मिर्झापूर, बनारस, काश्मीरमध्ये लेह, बीहारमध्ये सिंगभूम, वायव्य सरहद्द बलुचिस्तान, मकरान, वाघोदर, मुरादमेमन या ठिकाणी थोडया बहुत प्रमाणात आढळतात.

दक्षिण भारतातील दफन केलेल्या मृताबरोबरच विविध प्रकारच्या वस्तू दफन केलेल्या आहेत. सांगाडा दफन करण्याची पद्धत वेगवेगळी असल्याचे आढळते.

**दफन पद्धती :**

महापाषाणीय कालखंडातील निरनिराळ्या भागात सापडलेल्या पुराव्यांवरून असे आढळते की त्यांच्या ठिकठिकाणी दफन करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती होत्या. भारताच्या वायव्य



munotes.in

सरहद्दीवरील ठिकाणी सापडलेल्या दफनामध्ये एककेंद्रीय चक्राचे चित्रण असलेली मृदभांडी, लोखंडाच्या वस्तू व घोड्याचे अवशेष सापडतात.

भारतात महापाषाणीय दफनाच्या विविध विविध पद्धतींमध्ये शिळावर्तुळ, शिळावर्तुळातील पेटिका-दफन इ. ज्यांच्या बरोबर शैलोत्कीर्ण खोल्यातील दफने केरळ राज्यात आणि कर्नाटकात दफन पेटिका सापडल्या आहेत. महापाषाणीय संस्कृतीत दफनाच्या केवल शिळावर्तुळाच्या नसून दफनाचे वेगवेगळे प्रकारही होते. साधा खड्डा खणून त्यात कुंभामध्ये शव ठेवणे दफन केलेल्या ठिकाणापासून लंबरूप आणि खालील भागात शिला ठेवून अत्यंत परिश्रम पूर्वक तयार केलेल्या स्वस्तिक पेटिका यांचाही समावेश असे.

महाराष्ट्राच्या महाश्मयुगीन स्थळे विपुल प्रमाणावर आढळली आहेत. ही स्थळे प्रामुख्याने विदर्भात आढळून येतात. विशेषत: पूर्व विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली आणि नागपूर या जिल्ह्यात अशी महाश्मयुगीन शिलावर्तुळे मोठ्या प्रमाणात आढळली आहेत. उदा. टाकळी येथे ७, वानाडोंगरी येथे – ७८, नागलवाडी येथे ३५, हिंगणा येथे ३९ तर नागपूर जवळच्या रायपुर येथे २२३ शिळावर्तुळे आहेत. वर्धा जिल्ह्यातही खैरवाडा येथे विपुल प्रमाणावर आढळून आली आहेत.

या शिळावर्तुळांचे स्वरूप हे सामान्यत: सारखेच आहे. मुरमाड जमिनीवर मोठमोठ्या शिळावर्तुळाकार आकारात लावून त्यांच्या मध्यभागी खड्डा खणला जाई. या खड्ड्यात जमिनीवर, मडक्यात मानवी अस्थी पुरल्याचे आढळले नंतर त्यावर एकमीटर जाडीचा काळ्या मातीचा थर टाकून त्यात लोखंडी हत्यारे, तांब्याच्या वस्तू, मृदभांडी प्रसंगी घोडयाचे अवशेष पुरल्याचे आढळले. त्यानंतर मुरुम मिश्रीत बारीक दगडांचा थर टाकून या शिळावर्तुळाच्या मध्यभागाची उंची इतर भागांपेक्षा काही ठिकाणी उंच ठेवल्याचे दिसते.

महापाषाणीय युग हे वेगळ्या कालखंडात अस्तित्वात होते असे म्हणता येणार नही कारण दफन केलेल्या मृतासोबत ज्या वस्तूंचेही दफन केले जाई त्यात लोखंडी वस्तूदेखील आढळतात. त्यामुळे हा काळ किंवा ही संस्कृती लोहयुगाच्या कालखंडाला समांतर असावी असे वाटते.

श्री. आर.एस.शर्मा यांच्या उल्लेखानुसार अशोकाच्या शिलालेखात ज्या दक्षिणीय राजांचा उल्लेख आलेला आहे ते चोल, पांड्य आणि चेर हे राजवंशही महापाषाण काळातील असावेत असे वाटते.

महाराष्ट्रात एका ठिकाणी शिळावर्तुळे सर्वात जास्त आढळतात ते म्हणजे भंडारा जिल्ह्यातील खैरबांडा येथे. या ठिकाणी मोठे प्रस्तर शिला, दगड, गोटे, फारशा आढळल्या आहेत. तसे पहायला गेले तर दक्षिण भारताच्या तुलनेत उत्तर भारतात महापाषाणीय संस्कृतीचे अवशेष थोडे कमी प्रमाणात आढळतात.

**महापाषाणीय कालखंडातील हत्यारे, अवजारे व भांडी :**

महापाषाण काळातील लोकही तंत्रज्ञान अवगत असलेले, कलाकुसरीत माहीर असलेले, प्रगत प्रकारचे होते. त्यांनी दफन केलेल्या मृतांसोबत ज्या वस्तू दफन केल्या आहेत त्यामध्ये विविध प्रकारच्या वस्तू सापडल्या आहेत. जसे काळ्या मातीपासून व तांबडया

मातीपासून घडविलेली भांडी, घोडयांचे अवशेष (घोडा आपल्या मालकासोबत दफन केल्याची साक्ष) विटकरी रंगाच्या भांडयांवर हलकासा पिवळसर व पांढरट रंगात रेखाकृती चित्रण केलेली मृदभांडी दफानासोबत सापडली आहेत. लोखंडाबरोबर कांस्य धातूचा व सोने धातूचा वापरही या काळातील लोकांना माहित होता असे दिसते.

दक्षिण भारतातील अदिचनल्लूर येथे उत्खनन झाले असतात तेथे लोखंडाचे भाले, त्रिशूल, शूल, तलवारी, कटयारी इ. सापडले आहेत. तर नागपूर जवळील माहुरझरी येथे लोखंडी छिन्न्या, भाले, चपट्या, कुऱ्हाडी, तलवारी, कटयारी सोबत काही अलंकाराच्या वस्तू जसे बांगडया, नथण्या इ. होत. हे सर्व दफन केलेल्या ठिकाणी सापडले आहेत. याचा अर्थ ह्या वस्तू ज्या व्यक्तीच्या मालकीच्या होत्या त्या त्याच्या सोबत पुरण्याची प्रथा होती असे दिसते. नक्षी असलेली सोन्याची कर्णफुले, तांब्याची कडी, कंठमाला इ. महापाषाणीय स्थळांच्या वस्तूही उत्खननात हाती लागल्या आहेत.

विदर्भातील शिळावर्तुळांमध्ये सामान्यतः इतरत्र आढळतात त्याप्रमाणे लोखंडाच्या वस्तू आढळल्या आहेत, त्यात शेती संबंधीची अवजारे शिकारीसाठी वापरण्यात येणारी हत्यारे सुतारकामात उपयोगात आणली जाणारी हत्यारे, अवजारे तसेच घरगुती कामाची अवजारे आढळली आहेत. या व्यतिरिक्त तांब्याच्या वस्तू विविध रंगांची मृदभांडी, मणी काही ठिकाणी सुवर्ण अलंकार आढळले आहेत.

काही वस्तू अशा सापडल्या आहेत की त्या आपल्याला आश्चर्यकारक वाटतील, ज्यामध्ये अशी एक कटयार आहे की तिचे पाते लोखंडाचे व ,मूठ तांब्याची आहे. घोडयासोबतही घोड्याला घालावयाचे चामड्याचे तांब्याचे अलंकार सापडले आहेत. मातीच्या भांडयामध्ये वाडगे, थाळ्या, निमुळत्या बुडाची भांडी असून छोटया आकारात ती त्या झाकणाच्या वरील भागात बसविलेली दिसते. ज्यांच्या सहाय्याने त्या भांड्यावरचे झाकण हाताने सहजच उचलता येईल.

**आहार :**

महापाषाणीय काळातील लोकांच्या आहारात त्यांनी शेतीतून उत्पादित केलेल्या धान्यांचा समावेश होता. त्यात प्रामुख्याने भात वा नाचणी या पिकांचा समावेश होतो. या काळातील लोकांनी तालाव बांधून शेतीसाठी पाण्याची व्यवस्था केली होती. महाराष्ट्रात नागपूर जवळ झालेल्या उत्खननात .लोकांच्या घरांचे अवशेष, लोखंड बनवायच्या भट्टया व गहू, तांदूळ, जव आणि वाटाणे या धान्यांचे अवशेष सापडले आहेत. या काळातील मानवही शाकाहारी व मांसाहारी होता असे दिसते. यांची जीवनशैली थोड्याफार प्रमाणात वेगळी होती असे दिसते.

**धार्मिक समजुती :**

महापाषाण काळातील लोकांचाही मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. म्हणूनच त्यांनी महापाषाणीय शिळावर्तुळांची निर्मिती ही मानवाच्या मरणोत्तर जीवनाशी असलेली दिसते. मानवाच्या मृत्यूनंतर त्याचे यथायोग्य दफन करून त्याच्या आवडी निवडीच्या वस्तू त्याच्या सोबत ठेवल्या जात. त्याच्या हाताळलेल्या आवडीच्या वस्तू त्याच्या सोबत दफन करणे

यातूनच त्याचा 'आत्मा' या संकल्पनेवर विश्वास होता असे दिसते. ह्या व्यक्तींच्या मते, मृत्यूनंतरचे निवास स्थानच आहे व मरणोत्तर जीवनात त्याला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये अशा कल्पनेने त्याच्या सोबत उपयोगी हत्यारे आणि अवजारे अशा शिळावर्तुळात ठेवल्याचे आढळते. त्यांची अशी समजूत होती की कदाचित मृत्युनंतरच्या आयुष्यात त्याने वापरलेल्या वस्तूंची आवश्यकता भासेल अशा त्यांच्या समजुती होत्या. या काळातील लोक हे भावनिक व प्रेमळ असावेत असे दिसते. त्यांच्या दफनाच्या पद्धतीमध्ये लहान मुलांचे दफन करण्याची पद्धत, वृद्ध व्यक्तीला करण्याची पद्धत ह्या वेगवेगळ्या असल्याचे आढळून येते आणि यावरून त्यांच्या धार्मिक समजुतींविषयी अंदाज लावता येतो.

## २.६ ऐतिहासिक प्रारंभकाळ (Early Historical Period)

ऐतिहासिक काळाचा टप्पा गाठण्यापूर्वी मानवाने विविध टप्प्यांतून प्रगती केलेली आपण पाहतो. मानवाची अगदी प्रारंभीची अवस्था म्हणजे अश्मयुग. या अश्मयुगाचेही तीन टप्प्यात विभाजन केले जाते. ते म्हणजे पूर्व 'पुराश्म युग', 'मध्यपुराश्मयुग', त्यानंतरचा टप्पा म्हणजे 'मध्याश्मयुग' आणि नंतरचा टप्पा म्हणजे 'नवाश्मयुग'. इथपर्यंत मानव हत्यारांसाठी जास्तीत जास्त दगडांचा (अश्म) वापर करीत होता. नंतरच्या काळात धातूचा शोध लागला आणि मानवाने धातूंबरोबर दगडाचाही वापर केला तो काळ म्हणजे ताम्रपाषाण युग ही सर्व युगे मानवाची प्रगती कशी होत गेली? त्यासाठी किती काळ लागला हे दर्शवितात. एका युगाचा शेवट हा दुसऱ्या प्रगतशीर युगाची सुरुवात असते असेच यावरून कळते. कारण कोणतीही संस्कृती ही अचानक उगम पावली नाही किंवा नष्टही झाली नाही. एका कालखंडातून दुसऱ्या कालखंडात संक्रमित होताना आधीच्या काळाचा प्रभाव नवीन काळात दिसून येतो.

सिंधू संस्कृती ही नागरी संस्कृती होती आणि तिचा ऱ्हास झाला पण त्यानंतर जी संस्कृती उदयास आलेली दिसते. ती ग्रामीण संस्कृती होती. या ग्रामीण संस्कृतीचा मुख्य आधार शेती आणि शेतीशी संबंधित कही जोड उद्योग हे होते. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतर जी ग्रामीण संस्कृती उदयास आली. ती संपूर्ण भारतभर वेगवेगळ्या काळात दिसून येते. या ग्रामीण संस्कृतीचा कालखंड सर्वत्र सारखाच आढळत नाही. म्हणूनच या संस्कृतीला हडप्पोत्तर संस्कृती असे म्हणतात. या ग्रामीण संस्कृत्या ह्या त्यांच्या पुरातत्त्वीय अवशेषांद्वारे विभाजित केल्या जातात.उदाहरणार्थ :

१) गांधार ग्रेव्ह संस्कृती (स्वात नदीचे खोरे)

२) ऑकर कलर मृदभांडी (OCP Pottery)

३) ताम्रवस्तू संचय संस्कृती (Copper Hoard Culture)

ह्या विविध संस्कृती इ.स.पूर्व दुसऱ्या सहस्त्रकात होऊन गेल्या. यांचा संबंध काळी-तांबडी मृदभांडी, काळ्या झिलईची मृदभांडी या संस्कृतीशी लावला जातो, कारण यांचा काळही इ.स.पूर्व दुसरे सहस्त्रक होते.

## लोहयुग :

लोहयुगाचा उदय म्हणजे इतिहासामध्ये फार मोठा बदल झाला आहे असे म्हणता येईल. लोहयुगाचा प्रारंभ हा ताम्रपषाण संस्कृतीच्या शेवटच्या कालखंडात किंवा असत झाल्यानंतर झाला असावा असे इतिहास तज्ञांचे मत आहे. लोखंडाच्या शोधामुळे माणसाने हत्यारांमध्ये आणि अवजारांमध्ये मोठे बदल घडवून आणले. भारतात लोहयुगाचा उदय हा विविध प्रदेशांत वेगवेगळ्या कालखंडात झालेला होता.

भारतातील लोहयुगाची सर्वात प्राचीन साक्ष म्हणजे राजस्थान मधील आहार संस्कृती होय. कच्च्या लोखंडापासून ते टणक लोखंडापर्यंत (पोलाद) जी प्रक्रिया केली गेली तिचा कालखंड हा वेगवेगळा आहे. कही इतिहासकारांच्या मते भारतात इ.स. पूर्व १३०० ते इ.स. १००० असा काळ सांगितला आहे. तर काहींनी इ.स.पूर्व चौथे शतक इतका सांगितला आहे. ऋग्वेद काळात ‘अयस’ हा शब्दप्रयोग आढळतो तर संस्कृत भाषेत लोह या शब्दासाठी ‘मुंड’, या शब्दाचा उपयोग केलेला आहे. याचा इतिहास म्हणजे भारतात मुंड जमातींच्या लोकांनी लोह धातूचा उपयोग केला म्हणून याला मुंड असे म्हटले जाते. लोखंडाला ‘मुंडायसम आणि मुंडलोहम’ अशीही नावे आहेत.

पुरातत्त्वीय पुराव्यांद्वारे लोहयुगाची काही विशिष्ट वैशिष्ट्ये आढळून येतात ती म्हणजे पुढीलप्रमाणे :

१) चित्रीत राखी मृदभांडी [Painted Grey Ware (PGW)]

२) काळी तांबडी मृदभांडी [Black & Red Ware (BRW)]

३) महापाषाणीय दफने (Megalithic Graves)

पुरातत्त्वीय उत्खननात आपल्याला सापडलेल्या पुराव्यावरून असे दिसते की ही संस्कृती साधारणतः इ.स.पूर्व पहिल्या सहस्त्रकात अस्तित्वात होती. भारताच्या वेगवेगळ्या ठिकाणी उत्खनन झाले आणि तेथे सापडलेल्या पुराण अवशेषांवरून असे अंदाज वर्तविले की इ.स.पूर्व पहिल्या सहस्त्रकात या संस्कृत्या अस्तित्वात असाव्यात. त्या काळातील भांड्यांच्या रंगावरून या संस्कृत्यांना विशिष्ट नावे देण्यात आली. ती पुढीलप्रमाणे -

### गांधार ग्रेव्ह संस्कृती :- स्वात खोरे

गांधार कबर संस्कृती मध्ये मृत शरीरास वेगवगेळ्या पद्धतीने पुरण्याची पद्धत होती. त्यासोबत खूप मोठ्या प्रमाणात त्यांची भांडी देखील पुरल्याची अनेक ठिकाणे आढळली आहेत. गांधार ग्रेव्ह संस्कृतीचे तीन भाग केले जातात. प्रारंभिक, मध्य आणि उत्तर प्रारंभिक काळातील दफनांमध्ये डोंगरावर वरच्या बाजूस अतिशय काळजीपूर्वक मृताला अग्निसंस्कार झाल्यानंतर अंत्येष्टी प्रक्रियेला महत्व दिलेले दिसते. यात आयताकार दगडांची रचना आढळते. अग्नी संक्रमण झाल्यानंतर अस्थी कलश दफन केल्याचे आढळते. दुसऱ्या प्रकारात मृत शरीरच दफन केल्याची अनेक ठिकाणे आढळतात आणि या काळात मातीच्या भांड्यांच्या बनावटीत खूप सुधारणा झाल्याचे दिसते. तांबे या धातूचा



munotes.in

उपयोगही या काळात केल्याचे आढळते. शेवटच्या प्रकारची मानवी मूर्ती ह्या गोष्टी आढळतात, तसेच या काळापासूनच लोखंडाचा वापर सुरु झाला असावा असे वाटते.

**ऑकर कलर मृदभांडी :- [Ochre Colour Pottery (OCP)]**

OCP संस्कृतीचा सर्व प्रथम शोध १९५०-५१ मध्ये उत्तर प्रदेशातील बिसौली आणि राजपूर परसू या ठिकाणी केलेल्या उत्खननात लागला. या संस्कृतीत मातीची भांडी घडविण्यासाठी चाकाचा वापर करण्यात आला. या भांड्यावर लाल रंगाच्या आणि काळ्या रंगाच्या कलाकृती पाहायला मिळतात. OCP मृदभांडीची सर्वसाधारणपणे पश्चिम उत्तर प्रदेशात सहारनपूर, मुज्जफरनगर, मेरठ आणि बुलंदशहर ही केंद्रे होती. हस्तिनापूर, अहिच्छत्र आणि झिंझाना येथे OCP आणि PGW या दोन्ही प्रकारची भांडी आढळतात. या नंतर काळ्या - तांबडया (BRW) या मृदभांडयांच्या काळाला सुरुवात झाली. उत्तर भारतातील अनेक ठिकाणी OCP मृदभांडी आढळतात. या काळात भांड्यांमध्ये विविधता आढळते. जसे मातीची भांडी, दगडाची भांडी, धातूची भांडी आणि काही उपकरणे, हत्यारे यांचाही समावेश आहे.

**ताम्रवस्तु संच संस्कृती :- [Copper Hoard Culture]**

१८२२ मध्ये उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यातील बिहूर या ठिकाणी एक तांब्याची काटेदार बरछी म्हणजे एक प्रकारची दुधारी तलवार (लहान भाला) तेव्हापासून आतापर्यंत तांब्याची अनेक छोटीशी उपकरणे मिळाली आहे आणि त्यामुळेच या पुरातत्वज्ञांनी “ताम्र वस्तू संच”/ कॉपर होर्डस् संस्कृती असे नव दिले. भारतात या संस्कृतीचे प्रमाण गंगा नदीचे खोरे, उत्तर प्रदेश, बंगाल, उडीसा, हरियाना, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू या ठिकाणी या संस्कृतीचे अवशेष आढळतात. OCP संस्कृतीच्या उत्खनन काळातच ताम्रवस्तू संच संस्कृतीचा शोध लागत गेला. या तांब्याच्या वस्तूंमध्ये मानवी आकृत्या, टोकदार भाले, हार्पून, कुऱ्हाडी, खुरपी, दुधारी कुऱ्हाडी, मासे पकडण्याचे गळ, चपट्या कुऱ्हाडी, अलंकारीक तलवार यांचा समावेश होतो.

**काळी तांबडी मृदभांडी : [ Black and Red Ware (BRW) ]**

काळी तांबडी मृदभांडी ही विशेषकरून हडप्पा संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. ही भांडी बाहेरील बाजूने लाल असतात व आतील बाजूस काळी असतात. कदाचित त्यांची पक्वता वाढविण्यासाठी त्यांना आतील बाजूने भाजल्यामुळे ती काळी होतात आणि बाहेरची बाजू ऑक्सिजनमुळे लाल पडत असे. आणखी एक असा विचार आहे की त्या भांड्यांना दोनदा भाजल्यामुळे त्याचा असा रंग होत असावा. भाजून परिपक्व करण्याची ही त्यांची प्रक्रिया होती व ही भांडी भारतात चिरांद, पिकलीहाल, लोथल, सूरकोटडा, रंगपूर, रोजडी, देसलपूर, पांडू राजा ढिबी इ. ठिकाणी सापडतात.

या संस्कृतीतील आणखी कही वस्तू प्राप्त होतात. त्यात लाल मातीची भांडी, धूसर मातीची भांडी, इ. चा समावेश होतो. सामान्यतः ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा  या काळ्या तांबडया मृदभांडयांशी संबंध जोडला जातो.

**चित्रीत धूसर मृदभांडी :- [ Painted Grey Ware (PGW) ]**

चित्रीत राखी मृदभांडी ही सर्वप्रथम १९४० हस्तिनापूर या भागात बी.बी.लाल यांनी जेव्हा उत्खनन केले तेव्हा मिळाली. PGW ही संस्कृती फार विस्तृत क्षेत्रात पसरली होती. हिमालयापासून मध्य भारतातील माळवा भागापर्यंत, पाकिस्तान पासून ते उत्तर प्रदेशातील अलाहाबादपर्यंत या संस्कृतीचा कालखंड इ.स.पूर्व ११०० ते ५०० या मध्ये निश्चित केला जातो. तज्ञांच्या मते, हा काळ NBPW (Northern Black Polished Ware) या काळानंतरचा काळ असावा. ही एक अर्ध नागरी संस्कृती होती असे दिसते.

ही संस्कृती बऱ्यापैकी विकसित होती. रस्ते, घरे, गल्ल्या, चुलीची घरे, पाण्याची नलिका, अग्निकुंड, टेराकोटा प्रकारच्या मातीच्या मूर्त्या दगडाचे मणी व अलंकार, सोन्याचे आणि तांब्याचे दागदागिने इ. येथील उत्खननात सापडले आहेत. तसेच या ठिकाणी गहू, तांदूळ, जव या पिकांचे उत्पादन घेतले जाई. त्याचबरोबर पशुपालन केले जाई. मासेमारीसुद्धा केली जाई. भांड्यावर भौगोलिक आकारात नक्षीकाम केले जाई.

**महापाषाणीय दफने :- Megalithic Graves**

दक्षिण भारत हा महापाषाणीय संस्कृतीचा उगमस्थान होता. कारण दक्षिण भारतात नवपाषाण (नवाश्म) आणि महापाषाण संस्कृतीचे संयुक्तीक रुपात पुरावे सापडतात. दक्षिण भारतातल्या अनेक ठिकाणी महापाषाणीय दफनभूमी आढळते. त्यात असलेल्या मातीच्या भांड्याचे कालपरीक्षण केले असत. इ.स.पूर्व १००० ते १०० हा काळ निश्चित केला आहे. ही संस्कृती कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ या राज्यात प्रसारित झाली होती. ह्या संस्कृतीतील लोक लोखंडाचा उपयोग करीत होते. म्हणूनच लोहयुगाची सुरुवात असावी असेही तज्ञांचे मत आहे. शेती, शिकार, मासेमारी आणि पशुपालन ह्या काळात केले जाई. शेतातून बाजरी, डाळी रागी, कुळीथ, मूग, तांदूळ यासारखी पिके घेत. या ठिकाणी अनेक दफनस्थाने सापडली. त्यात ताबूत असून मृत शरीराच्या आजूबाजूला अनेक भांडी, वस्तू सापडल्या आहेत.

**ऐतिहासिक प्रारंभकाळाची वैशिष्ट्ये :**

**१) गंगा नदीच्या खोऱ्यातील नागरीकरणाची प्रक्रिया :**

लोह युगात अनेक क्रांतिकारक बदल झाले. लोखंडाच्या शोधापूर्वी तांब्याचा वापर जास्त केला जाई परंतु, लोखंडाच्या टणकपणामुळे तत्कालीन मानवाला जीवनात मोठ्या प्रमाणात बदल घडवता आले. त्याने लोखंडी हत्याराद्वारे जंगल सफाई करून शेती लायक जमीन तयार केली. लाकडी नांगराला लोखंडी फाळ लावले. व्यापार वाढला. हस्तकलांचाही उदय झाला आणि त्यामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

**२) चलनी नाण्यांचा विकास :**

लोहयुगात शेतातून उत्पादन वाढले परिणामी व्यापार वाढला. नुसत्या धान्यांचाच व्यापार होत होता असे नाही तर धातूंच्या कलाकुसरीच्या वस्तू यांचीही 'मागणी होती. वाहतुकीच्या साधनात वाढ केली गेली. व्यापारात देवघेवीला महत्त्व होते पण वस्तूंच्या किमती

ठरवल्यामुळे ती देवघेव करणे अधिक सोपे झाले. बाजारात चलनी नाण्याचा वापर वाढला. चांदीची, तांब्याची तसेच आहत नाणी वापरात येऊ लागली यामुळे नागरीकरणाला सुरुवात झाली.

**३) व्यापारी आणि औद्योगिक केंद्रांचा उदय आणि विकास :**

ज्या ठिकाणी कच्चा माल, खनिज संपत्ती, वाहतुकीची सोय सहज होत असे त्या ठिकाणी व्यापारी केंद्र विकसित झाली. आणि त्या ठिकाणच्या केंद्राचे नागरीकरण लवकर घडून आले. अशा नगरांमध्ये कारागीर काम करण्यासाठी येऊ लागले. अशा ठिकाणी तयार झालेल्या मालाला दूरवरपर्यंत मागणी होती आणि त्यातूनच व्यापारी संघटनांचा उदय झाला. त्या संघटनांना निगम, नगर, पुग, श्रेणी अशा पद्धतींची नावे होती.

**४) व्यापाऱ्यांची भूमिका :**

ज्या शहरांमध्ये औद्योगिक केंद्रे तयार झाली होती त्या ठिकाणी उत्पादित मालाला देशभरात मोठ्या प्रमाणात मागणी होती आणि यातूनच व्यापारी श्रेणी निर्माण झाल्या होत्या. या ठिकठिकाणी माल पोचवण्याची व्यवस्था करीत. उत्पादकांकडून माल विकत घेणे आणि सुरक्षितरित्या माल विविध ठिकाणी पोचविणे हे अतिशय महत्वचे कार्य व्यापाऱ्यांना पार पाडावे लागे.

**५) व्यापारी मार्गांचा विकास :**

नागरीकरणाच्या प्रक्रियेतून विविध व्यापारी केंद्रे उदयास आली. व्यापार वाढला. उत्पादित विविध वस्तूंना देशभरातून मागणी वाढू लागली आणि यातूनच माल निरनिराळ्या ठिकाणी पोचविण्यासाठी वाहतूक व्यवस्थेबरोबर वाहतूक मार्गांचाही विकास होऊ लागला. त्यांचीही भरभराट होऊ लागली. त्यातूनच देशभरात व्यापारी मार्गांचे जाळे निर्माण झाले व व्यापाऱ्यांचे मोठे तांडे व्यापारासाठी मैलोनमैल प्रवास करू लागले. वाटेत चोरांपासून संरक्षण व्हावे म्हणून 'सार्थवाह' या व्यापारी प्रमुखाची नेमणूक केली जाई. अशा पद्धतीने गरजेतून व्यापारी मार्गही विकसित होत गेले.

**६) लेखन कलेचा विकास :**

या काळात लेखन कलेचा पुन्हा एकदा विकास झाला. या काळात वाङ्मय निर्मिती ही मोठ्या प्रमाणात झालेली आढळते. 'पाणिनीच्या' अष्टाध्यायी हा ग्रंथ व्याकरणावर लिहिलेला आहे. अशोकाचे शिलालेख ब्राम्ही व खरोष्टी लिपींमध्ये आहेत. या काळात निर्माण झालेल्या कोरीव लेखाद्वारे आपणास तत्कालीन राजकीय माहिती मिळते.

**७) कला व स्थापत्याचा विकास :**

सम्राट अशोकाचे जसे लेखन कलेची साक्ष देणारे कोरीव लेख आहेत, त्याचप्रमाणे त्याने जे अनेक स्तूप बांधले, विहार बांधले, चैत्यगृहे बांधली यावरून त्या काळातील स्थापत्यकला किती विकसित होती हे कळते. त्या काळातील विजय स्तंभ, स्तंभावरील कोरीव कम यावरून आपल्या सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते.

प्रागैतिहासिक (Pre History), आद्य ऐतिहासिक (Proto Hiastory) आणि ऐतिहासिक प्रारंभकाळ (Early History Period)

**८) राजघराण्यांचा इतिहास :**

या काळात अनेक मोठ्या प्रमाणात वाङमय निर्मिती झाली. बौद्ध व जैन वाङमयातून तत्कालीन राजकीय जीवनाविषयी मोठ्या प्रमाणात माहिती मिळते. या काळात गणराज्य पद्धती, महाजनपदे, मगध राज्यावरील शासकांच्या राजघराण्याची माहिती, मौर्य काळाची माहिती त्यामुळे त्या काळातील राजघराणी आपणास चांगल्या पद्धतीने पुराव्यानिशी तपासून घेता येतील.

**९) विविध प्रकारची मृदभांडी :**

या काळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे काळ्या, लाल, राखाडी, हलक्या पिवळसर रंगाची मातीची भांडी हे या काळाचे वैशिष्ट्य आहे. विविध आकाराची कलात्मक मृदभांडी आपणास पहावयास मिळतात. उत्तर भारताच्या विविध क्षेत्रात अशा मातीच्या भांड्यांचा वापर होत होता. त्यावर विविध प्रकारच्या कलाकृती रंगविलेल्या आढळतात. तसेच त्यावर विविध भौमितिक आकृत्याही काढलेल्या आहेत. यावरून या संस्कृतीची भरभराट जाणून घेता येते.

**१०) भारतातील ऐतिहासिक कालखंडातील वसाहती :**

ऐतिहासिक कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रारंभिक काळातील वसाहती भारतभर आढळून येतात आणि त्या काळातील प्रगतीची साक्ष या वसाहतीत झालेल्या उत्खननातून मिळते. हरियाना, राजस्थान, गुजरात, गंगेचे खोरे, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आसाम, बिहार, बंगाल, ओरिसा, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू इ.राज्यांमध्ये वसाहत स्थळे आढळली आहेत. या राज्यांमधील कही शहरे व्यापारी मार्गाद्वारे एकमेकांना जोडली होती. त्यांचा विकास झाला होता, हे कळते.

वरील सर्व वैशिष्ट्यांवरून ऐतिहासिक कालखंडाची महत्त्वपूर्ण माहिती त्या काळातील प्रगती मानवी संस्कृती, जीवन या संदर्भात माहिती मिळते.

munotes.in

## २.७ प्रश्न

१) 'अश्मयुग' ही संकल्पना स्पष्ट करून तिचे विविध टप्पे सांगा.

२) प्रागैतिहासिक कालखंडातील मानवी प्रगतीचे विविध टप्पे सांगा.

३) अश्मयुगीन मानवाची प्रगती नवाश्मयुगाकडे कसकशी होत गेली, त्याचा मागोवा घ्या.

४) 'नवाश्मयुगीन मानव' या विषयावर एक निबंध लिहा.

५) 'ताम्रपाषाण युग' याविषयी माहिती द्या. हडप्पापूर्वकालीन ताम्रपाषाण संस्कृतींविषयी माहिती द्या.

६) सिंधू - संस्कृती (हडप्पा संस्कृती) च्या लोकांच्या भौतिक क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घ्या.

७) भारताची 'पहिली नागरी संस्कृती' म्हणून सिंधू (हडप्पा) संस्कृतींविषयी सविस्तर माहिती द्या.

८) हडप्पोत्तर काळातील भारतातील विविध ताम्रपाषाण संस्कृतींविषयी सविस्तर निबंध लिहा.

९) ऐतिहासिक प्रारंभकाळ म्हणजे काय ते सांगून तिच्या ठळक वैशिष्टयांचा मागोवा घ्या.

१०) भाष्य करा :

अ) मद्याश्मयुग

ब) भारतातील महापाषाणीय संस्कृती

क) लोहयुग

ड) भारतातील पहिले नागरीकरण (सिंधु संस्कृती)

## २.८ संदर्भ


- रायरीकर कल्पना आणि भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार, डायमंड प्रकाशन, पुणे, २००९.
- देगलूरकर गो.ब., प्राचीन भारत इतिहास आणि संस्कृती, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१५
- सांकलिया एच. डी. आणि माटे एम.एस., महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.
- देव एस.बी., महाराष्ट्राचा इतिहास, प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड-I, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
- देव एस बी, पुरातत्वविद्या, कॉन्टिनेंटल प्रकाशन, मुंबई, २००८ (दुसरी आवृत्ती)
- ढवळीकर एम के, भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१७.

ढवळीकर एम के, कोणे एके काळी सिंधू संस्कृती, राजहंस प्रकाशन, पुणे, २००६.


❖❖❖❖

# ३

# पुराभिलेखशास्त्र (कोरीवलेखशास्त्र) (EPIGRAPHY)

**अ ) पुराभिलेख: व्याख्या; भारतीय पुराभिलेखांचा इतिहास**

**ब) कोरीव लेखांचे प्रकार आणि त्यांचे महत्त्व**

**क) (I) ब्राम्ही आणि खरोष्ठी लिपींचा विकास;**

**(II) सम्राट अशोक यांच्या राजाज्ञा**

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ पुराभिलेख : अर्थ व व्याख्या

३.३ भारतीय पुराभिलेख विद्येचा इतिहास

३.४ कोरीव लेखांचे प्रकार आणि वैशिष्टये

३.५ क i ] ब्राम्ही व खरोष्ठी लिपींचा विकास

३.६ क ii ] अशोकाचे शिलालेख (राजाज्ञा)

३.७ सारांश

३.८ प्रश्न

३.९ संदर्भ

## अ) पुराभिलेख : व्याख्या व भारतीय पुराभिलेखांचा इतिहास

## ३.० उद्दिष्टे

या पाठात आपण पुराभिलेखशास्त्र / विद्या म्हणजे काय ते जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. तसेच भारतीय पुराभिलेख विद्येचा इतिहास, कोरीव लेखांचे प्रकार, त्यांची वैशिष्टये इ. बाबीही जाणून घेणार आहोत.

munotes.in

## ३.१ प्रस्तावना

इतिहासाची जुळणी करताना आणि विशेषतः प्राचीन भारताच्या इतिहासाच्या जुळवणीत आणि अभ्यासात कोरीव लेखांचे महत्व अनन्यसाधारण आहे. इतिहास म्हणजे केवळ राजकीय घडामोडींचा आढावा घेणे नसून मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पैलूंचा सूक्ष्म अभ्यास असा इतिहासाचा आता अन्वयार्थ लावला जातो. अर्थात या विविध पैलूंचा अभ्यास हा कोरीव लेखांतील माहितीच्या आधारे अधिक सखोलपणे लिहिता येणे शक्य झाले आहे.

प्राचीन भारतातील हे कोरीव लेख विविध लिपींमध्ये लिहिल्याचे आढळून येते. या लिपींमधील सर्वात प्राचीन लिपी म्हणजे ब्राम्ही आणि खरोष्ठी त्यानंतर शारदा आणि देवनागरी लिपीचा उदय झाला. त्यांच्याविषयी सविस्तर माहितीही या पाठात येत आहे.

## ३.२ पुराभिलेख : अर्थ व व्याख्या

पुराभिलेखविद्या म्हणजे कोरीव लेखांचा अभ्यास. प्राचीन अथवा गतकाळात लिहिलेला अथवा कोरलेला मजकूर म्हणजे पुराभिलेख होय. प्राचीन काळातील बहुतेक लेख हे कोरीव स्वरूपाचे आढळतात. असा कोरीव लेखांच्या अभ्यासास पुराभिलेखशास्त्र / विद्या अथवा कोरीवलेखनशास्त्र असेही म्हटले जाते. पुराभिलेखविद्या ही पुरातत्त्वशास्त्राची एक प्रमुख शाखा मानली जाते. कारण गेल्या काही वर्षात कोरीव लेखांच्या माध्यमातून फारच अनमोल अशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध झालेली असून विशेषतः प्राचीन आणि मध्ययुगीन भारताच्या इतिहासात कोरीव लेखांच्या अभ्यासास अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुराभिलेखांना म्हणजेच कोरीव लेखांना इतिहासाची अव्वल दर्जाची साधने समजली जातात. इतिहासाची जुळणी करण्याच्या कामी त्यांची अतिशय मोलाची मदत होते. कारण ज्या काळात हे लेख लिहिले गेले आहेत, त्या काळातील राजकीय सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना येऊ शकते. म्हणूनच प्राचीन तसेच मध्ययुगीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास करताना कोरीव लेखांना वगळून चालणार नाही. आता तर कोरीव लेखांच्या वाढत्या संख्येमुळे पुराभिलेखविद्या ही ऐतिहासिक संशोधनातील एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून आकार घेऊ लागली आहे.

कोरीव लेख म्हणजे दगड, धातू, नाणी, मृदाभांडी, विटा, लाकडी व हस्तीदंती वस्तू, शंख अशा प्रकारच्या वस्तूंवर कोरून लिहिलेला मजकूर. असा लिखित मजकूर म्हणजे मानवी विचारांचे, भाव-भावनांचे तसेच मानवी संस्कृतीचे प्रतिबिंब असतो. प्राचीन काळी कोरलेले बहुतेक लेख हे राजाच्या अथवा राजघराण्यातील व्यक्तीच्या आज्ञेवरून त्यांचे मंत्री अथवा शासकीय अधिकारी हे कोरवून घेत असत. असे राजाज्ञेवरून कोरलेले लेख हे राजशासन म्हणून ओळखले जातात. या राजकीय स्वरूपाच्या लेखांव्यतिरिक्त व्यापारी, उद्योजक किंवा त्यांच्या श्रेणीद्वारेदेखील काही लेख कोरले गेले आहेत हे बहुधा त्यांनी दिलेल्या दानाची अथवा देणग्यांची नोंद करण्यासाठी कोरलेले असून त्यांना दानलेख असे म्हणतात. हे बहुधा धार्मिक स्वरूपाचे व्यक्तींनीही असे दान दिल्याचे आढळते. उदा. बौध्द धर्माचे अनुयायी, भिक्षु आणि भिक्षुणी यांच्याद्वारेदेखील दानलेख कोरविलेले आहेत आणि बहुतेक प्राचीन लेण्यांमध्ये ते स्तंभांवर, भिंतींवर दरवाज्यांच्या कमानींवर पाण्याचे इत्यादींवर आढळतात.

munotes.in

एक ऐतिहासिक साधन म्हणून कोरीव लेखांना अव्वल दर्जा दिला जातो. इतिहासाचे सर्वात विश्वासार्ह साधन म्हणून कोरीव लेखांना अत्यंत महत्त्व आहे. कारण इतिहासाच्या वाङ्मयीन साधनांमध्ये काळाच्या ओघात काही फेरफार होण्याची शक्यता असते. त्यात काही भर अथवा घट होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे मूळ मजकुराचे अस्सल स्वरूप काहीसे भ्रष्ट होण्याची शक्यता असते. त्यामुळे मूळ मजकुराचे अस्सल स्वरूप काहीसे भ्रष्ट होण्याचीची शक्यता असते. अशा परिस्थितीत कोरीव लेख हे मुळात कोरलेलेच असल्यामुळे ते नष्ट करून त्यात फेरफार केले असल्याची शक्यता मात्र मुळीच नसते, आणि म्हणूनच कोरीव लेख हे अव्वल दर्जाचे इतिहासाचे साधन म्हणून मानले जाते.

काही लेख हे प्रत्यक्ष 'कोरीव' स्वरुपाचे नसतात, तर ते भिंतीवर रंगवलेल्या स्वरुपात असतात. उद्या अजिंठ्याच्या लेण्यांमधील काही लेख हे कोरलेले नसून रंगवलेले आहेत. तसेच काही लेख हे उठावदार अक्षरांचे असतात. उदा. नाण्यांवरील लेख हे उठावदार अक्षरांचे असतात हेही पुराभिलेख म्हणूनच ओळखले जातात.

## ३.३ भारतीय पुराभिलेख विद्येचा इतिहास

भारतात लिखाण कला विकसित करण्याचा सर्वप्रथम मान सिंधू संस्कृतीच्या लोकांकडे जातो. आजच्या पाकिस्तानमधील लाडखाना जिल्ह्यातील मोहेंजोदडो येथे १९२१-२२ सालात सर जॉन मार्शल यांनी जे उत्खनन केले त्यात रेखालीपी तसेच चित्रलिपी असलेल्या शेकडो मुद्रा सापडल्या. त्यावर पशुपक्षी, मानवाकृती इत्यादी विविध खुणा आहेत. अनेक संशोधकांनी त्याचा अर्थ लावून वाचन करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ही लिपी अजून समाधानकारकरित्या आणि सर्वमान्य होईल अशा तऱ्हेने वाचता आलेली नाही.

ब्रिटिश राजवटीत भारतात जेव्हा पुरातत्त्वाचा अभ्यास सुरु झाला तेच कोरीव लेखांचा अथवा पुराभिलेखांचा अभ्यासही सुरु झाला. इ. स. १७८४ मध्ये स्थापन झालेल्या एशियाटिक सोसायटीच्या संशोधक सदस्यांनी जेव्हा भारतीय इतिहासाची साधनसामग्री जगविण्यास सुरुवात केली, त्याचवेळी शिलालेख आणि ताम्रपटांचे ठसे घेवून त्यांच्या अभ्यासास सुरुवात झाली. यातील बहुतेक संशोधक हे युरोपीय असल्याने त्यांना भारतातील प्राचीन लिपींचे ज्ञान नव्हते. त्यामुळे या संपादन केलेल्या कोरीव लेखांचे वाचन करण्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. श्री विल्यम जोन्स त्यांचे सहकारी त्याच्या प्रयत्नांचेही फारसे यश मिळाले नाही. याचे कारण म्हणजे प्राचीन काळापासून ज्या लिपी भारतात विकसित झाल्या होत्या त्या काळाच्या ओघात विस्मृतीस गेल्या. या लिप्यांचे यशस्वी वाचन करण्याचे प्रयत्न अखेर यशस्वी झाले आणि लिप्यांचा उलगडा झाल्यावर त्या कोरीव लेखांमधील माहितीही ऐतिहासिक साधन म्हणून आपणांस अत्यंत उपयोगी ठरली.

ब्राम्ही लिपी ही भारतातील अशी सर्वात प्राचीन लिपी आहे. की जिचे यशस्वीपणे वाचन करता आले आहे. ब्राम्ही लिपीचा उगम हा जवळ जवळ २००० वर्षाहून अधिक प्राचीन असा समजला जातो. हिची उत्पत्ती आणि विकास इ.स.पू. ३रे शतक ते इ. स.चे ७ वे शतक असा सुमारे हजार वर्षाचा समजला जातो. तिच्या अक्षरपद्धतीत म्हणजे लिपीच्या

वळणात काळाच्या ओघात अनेक बदल होत गेले. सुमारे दर दोन अडीचशे वर्षांनी हे बदल घडून आलेले दिसतात. त्यामुळे ती तिच्या वळणावरून ओळखली जाते. उदा. अशोकाच्या काळातील ब्राम्ही लिपी, सातवाहन काळातील ब्राम्ही लिपी, गुप्तकालीन ब्राम्ही लिपी, हर्षकालीन ब्राम्ही लिपी इ. स. च्या ७ व्या आणि ८ व्या शतकापासून ब्राम्ही लिपी मागे पडून देवनागरी आणि त्याहीनंतर प्रादेशिक लिपींचा भारतात प्रसार झाला. त्यामुळे ब्राम्ही लिपी जनतेच्या स्मृतीपटलावरून नष्ट झाली.

तरीही गुप्तकालीन ब्राम्ही आणि प्राचीन देवनागरी या दोन लिप्यांमध्ये काहीसे साम्य होते. त्यांचे सखोल संशोधन करून पाश्चात्य संशोधकांनी गुप्तकालीन ब्राम्हीचे वाचन करण्यात यश मिळविले होते. मात्र मौर्यकालीन ब्राम्ही लिपी ही १९ व्या शतकाच्या ४ थ्या दशकापर्यंत अज्ञातच राहिली. कलकत्ता येथील टांकसाळीत एक कर्मचारी असलेल्या श्री जेम्स प्रिन्सेप यांच्या प्रयत्नांमुळे या ब्राम्ही लिपीचे गूढ उकलले. या टांकसाळीत ब्रिटिश नाणी पडली जात व तिथे अनेकजण जुनी नाणी बदलून घेण्यासाठी येत असत. अशा काही प्राचीन नाण्यांवर जो कोरीव मजकूर होता तो एकाच वेळी दोन लिपी म्हणजे ब्राम्ही व प्राचीन ग्रीक लिपीतील होता. त्या ग्रीक लिपीवरून ब्राम्ही लिपीच्या मुळाक्षरांचा अंदाज आला. लिपीची काही मुळाक्षरे ज्ञात झाल्यावर प्रिन्सेपने सांची, एरण, गिरनार येथील गुप्तकालीन ब्राम्ही लिपीतील कोरीव लेखांचे वाचन केले. पुढे अशोककालीन ब्राम्ही लिपीचाही उलगडा झाला. इ.स. १८३४- ३५ पासून पुढे १८३८ पर्यंतच्या कालखंडात जेम्स प्रिन्सेपने ब्राम्ही लिपीचे संपूर्ण वाचन केले.

या पुढील काळात जसजसे प्राचीन कोरीव लेखांचे वाचन होत गेले. तसतशी नवनवीन माहिती उपलब्ध होत गेली व तिच्या आधारे इतिहासामध्ये भर पडत गेली. अजूनही असे कितीतरी कोरीव लेखांचे संपादन होत आहे. प्रिन्सेपच्या बरोबरीने आणखीही काही संशोधक ब्राम्ही लिपीतील कोरीव लेखांचे वाचन करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यात श्री लासेन या संशोधकाने भारतातील इंडो ग्रीक राजांच्या नाण्यांवरील ग्रीक आणि ब्राम्ही या द्वैलिपीतील लेखांचे यशस्वी वाचन केले होते. तसेच माणीक्याल या ठिकाणीही काही इंडो - ग्रीक राजांची नाणी सापडली होती. तिच्या आधारे श्री नॉरीस आणि कर्नल मॅसन या संशोधकांनी खरोष्ठी या आणखी एका भारतीय लिपीचे यशस्वी वाचन केले. पुढे श्री. प्रिन्सेप यांनीही आणखी काही खरोष्ठी अक्षरे शोधून काढली. त्यांनी अनेक कोरीव लेखांचे पद्धतशीरपणे संपादन करून त्याची सुसंगतवार माहिती जमा केली. पुढे आणखीही कितीतरी भारतीय आणि पाश्चात्य विद्धनांनी या पुराभिलेख अभ्यासात (कोरीवलेखाशास्त्रात) मोलाची भर घातली. या पुराभिलेखांना इतिहासाचे एक अव्वल दर्जाचे साधन म्हणून मानले जाऊ लागले. त्यातूनच नवीन माहिती प्रकाशात आली व त्यामुळे प्राचीन भारतीय इतिहासातील कितीतरी अज्ञात दुवे प्राप्त झाले व गूढ समस्या उकलण्यास मदत झाली.

प्राचीन ब्राम्ही लिपी ज्ञात झाल्यावर कोरीव लेखांचे वाचन आणि प्रकाशन यांच्या कामास गती प्राप्त झाली. अनेक संशोधकांनी त्या कामास स्वतःला वाहून घेतले. प्रारंभीच्या काळातील पुराभिलेखतज्ञांमध्ये अनेक संशोधकाचा समावेश होतो. ते संशोधक म्हणजे अलेक्झांडर कनिंगहॅम, जेम्स फर्ग्युसन. सर वॉल्टर इलियट, रेव्हरंड स्टीव्हन्सन, जे. एफ.

फ्लीट, हुल्श, जेम्स, बेर्गेस, जी. ब्युहलर, श्री लासेन, श्री. नॉरिस, एफ कीलहॉर्न, एल. राईस, आणि एल. पी. बॉर्नेट यांचा समावेश होता.

पुढे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या पाश्चात्य संशोधकांच्या बरोबरीने कितीतरी भारतीय संशोधकांनी पुराभिलेख संशोधनास स्वतःला वाहून घेतले. त्यातील काही म्हणजे भाऊ दाजी लाड, पं. भगवानलाल इंद्रजी, आर. जी. भांडारकर हे होत. त्यानंतर २० व्या शतकातील अग्रणी पुराभिलेखतज्ञ म्हणजे डी. आर. भांडारकर, एन. जी. मजुमदार, कृष्णस्वामी, एन. व्यंकैया, आर. एल.मित्रा. आर. डी. बॅनर्जी, पी. एन. भट्टाचार्य, एच. पी. शास्त्री, एन. पी. चक्रवर्ती आणि इतर त्यानंतरचे प्राचीन भारतीय लिपीशास्त्रज्ञ म्हणजे डॉ. के. व्ही. रमेश, प्रो. के. व्ही रामान, डॉ. एस. आर. राव, डॉ. आजयमित्र शास्त्री, डॉ. एस. एच. रित्ती, डॉ. एच. एस. ठोसर, डॉ. शोभना गोखले आणि इतर ही आहेत. प्राचीन कोरीव लेखांचे संपादन, त्यांचे विश्लेषण, त्यांचा अन्वार्थ लावून इतिहासाच्या पुनर्लेखनात त्यांच्या मोलाचा वाटा आहे.

शिलालेखांचे, इतर लोरीव लेखांचे जसजसे संपादन होऊ लागले, तर तसे त्यांना प्रसिद्धी देणे आवश्यक आहे असे वाटू लागले. त्यामुळे अनेक नियतकालिके सुरु झाली, ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) 'एशियाटिक रिसर्चेस'

२) 'जर्नल ऑफ द एशियाटिक सोसायटी' ही दोन्ही प्रकाशाने एशियाटिक सोसायटी द्वारा प्रकाशित होत असत.

३) 'दि इंडियन ॲन्टीक्वेरी' हे श्री जेम्स बर्गेस यांनी सुरु केले.

४) 'दि मद्रास जर्नल ऑफ लिटरेचर ॲन्ड सायन्स'

५) 'दि जर्नल ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी' (लंडन)

६) 'दि जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रॅन्च ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी'

७) 'दि ट्रान्झेक्शंन्स ऑफ दि लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे'

या सर्व संस्थांची मुखपत्रे आणि नियतकालिके यांनी पुराभिलेखांच्या अभ्यासास चालना दिली व त्यामुळे अधिकाधिक संशोधन होऊ लागले. एखादा विशिष्ट विषय हाताळून त्यावर सखोल संशोधन करून त्यांचे प्रकाशन होऊ लागले. अशी काही विशेष विषयांच्या कोरीव लेखांच्या समग्री अभ्यासाची प्रकाशने पुढीलप्रमाणे.

१) आलेक्झांडर कनिंगहॅम यांचे 'अशोकन इन्सिक्रप्शन्स'

२) श्री हुल्श यांचे 'साउथ इंडियन इन्सिक्रप्शन्स'

३) श्री जेम्स बर्गेस यांचे 'एपिग्राफिया इंडिका'

४) पुरातत्त्व विभागातर्फे संशोधित आणि प्रकाशित 'अॅन्युअल रिपोर्टस् ऑफ इंडियन एपिग्राफी' आणि कॉर्पस इन्सिक्रप्शनम इंडीकारम'

५) मद्रास गर्व्हमेंटमध्ये 'नोटिसेस ऑफ इन्सिक्रप्शन्स' हे नियतकालीक.

ही प्रकाशने अतिशय महत्त्वाची होती. भारत सरकारलाही या पुराभिलेखांचे महत्त्व कळून आले आणि पुरातत्त्वीय संशोधनात म्हणजे पुरातत्त्व खात्यात पुराभिलेख विभाग म्हणून एक विशेष उपविभाग स्थापन करण्यात आला व त्याचा भार एखाद्या पुराभिलेख तज्ञाकडे सोपवला जाऊ लागला. पुढे त्याचा मोठा विस्तार होऊन त्यासाठी म्हैसूर येथे एक मुख्यालय स्थापन करण्यात आले आहे व त्यासाठी संचालकांचे पद निर्माण झाले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात काही विद्यापीठांतर्गत पुराभिलेखांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र विभाग निर्माण केले गेले. कर्नाटक विद्यापीठांचे धारवाड येथे तसेच तामिळनाडूत तंजावुर येथेही विद्यापीठात स्वतंत्र पुराभिलेख विभाग आहेत. १९७४ मध्ये तर 'दि एपीग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया' ही अशासकीय संस्था संशोधकांच्या प्रयत्नांमधून निर्माण झालेली असून त्यामुळे पुराभिलेखांच्या अभ्यासात विशेष गती प्राप्त झाली आहे. या संस्थेद्वारा दरवर्षी एका परिषदेचे अखिल भारतीय पातळीवर आयोजन केले जाते व त्यात तरुण संशोधकांना शोध निबंधांना 'पुराभिलेख पत्रिका' (जर्नल ऑफ दि एपिग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया') या नियतकालिकातून प्रसिद्धी दिली जाते.

## ब) कोरीव लेखांचे प्रकार आणि त्यांचे महत्त्व

## ३.४ कोरीव लेखांचे प्रकार आणि वैशिष्टये

सर्वसामान्यपणे कोरीव लेखांचे दोन प्रमुख प्रकार पडतात ते म्हणजे १) शासनप्रमुख म्हणजेच राजकर्त्याने स्वतः अथवा त्याच्या वतीने जरी केली जाणारी राजशासने उदा. अशोकाचे शिलालेख, राजा खारवेल, सातवाहन, राजा गौतमीपुत्र सातकर्ण, चालुक्य सम्राट द्वितीय पुलकेशी यांचे काही आलेख हे राजशासन या प्रकारात मोडतात.

२) अशासकीय म्हणजेच खाजगी व्यक्तींनी आणि संस्थांनी दिलेल्या दान अथवा देणगीची नोंद करून ठेवण्यासाठी कोरवून घेतलेले लेख हे या प्रकारात मोडतात. असे आलेख प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाचे आहेत. उदा. पश्चिम भारतातील बौध्द लेण्यांमध्ये कोरलेले हजारो शिलालेख तसेच सांची, भारहूत, आणि अमरावती स्तूपांभोवतीच्या कठड्यांवर कोरलेले दानलेख यांचा समावेश त्यात होतो. त्यात दिलेल्या देणगीची अथवा दानाची नोंद केलेली असते. यापैकी पहिल्या म्हणजे राजशासन प्रकारातील कोरीव लेखांची विभागणी आणखी काही उपप्रकारांत होते. ते म्हणजे -

**अ) राजशासने -** हे कोरीव लेखाद्वारे राजा अथवा शासनप्रमुखाने आपला आदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कोरवून घेतलेले असत. उदा. मौर्य सम्राट अशोक यांच्या राजाज्ञा असलेल्या सर्व कोरीव लेखांचा समावेश या प्रकारात होतो.

**ब) दानशासने -** या कोरीव लेखाद्वारे राजा अथवा इतर शासकीय अधिकाऱ्यांकडून विद्वान ब्राम्हण, धार्मिक संस्था अथवा विशिष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिल्या जाणाऱ्या दानाची

नोंद केलेली असते. या प्रकारात दान नोंद असलेल्या सर्व ताम्रपट व शिलालेखांचा समावेश होतो. अशा सर्व लेखांना दानशासने असे संबोधले जाते. ही बहुधा राजाकडून अथवा त्याच्या अनुमतीने त्याचे मंत्री अथवा इतर अधिकारी यांच्याकडून दिलेली असतात. या प्रकारांचे लेख नाणघाट, जुन्नर, नाशिक, कार्ले इ. ठिकाणी आहेत. विविध राजघराण्याचे उदा. सातवाहन, गुप्त वाकाटक, कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट यादव इत्यादींचे अनेक लेख हे या दानशासन प्रकारात मोडतात.

**क) राजप्रशस्तीलेख / राजस्तुतीपर लेख** एखद्या राजाच्या कर्तबगारीची नोंद करण्यासाठी खास निर्माण केल्या गेलेल्या पुराभिलेखांचा समावेश या प्रकारात होतो. त्यात राजाने दाखविलेल्या कर्तृत्त्वाची आणि कामगिरीची नोंद केलेली असते. अशा राजाची स्तुती अथवा प्रशस्तीपर वर्णनही त्यात असते. राजाचे योगदान सांगणे त्याचे गुणगान करणे हा या प्रकारच्या कोरीव लेखांचा मुख्य उद्देश असतो. या प्रकारची उदाहरणे म्हणून कलिंगराज खारवेलाचा हाथीगुंफा शिलालेख, गौतमीपुत्र सातकर्णीचा नाशिक शिलालेख, समुद्रगुप्ताचा अलाहाबाद येथील स्तंभालेख यशोवर्मन राजाचा मंदसोर येथील शिलालेख, तसेच ऐहोळे येथील चालुक्य सम्राट द्वितीय पुलकेशीचा शिलालेख सांगता येतील.

वरील तीन मुख्य प्रकारांव्यतिरिक्त कोरीव लेखांत नमूद केल्या मजकुराच्या विषयानुसार त्यांचे आणखी काही उपप्रकारांत केले जाते ते पुढीलप्रमाणे -

**१) व्यापार / वाणिज्य विषयक कोरीव लेख :** अशा लेखांचा आशय व्यापार अथवा वाणिज्य विषयाशी संबंधित असतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सिंधुकालीन लोकांचे चित्रलिपीतील शिक्के आणि मुद्रा. ही लिपी जरी दुर्बोध असली, तरी त्या शिक्क्यांचा वापर हा व्यापारी हेतूनेच केला जात असावा असे विद्वानांचे मत आहे.

अनेक वेळा उत्खननात देखील अशा मुद्रा आणि शिक्के आढळतात. त्यावर लिहिलेले कोरीव लेख अथवा ठाशीव अक्षरांचा लेख असला तरी त्यापैकी बरेच लेख हे व्यापारविषयक असल्याचे दिसते. उदा. मंदसोर येथील एक शिलालेख हा कुमारगुप्त आणि बंधुवर्मन यांच्या कालखंडातील असून त्यंचे स्वरूप व्यापारविषयक आहे. महाराष्ट्रातही जालना भोकरदन (प्राचीन भोगवर्धन) यथील उत्खननात एका व्यापारी शिक्का मिळाला असून त्यावरील लेख हा 'ठाणेनगर  गोता इंद्रा' असा एक ओळीचाच असला तरी त्यातून कितीतरी ऐतिहासिक माहिती मिळते. ती पुढील प्रमाणे. हा लेख ब्राम्ही लिपीतील असून त्याची भाषा प्राकृत आहे. लिपीच्या वळणावरून त्याचा काल हा इसवी सणाचे दुसरे शतक असा मनाला जातो. डॉ. एच. एस. ठोसर या पुराभिलेख तज्ञाच्या मते -

१) इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात ठाणे हे मुंबईजवळी एक मोठे शहर होते व सह्याद्रीच्या पूर्वेकडील कितीतरी औद्योगिक शहरे व पश्चिम किनाऱ्यावरील सोपारा बदर यांच्या दरम्यान ते एक महत्त्वाचे शहर होते.

२) या लेखातील इंद्रा ही स्त्री होती व ती ठाणे नगराची रहिवासी होती. अर्थातच हा व्यापारी शिक्का होता व ही इंद्रा स्वतः व्यापारी असून व्यापारनिमित्ते ती भोकरदनला गेली असावी.

३) भोकरदन हे त्या काळातील भरभराटीस आलेले होते व त्याचे पाश्चात्य देशांशीही व्यापारी संबंध होते हे इतर ऐतिहासिक साधनांमधून सिद्ध होते.

४) त्या काळात स्त्रियाही व्यापारक्षेत्रात सक्रीय असून स्वतंत्रपणे कार्य करीत असत असे दिसते.

५) आपले देवाण घेवाणीचे व्यवहार अधिकृत करण्यासाठी व्यापारी असा स्वतंत्र मुद्रांचा वापर करीत असल्याचे दिसते.

या प्रमाणे कितीतरी दानलेख हे व्यापारी, त्यांच्या श्रेणी (संघटना) इत्यादींनी कोरलेले असल्याचे आढळते.

**२) धार्मिक स्वरूपाचे आलेख :**

अशा आलेखांतून प्रामुख्याने धार्मिक अथवा नैतिक स्वरुपाची माहिती मिळते. उदा. अशोकाच्या शिलालेखांतून बौद्ध धर्माचा मूळ तत्त्वानुसार शुद्ध व नैतिक आचरणावर भर दिलेला आढळतो. पश्चिम भारतातील अनेक लेखांमध्ये 'बुद्ध', 'धर्म ' आणि 'संघ' यांविषयीच्या प्रार्थना आहेत.

दक्षिण भारतात अनेक मंदिरांच्या प्राकारावर विस्तृत कोरीव लेख असून त्यांस रामायण महाभारत अथवा भगवद्गीतेतील श्लोकांचा समावेश आहे. त्यामुळे तेही धार्मिक स्वरूपाचे आहेत. बहुधा सर्व लेखांच्यावरील भागात चंद्र, सूर्य, शिवलिंग इ. धार्मिक प्रतीके असून त्यांचा प्रारंभ व शेवट हा धार्मिक वचनाने होतो.

**३) दानशासन :**

वर सांगितल्याप्रमाणे राजा अथवा त्याच्या अधिकाऱ्यानी अथवा नातलगांनी दिलेल्या दानाची सनद अथवा रीतसर दस्तऐवज म्हणून जे लेख निर्माण केलेले असतात, त्यास दानशासन असे म्हणतात. उपलब्ध असलेले बहुसंख्य आलेख हे दानशासन म्हणून ओळखले जातात. देवस्थाने, धार्मिक संस्था अथवा न्यास, विद्वान ब्राम्हण अथवा शिक्षणसंस्था, मठ यांच्या चरितार्थासाठी भूमि, ग्राम, अथवा रोख रक्कमेचे दान दिले जाई. काही वेळा असे लेख हे लेण्यांच्या स्तूपांच्या मंदिरांच्या भिंतीवर त्रोटक स्वरुपात लिहिलेले असत तर काही वेळा साग्रसंगीत स्वरूपाचे शीलालेख अथवा ताम्रपटांवर लिहिलेले आढळतात व त्यात दाता, दान स्वीकारणारा, दिलेले दान हे सविस्तर नमूद केलेले असते. काही वेळा घर, तलाव किंवा ग्राम अथवा भूमिदान याची नोंद आढळते तर काही वेळा दान रोख रक्कमेत दिल्याचे आढळते.

**४) प्रशासकीय स्वरूपाचे आलेख :** बऱ्याच कोरीव लेखांतून आपणांस तत्कालीन प्रशासकीय बाबींविषयी बहुमोल माहिती मिळते. उदा. अशोकाच्या शिलालेखांतून आपणास मौर्य प्रशासनव्यवस्थेत अधिकारी असलेल्या युक्त, रज्जुक, प्रादेशिक आणि महामात्र, तसेच धर्ममहामात्र यांविषयी बहुमोल माहिती मिळते. तसेच अनेक वेळा त्या काळात अस्तित्वात असलेली राज्ये त्यांचे विविध विभाग, अधिकारी यांचेही उल्लेख येतात. राज्ये आणि त्याचे प्रांत, प्रांताधिकारी, त्यांचे कामकाज याविषयीही काहीवेळा उल्लेख येतात. उदा. मौर्य

सम्राट अशोकाच्या शिलालेखांतून असे समजते की, मगध हा त्याचा केन्द्रीय म्हणजे मुख्य भाग असून त्यांच्या साम्राज्याचे चार प्रांत राज्यकारभाराच्या सोयीसाठी पाडले होते व त्या चार प्रांतांच्या राजधानी म्हणजे **तक्षशीला, उज्जैन, तोषाली** आणि **सुवर्णगिरी** या होत्या.

### ५) चारित्रात्मक अथवा राजप्रशस्तीविषयक आलेख :

अशा आलेखांतून एखाद्या राजाची अथवा व्यक्तीची सविस्तर माहिती असून तिचे स्वरूप काहीसे स्तुतीपर/ प्रशस्तीपत्र असते. असे आलेख हे प्रदीर्घ असतात. आणि त्यातून बरीच ऐतिहासिक माहिती प्राप्त होत असते. कारण आलेखाचा विषय असलेल्या राजाच्या स्तुतीबरोबरच त्या काळातील इतर राजा तसेच त्याकाळातील घटना, घडामोडी यांचाही उल्लेख असलेला आढळतो.

अशा आलेखांमध्ये राजाची सविस्तर माहिती, त्याचे राजघराणे, त्याची कुलपरंपरा, पूर्वज यांचीही माहिती येते. शिवाय या राजाने कोणती मोलाची कामगिरी केली आहे. त्याचे काय योगदान आहे, त्याचा पराक्रम, त्याचे दातृत्व इ. विविध गुणांचा परामर्श यात घेतलेला असतो. अशा प्रशस्तीपत्र आलेखांमध्ये महत्त्वाचे असलेले आलेख म्हणजे –

अ) कलिंगचा राजा खारवेल याचा हाथीगुंफा आलेख.

ब) गौतमीपुत्र सातकर्णी याचा नाशिक शिलालेख.

क) समुद्रगुप्ताचा अलाहाबाद स्तंभालेख.

ड) यशोधर्म्याचा मंदसोर येथील शिलालेख

इ) द्वितीय पुलकेशीचा ऐहोळे येथील शिलालेख इ.

### ६) स्मारक लेख :

काही राजांच्या अथवा सत्पुरुषांच्या समाधीवर त्यांच्याविषयी माहिती देणारे स्मारक लेख कोरलेले असतात. तर काही स्मारकलेख देवकुलात संबंधित व्यक्तींच्या शिल्पांवर मूर्तीवर कोरलेले असतात. हे लेख त्रोटक असले तरी त्यातून बहुमोल माहिती प्राप्त होते. उदा. महाराष्ट्रात जुन्नरजवळील नाणेघाटात सातवाहनांचे देवकुल असून तेथे त्यांच्या सिमुक हा संस्थापक राजा, त्याचा वारस सातकर्णी (प्रथम) व त्याची राणी नागनिका व इतर काही सातवाहन राजपुत्र वगैरेच्या प्रतिमा व त्यावर त्यांची नावे कोरलेली आहेत.

तसेच कान्हेरीजवळ बौद्ध भिक्षूंच्या दफनभूमीतही महत्त्वाच्या बौद्ध भिक्षूंच्या समाधीवर त्यांच्या माहितीविषयक कोरीव लेख आढळतात. याव्यतिरिक्त युद्धात कामी आलेल्या वीरांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्मृतीशिला म्हणजे वीरगळही उभारलेले आढळतात. असे वीरगळ आणि सती शिलांवरही अनेक वेळा शिल्पे व काहीवेळा कोरीव लेख आढळतात. तेही स्मारक शिलालेख म्हणून ओळखले जातात.

काही वेळा कोरीव लेखांतून राजाने लोककल्याणार्थ काय काम केले आहे, याचा आवर्जून उल्लेख आढळतोच, अर्थातच राजप्रशस्ती प्रकारच्या आलेखांत त्याचा उल्लेख आढळतोच, शिवाय इतरत्रही काही वेळा त्याचा उल्लेख आढळतो. उदा. सम्राट अशोकाने

जनकल्याणार्थ आणि प्राणीमात्रांसाठी पुरविलेल्या वैद्यकीय सुविधांचा तसेच वाटसरूंना सावली मिळावी म्हणून रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या वृक्षांच्या तपशील आलेला आहे. तर हाथीगुंफा यथील शिलालेखात राजा खारवेल याविषयी अशीच माहिती मिळते. त्यानुसार नंद घराण्यातील राजाने बांधलेला एक नदीवरील कालवा जो नादुरुस्त झाला होता तो राजा खारवेलाने दुरुस्त केला होता अशी माहिती मिळते.

**भारतीय इतिहासात कोरीव लेखांचे महत्त्व:**

प्राचीन भारतीय इतिहासाची जुळणी करण्यासाठी कोरीव लेख हे अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांचे महत्त्व या कामी अनन्यसाधारण आहे. हे प्राचीन कोरीव लेख ज्या ब्राम्ही खरोष्ठी लिपीत लिहिलेले होते. ती लिपी काळाच्या ओघात विस्मृतीस गेली. हजारो वर्षे ती विस्मृतीतच राहिली. तरीही आधुनिक काळात ब्रिटिश राजवटीत पुराभिलेखांच्या सखोल संशोधनामुळे या लिपीचे वाचन शक्य झाले आणि भारतभर आढळून येणाऱ्या कोरीव लेखांचा अन्वयार्थ लावता आला.

जसजसे कोरीव लेकांचे वाचन होऊ लागले तसतशी ऐतिहासिक ज्ञानात मोलाची भर पडू लागली. अनेक अज्ञात ऐतिहासिक दुवे हाती येऊ लागले आणि इतिहासाची नव्याने जुळणी होऊ लागली. प्राचीन आणि मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन कोरीव लेखांच्या आधारे शक्य झाले. तसेच आपल्या देशाची तत्कालीन राजकीय सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचा बोधही होतो. इतिहासातील पुराभिलेखांचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

**राजकीय इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीकोन महत्त्व:**

बहुतांश कोरीव लेख हे राजकर्त्याकडून अथवा त्यांच्या अधिकाऱ्यांकडून जरी केले जात असल्यामुळे त्यात समकालीन राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. त्या त्या काळातील राजकीय इतिहासाची जुळणी करत असताना कोरीव लेखांची फारच मदत होते.

एखादा कोरीव लेख म्हणजे राजशासन अथवा दानशासन राजा जेव्हा जरी करतो, तेव्हा त्यात त्या राजाची वंशावळ, काही राजांच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या घटनांचे वर्णन असते. हेच राजशासन जर त्याच्या मांडलिक राजाने दिले असेल तर त्यात मांडलिक राजा व त्याचा सार्वभौम राजा यांचीही वंशावळ असते. या वंशावळीमुळे विविध राजघराणी, त्यातील राजे, त्याचा काल शासनक्रम व त्यांच्या राज्यकाळातील महत्त्वाच्या घटना इत्यादींविषयी सविस्तर आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध होते.

अनेक वेळा वाङ्मयीन साधनांमध्ये जी माहिती अज्ञात जी माहिती आपणांस कोरीव लेखांमध्ये मिळते. उदा. राजा खारवेल या नावाचा एक राजा कलिंगदेशात होऊन गेला व त्याचे योगदान काय आहे हे कोणत्याही वाङ्मयीन साधनांतून आपणास ज्ञात नाही. परंतु या राजा खारवेलाचा ओरिसातील हाथीगुंफेत जो कोरीव लेख उपलब्ध झाला आहे, त्यात राजाने दरवर्षी कोणती लोकोपयोगी कामे केली याविषयीची नोंद केलेली आहे.

काही कोरीव लेखांतून देशाच्या विविध भागातील लोकांचा तसेच विदेशातील समकालीन राजांचे उल्लेख असतात. उदा सातवाहन राजा वशिष्ठीपुत्र पुळुमावीच्या नाशिक

लेण्यांमधील कोरीव लेखात त्याने जिंकून घेतलेल्या बऱ्याच देशांचा उल्लेख आहे. हे देश म्हणजे ऋषिक, मूलक, सूरठ, अपरांत, अवंती, अनुप आणि विदर्भ होते. तसेच अशोकाच्या शिलालेखांतून कलिंग, आंध्र, पुलिंद, केरळपुत्र, सत्यपुत्र इ. राज्यांचे व जमातीचे तसेच भारताबाहेर ग्रीक राजे अॅन्टीऑकस व टॉलेमी यांचेही उल्लेखही येतात. त्यामुळे देशाविदेशांचा इतिहास आणि राजे व राजवंशांचा निश्चित काल ठरविण्यास मदत होते.

अनेक वेळा राजांनी हाती घेतलेल्या ( लोककल्याणार्थ) कामांचे वर्णन त्यातून मिळते. उदा. तलाव व कालवे बांधणे, रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, दानधर्म वगैरे बाबींचा त्यात उल्लेख असतो.

राजवंशाचे मूलस्थान व त्यांच्या साम्राज्याचां विस्तार याविषयी कोरीव लेखांद्वारे फारच उपयुक्त माहिती मिळते. उदा. मौर्य साम्राज्याचा विस्तार वायव्येकडील अफगणिस्तानापासून ते दक्षिणेस म्हैसूरपर्यंत व पश्चिमेस सौराष्ट्रापासून ते पूर्वेकडे बंगालच्या उपसागरापर्यंत होता ही माहिती अशोकाच्या शिलालेखांच्या उपलब्धीस्थानामुळे होऊ शकली.

विविध कालखंडातील देशांच्या विविध भागांतील प्रशासनव्यवस्थेची तसेच प्रशासकीय विभाग, त्यांचे अधिकारी याविषयी बहुमोल माहिती आपणांस कोरीव लेखांद्वारे मिळते. उदा. प्राचीन काळात आहार, विषय भुक्ती देश आणि मंडळ असे विविध प्रशासकीय विभाग असल्याचे समजते. त्यात वेळोवेळी झालेले बदल काही प्रशासकीय विभाग काळाच्या ओघात नष्ट झाले तर काही विभागांची नव्याने निर्मिती झाली हेही आपणास कळते.

प्राचीन काळातील कालगणनाही आपणांस कोरीव लेखांद्वारे कळून येतात. कोरीव लेखांमध्ये आपणास प्रशासकीय अधिकाऱ्याविषयीही माहिती कोरीव लेखांद्वारे मिळते उदा. अधिकारी पदे जी युक्त, रज्जूक प्रादेशिक, अमात्य सचिव राष्ट्रपती विषयपती भोगिक, ग्रामणि,पट्टकील, नाडकर्णी, इत्यादींची माहिती मिळते. तसेच अनेक राजाज्ञांवरून आपणास त्या राज्यांची उद्दिष्टये काय होती हेही कळते. अशा तऱ्हेने विविध प्रकारची राजकीय आणि प्रशासकीय बाबींविषयी कोरीव लेखांद्वारे आपणास मोठी उपयुक्त माहिती मिळते.

**सामाजिक इतिहास :**

इतिहास म्हणजे केवळ राजकीय घडामोडी नसून मानवी जीवनाच्या तत्कालीन सामाजिक आर्थिक, आणि सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास होय. कोरीव लेखांमधून आपणांस तत्कालीन लोकांचे सामाजिक जीवन कसे असेल याचा चांगलाच बोध होतो. त्यातून तत्कालीन जातीव्यवस्था संयुक्त कुटुंबव्यवस्था, कौटुंबिक गोत्र, समाजातील विभिन्न घटक इ. विषयी माहिती मिळते. वर्ण/जाती व्यवस्थेतील दृढताही त्यात दिसून येते. उदा. गौतमीपुत्र सातकर्णीच्या एका लेखात त्याचा चातुर्वर्ण्य पद्धतीवर विश्वास असून त्याने आंतरजातीय विवाहांवर बंदी घातल्याचे दिसून येते.

संयुक्त कुटुंबव्यवस्था हे प्राचीन भारतीय समाजाचे फार मोठे वैशिष्ट्ये आहे अनेक कोरीव लेखांद्वारे या संयुक्त कुटुंब व्यवस्थेवर प्रकाश पडतो. कुटुंबातील विविध घटक, त्यांचे कौटुंबिक स्थान, महिलांचे त्यातील स्थान इत्यादींची मौलिक माहिती आपणास मिळते.

दानशासनात दान दिलेल्या ब्राम्हणाच्या नावाबरोबरच त्याचे गोत्र, वेदशाखा, त्याने प्राप्त केलेले प्राविण्य इत्यादींचा उल्लेख मिळतो. ही माहिती कोणत्या भागात कोणता वेद वा शाखा अधिक प्रभावी होता हे समजण्यास उपयुक्त ठरते.

तत्कालीन स्त्रीजीवनाचे चांगलेच प्रतिबिंब कोरीव लेखांत पडलेले असल्याचे आढळून येते. त्यातील माहितीनुसार स्त्रिया या स्वतंत्ररित्या धार्मिक विधी करीत असल्याचे दिसते. त्यांची समाजजीवनात महत्त्वाची भूमिका होती असेही दिसते. अनेक स्त्रिया ह्या अर्थार्जन करीत असत. त्यांनी नोकरी केल्याचे व्यवसाय केल्याचेही अनेक संदर्भ मिळतात. बौद्ध धर्म प्रचारातही यांचा सक्रीय सहभाग होता असे सातवाहनांच्या कोरीव लेखांतून दिसून येते स्त्रियांनी अथवा स्त्रियांसहीत संपूर्ण कुटुंबाने धार्मिक हेतूने संस्थाना देणग्या दिल्या असल्याचेही कळते.

समाजातील विवाह प्रथेविषयी माहिती कोरीव लेखांतून मिळते. कशी वेळा अनुलोम, प्रतिलोम विवाहांची उदाहरणे लेखांमधून मिळतात. तसेच बहुपत्नीत्वाची पद्धत अस्तित्वात असल्याचेही कळते. उदा. कान्हेरीच्या एका कोरीव लेखात सावत्र मातांचा उल्लेख आहे, यावरून ह्या पद्धतीचे अस्तित्व कळते.

प्राचीन काळापासून भारतात अनेक परकीय व्यापारी व्यापारनिमित्ताने अथवा राजकीय वर्चस्व मिळविण्याच्या हेतूने आले. ते परकीय असले तरी भारतात आल्यावर काही पिढ्यांनंतर तेही येथील समाजात सामावून गेले त्यांच्यात काहीवेळा रोटी बेटी व्यवहार होऊ लागले याचे प्रतिबिंबही कोरीव लेखातून दिसून येते. अशा तऱ्हेन सामाजिक जीवनासंबंधी बहुमोल माहिती आपणास कोरीव लेखांतून मिळू शकते.

**आर्थिक परिस्थिती :**

तत्कालीन अर्थजीवन अथवा आर्थिक व्यवस्थेबरोबर कोरीव लेखांद्वारे चांगलाच प्रकाश पडतो. अनेक वेळा कोरीव लेखात व्यक्तीनामाबरोबर त्याच्या व्यवसायाचा / पेशाचाही उल्लेख आढळतो. असे विविध व्यवसाय (त्या काळातील) म्हणजे वाणिज्य अथवा व्यापरी, श्रेणी, सावकार, सार्थवाह अथवा व्यापारी, तांडयाचा प्रमुख, निगम अथवा वाणिज्य मंडळाचा प्रमुख, गंधिक अथवा सुगंधी द्रव्यांचा व्यापारी, लोहवणित म्हणजे लोखंडाचा व्यापारी, तसेच मालाकार, सुवर्णकार, कुंभकार, इत्यादी पेशाचा उल्लेख त्यात असतो. त्यावरून तत्कालीन व्यापारी जीवनाचे दर्शन होते. याशिवाय अनेक व्यापारीपेठा औद्योगिक केंद्र, बंदरे, बाजारपेठा, व्यापारी केंद्रे यांविषयीही माहिती मिळते.

व्यापारी देवघेवीचे माध्यम म्हणून अनेक वेळा नाण्यांचा अथवा तत्कालीन चलनपद्धतींचा उल्लेख कोरीव लेखातून मिळतो. शिवाय त्या काळातील व्यापारपद्धती, व्यापारीसंघ, त्यांचे बँकेप्रमाणे होणारे कामकाज त्यांनी निर्मिलेले न्यास त्यात लोक ठेवत असलेल्या ठेवी, त्यावर दिले जाणारे व्याज इत्यादींविषयी फारच उपयुक्त माहिती काही वेळा मिळते. तत्कालीन कायम स्वरूपी ठेवींना  अक्षयनिधी असे म्हणत. व अशा व्यापारी संघांचे म्हणजे श्रेणींचे कामकाज हे पतपेढी / बँकेप्रमाणे होत होते हेही कळून येते.

याव्यतिरिक्त अर्थव्यवस्थेची संबंधित अशी कितीतरी माहिती कोरीव लेखांद्वारे प्राप्त होते. उदा. शेतीव्यवस्था, विविध प्रकारची धान्ये, विविध कर, करव्यवस्था कर गोळा करणारे

अधिकारी इत्यादी तत्कालीन वजन-मापे पध्दतींचीही माहिती आपणास कळते. तसेच दुष्काळ आणि महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्ती व त्यावर मात करण्यासाठी केलेलं उपाय इत्यादींविषयीही बरीच माहिती मिळते. अशा तऱ्हेने तत्कालीन अर्थव्यवस्थेवर चांगलाच प्रकाश पडतो.

**धार्मिक स्थिती :**

प्राचीन भारतीयांचे धार्मिक जीवन समजून घेण्यासाठीही कोरीव लेख हे फार उपुयक्त ठरतात. त्यातील बरेच कोरीव लेख हे दानस्वरूपाचे देवतेस अपर्ण स्वरूप आहेत. त्यात मंदिरांची निर्मिती, मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, देवतेस अर्पण केलेले द्रव्य अथवा वस्तू, बौद्ध जैन आणि वैदिक धर्मीय धर्मसंस्थांना, मठांना, साधुसंतांनाही दान अथवा देणगी दिल्याची नोंद असते. त्यावरून आपणांस तत्कालीन भारतीयांचे धार्मिक जीवन धर्मसंकल्पना, धर्मसंकल्पना, धर्मसंस्था त्यांचा जनजीवानावरील प्रभाव, धर्मसंस्थांची शिक्षण पद्धत यावर चांगलाच प्रकाश पडतो. त्याचप्रमाणे विविध धर्मामध्ये पडलेले पंथ, उपपंथ त्यांचे आचार-विचार तत्त्वज्ञान यांचीही माहिती मिळते.

विविध धर्मसंस्थानांराजे व त्यांचे अधिकारी हे दान व देऊन आश्रय तर देतच असत परंतु सर्वसामान्य लोकही आपापल्या परीने धर्मसंस्थांना देणग्या देत असत. याविषयी सविस्तर माहिती आपणास मिळते. उदा. कान्हेरी येथील लेण्यांनमध्ये फार मोठी बौद्ध धर्मसंस्था, बौद्ध शिक्षण केंद्र उभे राहिले होते. त्यास अर्थातच उदारहस्ते देणग्या समाजातील विविध वर्गाकडून मिळाल्या होत्या हे तेथील कोरीव लेखांवरून दिसून येते.

वैदिक धर्म आणि धार्मिक विधीविषयी म्हणजे विविध यज्ञ, नंतरच्या काळात मंदिरांची स्थापना, देवतांची पूजा अर्चा इत्यादींचे दर्शन होते. काळाच्या ओघात काही धार्मिक प्रथांचे म्हणजे यज्ञ-याग वगैरेंचे प्राबल्य कमी झाले असल्याचेही लेखांमधील त्यांचा अभाव आपणांस दाखवून देतो.

काही स्थानिक कोरीव लेख हे त्या त्या ठिकाणच्या धार्मिक महत्त्वावर प्रकाश टाकतो. उदा. विदिशा येथील विष्णुमंदिरातील एक शिलालेखात हेलिओडोरस या ग्रीक व्यक्तीने दिलेल्या दानाची नोंद आहे व त्याने स्वत:स परमभागवत म्हणून घेतले आहे. त्यावरून विदिशा हे वैष्णवधर्माचे पीठ असावे, असा निष्कर्ष निघतो. सह्याद्रीच्या डोंगरांवरील बौद्ध लेण्यांमधील लेखांमध्ये अनेक बौद्ध धर्मगुरू तसेच त्याचे अनुयायी / उपासक यांचीही नावे कोरलेली आहेत. या उपासकांमध्ये अनेक यवन म्हणजे ग्रीक होते. त्यांनी बौद्ध धर्मामुळे प्रभावीत होऊन बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता असेही दिसून येते.

अशा तऱ्हेने कोरीव लेखांच्या आधारे आपण भारतातील विविध काळातील, विविध भागांत, विविध धर्माचा प्रसार अथवा त्यांचा ऱ्हास कसकसा होत गेला ते सांगू शकतो.

**सांस्कृतिक जीवन :**

तत्कालीन सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठीही आपणांस कोरीव लेखाची मोलाची मदत होते. उदा. प्राचीन कालीन सर्व धर्मात दान करणे हा मोक्ष व पुण्यप्राप्तीचा

प्रमुख मार्ग समजला जाई. त्यामुळे हिंदू, बौद्ध व जैन या तीनही धर्मात दानकृत्यात पुण्यकर्म मानले गेले आहे व कोरीव लेखांमध्ये मोठया प्रमाणावर दान देणग्यांची नोंद आहे.

कोरीव लेखांतून विविध धार्मिक विधींचे आचरण व पालन यासंबंधी माहिती आली आहे. वैदिक धर्मात वेदाध्ययनास आणि अध्ययनास मोठे महत्त्व आहे. त्यासाठी विद्वान आणि पंडितांना दिलेल्या दानांचीही माहिती लेखांमधून मिळते.

काही कोरीव लेखांमधून तर स्वर्ग आणि नरक या तत्कालीन लोकांच्या कल्पनांविषयी माहिती मिळते. उदा. इस.८५३ - ५४ च्या दरम्यान कोरलेल्या एका लेखात 'हे बुध्द जो स्वर्गात आहे' अशी एक नोंद आहे. तर नरक याविषयी 'अविची' 'परिताप' 'कुंभीपाक' असे उल्लेख आलेले आहेत.

स्थापत्य आणि विविध कला यांच्या विकासाविषयी माहिती देखील कोरीव लेख आपणास देतात. इ. स. नंतरच्या पहिल्या काही शतकांत पश्चिम भारतात लेणी कोरण्याचे काम जोरात सुरु होते. त्यातील कोरीव लेखांमध्ये स्थापत्यविषयक अनेक संज्ञा आढळतात. उदा. लयन(लेणे), कोढी (खोली), कुटी (तपस्वीगुंफा), ओवरक (ओवरी), पोढी (पाण्याचे टाके), संघाराम (बौद्धगर्भगृह), तडाग (तलाव), वापी (विहीर), चैत्य (बौद्ध प्रार्थनागृह इत्यादींचे उल्लेख आहेत. त्याच प्रमाणे बांधकामाशीं संबंधित कारागिरांची नवे उदा. गवंडी, शिल्पी, सूत्रधार, कोरक्या, स्थापती इ. विषयीदेखील माहिती मिळते. राजा अथवा दाट हा कोणत्याही धर्मपंथांचा असला तरी त्याला इतर धर्मातील विद्वानांविषयी आदर असे. सर्वधर्मसमभाव अथवा धार्मिक सहिष्णुता हे प्राचीन भारतीय सांस्कृतिक / धार्मिक जीवनाचे एक मुख्य सूत्र होते व त्याचे प्रतिबिंब कोरीव लेखांमधून दिसून येते.

प्राचीन भारतीय शिक्षणसंस्था अथवा शिक्षणाची केंद्रे म्हणजे अग्रहार, ब्रम्हपुरी घटिकास्थान, पाठशाळा, मठ याविषयीही बहुमोल माहिती कोरीव लेखांद्वारे मिळते.

प्राचीन काळात भारतीय संस्कृतीचा प्रसार आग्नेय आशियात मोठया प्रमाणावर झाला होता. इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, श्रीलंका, इत्यादी आग्नेय आशियाई देशांमध्ये प्राचीन काळापासून संस्कृत व प्राकृत लेख कोरलेले दिसतात. हे कोरीव लेखही आपणास बरीच उपयुक्त माहिती देतात.

विविध भाषा आणि लिपी यांविषयीची माहिती आपणास केवळ कोरीव लेखांद्वारे प्राप्त झालेली आहे. उदा. अगदी प्राचीन लेख प्राकृतात आहे. (उदा सम्राट अशोकाचे त्यानंतर इ.स. च्या पहिल्या दुसऱ्या शतकापासून संस्कृत भाषेत कोरीव लेख लिहिले जाऊ लागले. उदा. सातवाहनांच्या काळात वापरत असलेली ब्राम्ही लिपी हीदेखील बदलत जाऊन तिच्यातून आजच्या देवनागरी लिपीचा विकास झाला. भाषा म्हणून कोरीव लेखांसाठी संस्कृतचा वापर अनेक शतके केला गेला. परंतु पुढे प्रादेशिक भाषा म्हणजे मराठी, गुजराथी, कन्नड इ. भाषांमध्ये (संस्कृतबरोबर) कोरीव लेख लिहिले जाऊ लागले. त्यामुळे भाषा आणि लिपीच्या वळणातील वेळोवेळी होणारे बदल आपण अभ्यासू शकतो. अशा तऱ्हेने कोरीव लेखांमधून मिळणारी माहिती आपण तत्कालीन राजकीय, सामाजिक , आर्थिक व धार्मिक जीवनाचा सखोल अभ्यास करण्यासाठी उपयोगात आणू शकतो.

## ३.५ क i ] ब्राम्ही व खरोष्ठी लिपींचा विकास

**ब्राम्ही :**

ब्राम्ही लिपी ही भारतातील सर्वात प्राचीन लिपी असून तिच्या उत्पत्तीबाबत विद्वानांमध्ये एकवाक्यता नाही. मुळात प्राचीन भारत लेखनकलेचा महत्त्वाचे स्थान होते की नाही, याबाबतही विद्वानांमध्ये मतभेद आहेत. परंतु प्राचीन वाङ्मयात लिपी / लिबी / दिपी म्हणजे लेखनकला या अर्थाचे अनेक उल्लेख आढळून येतात.

वैदिक वाङ्मय, दोनेही महाकाव्ये, पुराणे, स्मृतिग्रंथ काव्ये, नाटके यांमधून लेखनकला अस्तित्त्वात असल्याचे आपणांस पुरावे मिळतात. पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथात लिपी, लिपिका यावनानी या अर्थाचे अनेक शब्द आहेत. पाणिनीचा कालखंड हा इसवीसनापूर्वी ८ वे शतक असा समजला जातो. त्यावरून यावनी लिपी ही त्या काळात निश्चितच अस्तित्वात होती असे आपण म्हणू शकतो.

कौटील्याने लिहिलेल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथातही लेखनविषयक पुरावे मिळतात. त्यात कौटिल्याने म्हटले आहे, की 'मुलांचे चौलकर्म' झाल्यावर त्यास अक्षरओळख आणि पाढे शिकविण्यात यावेत. तसेच याचा ग्रंथात कौटिल्याने राजकुमारास शिकवले जाणारे विषय सांगितले आहेत, त्यातही लिपीविद्येचा समावेश आहे. या काळात लेखनविद्येस अर्थातच महत्त्वाचे स्थान असावे, मात्र लिपींविषयी फारशी माहिती 'अर्थशास्त्र' या ग्रंथातून मिळत नाही.

इतरही काही ग्रंथांमध्ये लिपी अस्तित्वात असल्याचे संदर्भ आढळतात. त्यापैकी वात्स्यायनाच्या 'कामसूत्रात' ६४ कलांमधील एक कला म्हणून ग्रंथवाचनास महत्त्व होते. अर्थात ग्रंथ जर वाचले जात असतील तर तत्पूर्वी ते निश्चितच लिहिले गेले असले पाहिजेत. जैन सूत्र-वाङ्मय पण्णवनसुत्र, सण्वयांगसूत्र यांवरून त्या काळी अस्तित्त्वात असलेल्या १८ विविध लिपींची माहिती मिळते व त्यात ब्राम्ही, यावनी, खरोष्ठी, गांधार, महेश्वरी इ. लिपींचे उल्लेख आढळतात.

भागवतसूत्र या ग्रंथात केवळ ब्राम्ही लिपीचाच लेख आहे. परंतु बौद्ध धर्मग्रंथांमध्ये लेखनकलेचे अनेक पुरावे केवळ मिळतात. ललितविस्तार या ग्रंथात 'गौतमबुध्द हे पाठशाळेत विश्वमित्र या गुरुंजवळ बसून चंदनाच्या पाटीवर सोन्याच्या लेखणीने अक्षरे लिहिण्यास शिकले' असे सांगितले आहे. शिवाय त्यात एकूण ६४ लिपी त्याकाळात अस्तित्वात असल्याचा उल्लेख आहे. या सर्व पुराव्यांवरून भारत इ.स. पूर्व ५ व्या शतकाच्याही बरेच आधी लेखनकला अस्तित्वात होती हे सिद्ध होते.

ब्राम्ही लिपी ही भारतातील ज्ञात असलेली सर्वात प्राचीन लिपी होय. ब्राम्ही लिपीच्या उत्पतीविषयी अनेक मत-मतांतरे आहेत. भारतीय परंपरेनुसार , ज्या ब्रम्हदेवाने सृष्टीची निर्मिती केली, त्या ब्रम्हदेवानेच ह्या लिपीची निर्मिती केली, म्हणून तिला ब्राम्ही असे नाव मिळाले. या लिपीच्या उत्पत्तीविषयी दोन प्रमुख विचारप्रवाह आहेत ते म्हणजे –

munotes.in

१) ब्राम्ही लिपीचा उगम भारतातच झाला व भारतीयांनीच तिचा विकास झाला.

२) ब्राम्ही लिपीचा उगम हा भारतात झालेला नसून परकीय लिपींपासून तिची उत्पत्ती झाली असावी या विचारप्रणालीतही विविध मते आढळून येतात. ते म्हणजे

ब्राम्हीची उत्पत्ती ही अ) असिरीयन लिपी, ब) फिनिशयन लिपी, क) साउथ सेमेटिक लिपी ड) नॉर्थ सेमेटिक लिपी, इ) चीनी लिपी, यांपैकी कोणत्यातरी एका प्राचीन लिपीपासून झाली असावी.

तर पहिल्या गटात म्हणजे भारतातच तिचा उगम झाला असे मानणाऱ्यांमध्ये उपप्रवाह आहेत. अ) काहींच्या मते ब्राम्ही लिपीची उत्पत्ती ही वैदिक कालातझाली असावी. ब) आणखी काही विद्वानांच्या मते तिची उत्पत्ती द्राविडी लिपीपासून झाली असावी. क) काही विद्वानांच्या मते तिची उत्पत्ती ही सिंधु लिपीपासून झाली असावी.

या विविध मत-मतांतरांमध्ये विशेष ग्राह्य धरले जाणारे मत म्हणजे तिची उत्पत्ती ही नॉर्थ सेमेटिक लिपीपासून झाली असावी. आजच्या पॅलेस्टाईन व सिरिया या भागांमध्ये रहाणारे प्राचीन काळातील फिनिशियन लोक हे नॉर्थ सेमेटिक लिपी लिहित असत. याचा नॉर्थ सेमेटिक लिपीपासून ब्राम्ही लिपीचा उगम झाला असे मानले जाते. फिनिशियन लिपीतील एकूण २२ अक्षरे ही नॉर्थ सेमिटिक लिपीपासून निर्माण झाली आहेत असे सांगितले जाते. या उत्पत्तीविषयी काही महत्त्वाचे निष्कर्ष म्हणजे -

१) इ.स. पूर्व ५ व्या शतकापूर्वीचे लिखित पुरावे नाहीत.

२) नॉर्थ सेमेटिक आणि ब्राम्ही या लिपींमध्ये बरेचसे साम्य आढळून येते.

३) आरंभीच्या काळात ब्राम्ही लिपी ही नॉर्थ सेमेटिक प्रमाणेच उजवीकडून डावीकडे लिहिली जात असे.

या सर्व मुद्यांवर आधारित नॉर्थ सेमेटिक लिपीतून ब्राम्ही लिपीचा उगम झाला असा सिद्धांत मांडला गेला असून बहुसंख्य विद्वानांनी तो मान्य केला आहे.

अशा तऱ्हेने भारतात ब्राम्ही लिपी उदयास आल्यावर तिचा भारतात सुमारे एक हजार वर्षापर्यंत उपयोग होत राहिला. या लिपीत कोरलेले सर्वात प्राचीन लेख म्हणजे अशोकाचे शीलालेख होते. इ.स. पूर्व ३ रे शतक ते इसवीसनाचे ७ वे शतक या काळात तिचा मोठया प्रमाणावर उपयोग झाला. या कालखंडातही सुमारे दर २०० वर्षांनी या लिपीच्या अक्षरवटिकेत म्हणजे वळणात फरक पडत गेला. त्यामुळे विविध कालखंडातील लिपी ही त्या नावाने ओळखली जाते. ती म्हणजे -

अ) अशोककालीन ब्राम्ही

ब) सातवाहनकालीन ब्राम्ही

क) गुप्तकालीन ब्राम्ही

ड) हर्षवर्धनकालीन ब्राम्ही इ.

munotes.in

या व्यतिरिक्त भारताच्या विविध भागांमध्ये म्हणजे भौगोलिक विभागांमध्ये ही या लिपीचे वैशिष्टयपूर्ण वळण आढळून येते. त्यामुळे उत्तरेकडील ब्राम्ही, दक्षिणेकडील ब्राम्ही, पूर्वेकडील ब्राम्ही, पश्चिमेकडील ब्राम्ही असेही त्यात काही उपप्रकार आढळतात.

याशिवाय ब्राम्ही लिपी फरक प्रामुख्याने विविध प्रातांत व विविध काळात कोरल्या गेलेल्या आलेखांवरून अभ्यासता येतो. अर्थातच लिपीच्या वळणात बदल झाला, तरी ब्राम्ही लिपी ही सुमारे हजार वर्षे भारतात वापरात राहिली.

**खरोष्ठी लिपी :**

ब्राम्ही लिपीच्या समकालीन असलेली एक प्राचीन लिपी म्हणजे खरोष्ठी लिपी होय. ज्यावेळी भारतात मोठ्या प्रमाणावर ब्राम्ही लिपीचा उपयोग होत होता, त्याचवेळी भारताच्या वायव्य भागात म्हणजे हिंदुकुश पर्वताकडच्या भागात असलेल्या शक, इंडोग्रीक व नंतर कुषाण या परकीय राज्यकर्त्यांनी उजवीकडून डावीकडे लिहिलेल्या जाणाऱ्या खरोष्ठी  लिपीचा वापर सुरु केला. उजवीकडून डावीकडे लिहिली जाणारी ही लिपी भारतातील सर्व प्राचीन लिपींमध्ये अद्वितीय आहे.

'खरोष्ठी' या शब्दाचा अर्थ म्हणजे खर्ज (गाढव) ओष्ठ म्हणजे गाढवाच्या ओठांसारखी लपेटी असलेली लिपी असा आहे. ब्राम्हीप्रमाणेच या लिपीची नॉर्थ सेमेटिक लिपीतूनच झाली असावी असे विद्वानाचे मत आहे. ही लिपी सर्वप्रथम बॅक्ट्रियन ग्रीक राजांच्या नाण्यांवर आढळून आली.त्यामुळे सुरुवातीस तिला 'बॅक्ट्रियन लिपी' असेही संबोधले गेले. या लिपीचा वापर मात्र सिंधु नदीच्या पश्चिम भागातच मर्यादित होता. या भागास प्राचीन काळी अरियाना असे नाव होते.

या लिपीचे वळण जरी उजवीकडे डावीकडे अशा स्वरूपाचे होते तरी त्यातील मजकुराची भाषा मात्र पाली होती. त्यामुळे या लिपीस काही वेळा 'बॅक्ट्रो-पाली', 'अरियाना-पाली' असेही म्हटले गेले. मात्र या लिपीला खरोष्ठी हे नाव युरोपियन विद्वान श्री. ब्युहलर यांनी दिले. हे या लिपीला देण्याचे कारण म्हणजे इसवी सणाच्या तिसऱ्या शतकातील **'**ललित विस्तार**'** या बौद्ध ग्रंथात 'खरोष्ठी' असा या लिपीसाठी शब्द आधीच दिलेला आहे हेही त्यांनी दाखवून दिले.

या खरोष्ठी लिपीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला तो भारताच्या वायव्य भागातच. खरोष्ठी लिपीतील लेख हे भारताच्या वायव्येकडील म्हणजे सिस्तान, कंदहार (अफगाणिस्तान), लडाख, चीनचा काही भाग, तक्षशीला, अरियाना, सिंधुचा पश्चिम भाग, काश्मिर इ. भागातच आढळून येतात. इ.स. पूर्वी ३ ऱ्या शतकातील सम्राट अशोकाचे शाहबाजगढी आणि मानसेहरा (आजच्या पाकिस्तानातील शहरे) या दोन ठिकाणचे कोरीव लेख हे खरोष्ठी लिपीत लेहिले आहेत. तर अफगानिस्तानातील कंदहारजवळ (प्राचीन गांधार प्रदेश) खरोष्ठी व आरमाईक अशा द्वैलिपीत लिहिलेले कोरीव लेख आढळतात. प**श्चि**मी शक - क्षत्रप राजांच्या काही नाण्यांवरही खरोष्ठी लिपीतील लेख असून ही नाणी हिंदुकुश, गांधार तक्षशीला या भागांमध्ये मिळालेली आहेत.

खरोष्ठी लिपीतील लेख हेही प्रस्तर (म्हणजे शिलालेखच) धातूंचे पत्र, नाणी, उंटाचे कातडे, लाकडी फळ्या, भूर्जपत्र इत्यादींवर लिहिलेले आढळतात. आश्चर्याची बाब म्हणजे अफगाणिस्तानातील एक स्तूपाजवळ (खोतान प्रांतात ) इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात खरोष्ठी लिपीत लिहिलेले भूर्जपत्रावरील एक हस्तलिखितही सापडले आहे. चीनी तुर्कस्थान या भागात उंटाच्या कमावलेल्या कातडयावर आणि लाकडावरही कोरलेले खरोष्ठी लेख श्री स्टीन या पुरातत्त्वज्ञास मिळालेले आहेत.

खरोष्ठी लिपीची उत्पत्ती ही देखील 'आरमाईक' या नॉर्थ सेमेटिक लिपीच्या एका प्रमुख शाखेपासून झालेली आहे, आणि उजवीकडून डावीकडे लिहिले जाने हे तिचे महत्त्वपूर्ण वैशिष्टये आहे.

खरोष्ठी लिपीतील सर्वात जुने उपलब्ध लेख हे सम्राट अशोकाचेच आहेत. इ. सन पूर्व ३ रे शतक ते पुढे ६०० ते ७०० वर्षे म्हणजे सुमारे इसवी सनाच्या ४ थ्या शतकापर्यंत प्रचलित होती. या लिपीतील सर्वात अलिकडील लेख म्हणजे उत्तर कुशाण घराण्यातील राजांनी इ.स. सन ३ ऱ्या व इ.सन ४ थ्या शतकात कोरलेले लेख. मात्र या काळापर्यंत खरोष्ठी लिपीचा वापर हळूहळू कमी होत असल्याचे दिसते. तीची  जागा ब्राम्ही लिपीने घेतली होती. भारतातील इंडोग्रीक, शक, कुषाण या परकीय राज्यकर्त्यांनीही ब्राम्ही लिपीचा स्वीकार केल्याचे त्यांच्या लेखांवरून व नाण्यांनवरून दिसते. ब्राम्हीप्रमाणेच खरोष्ठी लिपीतही वेळोवेळी अनेक बदल घडून आले या लिपीत एकप्रकारचा साचेबंदपणा आहे तरीही लिपीमध्ये उच्चार चिन्हे असल्यामुळे कोणत्याही उच्चारांचे लिखाण खरोष्ठी लिपीत लेखातून दिसून येते. ते पुढीलप्रमाणे.

१) अशोकाच्या शिलालेखांतील खरोष्ठीलिपी .

२) इंडोग्रीक राजांच्या नाण्यांवरील खरोष्ठी लिपी.

३) इंडोग्रीक राजा मिनँडर याच्या काळातील बजौर येथील लेखांमधील खरोष्ठी लिपी.

४) सिथो-पार्थियन कालखंडातील खरोष्ठी लिपी (या गटात अनेक कोरीव लेखांचा समावेश होतो.)

५) कुषाण कालीन खरोष्ठी लिपी या गटाचे काही उपप्रकार पडतात. ते म्हणजे

अ) कुषाण असा उल्लेख असलेले लेख.

ब) सम्राट कनिष्ककालीन कालगणनेच्या उल्लेखासह असलेले प्रस्तरलेख.

क) खास कनिष्क शैलीत असलेले इतर कुषाण राजांचे लेख.

ड) इ.सन ३०३ ते ३९९ या कालखंडातील कुषाणांचे खरोष्ठी लेख.

ब्राम्ही लिपीप्रमाणेच काळाच्या ओघात खरोष्ठी लिपीचा वापर हळूहळू कमी झाला व अखेर पूर्ण लुप्त झाला. ही लिपी पुढे फार मोठा काल विस्मृतीस गेली. आधुनिक काळात, ब्रिटिश राजवटीत एक पाश्चात्य संशोधक जनरल व्हेंचुरा यांनी इ.स. १८३३ मध्ये मणिक्याल येथील स्तूपाचे उत्खनन केले होते. त्यात प्राचीन ग्रीक आणि खरोष्ठी असे द्वैलिपिक लेख

मिळाले त्यातील ग्रीक अक्षरांचे वाचन श्री नॉरिस आणि कर्नल मॅसन यांनी केले अशा तऱ्हेने खरोष्ठी लिपी वाचण्याची गुरुकिल्ली या द्वैलिपिक नाण्यामुळे मिळाली आणि त्यातील माहिती इतिहास संशोधनाच्या कमी उपलब्ध झाली.

## ३.६ क ii ] अशोकाचे शिलालेख (राजाज्ञा)

प्राचीन भारतीय इतिहास ज्ञात करून घेण्यासाठी उत्खनित पुरावस्तूंबरोबरच पुराभिलेखांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतातील सर्वात प्राचीन असे पुराभिलेख हे सम्राट अशोक याचे उपलब्ध असून मौर्यकालीन इतिहास ज्ञात होण्यासाठी ते अत्यंत उपयुक्त ठरतात. अर्थात काही विद्वानांच्या मते, सोहगौडा येथे मिळालेला ताम्रपट हा अशोकाच्या शिलालेखांहून अधिक प्राचीन असावा.

**सम्राट अशोक :**

इ.स.पूर्व ३२१ च्या सुमारास नंदाचे राज्य उलथून चंद्रगुप्त मौर्याने मगधावर स्वतःचे राज्य प्रस्थापित केले. चंद्रगुप्ताने आपले साम्राज्य विस्तृत केले. वायव्येकडील अफगाणिस्थानापासून दक्षिण भारतातील कृष्णेच्या खोऱ्यापर्यंत व गुजरात सौराष्ट्रपासून हिमालयाच्या पायथ्यापर्यंतच्या विस्तृत भूप्रदेशावर हे साम्राज्य पसरले होते.

चंद्रगुप्तानंतर इ.स. पूर्व २९७ च्या सुमारास बिंदुसार हा चंद्रगुप्ताचा पुत्र गादीवर आला. आपल्या पित्याचे विशाल साम्राज्य आणि त्यांची प्रशासन व्यवस्था बिंदुसाराने कौशल्याने सांभाळली. इ.स.पूर्व २७२ च्या सुमारास आणि त्यानंतर चार वर्षांनी म्हणजे इ.स.पूर्व २६८ च्या सुमारास अशोक हा बिंदुसाराचा द्वितीय पुत्र मगधाचा सम्राट झाला.

या मधल्या चार वर्षात बिंदुसाराच्या मृत्युनंतर मौर्यांच्या गाडीवर हक्क सांगणारे अनेक वंशज पुढे आले. त्यापैकी महत्वाचे म्हणजे सुशिम आणि अशोक. या वारसा संघर्षात अशोकाने आपल्या विरोधकांचा विरोध कठोरपणे मोडून राज्य मिळविले. त्यासाठी जवळ जवळ चार वर्षांचा काळ लागला.

आपल्या कारकिर्दीत अशोकाने केलेली एकमेव स्वारी म्हणजे कलिंगावर केलेली स्वारी. या स्वारीत अशोक विजयी झाला पण युद्धाने झालेली भीषण हानी बघून तो व्यथित झाला व पुढे त्याने अहिंसेचा स्वीकार केला व त्याने शांतीने अनेक वर्षे, राज्य केले असे परंपरा सांगते.

**अशोकाचे शिलालेख :**

सम्राट अशोकाने आपल्या राज्यात अनेक ठिकाणी उत्तुंग शिलास्तंभ उभारून त्यावर आपले लेख कोरवून घेतले. अशा प्रकारचे लेख कोरण्यासाठी विशाल शिलाखंडाचाही उपयोग करण्यात आला. या शिलालेखांचा उल्लेख सामान्यतः 'अशोकाच्या राजाज्ञा' असा केला जातो. या आज्ञा त्याने आपल्या प्रजेस दिल्या आहेत. भारताच्या विविध प्रांतामधून हे लेख सापडले आहेत. या लेखांच्या प्राप्ती स्थानावरून मौर्य साम्राज्याची प्रभावक्षेत्रांची कल्पना येऊ शकते. या शिलालेखातील मजकूराबाबत भारतीय इतिहासकार १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत अनभिज्ञ होते कारण हे लेख ज्या ब्राम्ही लिपीत लिहिलेले आहेत

ती १८३७ सालापर्यंत कोणालाही वाचता येत नव्हती. मात्र ते वाचण्याच्या दृष्टीने यापूर्वीही प्रयत्न झाले होते. फिरोजशहा तुघलकाने एक अशोक स्तंभ टोपरा येथून दिल्लीला आणवला होता व तो वाचण्यासाठी विविध पंडितांना आमंत्रण केले. मात्र त्यात कोणालाही यश आले नही.

इ.स. १८३७ मध्ये जेम्स प्रिन्सेप यांनी ब्राम्ही अक्षरांचे यशस्वी वाचन केले. त्यानंतर हळूहळू लिपीची सर्व अक्षरे जुळविण्यात पुराभिलेख तज्ञांना यश आले. तरीही सम्राट अशोकाचे लेख कही प्रमाणात गूढच राहिले. कारण अशोकाच्या सर्व लेखांत त्याचा उल्लेख 'प्रियदसी' असा येतो. हा 'प्रियदसि' कोण ते बराच काळ गूढच राहिले. पुढे इ.स.१९१५ साली 'प्रियदसि' लाजा (राजा) अशोक' असा स्पष्ट उल्लेख असलेला लेख सापडला. तसेच श्रीलंकेतील बौद्ध वाङ्मयातही अशोकाचे 'प्रियदसि' हे नाव सापडले त्यामुळे अशोकाचे शिलालेख हे अशोकाच्या इतिहासाचे महत्वाचे साधन बनले. या शिलालेखांचा विविध अंगांनी अभ्यास केला गेला आहे. अशोकाने आपल्या या राजाज्ञांना 'धम्मलेख' असे म्हटले आहे. या लेखांच्या माध्यमातून अशोकाने आपल्या प्रजेला नीतिमूल्ये पाळण्याची आज्ञा केली आहे. या लेखांची प्राप्ती स्थळे आपल्याला असे दर्शवितात की केवळ आपल्या राज्यातच नव्हे तर सीमावर्ती प्रांतातही अशोकाने आपली तत्त्वे पोहचवली होती.

अशोकाच्या लेखातील काही महत्त्वपूर्ण विचार बौद्ध शिकवणुकीच्या जवळचे आहे. ते म्हणजे अहिंसा, वृद्ध, आश्रित, मुके प्राणी यांच्याशी सौजन्यपूर्ण व्यवहार इत्यादी. याशिवाय अशोकाने केलेल्या प्रजाहिताच्या अनेक कामांची माहितीही या लेखांमधून मिळते. उदा. पिण्याच्या पाण्याची सोय, वृक्षारोपण, औषधी वनस्पतींची लागवड, मनुष्य व जनावरांसाठी दवाखाने इ.

याच शिलालेखांमधून अशोकाने 'धम्म महामात्र' (धर्म महामात्र) या विशेष अधिकाऱ्यांची केलेली योजनाही आपणास कळते. ही योजना म्हणजे त्याच्या 'धम्मा'चाच एक भाग होता. या धर्म महामात्र अधिकाऱ्यांनी समाजाच्या सर्व लोकांत मिळून मिसळून त्यांची दु:खे, वेदना समजावून घेवून त्याविषयी माहिती राजापर्यंत पोहचवावी तसेच गरजूंना सर्वतोपरी मदत पोहचवावी अशी अपेक्षा होती. विशेष म्हणजे या अधिकाऱ्यांनी तुरुंगातही बंदिजनांच्या उद्धाराचे कार्य करावे, अशीही आज्ञा दिली होती.

सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या चार प्रकारात वर्गीकरण करण्यात येते, ते म्हणजे –

१) प्रस्तर लेख

२) लघुप्रस्तर लेख

३) स्तंभालेख

४) लघुस्तंभालेख

वरील चारही प्रकारचे लेख भारतात व भारताबाहेरही आढळले आहेत त्यांची उपलब्धी स्थळे खालीलप्रमाणे आहेत :

**प्रस्तर लेख :** अशोकाचे प्रस्तरलेख हे पुढील ठिकाणी उपलब्ध झाले आहेत.

१) गिरनार : काठेवाडमधील जुनागढजवळ

२) कालसी : उत्तर प्रदेश

३) शाह बाझ गढी : पाकिस्तान

४) मन्सेरा : पाकिस्तान

५) धौली : ओरीसा

६) जौगड : ओरीसा

७) सोपारा : महाराष्ट्र

८) एर्रागुड्डी : आंध्रप्रदेश

**लघुप्रस्तर लेख :** अशोकाच्या लघुप्रस्तरलेखांची उपलब्धीस्थळे पुढीलप्रमाणे आहेत.

१) रुपनाथ : मध्यप्रदेश

२) सहस्त्राम : बिहार

३) बैराट : राजस्थान

४) कलकत्ता : पश्चिम बंगाल

५) मस्की : म्हैसूर, कर्नाटक

६) म्हैसूर : कर्नाटक

७) एर्रागुड्डी : आंध्रप्रदेश

८) राजुलमंडगिरी : आंध्रप्रदेश

९) अहरौरा : उत्तर प्रदेश

**स्तंभलेख :** अशोकाचे स्तंभालेख हेही अत्यंत महत्त्वाचे असून ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) दिल्ली : टोपडा : दिल्ली

: हा मूळ टोपडा येथे होता, तो दिल्ली येथे हलवला गेला.

२) दिल्ली : मेरठ : दिल्ली

: हाही मूळ मेरठ येथे होता व तो दिल्ली येथे हलवला गेला.

३) लौरिया अरराज आणि लौरिया नंदनगड : उत्तर बिहार

४) रामपूर्वा : बिहार

५) अलाहाबाद : कोसम : अलाहाबाद

**लघुस्तंभालेख :** अशोकाचे लघुस्तंभालेख हे पुढील ठिकाणी स्थित आहेत.

१) सांची : मध्यप्रदेश

२) सारनाथ : उत्तर प्रदेश

३) रुम्मिनदेई : नेपाळ

४) निगली सागर : नेपाळ

अशोकाच्या शिलालेखात अशोकाच्या राजाज्ञा आहेत. प्रजेने कसे वागावे. धर्मासंबंधीची माहिती प्रजेच्या कल्याणासाठी केलेले मार्गदर्शन, काही शिलालेखांवर नियम, अहिंसा मार्गाचे पालन, त्याची विविध धोरणे त्याचा साम्राज्यविस्तार, तत्कालीन सामाजिक परिस्थिती शिलालेखात वापरलेली भाषा, लिपी, विविध भागात बोलली जाणारी भाषा यावरून अशोक किती प्रजाहितदक्ष सम्राट, धर्मसहिष्णू, कल्याणकारी होता हे दिसते.

**प्रस्तरलेखांमधील १४ राजाज्ञा :**

महाप्रस्तर म्हणजे मोठे शिलांवर कोरलेले लेख ज्यात सम्राट अशोकाच्या चौदा राजाज्ञा कोरलेल्या आहेत. या राजाज्ञा पुढीलप्रमाणे :

१) देवांना लाडका प्रियदर्शी राजा असे सांगतो –

२) पूर्वीच्या काळी लोकांची प्रकरणे रितसर मिटविणे आणि प्रत्येक गोष्ट निवेदन करणे या गोष्टी अस्तित्वात नव्हत्या.

३) परंतु मी त्या खालीलप्रमाणे केल्या.

४) मी सर्व ठिकाणी हेर नेमले. मी जेवत असलो, जनानखान्यात असले किंवा अंत:पुरात असलो, किंवा गोशाळेत, पालखीत किंवा उदयानात असलो तरी हेरांनी लोकांच्या अडचणी मला येऊन ताबडतोब सांगाव्यात.

५) मी कोठेही लोकांच्या अडचणींचे निवारण करीन.

६) जर मंत्रीमंडळात वादग्रस्त प्रश्न निघाला किंवा एखाद्या देणगीबाबत किंवा माझ्या तोंडी सांगितलेल्या निवाडयात अडचण उत्पन्न झाली किंवा एखादी तातडीची गोष्ट मंत्र्यांना सांगितली तर ती मला केव्हाही, मी कुठेही असलो तरी सांगितली पाहिजे.

७) म्हणून अशा तऱ्हेच्या मी आज्ञा दिल्या आहेत.

८) अडचणींचे निवारण करणे आणि मला कामकाजाचा निकाल लावणे (या गोष्टी) केल्याशिवाय मला समाधान होत नही.

९) लोककल्याण हे माझे कर्तव्य आहे असे मी समजतो.

१०) अविरत काम आणि अडचणींचे निवारण हा त्याचा पाया आहे.

११) लोककल्याणाची वृद्धी यासारखे श्रेष्ठ कर्तव्य नाही.

१२) मी जे प्रयत्न करीत आहे त्यामुळे मी लोकांचे ऋण फेडीन आणि त्यांना मी इहलोकी आणि परलोकी सुखी करीन.

१३) या हेतूने ही धर्माज्ञा मी लिहविली आहे. ती चिरकाल टिको. माझे पुत्र, पौत्र, प्रपौत्र या धर्माज्ञेचे लोककल्याणासाठी आचरण करोत.

१४) परंतु याचे आचरण करण्यास अतिशय कठीण आहे. श्रेष्ठतम प्रयत्नाशिवाय ते आचरणात आणणे शक्य होणार नाही.

वरील १४ राजाज्ञावरून असे दिसते की अशोक अत्यंत प्रजाहित दक्ष होता. त्याच्या इतर ठिकाणी आढळलेल्या आलेखांमध्ये त्याने यातील कही राजाज्ञा पुन्हा पुन्हा कोरलेल्या दिसतात तसेच त्याच्या साम्राज्याच्या विस्तार कळतो. असेच कही शिलालेख आपण पुढे पाहू.

- **गिरनार येथील प्रस्तर लेख :**

गिरनार येथे सापडलेल्या शिलालेखात सम्राट अशोकाच्या १४ राजाज्ञा कोरलेल्या आहेत. शिळेचे समान दोन भाग करून त्यावर दोन्ही बाजूला त्या कोरलेल्या आहेत. आज गिरनार येथील दोन्ही बाजूला त्या कोरलेल्या आहेत. आज गिरनार येथील जुनागढ संग्रहालयात सुरक्षितरित्या ठेवण्यात आलेला आहे.

- **कालसी येथील प्रस्तरलेख :**

उत्तर प्रदेशातील डेहराडून येथे सापडलेल्या प्रस्तरलेख १४ राजाज्ञा कोरलेल्या आहेत. शिळेच्या एक भाग गुळगुळीत असून दुसऱ्या भागावर हत्तीची रेखाकृती कोरलेली आहे. या शिलालेखाचा शोध १८६० मध्ये श्री. फॉरेस्ट यांनी लावला. या लेखाचे वाचन श्री कनिंगहॅम यांनी केले.

- **शाहबाजगढी येथील प्रस्तरलेख :**

आजच्या पाकिस्तान येथील शहाबाज गढी येथे अशोकाच्या १४ राजाज्ञा कोरलेला शिलालेख सापडला आहे. या लेखाचे वैशिष्ट्य म्हणजे हा लेख ब्राम्ही व खरोष्टी लिपीत कोरलेला असून या लिपी वाचण्याचे श्रेय जेम्स प्रिन्सेप, लॅसन, नॉरिस आणि कनिंग हॅम यांनी केले. १८३६ मध्ये या लेखाचा शोध कोर्ट नावाच्या सेनाधिकाऱ्याने लावला होता.

- **मानसेहरा येथील प्रस्तरलेख :**

मन्सेरा (मानसेहरा) हे ठिकाण आज पाकिस्तानात आहे. येथेही मोठया प्रस्तरांवर १४ राजाज्ञा कोरलेल्या आहेत. पण त्या राजाज्ञा एकूण तीन शिळांवर कोरलेल्या आढळतात. १८८९ मध्ये पहिल्या दोन शिळा कनिंगहॅम यांनी शोधून काढल्या त्यानंतर पुरातत्व खात्याच्या एका सेवकाने तिसऱ्या शिळेचा शोध घेतला. पहिल्या शिळेवर १ ते ८ आज्ञा, दुसऱ्या शिळेवर ९ ते ११ आणि तिसऱ्या शिळेवर १२ ते १४ आज्ञा कोरलेल्या आहेत.

munotes.in

- **धौली येथील प्रस्तरलेख :**

धौली हे ठिकाण ओरिसा राज्यात आहे. १८३७ मध्ये लेफ्टनंट किट्टू यांनी हा लेख शोधून काढला. धौली येथे आढळलेल्या लेखात ११,१२,१३ ह्या राजाज्ञा नसून १४ व्या राजाज्ञेनंतर वेगळ्या प्रकारच्या दोन राजाज्ञा असलेले लेख कोरलेले आहेत. त्याला 'कलिंग राजाज्ञा' असे म्हणतात.

- **जौगढ येथील प्रस्तरलेख :**

जौगढ हे गाव देखील ओरिसा राज्यात आहे. १८५० मध्ये सर वॉल्टर इलियट यांनी हा लेख शोधून काढला. धौली प्रमाणे जौगड येथेही ११,१९,१३ क्रमांकाच्या राजाज्ञा कोरलेल्या नाहीत. त्याऐवजी वेगळ्या राजाज्ञा कोरलेल्या आढळतात. या लेखात स्वस्तिक चिन्ह व 'म' हे अक्षर आढळते.

- **सोपारा येथील प्रस्तरलेख :**

सोपारे हे ठिकाण महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात आहे. १८८२ मध्ये भगवानलाल इंद्रजी यांना प्रथम हा लेख आढळला. १९५६ मध्ये गोरे यांनी येथे दुसरा भाग शोधून काढला. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय मुंबई येथे या लेखाचे व्यवस्थित जतन केले आहे. या प्रस्तरलेखांत अशोकाच्या क्र. ८ व ९ या राजाज्ञा कोरल्या आहेत.

- **एर्रगुड्डी येथील प्रस्तरलेख :**

एर्रगुड्डी हे गाव आंध्रप्रदेशातील कर्नूल जिल्ह्यात आहे. या गावातील एका टेकडीवर ६ मोठया शिलांवर अशोकाचे लेख लिहिले आहे. दयाराम सहानी यांनी हा लेख प्रसिद्ध केला आहे.

- **रूपनाथ येथील लघुप्रस्तर लेख :**

रूपनाथ हे ठिकाण मध्यप्रदेशातील जबलपूर जिल्ह्यात असून विंध्य पर्वतरांगेतील एका डोंगरावर हा लेख कोरलेला आहे. हा लेख सहा ओळींचा आहे. १८७१-७२ मध्ये कनिंग हॅम यांनी या लेखाचे वाचन केले.

- **सहस्त्राम येथील लघुप्रस्तर लेख :**

सहस्त्राम हे बिहार मधील शहाबाद जिल्ह्यात आहे. तेथील चंदनपीर नावाच्या डोंगरावर लेख कोरलेला असून आज या शिळेचा काही भाग नष्ट झालेला आहे.

- **बैराट येथील लघुप्रस्तर लेख :**

राजस्थान मधील बैराट या ठिकाणी हा लेख आढळला. १८७१ मध्ये कार्लाइल यांनी या लेखाचा शोध घेतला. काही भाग शिळेच्या पूर्वेस तर काही भाग शिळेच्या खालच्या बाजूस कोरलेला आहे.

munotes.in

- **गुजर्रा येथील लघुप्रस्तर लेख :**

गुजर्रा हे ठिकाण उत्तर प्रदेशात असून गावाच्या टेकडीच्या पायथ्याशी एका शिळेवर अशोकाचा हा लेख कोरलेला आहे. गुजर्रा येथील लेखाचे वैशिष्ट्य म्हणजे या लेखात 'देवानं पिय पियदासिनो असोकराज' असा उल्लेख आलेला आहे. १९५४ मध्ये बहादूरचंद्र छाबडा यांनी हा लेख शोधून काढला.

- **राजुल मंडागिरी येथील लघुप्रस्तर लेख :**

राजुल मंडागिरी हे ठिकाण आंध्रप्रदेशातील कर्नूल जिल्ह्यात आहे. या टेकडीवर रामलिंगेश्वर नावाचे जे शंकर देवाचे मंदिर असून काही दूर अंतरावर क्रमांक १ व २ या राजाज्ञा उत्कीर्ण केलेल्या आहेत.

- **एर्रगुड्डी येथील लघुप्रस्तर लेख :**

आंध्रप्रदेशातील एर्रगुड्डी या ठिकाणी हा लेख आढळला असून या लेखावर दोन लिप्या आढळतात. ब्राम्ही लिपीमध्ये लिहिलेला लेख आहे.

- **गोविमठ आणि पालकिगुंडु येथील लघुप्रस्तरलेख :**

कर्नाटक राज्यात गोविमठ आणि आणि पालकिगुंडु या दोन टेकडया आहेत आणि या टेकड्यांवर अशोकाचा लेख आढळतो. या लेखाचा शोधकर्ता कोपवाळ येथील एक रहिवाशी श्री शास्त्री हे आहेत.

- **मस्की येथील लघुप्रस्तरलेख :**

मस्की हे कर्नाटक राज्यातील म्हैसूरमधील रायपूर जिल्ह्यात आढळते. येथील एका टेकडी वरील मोठ्या शिळेवर हा लेख कोरला असून या लेखात अशोकाच्या नावाचा उल्लेख आढळतो.

- **म्हैसूर राज्यातील लघुप्रस्तरलेख :**

१८८२ मध्ये श्री. राइस यांनी म्हैसूर राज्यातून तीन लघुलेख प्राप्त केले. ब्रम्हगिरी येथे चांगल्या अवस्थेत लेख सापडला असून या लेखातील काही अक्षरे नष्ट झाली आहेत.

दुसरा लेख सिद्धपूर येथे एका डोंगरावरील गुहेमध्ये आढळला. ब्रम्हगिरी पासून कही अंतरावर हे ठिकाण आहे.

तिसरा लेख जटिंगरामेश्वर येथे सापडला. हे ठिकाणदेखील ब्रम्हगिरीपासून कही अंतरावर आहे. ह्या लेखाची मोठ्या प्रमाणात झीज झाली असल्यामुळे अस्पष्ट स्वरुपात आहे.

- **अहरौरा येथील लघुप्रस्तर लेख :**

अहरौरा हे ठिकाण उत्तर प्रदेशातील मिर्झापूर लिह्यात येते. १९६१ मध्ये इलाहाबाद विश्वविद्यालयातील पुरातत्व विभागाचे प्रमुख गोवर्धनराय शर्मा यांच्या संशोधक तुकडीने या लेखाचा शोध लावला.

**नवी दिल्ली येथील लघुप्रस्तरलेख :**

अमरपूरी नावाच्या वसाहतीत एका खडकाच्या पृष्ठभागावर हा लेख कोरलेला आहे. अशोकाचे लघुप्रस्तर लेख १३ ठिकाणी सापडले हे १४ वे ठिकाण असून स्थानिक दगडावरच हा लेख कोरलेला आहे.

- **बाराबर येथील गुहालेख :**

बिहार राज्यात बाराबर नावाच्या गुहा असून तेथील तीन गुफांमध्ये अशोकाचे लेख आहेत. अशोकाचा नातू दशरथ याचे लेख आहेत. राजा अनंतवर्ण याचाही लेख आहे. अशोक व दशरथ यांनी ह्या गुहा आजीवक पंथास दान दिल्या होत्या.

**स्तंभालेख :**

- **दिल्ली-टोपडा येथील स्तंभालेख :**

हा स्तंभालेख मूळचा टोपडा या गावी होता, ते फिरोजशहा तुघलकाच्या कारकिर्दीत त्याने तो दिल्लीला आणवून घेतला. अशोकाच्या स्तंभावर एकूण सात राजाज्ञा आहेत. मात्र यापैकी सहा राजाज्ञा इतरत्र आढळतात. मात्र सातवा लेख याच ठिकाणी आढळतो. यावर अशोकाखेरीज इतरांचेही लेख आढळतात. १८७० साली जेम्स प्रिन्सेप यांनी वाचन केले.

- **दिल्ली-मीरत येथील स्तंभालेख :**

हा स्तंभालेख मीरत येथून दिल्लीला आणला गेला. दिल्ली-टोपडा लेखापैकी पाच लेख या स्तंभावर असून सहाव्या लेखाच्या पहिल्या दोन ओळी कोरलेल्या आहेत. १९१३ साली हा लेख सापडला.

- **लौरिया – अराराज आणि लौरिया – नंदनगड येथील स्तंभालेख :**

हे दोन्ही स्तंभालेख ज्या ठिकाणी आढळले ती ठिकाणे उत्तर बिहारमधील चंपारण्य या जिल्ह्यात आढळतात. बिहारमध्ये अराराज नावाचे एक शिवमंदिर आहे. तर दुसऱ्या गावात नंदनगड नावाचा किल्ला आहे. म्हणून याला लौरिया अरराज व लौरिया नंदनगड अशी पडली आहेत. या स्तंभालेखाच्या शीर्षावर गरुडाची मूर्ति आहे. तर नंदनगड येथील स्तंभावर घंटाकृती शीर्षावर सिंगचा पुतळा आहे. त्याच्याखाली राजहंस आहेत.

- **रामपूर्व येथील स्तंभालेख :**

रामपूर्व हे ठिकाण बिहार राज्यात असून या स्तंभाच्या शीर्षावर घंटाकृती मथळा व राजहंस आणि फुले आहेत. या स्तंभावर सहा लेख कोरलेले आहेत.

- **अलाहाबाद-कोसम येथील स्तंभालेख :**

हा स्तंभालेख अलाहाबाद येथील किल्यामध्ये आढळतो. या स्तंभावर अशोकाचे तीन वेगवेगळे लेख आहेत. त्यामध्ये दिल्ली टोपडा येथील सहा लेख, राणीचा लेख, कौशांनी येथील लेख. याशिवाय गुप्त सम्राट समुद्रगुप्ताची प्रशस्ती, जहांगीर बादशहाचा लेख, बिरबलचा लेख असे इतरही लेख आढळतात. त्यामुळे या स्तंभालेखाचे महत्त्व अधिक आहे.

- **सांची यथील लघुस्तंभालेख :**

सांची हे गाव मध्यप्रदेशात असून या गावी अशोककालीन स्तूप आहे. तसेच रेल्वे स्टेशनपासून जवळच सांची येथे एक स्तंभ आहे. त्यावर काही ओळी कोरलेल्या आहेत.

- **सारनाथ येथील लघुस्तंभालेख :**

सारनाथ हे ठिकाण उत्तर प्रदेशात असून याला अतिशय महत्त्व आहे. या स्तंभावर चार सिंह पाठीला पाठ लावून असलेली आकृती तसेच मध्यभागी अशोक चक्र आहे. सिंहाच्या खाली गोल पट्टीवर सिंह, हत्ती, घोडा आणि बैल यांची आकृती कोरलेली आहे. या स्तंभावर कोरलेल्या लेखाच्या ओळी नष्ट झाल्या आहेत. या लेखाचे वाचन व्होगेल यांनी केले.

- **रुम्मिनदेई (लुंबिनी) येथील लघुस्तंभालेख :**

रुम्मिनदेई हे ठिकाण नेपाळमध्ये १८९६ साली फ्युरर यांना नेपाळच्या जंगलात हा लेख आढळला. हे ठिकाण गौतम बुद्धांच्या जन्माशी संबधित असल्यामुळे अशोकाने या गावाचा कर माफ केला होता. असा उल्लेख असलेला लेख येथे आढळतो. आज रुम्मिंदेई म्हणून ओळखले जाणारे हे स्थळ प्राचीन काळी लुंबिनी म्हणून ओळखले जाई. येथेच गौतम बुद्धांचा जन्म झाला होता.

- **निगलीसागर येथील लघुस्तंभालेख :**

निगलीसागर नावाचा तलाव नेपाळमध्ये आहे. तेथेच हा लेख आढळला. कनकमुनी बुद्धाच्या स्तूपासमोर हा स्तंभ आहे. याचे वाचन १८७८ मध्ये ब्युहलर यांनी केले.

**द्वैभाषिक लेख :**

कंदहार हे ठिकाण अफगाणिस्तानात असून १९५८ साली शेरेवुना या गावी हा द्वैभाषिक लेख सापडला. या लेखाचे महत्त्व म्हणजे येथील लेखात दोन लिप्या आढळतात. त्याही परकीय असून ग्रीक व अरमाइक ह्या होत.

अशा पद्धतीने अशोकाच्या शिलालेखातून, स्तंभालेखातून आणि गुहालेखातून तत्कालीन परिस्थितीची माहिती प्राप्त होते. त्या काळात अशोकाचे प्रशासकीय धोरण कोणत्या प्रकारचे होते, धार्मिक धोरण कसे होते? अशोकाच्या काळात इतर कोणकोणते समकालीन राजे होते या सर्वांची माहिती आपणास मिळते.

## ३.७ सारांश

अशा तऱ्हेने या पाठात आपण पुराभिलेख शास्त्र म्हणजे काय ते जाणून घेतले. तसेच भारतीय पुराभिलेखविद्येचा इतिहास, कोरीव लेखांचे प्रकार यही बाबी जाणून घेतल्या. इतिहासाची जुळणी करताना आणि विशेषत: प्राचीन भारताच्या इतिहासाच्या जुळवणीत आणि अभ्यासात कोरीव लेखांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इतिहास म्हणजे केवळ राजकीय घडामोडींचा आढावा घेणे नसून मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पैलूंचा सूक्ष्म अभ्यास इतिहासाचा आता अन्वयार्थ लावला जातो. अर्थात या विविध पैलूंचा अभ्यास हा कोरीव लेखांतील माहितीच्या आधारे अधिक सखोलपणे लिहिता येणे शक्य झाले आहे. प्राचीन भारतातील हे कोरीव लेख विविध लिपींमध्ये लिहिल्याचे आढळून येते. या लिपींमधील सर्वात प्राचीन लिपी म्हणजे ब्राम्ही लिपी आणि खरोष्टी. त्यानंतरच्या काळात शारदा आणि देवनागरी लिपींचा उदय झाला.

सम्राट अशोक यांचे शिलालेख हे त्यांनी प्रजेला दिलेल्या राजाज्ञा असून प्राचीन भारतीय इतिहास लेखनात त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

## ३.८ प्रश्न

१) भारतीय पुरालेखविद्येच्या इतिहासाचा मागोवा घ्या.

२) पुराभिलेखाचे ठळक प्रकार व त्यांची वैशिष्टये यांवर एक सविस्तर टीप लिहा.

३) भारतातील प्राचीन लिपी ब्राम्ही व खरोष्ठी कसकशा विकसित होत गेल्या यावर सविस्तर माहिती लिहा.

४) प्राचीन भारताच्या इतिहासातील पुराभिलेख विद्येचे महत्त्व स्पष्ट करा.

५) पुराभिलेखाचे ठळक प्रकार व त्यांची वैशिष्टये यांवर एक सविस्तर टीप लिहा.

६) अशोकाचे शिलालेख या विषयावर एक निबंध लिहा.

७) टीपा लिहा :

  १) ब्राम्ही लिपी

  २) खरोष्टी लिपी

  ३) अशोकाच्या शिलालेखांचे धार्मिक महत्त्व

munotes.in

## ३.९ संदर्भ

ओझा गौरीशंकर, प्राचीन भारतीय लिपिमाला, मुन्शीराम मनोहरलाल, दिल्ली, 1971.

- देगलूरकर गो.ब., प्राचीन भारत  इतिहास आणि संस्कृती, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१५
- तुळपुळे एस जी, प्राचीन मराठी कोरिव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६३.
- थापर रोमिला, अशोक आणि मौर्यांचा ऱ्हासस, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.
- गोखले शोभना, भारतीय लेखविद्या (डी सी सरकर यांनी केलेले इंडियन एपिग्राफीचे भाषांतर), कॉन्टिनेन्टल पब्लिकेशन, पुणे, २०१०.
- गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.
- गोखले शोभना, प्राचीन भारतीय इतिहासाची साधने, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे, २००८.
- कोलते व्ही बी, महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७.

❖❖❖❖

munotes.in

# ४

# नाणकशास्त्र (NUMISMATICS)

**अ ) व्याख्या आणि अर्थ; भारतीय नाणकशास्त्राचा इतिहास**

**ब) प्राचीन भारतीय नाणी : आहत नाणी, सातवाहन, पश्चिमी क्षत्रप, कुषाण आणि गुप्त राजांची नाणी.**

**क) भारतीय इतिहासात नाणकशास्त्राचे योगदान**

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टये

४.१ नाणकशास्त्र: व्याख्या व अर्थ; भारतातील नाण्यांची सुरुवात

४.२ भारतीय नाणकशास्त्राच्या अभ्यासाचा इतिहास

४.३ प्राचीन भारतीय नाणी: आहत नाणी

४.४ सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रपांची नाणी

४.५ कुषाण आणि गुप्त राजांची नाणी

४.६ भारतीय इतिहासातील नाणकशास्त्राचे योगदान

४.७ सारांश

४.८ प्रश्न

४.९ संदर्भ

**अ) व्याख्या आणि अर्थ; भारतीय नाणकशास्त्राचा इतिहास**

## ४.० उद्दिष्टये

सदर पाठात आपण नाणकशास्त्राचा अभ्यास करणार आहोत. तसेच भारतीय नाणकशास्त्राविषयक अभ्यासाचा इतिहास, नाणकशास्त्राचे योगदान, प्राची भारतीय नाणी याही बाबींचा अभ्यास करणे ही या पाठाची उद्दिष्टये आहेत.

munotes.in

## ४.१ नाणकशास्त्र : व्याख्या व अर्थ : भारतातील नाण्यांची सुरुवात

नाणकशास्त्र या संज्ञेचा अर्थ प्रारंभीच्या काळात नाण्याचा संग्रह करणे असा लावला जात असे. परंतु कालौघात ' नाणकशास्त्र' या संकल्पनेची व्याप्ती वाढत गेली. तिचा अर्थ अधिक व्यापकतेने लावण्यात आला व नवीन व्याख्येप्रमाणे 'गतकालीन नाण्याचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून करण्यात येणारा अभ्यास' म्हणजे नाणकशास्त्र होय. पुरातत्त्वाची ज्याप्रमाणे कोरीव लेखनशास्त्र अथवा पुराभिलेखशास्त्र ही एक उपशाखाच आहे, त्याचप्रमाणे नाणकशास्त्राची व्याप्ती आणि ऐतिहासिक दृष्टीकोणातून वाढत असलेले महत्त्व यांमुळे नाणकशास्त्रासही पुरातत्त्वाची एक स्वतंत्र उपशाखा म्हणून मान मिळालेला आहे. तसेच नाणकशास्त्राला पुरातत्त्वातील एका स्वतंत्र ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त झाला आहे.

कोरीव लेखांच्या खालोखाल नाण्यांचे इतिहास संशोधनाच्या कामी एक ऐतिहासिक साधन म्हणून मोठे योगदान आहे. मानवी जीवनाच्या विविध पैलूंविषयी माहिती आपणास नाण्यांच्या अभ्यासातून कळते. विविध कालातील आर्थिक परिस्थिती देशाच्या विविध प्रांतांमधील विविध काळांमधील, विविध राजवटींची विविध आकारांची अशी ही नाणी आपणांस तत्कालीन परिस्थितीची चांगलीच कल्पना देतात.

अनेक वेळा वाङमयीन साधनांद्वारे जी माहिती मिळू शकत नाही, अशा माहितीवर नाणकशास्त्रीय पुरावे हे चांगलाच प्रकाशझोत टाकतात. अशी अज्ञात माहिती आपल्या इतिहासातील अधिक भर टाकत असते. शिवाय वाङमयीन साधनांतील ज्ञात ऐतिहासिक गोष्टी आपण पडताळून पाहू शकतो. नाणी ही प्रत्यक्ष त्या काळातील इतिहासाचे अमर साक्षीदार असतात. त्यांमध्ये फेरफार घडून येणे शक्य नसते आणि म्हणूनच कोरीव लेखांप्रमाणे त्यांनाही इतिहासाची विश्वसनीय साधने समजण्यात येते.

इतिहासाचे एक साधन म्हणून नाणी ही महत्त्वपूर्ण ठरतात. खरे तर 'नाणी' ही देखील एक ऐतिहासिक वस्तू (पुरावस्तू) म्हणून गणली जाते. अर्थातच नाण्यांमधून कधी प्रत्यक्ष अथवा कधी अप्रत्यक्ष स्वरुपात कालगणनेबाबत माहिती मिळू शकते. त्यामुळे नाणकशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

इतिहासाचे एक साधन म्हणून नाण्यांकडे पहात असताना भारतात नेमकी कधीपासून आणि कोणत्या हेतूने त्यांची निर्मिती झाली असावी असे कुतुहूल निर्माण होते.त्यासाठी आपण भारतात नाण्यांची सुरुवात कशी व का झाली, ते पाहूया.

### भारतातील नाण्यांची सुरुवात :

मानवी संस्कृतीचा उदय झाल्यावर मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर स्वतःची जी भौतिक प्रगती केली, त्यातूनच मानवाने अनेक भौतिक साधने, कलावस्तू बनविल्या. त्याच्या गरजेप्रमाणे अनेक वस्तूंचा शोध लावला. त्यातून मानवी व्यवहारांना सुरुवात झाली. प्रारंभीच्या काळास मानवजातीच्या व्यावहारिक दृष्टीकोन हा स्वतःपुरता व कुटुंबापुरताच मर्यादित होता. पुढे जसजशी समाजीकरणाची प्रक्रिया वाढत गेली, तसतशी मानवी व्यवहारांमध्ये कुटुंबाव्यतिरिक्त समाजातील इतर घटकांचाही समावेश होऊ लागला. त्यातूनच वस्तूविनिमय पध्दतीची सुरुवात झाली.

सुरुवातीस वस्तूविनिमय पद्धत अतिशय उपयुक्त ठरली परंतु लवकरच या पद्धतीतील दोषही लक्षात येऊ लागले आणि व्यावहारिक देवाणघेवाणीचा एक नवीनच पद्धत उदयास आली. त्यानुसार प्रथमतः सर्व वस्तूंची किंमत एका विशिष्ट वस्तुद्वारे ठरविण्यात आली. त्यानंतर देवघेवीच्या माध्यमासाठी एखाद्या विशिष्ट वस्तूंचा वापर करण्यात येऊ लागला हेच माध्यम (वस्तुरूप) नाण्यांच्या विकासातील पहिला टप्पा ठरला.

देवाणघेवाणीचे माध्यम म्हणून सुरुवातीस कृषी-उत्पादने यांचाच वापर केला गेला. परंतु नंतर आलेल्या भटक्या पशुपालक आर्यांनी याच कामासाठी गायींचा उपयोग केला. ब्राम्हण कालखंड अथवा उत्तर वैदिक कालखंडापर्यंत गायी हेच देवघेवीचे प्रमुख माध्यम म्हणून उपयोगात आणले जाई. गायी हे देवघेवीचे स्थिर माध्यम अधिक काळ टिकून होते. कारण कृषिवल जीवनासाठी व दूधदूभत्यासाठी असणारी गायींची उपयुक्तता.

या नंतरच्या काळात गायी हे देवाणघेवाणीची माध्यम म्हणून वापरणे गैरसोयीचे होऊ लागले. परिणामी मौल्यवान धातू, रत्न इ. वस्तूंना देवघेवीच्या माध्यमाचे स्थान मिळू लागले. तसे पहावयास गेले तर वेदकाळापासूनच गायींबरोबरच अशा मौल्यवान धातू व रत्ने, सुवर्णअलंकार इ. चा वापर विनिमयासाठी होत असे. ऋग्वेदात 'हिरण्यपिंड' या नावाचा उल्लेख आलेला आहे. 'हिरण्यपिंड' म्हणजे सुवर्णाचा तुकडा. त्याचा चलनासारखा वापर केला जाई. वैदिक वाड्मयात 'निष्क' (सुवर्ण नाणी) 'मान', 'पाद' हे चलनाचे प्रकार उल्लेखले गेले आहेत. याशिवाय 'विंशतिका''त्रिंशतिका', 'सन' आणि 'कार्षापण' या नाणे सदृश्य संज्ञांचा उल्लेख पाणिनीच्या अष्टाध्यायीत आलेला आहे. अष्टाध्यायीचा काळ हा इ.स. पूर्व ६ वे ५ वे शतक असा गृहीत धरला जातो. त्यामुळे या कालखंडापर्यत वास्तुविनिमयाचा माध्यम म्हणून नाण्यांचा काही प्रमाणावर वापर होत असावा असा निष्कर्ष काढता येतो. असे असले तरी प्राचीन काळापासून आजपर्यंतसुद्धा वस्तूविनिमय पद्धती काही प्रमाणावर भारतात टिकून आहे.

## ४.२ भारतीय नाणकशास्त्राच्या अभ्यासाचा इतिहास

पुराभिलेखशास्त्राच्या इतिहासाप्रमाणेच भारतातील नाणकशास्त्राचा इतिहासही इ.स. १७८४ मध्ये झालेल्या 'एशियाटिक सोसायटी'च्या स्थापनेपासून सुरु होतो. पाश्चात्य जगात प्रबोधन युग अस्तित्वात आले. तेव्हापासूनच इतिहास आणि संस्कृतीचे साधन म्हणून नाण्यांचा अभ्यास सुरु झाला. हळूहळू या नाणकशास्त्राच्या अभ्यासात प्रगती झाली आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीस नाणकशास्त्रास एक स्वतंत्र ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त झाला. जगातील पहिली नाणकशास्त्र संस्था इंग्लंडमध्ये २२ जून १८३६ रोजी सुरु करण्यात आली व तिला १९०७ मध्ये 'न्युमिस्मॅटिक्स सोसायटी' असे नाव प्राप्त झाले.

ब्रिटिश राजवट भारतात आल्यावर जशी पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासात सुरुवात झाली तशीच त्याचीच एक उपशाखा म्हणून नाणकशास्त्राच्या अभ्यासास सुरुवात झाली हळूहळू तिच्यात प्रगती झाली आणि पुरातत्त्वातील स्वतंत्र ज्ञानशाखेचा दर्जा तिला प्राप्त झाला. भारतातील या नाणकशास्त्राच्या अभ्यासाचे एकूण पाच टप्पे अभ्यासता येतील ते पुढील प्रमाणे-

**प्रथम टप्पा ( १७८४ ते १८५० ):**

इ.स. १७८४ ते १८५० या पहिल्या टप्प्यांमध्ये अनेक व्यक्ती युरोपियन अधिकारी व लष्करी अधिकाऱ्यांनीही जुन्या नाण्यांचा संग्रह करण्याचा आणि अभ्यास करण्याचाही प्रयत्न केला. त्यांनी अभ्यासलेल्या नाण्यांची अभ्यासपूर्ण माहिती प्रकाशित होऊ लागली. त्याचाच परिणाम म्हणून अनेक लोकांना या नाणकशास्त्राविषयी कुतूहल वाटते व त्यांनीही नाणेसंग्रहास सुरुवात केली. अशा नाणेसंग्राहक आणि अभ्यासकांपैकी पुढील महत्त्वाच्या व्यक्तींनी व संस्थांनी नाणकशास्त्रास मोठे योगदान दिलेले आहे.

१) प्रायोनेट आणि व्हिस्काउंटी यांनी यापूर्वी शोध लागलेला इंडो-ग्रीक नाण्यांचा अभ्यास करून त्यावर सविस्तर माहिती लिहून प्रकाशित केली.

२) रॉयल एशियाटिक सोसायटीने  एक स्मरणिका प्रकाशित केली. या स्मरणिकेत ग्रीक, पर्शियन आणि भारतीय नाण्यांचे सचित्र वर्णन प्रसिद्ध केले.

३) प्राचीन भारतीय शहरे मथुरा, तक्षशीला आणि इतर शहरांच्या उत्खननामध्ये नाणी मिळाली आणि शिवाय अशी प्राचीन नाणी मिळवण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले गेले व त्यातून जवळजवळ वीस हजार प्राचीन नाण्यांचा शोध लागला. यातच अपोलोडोटस व मिनॅंडर या ग्रीक राजांची नाणीही मिळाली.

४) विल्हेम वॉन श्लेगेल या अभ्यासकाने या नाण्यांचा पद्धतशीर अभ्यास सुरु केला.

५) जनरल व्हेंचुरा यांनी पंजाबमध्ये बॅक्ट्रियन आणि सिथियन नाण्यांचा शोध लावला.

६) चार्ल्स मॅसन यांनी अफगानिस्थानात अनेक महत्त्वपूर्ण नाण्यांचा शोध घेतला व त्यावर इ.स. १८३४, ३५ व ३६ मध्ये तीन स्मरणिका प्रकाशित केल्या. याचा नाणकशास्त्राचा अभ्यासास फारच उपयोग झाला. याचा नाण्यांचा अभ्यास करून पुढे जेम्स प्रिन्सेप यांनी प्राचीन ब्राम्ही लिपीचे यशस्वी वाचन केले.

७) लेफ्टनंट बर्गेस, जनरल व्हेंचुरा, डॉ. मार्टिन हाएनबर्गर आणि विशेषतः श्री मॅसन व त्यांचे इतर सहकारी यांनीही या काळात अनेक नाणी शोधून काढली या नवनवीन प्रकाशात येत असणाऱ्या नाण्यामुळे या अभ्यासाची कक्षा रुंदावली गेली.

८) आतापर्यंत सापडलेल्या सर्व नाण्यांच्या याद्या बनविण्याचे कार्य एशियाटिक सोसायटीने केले. श्री जेम्स प्रिन्सेप यांचा त्यात मोलाचा वाटा होता.

९) नाण्यांवरून मिळालेल्या माहितीचे संकलन करून त्याचा उपयोग प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी प्रथमच केला गेला. अशा तऱ्हेने पहिला इतिहासकार म्हणजे लासेन होय.

अशा तऱ्हेन नाणकशास्त्राने प्रगतीच्या पहिल्या टप्प्यात बरीच वाटचाल केली.

**द्वितिय टप्पा (१८५० ते १९००) :**

भारतीय नाणकशास्त्रा विषयसंशोधनाच्या प्रगतीच्या दृष्टीने हा कालखंड अतिशय महत्त्वाचा ठरला. आतापर्यंत प्राचीनकाळी भारत होऊन गेलेल्या विविध राजघराण्यांची हजारो नाणी संशोधकांनी संग्रहीत केली होती. या द्वितिय टप्प्यात या नाण्यांचे वर्गीकरण आणि तालिकीकरण करण्यावर आणि नाण्यावरील लेखांचे वाचन, विश्लेषण व संशोधन करण्याच्या कामास प्राधान्य देण्यात आले.

या काळात नाण्यांच्या पद्धतशीर संशोधनासाठी सुरुवात झाली. त्यामुळे ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रात नाणकशास्त्रास महत्त्वाचे स्थान मिळाले. नाणकशास्त्राचा शास्त्रशुध्द अभ्यास करून या शास्त्राच्या विकासात मोलाची भर घालणारे अनेक नाणकशास्त्रविषयक अनेक ग्रंथांचे संपादन आणि प्रकाशन केले. त्यात खालील ग्रंथांचा समावेश होतो.

१) द कॉइन्स ऑफ आलेक्झांडर्स सक्सेसर्स इन इस्ट(१८९३)

२) द कॉइन्स ऑफ इंडो सिथियन्स (१८९२)

३) कॉइन्स ऑफ एन्शंट इंडिया (१८९४)

४) कॉइन्स ऑफ मिडीव्हल इंडिया (१८९४)

५) कॉइन्स ऑफ द लेटर इंडो-सिथियन्स (१८९५)

या ग्रंथांमुळे भावी काळातील नाणकशास्त्रज्ञांना या विषयातील संशोधनाची निश्चित दिशा मिळाली व त्यामुळे या शास्त्रात अधिक प्रगती झाली या काळातील इतर नाणकशास्त्रज्ञ म्हणजे श्री भगवानलाल इंद्रजी, श्री वि. जे. रॅप्सन आणि श्री इलियट होत.श्री इलियट यांनी इ.स. १८८६ मध्ये 'दक्षिण भारतातील नाण्यांची' एक तालिका (कॅटलॉग) प्रकाशित केली. तर रॅप्सन यांनी भारतात होऊन गेलेल्या सर्व राजवटींच्या नाण्यंचा एक प्रचंड कॅटलॉग तयार भारतीय नाण्यांविषयीच्या सर्व बाजू आणि समस्यांच्या त्यात उहापोह करण्यात आला होता. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासात नाणकशास्त्राचा आणखी दमदार वापर होऊ लागला.

## तृतीय टप्पा (१९०० ते १९४०)

या काळात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाची लॉर्ड कर्झन याने संपूर्ण पुनर्रचना केली व श्री जॉन मार्शल यांची त्यांच्या सरसंचालकपदार नेमणूक केली अर्थातच पुरातत्त्वाचाच एक भाग म्हणून नाणकशास्त्राचा अभ्यास होत असल्यामुळे त्यास एक वेगळेच वळण मिळाले.

श्री. जॉन यांनी पुरातत्त्वशास्त्रांतर्गत सर्व विषयांच्या संशोधनास चालना दिली. त्यामुळे नाणकशास्त्राच्या अभ्यासा - संशोधनासाठी स्वतंत्र संशोधक नेमण्यात आले. मार्शल यांनी पुरातत्त्वीय उत्खननास देखील तितकेच महत्त्व दिले. अशा उत्खननांमध्येही विशिष्ट स्तरांमध्ये नाणी मिळू लागली. त्यामुळे नाणकशास्त्राच्या संशोधनाचा मोठा व्याप वाढला.

या काळात नाणकशास्त्रीय संशोधनात हातभार लावणारे महत्त्वाचे नाणकशास्त्रज्ञ म्हणजे व्हिन्सेंट स्मिथ, जॉन ॲलन आणि व्हाइटहेड इ. होत. शिवाय या क्षेत्रातील महत्त्वाच्या घडामोडी म्हणजे -

१) एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकांमधून (जर्नल्समधून) इ.स. १९०४ पासून खास नाणकशास्त्राची पुरवणी काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे अनेक शोधनिबंध त्यातून प्रसिद्ध झाले व त्यातून इतिहास लेखनासाठी अतिशय उपयुक्त अशी माहिती मिळाली.

२) इ.स. १९१० मध्ये भारतीय नाणकशास्त्र परिषदेची स्थापना झाली. त्याद्वारे नाणेसंग्राहक व विद्यार्थ्यांना नाणकशास्त्रीय अभ्यासास अधिक वाव मिळाला.

३) १९२१ पासून 'नाणकशास्त्र' हा विषय भारतातील काही विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट केला. उदा. बनारस, मुंबई इ. विद्यापीठे.

४) या काळात आहत नाण्यांवरील चिन्हांच्या अभ्यासास महत्त्व दिले गेले.

५) बॅक्ट्रियन ग्रीकांच्या नाण्यांचाही पद्धतशीर अभ्यास सुरु झाला.

६) इंडोग्रीक राजे, नाणी, गुप्त सम्राटांची नाणी, हूण राजांची नाणी यांचाही अभ्यास सुरु झाला व त्याच्या नाण्यांवर स्वतंत्र संशोधन ग्रंथ लिहिले गेले.

७) गुर्जर प्रतिहार, गुजरात चालुक्य यांच्या नाण्यांचाही शास्त्रयुध्द अभ्यास सुरु झाला.

**चतुर्थ टप्पा - (१९४०-५०) :**

या चतुर्थ टप्प्यातील कालखंडदेखील नाणकशास्त्राच्या प्रगतीस गती देणारा ठरला. भारतीय नाणकशास्त्र परिषदेने वार्षिक अधिवेशने घेण्यास सुरुवात करून त्यात विद्वान व संशोधकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यांनी सदर केलेल्या शोधनिबंधांच्या प्रकाशनासाठी नाणकशास्त्रीय नियतकालिक (जर्नल) सुरु केले.

याच काळात नाणक शास्त्रावरील काही ग्रंथही प्रसिध्द झाले ते पुढीलप्रमाणे

१) 'द टेक्निक ऑफ कास्टिंग कॉइन्स इन एन्शंट इंडिया' - (बिरबल सहानी)

२) 'ए होर्ड ऑफ सिल्व्हर पंच मार्क्ड कॉइन्स फ्रॉम पूर्णिया' (बिरबल सहानी)

३) 'न्युमिस्मॅटिक पॅरलल्स इन कालिदास' (शिवराममूर्ती)

४) 'कॉइन्स ऑफ मारवाड' (पं.बी.एन.रेऊ)

५) 'भारतीय सिक्के' (श्री उपाध्याय) इ.

या व्यतिरिक्त सी.आर.सिंघल प्रो ए.एस.आळतेकर, श्री वॉल्श, श्री चक्रवर्ती, श्री. परमेश्वरीलाल गुप्ता, श्री बाजपेयी आणि डिक्सळकर इ. संशोधकांनी नाणकशास्त्राच्या प्रगतीस आपल्या संशोधनाद्वारे मोठाच हातभार लावला. परमेश्वरीलाल गुप्तांनी आहत नाण्यांवर सखोल संशोधन केले तर श्री डी.डी. कोसंबी यांनी नाण्यांचे वर्गीकरण करून प्राचीन भारतीय नाण्यांवर आपला ग्रंथ प्रकाशित केला. या कालखंडात मौर्योत्तर कालखंडातील नाण्यांच्या अभ्यासाला प्राधान्य आले.



munotes.in

**पाचवा टप्पा (१९५० नंतरचा काळ):**

१९४७ साली भारतास स्वातंत्र्य मिळाले. पुरातत्त्व विभागाची संपूर्ण जबाबदारी आता स्वतंत्र भारत सरकारकडे आली. याचा काळात देशाच्या विविध भागात नवनवीन विद्यापीठे स्थापन झाली. त्यापैकी काही विद्यापींठानमधून पुरातत्त्वशास्त्र, पुराभलेखशास्त्र , नाणकशास्त्र यांसारखे विषय सुरु झाले.

या काळात अनेक प्राची स्थलांचे सर्वेक्षण होऊन त्यांच्या उत्खननाचा कार्यक्रम हाती घेतला. त्यातून अनेक प्राचीन राजवंशांची नाणी उपलब्ध झाली. या कालावधीत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाबरोबर भारतीय घटक राज्य सरकारांनीही आपापल्या राज्यात पुरातत्त्वविभाग सुरु केले. पुरातत्त्वीय संशोधकांचा जसजसा विस्तार होऊ लागला तसतसा नाणकशास्त्रीय संशोधनाचाही विस्तार झाला. शिवाय काही संशोधकांनी होऊ लागले. हे संशोधक म्हणजे श्री. ए. अेस. आळतेकर, श्री. सोहोनी, डॉ. के.पी. जायस्वाल, श्री.व्ही. व्ही मिराशी, श्री ए.व्ही नरसिंहमूर्ती, श्री. पी.एल गुप्ता, श्री के. ए. शर्मा इ. होत.

श्री. पी.एल. गुप्ता आणि श्री. के. के माहेश्वरी यांनी नाणकशास्त्रविषयक शिक्षण आणि प्रशिक्षणास वाहून घेणारी एक संस्थाच नाशिक जवळ अंजनेरी या गावी स्थापन केली आहे. 'इंडियन इन्स्टियूट ऑफ रिसर्च इन न्युमिस्मॅटिक स्टडीज' असे या संस्थेचे नाव आहे.

## ब) प्राचीन भारतीय नाणी : सातवाहन, पश्चिमी क्षत्रप, कुषाण व गुप्त राजांची नाणी

## ४.३ प्राचीन भारतीय नाणी : आहत नाणी

सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी भारतात सर्वप्रथम नाणी पाडण्यास सुरुवात झाली. एखाद्या वस्तूचे मूल्य नाण्यांद्वारे मोजले जाऊ लागले. जसजशी चलन पद्धती अस्तित्वात आली. तसतशी आर्थिक प्रगतीही होऊ लागली. इ.स. ६ व्या शतकाच्या सुरुवातीस नाणी टांकसाळीतून निर्माण केली जाऊ लागली. ग्रीक इतिहासकार हेरोडोटस आणि 'अष्टाध्यायी' या ग्रंथांचा कर्ता पाणिनी यांच्या लेखनातही नाण्यांचा चलन म्हणून वापर होत असल्यासंबंधीचे उल्लेख येतात. या कालखंडातील वाड्मयात नाणेसदृश्य संज्ञाचा उल्लेख येतात. ही नाणी म्हणजे 'शतमान' , 'पाद' , निष्क, विंशातिक, त्रिशतिका, सन आणि कार्षापण इ.

इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात म्हणजे मौर्य कालखंडात नाण्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात तर नाण्यांची निर्मिती अथवा उत्पादन कसे केले जाते याविषयी वर्णन केलेले असून ते पुढील प्रमाणे -

"सर्वप्रथम धातू एका मुशेमध्ये वितळवून क्षारांमध्ये शुद्ध केला जाई. त्यानंतर हा गरम प्रवाह धातू अधिकरणीवर पसरवून व मुष्टीकेच्या सहाय्याने ठोकून त्यांचे पत्र्यामध्ये रुपांतर केले जाई. त्यानंतर एका विशिष्ट हत्याराद्वारे त्याचे छोटे-छोटे तुकडे केले जात आणि या तुकडयांवर ठशांच्या सहाय्याने विविध चिन्हे (खुणा) उमटली जात असत."

मौर्योत्तर काळात भारतात विविध राजवंशांच्या राजांनी आपली राज्ये स्थापन केली. मगधात शुंग व कण्व ही धारणी, उत्तर-वायव्येत कुषाणांचे साम्राज्य, तर गुजराथ-माळवा भागात शक-क्षत्रपांचे राज्य व महाराष्ट्रात सातवाहन घराण्याचे राज्य अस्तित्वात आले. सातवाहन काळात म्हणजे इसवी सनाच्या प्रारंभीच्या सुमारास भारताचा रोमन साम्राज्याशी होणारा व्यापार हा अत्यंत भरभराटीला आलेला असून भारतातची निर्यात अधिक, आयात कमी व निर्यात केलेल्या मालाचा मोबदला रोमन सुवर्णनाण्यांच्या माध्यमातून मिळविला जाई. महाराष्ट्रातील सातवाहन घराण्याचा या रोमशी असलेला सागरी व्यापार अत्यंत फायदेशीर ठरला. साहजिकच त्यांनी राज्यशासननियंत्रित व सुधारित स्वरुपाची चलनपद्धती सुरु केली असे काही इतिहासकारांचे मत आहे.

सातवाहनांचे समकालीन शक क्षत्रप आणि कुषाण या रहवंशांनीही विविध स्वरुपाची नाणी पडली. पुढे गुप्त सम्राटांनी तर विविध प्रकारची विविध धातूंची उत्कृष्ट अशी नाणी पडली. नाणकशास्त्राचे इतिहासलेखनातील योगदान मोठे आहे. हे आपण यापूर्वीचा पहिले आहे. प्रस्तुत भागांत आपण प्राचीन भारतातील नाणी यावर सखोल चर्चा करणार आहोत.

यापूर्वी सांगितल्याप्रमाणे धातूंच्या चलनाचे वैदिक वाङ्मय आणि पाणिनीच्या अष्टाध्यायीत आले असले तरी त्यांचे प्रत्यक्ष नमुने आपल्या अभ्यासासाठी मात्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्याविषयी सखोल चर्चा करणे अशक्य आहे. आजपर्यंतच्या उपलब्ध धातूच्या चलनात 'आहतमुद्रा' अथवा 'पंच  मार्क्ड कॉइन्स' हेच प्राचीन भारतातील सर्वात जुने धातूचे चलन होय असे मानले जाते.

**आहत मुद्रा / नाणी :**

ही भारतातील उपलब्ध असलेली सर्वात प्राचीन नाणी असून ती सर्व चांदीची आहेत. त्यांच्यावर एका चिन्हापासून पाच चिन्हांपर्यंत ठसे उमटलेले आहेत,. या खुणा/ ठसे ह्या धातूच्या तुकड्यांवर ठोकून काढलेल्या आढळतात. म्हणून त्यांना आहत मुद्रा असे म्हटले जाते. या मुद्रा छोटी राज्ये, श्रेष्ठी, व्यापारी अथवा नगर निगम (व्यापारी संघटना) यांचेद्वारे पडली जात असत. या नाण्यांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ही नाणी अनियमित आकाराची व घडणीची असत. काही वर्तुळाकार, अंडाकृती लंबगोलाकार, दंडगोलाकार व चौकोनी असा निरनिराळ्या भौमितिक आकृतीच्या स्वरुपात ही नाणी अस्तित्वात होती.

२) या नाण्यांवर विविध चिन्हे आढळून आली आहेत. ती म्हणजे झाड, पशु-पक्षी मानवी आकृती, फुले-पाने यांच्या आकृती, चक्र, सूर्यासारखे दिसणारे सांस्कृतिक चिन्ह, चंद्रकोर, भौमितिक रचना, क्वचित मानवी आकृती, तीन अथवा अधिक टेकड्यांनी बनलेला पर्वत, त्यावर चंद्रकोर अथवा झाडाचे चिन्ह, तर क्वचित धनुष्य बाण यांसारखी शस्त्रे इ. होत.

३) या आहत नाण्यांवर कोरीव लेख मात्र अजिबात आढळून येत नाहीत.

४) रामायण आणि महाभारत कालखंडानंतर सुमारे इ.स.पूर्व ६ व्या शतकात भारतात होऊन गेलेल्या जनपदांनी मुद्रा पडण्यास सुरुवात केली. (जी आज उपलब्ध आहेत.)

५) आकार, घडण आणि चिन्हांच्या आधारे विविध भागांतील आहतमुद्रा ओळखल्या जाऊ शकतात.

६) व्यवहारातील या नाण्यांचा वापर हा त्या-त्या जनपदापुरताच मर्यादित होता. आहत मुद्रा या इ.स. पूर्व ६ व्या शतकापासून ते इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत चलनात होत्या.

७) विविध गणराज्यांनी/ जनपदांनी आपापल्या मुद्रा पडल्या होत्या ती राज्ये म्हणजे १)शूरसेन २) उत्तर पांचाल ३) दक्षिण पांचाल ४) वत्स ५) कोसल ६) काशी ७) मल्ल ८) मगध ९) वंग १०) कलिंग ११) गांधार १२) अवंती १३) सौराष्ट्र १४) कुंतल १५) आंध्र १६) अश्मक १७) मूलक

- यापैकी केवळ चार म्हणजे कुंतल, अश्मक, मूलक आणि आंध्र, ही जनपदे दक्षिणेत होती बाकी सर्व जनपदे उत्तर भारतातच होती. उत्तर पांचाल आणि दक्षिण पांचाल या जनपदांच्या नाण्यांमध्ये बरेच साम्य आढळले व त्यांचे वजन १५ गुंजाएवढे होते. त्याच्यावरील चिन्हांमध्ये मात्र पूरक आहेत म्हणून ती उत्तरेकडील दक्षिणेकडील याप्रमाणे ओळखता येतात.

- गांधार प्रदेशातील नाणी वैशिष्टयपूर्ण असून आकृतीने लंबगोलाकार असे चपटे धातूचे वक्रपट्टे आहेत. त्यावर फुलांचे ठसे आढळतात. (वजन १५० ते १८० गुंजाएवढे .)

- वंग प्रांतातील नाणी आयताकार व पातळ असून त्यावर चक्र एक शिडाचे जहाज अशी चिन्हे आहेत.

- वत्स प्रांतातील नाणी ही पातळ असून त्यावर भौमितिक आकृती व वेगवेगळे प्राणी यांचे ठसे आहेत (वजन ४२ गुंजाएवढे) .

- कोशल राज्याची नाणी गोलाकार व आकाराने मोठी असून त्यावर झाड, बैल हत्ती किंवा भौमितिक आकृती आहेत (वजन ४ गुंजाएवढे ).

- काशी व मल्ल राज्यांच्या नाण्यांमध्ये साम्य आहे. कशी जनपदाच्या नाण्यांवर कमळ, वाकडया फांद्यांच्या आकृती असून मल्लच्या नाण्यांवरील आकृती म्हणजे सध्या भौमितिक आकृती होत ( वजन ७५ गुंजांएवढे).

- मगध राज्याच्या आहत नाण्यांवर विविध चिन्हे दिसून येतात. मुळात हे नाणी दोन कालखंडातील असून काही मगध जनपदाच्या काळातील आहेत. वजन १६ ते ४९ (गुंजांएवढे) तर काही नंतरच्या म्हणजे मगधाचे रूपांत साम्राज्यात झाले, तेव्हाची आहेत. या साम्राज्यकाळातील नाण्यांचा आकारही मोठा आहे. (वजन ९२ ते १२५ गुंजांएवढे )

- अश्मक व कुंतल जनपदांच्या मुद्रा चापट्या व आकाराने मोठ्या होत्या (वजन ५० ते १०५ गुंजांएवढे)

**आहत मुद्रांचा अन्वयार्थ :**

आहत मुद्रांवरील जी विविध चिन्हे आढळून आली आहेत, त्यांचे अर्थ काय असावा आणि त्यांचे प्रयोजन काय असावे, याबाबत इतिहासकारांमध्ये विविध प्रकारची मते आहेत. काही विद्वानांच्या मते, ही चिन्हे धार्मिक स्वरुपाची आहेत, तर काहींच्या मते ही वनस्पती व प्राणी जगताशी संबंधित आहेत. काही जणांच्या मतानुसार हे चिन्हे व्यापारी संघटनाची असावीत.

अशी ही आहत नाणी अथवा मुद्रा इ.स पूर्व ६ व्या शतकांपासून पुढे सुमारे चारशे ते पाचशे वर्ष चलनात असावीत. हळूहळू तिचा वापर कमी होऊ लागला. मात्र काही भागांत तो इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत होऊ लागला. इ.स. पूर्व ४ थ्या शतकात आलेक्झांडरच्या भारतावरील स्वारीमुळे ग्रीक आणि भारतीय यांमध्ये जी सांस्कृतिक देवाण घेवाण झाली, त्यात भारतीयांनी ग्रीकांच्या सुबक चलनपद्धतींचा स्वीकार केला. नाण्यांच्या घडणावळीतील सुबकता, त्यावर लेख लिहिण्याची प्रथा, त्यावर कालोल्लेख लिहिण्याची प्रथा, मिश्रधातूंचे चलन इ. बाबींचे भारतीयांनी अनुकरण केले. तसेच टांकसाळी आणि चलनपद्धतीवर खाजगी नियंत्रणाऐवजी शासकीय नियंत्रण ठेवण्याची प्रथा भारत सुरु झाली. परिणामी इ.स. पूर्व २ च्या शतकापासून भारतात विविध राज्यांची अथवा राजवंशांची नाणी अस्तित्वात आली.

**कुषाण राजांची नाणी :**

भारताच्या वायव्यकडे म्हणजेच उत्तर भारत आणि आजचा पाकिस्तान, अफगाणिस्थान या संलग्न प्रदेशाचा समावेश असलेल्या प्रदेशात कुषाण राजवटीचा प्रारंभ इ. सनाच्या पहिल्या शतकात सुरु झाला. कुषाणांपूर्वी या प्रदेशात भारतातील इंडो-ग्रीक राज्यकर्त्यांच्या राजवटीत होत्या. त्यांचेच उत्तराधिकारी हे कुषाण राजे होते. साहजिकच कुषाणांच्या नाण्यांवर इंडो-ग्रीक प्रभाव दिसून येतो. ग्रीक पद्धतीच्या नाण्यांचे कुषाणांनी अनुकरण केलेले दिसते.

कुजूल कॅडफिसेस हा कुषाण घराण्यातील पहिला राजा होय. या राजवंशातील इतर राजे म्हणजे विम कॅडफिसेस, कनिष्क, हुविष्क, वासुदेव, कनिष्क द्वितीय , वसिष्क इ. होत. या सर्व राजांची नाणी उपलब्ध आहेत.

**कुजूल कॅडफिसेसची नाणी -**

याची नाणी ही तांब्याची असून या नाण्यांवर एका बाजूला बैल तर दुसऱ्या बाजूस मध्य आशिया प्रांतात आढळून येणारा दोन मदारी असलेल्या बॅक्ट्रियन उंटाचे चित्र आहे. काही नाण्यांवर हेरनॅकस व हेराक्लस या ग्रीक योध्यांची चित्रे कोरलेली आहेत. याशिवाय नाण्यांवर राजाची प्रतिमा कोरावयाची पद्धत तर ग्रीक छापाचीच आहे. राजाची वेशभूषा चेहऱ्यावरील हावभाव इ. बाबींवरील ग्रीक छाप स्पष्ट दिसते. राजा हा मंचावर (आसनावर बसलेला) दाखविलेला असून या नाण्यांवरील आलेख ग्रीक व खरोष्ठी या दोन्ही लिपींमध्ये आहे.

**विम कॅडफिसेसची नाणी :**

कुजूलनंतर त्याचा पुत्र विम कॅडफिसेस हा गादीवर आला. त्यानेही अनेक प्रकारची नाणी पडली आहेत. आपल्या पित्यापेक्षा नाण्यांच्या पद्धतीत त्याने बऱ्याच सुधारणा केल्या त्यांची नाणी अधिक सुबक असून त्यात वैविध्य आहे. काही प्रकारच्या नाण्यांमध्ये तर पित्याच्या नाण्यांपेक्षा अमुलाग्र बदल दिसून येतात. पित्याप्रमाणे त्यांने तांब्याची नाणी तर पाडलीच, परंतु फार मोठया प्रमाणावर सुवर्णनाणीही पडली. ही नाणी या काळातील रोमन सुवर्णनाण्यांच्या प्रभावामुळे पडली होती. रोमन दिनार या नाण्यांचे विमने अनुकरण केले होते.

विमने तीन प्रकारची नाणी पडली होती ती म्हणजे पाव दिनार (१/४ दिनार) एक दिनार (१ दिनार) आणि दोन दिनार (२ दिनार) या मूल्यांची होती यापैकी पाव दिनार हे नाणे कमी वापरात असावे. या नाण्यावर विमची स्वतःची प्रतिमा उमटवलेली असे. त्या प्रतिमांच्या चेहऱ्यावरील भाव, उभे रहाण्याचा वा बसण्याचा ढंग यांच्यात बरेच वैविध्य आहे. कधी तो मंचावर / आसनावर बसलेला तर कधी खिडकीत बसलेला दिसतो. काही नाण्यांवर तो हत्तीवर आरूढ झाल्याचे दर्शिविले असून काही नाण्यावर तो यज्ञविधी करीत असल्याचे दर्शविले आहे. नाण्यांच्या विरुद्ध बाजूस भव्य असे त्रिशूळधारी शिवाचे चित्र असून बाजूस नंदी आहे. तसेच तेथे 'महिश्वर सर्वलोक ईश्वर' असा आलेख ग्रीक आणि खरोष्ठी भाषांमधून आढळून येतो. त्यावरून विम हा शिवपूजक असावा हे दिसून येते. त्याचाही नाण्यांवर ग्रीक आणि खरोष्ठी लिपीतील लेख आढळून येतात.

**कनिष्काची नाणी :**

प्रथम कनिष्क हा कुषाण राजघराण्यातील सर्वश्रेष्ठ राजा होता. तो एक महान कुषाण सम्राट म्हणून ओळखला जातो. त्याचा काळ अत्यंत भरभराटीचा होता. त्याने आपल्या राज्याभिषेकाच्या वेळी आपला स्वतंत्र संवत सुरु केला. तोच पुढे शक संवत् म्हणून ओळखला जाऊ लागला व आज जो भारतभर शालिवाहन संवत् म्हणून ओळखला जातो तो हाच असे बहुतेक इतिहासकारांचे मत आहे.

कनिष्कानेही तांबे आणि सुवर्ण या धातूंची नाणी पडली. अर्थातच नाण्यांच्या दर्शनी भागावर त्यांची प्रतिमा चितारली असल्याचे दिसते. तो बहुधा हातात भाला घेवून उभा असलेल्या अवस्थेत दिसतो. या नाण्यांच्या मागील बाजूस विविध देवतांच्या प्रतिमा आहेत. या देवता विविध देशांतील आणि धर्मांतील आहेत. उदा. मिहिर (मित्र), माओ (चंद्र) ओडो (वायू), ओशो (अग्नी) इ. इराणी देवता, मझदा ही पारशी देवता, शिव ही हिंदू देवता आणि बौद्धाचा बुद्ध इ. प्रतिमा त्याच्या विविध नाण्यांवर आढळतात. त्याच्या नाण्यांवरील बुद्धप्रतिमा ही जगातील सर्वात जुनी बुद्ध प्रतिमा समजली जाते व त्यावरील आलेख म्हणजे 'शाक्यमणी बुद्ध' असा आहे. काही नाण्यांवर 'शाओ नानो शाओ कनेष्की कुषानो' असा लेख आहे.

**हुविष्काची नाणी :**

हुविष्क हा कनिष्काचा वारस होता. त्यानेही तांबे व सुवर्ण या दोन्ही धातूंची नाणी पाडली. कनिष्काच्या नाण्यांप्रमाणेच. त्यांच्याही नाण्यांवरील राजाच्या प्रतिमेत वैविध्य आढळते.

त्याचाही नाण्यांवर 'शाओनानो शाओ कुषाण' असा लेख आहे. नाण्याच्या मागील बाजूस देवता हेराक्लस, भारतीय देवता ओरोन (वरूण), शिव आणि पत्नी उमा व पुत्र कार्तिकेय, स्कंदकुमार व विशाल या देवता चित्रीत केलेल्या आहेत.

**अखेरच्या कुशाणांची नाणी :**

या नंतरच्या वशिष्क द्वितिय, कनिष्क, वासुदेव इ. हुविष्काच्या उत्तराधिकाऱ्यांनी आपापल्या कारकीर्दीत नाणी पडली व तीही थोड्याफार फरकाने आधीच्या कुशाण राजांच्या नाण्याप्रमाणेच होती. त्यापैकी वाशिष्काच्या काही नाण्यांवर शिवाच्या ऐवजी ओद्रोक्षो ही ग्रीक देवता चितारलेली दिसते. नुकतेच मासरा हे नाव असलेले कुषाणांचे एक नाणे सापडले आहे. त्यावरून तो अखेरचा कुषाण राजा असावा व त्याच्यानंतर कुषाणांची सत्ता संपुष्टात आली असावी. कुषाणांची नाणी ही इराण, अफगाणिस्थान, भारताचा उत्तर पश्चिम भाग, मध्य भारत इ. ठिकाणी आढळून आली आहेत.

**कुषाणोत्तर कालखंडातील गणराज्यांची नाणी :**

कुषाण साम्राज्य विलयास गेल्यानंतर उत्तर भारतात नाग,यौधेय, कुणिंद, मालव इ. स्वातंत्र गणराज्ये अस्तित्वात आली. त्यांनीही कुषाणांच्या नाण्यांचे अनुकरण करून आपापली स्वतंत्र नाणी पाडली. नाण्यांवर लेख मात्र ग्रीक वा खरोष्ठी लिपीत न लिहिता ब्राम्ही लिपीतून लिहिले.

यौधेय राजांनी आपल्या नाण्यांवर राजाच्या प्रतिमेऐवजी कार्तिकेयाची प्रतिमा काढली, तर कुणिंदांनी त्याऐवजी शिवप्रतिमेस स्थान दिले. नाग राजांनी शिवाचे प्रतीक म्हणनू त्रिशूळ व कार्तिकेयाचे वाहन मयूर याचे चित्र नाण्यावर काढले. त्यांच्या नाण्यांवर राजा अथवा देवता त्यांच्या प्रतिमा नाहीत. याचा काळात दक्षिणेत विदर्भात वाकाटक घराण्याचे राज्य अस्तित्वात आले. मात्र त्यांनी स्वतः चे चलन न काढता आपल्या राज्यात आधीच्या शक-क्षत्रप या राजवंशाचे व नंतरच्या काळात गुप्तांची चलनी नाणी चालू ठेवली.

**सातवाहन राजवंशाची नाणी :**

मौर्य साम्राज्याच्या विलयानंतर दक्षिणेत सातवाहन या राजघराण्याचा उदय झाला. इ.स.च्या प्रारंभी भारताच्या रोमन साम्राज्याची असलेला व्यापार हा प्रामुख्याने सागरी मार्ग चालत असेल. त्याच वेळी सातवाहन घराण्याची सत्ता दृढ झाली होती. या वेळी दक्षिणेतील बहुतेक बंदरे आणि व्यापारी केंद्रे सातवाहन साम्राज्यात होती. त्यांनी शासननियंत्रित चलनपद्धत सुरु करण्यात आघाडी घेतली.

पुराणांमध्ये या घराण्यात एकूण तीस राजे होऊन एकूण तीस राजे होऊन गेले व त्यांनी ४०० वर्षाहून अधिक काळ राज्य केले. अर्थात याबाबतीत इतिहासकारांमध्ये मत-मतांद्वारे आहेत. सिमुक (श्रीमुख) हा या राजवंशाचा संस्थापक. त्याच्या नावाची काही नाणी उपलब्ध आहेत. यावरून सुरुवातीपासून या राजवंशाचे शासन नियंत्रित चलनपद्धतीची सुरुवात केली असावी असे दिसते.

प्रथम सातकर्णी हा या राजवंशातील दुसरा महत्त्वाचा राजा. त्याची प्रतिमा असलेली नाणी तर उपलब्ध आहेतच. परंतु सातकर्णी व त्याची राणी नागनिका यांतच्या  संयुक्त प्रतिमांसह असलेली चांदीचे एक नाणेही उपलब्ध आहे. सातवाहन घराण्यात सुमारे तीस राजे होऊन गेले असले तरी सर्वांचेच नाणकशास्त्रीय पुरावे आज उपलब्ध नाहीत. पुराणांतील वंशावळीत दिलेल्या अखेरच्या नऊ राजांची नाणी मात्र आपल्या अभ्यासासाठी उपलब्ध आहेत.


**सातवाहन राजवंशाच्या नाण्यांची वैशिष्टये -**

१) सातवाहन नाण्यांचा आकार व त्यांची बनावट यातील वेगळेपणा हे एक वैशिष्टये आहे.

२) सातवाहनांची तांबे, शिसे, चांदी, पोटीन सारख्या मिश्रधातूंची नाणी आहेत.

३) सातवाहन नाण्यांवर ग्रीक नाणककलेचा खोलवर प्रभाव पडला होता. अर्थातच हा भारताचा ग्रीक-रोमन संस्कृतीशी असलेल्या व्यापारी संबंधाच्या परिणाम होय. या नाण्यांप्रमाणे सातवाहन राजेही नाण्यांवर आपली प्रतिमा आणि नावाचा आलेख कोरु लागले या नाण्यांच्या बनावटीत कलात्मकता आढळते.

४) सातवाहन राजांची नाणी दख्खनचा प्रदेश, दक्षिण भारत, मध्य भारतात सापडलेली आहेत. तसेच उत्तर गुजराथ, राजस्थान येथेही ती सापडलेली आहेत.

५) सातवाहनांच्या नाण्यांवर एका बाजूस राजाची प्रतिमा व विरुद्ध बाजूस राजाचे नाव, इतर चिन्हे, काही वेळा टांकसाळीचे चिन्ह इ. आढळततात, उदा.  हे चिन्ह उज्जैन टांकसाळीचे समजले जाते तर बैल, हत्ती, टेकडी, झाड, शंख, सिंह, घोडा, चक्र, जहाज इ. चिन्हे आढळतात.

६) या नाण्यांच्या आकार वर्तुळाकृती, चौकोनी, चौरस असा आहे. त्यांच्या वजनात मात्र साम्य नाही.

७) या घराण्यातील तेवीसावा राजा गौतमीपुत्र सातकर्णी हा या वंशातील सर्वश्रेष्ठ राजा होय. त्याने शक राजा नहपान याचा पराभव करून आपला पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश जो शकांच्या ताब्यात होता तो परत जिंकून घेतला. त्यावेळी शकांच्या नहपान राजाने पाडलेल्या काही नाण्यांवर त्याने आपल्या नावाचा ठसा मारून त्यांचा वापर सुरु केला. अलिकडेच नाशिकजवळील जोगळठेंबी या गावी सुमारे १३००० नाण्यांचा जो संग्रह सापडला त्याच बरीच नाणी मूळ शकांची व त्यावरील ठसा सातवाहनांचा या प्रकारातील आहेत. गौतामीपुत्रानंतरचा वशिष्टीपुत्र पुलुमावी, स्कंद सातकर्णी, यज्ञश्री सातकर्णी, विजय सातकर्णी, शक सातकर्णी, रुद्र सातकर्णी, कुंभ सातकर्णी, आणि कर्ण सातकर्णी या राजांची नाणी उपलब्ध झाली आहेत. यापैकी शक, रुद्र, कुंभ आणि कर्ण या सातकर्णी राजांचे नाणकशास्त्रीय पुरावे उपलब्ध आहेत. परंतु पुराणांमधील यादीमध्ये या राजांची नावेच नाहीत.

munotes.in

सातवाहनांची नाणी हे अतिशय वास्तवदर्शी आहेत. उदा. राजांच्या विविध वयातील आकृती चितारणे. काही नाण्यांवर त्याचा चेहरा हा मध्यमवयीन आणि काही नाण्यांवर प्रौढत्व असलेले दिसते. तसेच त्याच्या केशभूषेवर रोमन शैलीचा प्रभाव आढळतो.

अशा तऱ्हेने सातवाहन राजांची नाणी ही वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांचा इतिहास लिहिण्यास नाण्याची मोलाची मदत होते.

**शक क्षत्रपांची नाणी :**

पश्चिम क्षत्रप अथवा शक क्षत्रप हे सातवाहनांचे समकालीन होते. महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश या राज्यांमधील संलग्न प्रदेशात त्यांचे राज्य होते या शकांची दोन घराणी होती. ती म्हणजे १) क्षहरात घराणे २) कर्दमक घराणे

**क्षहरात घराणे -**

या शहरात क्षत्रप घराण्याने इ.स.च्या पहिल्या शतकात सातवाहन राज्याच्या पश्चिमेच्या प्रदेशात आपली सत्ता प्रस्थापित केली. या घराण्यातील भूमक हा संस्थापक राजा आणि नहपान या दोन राजांविषयी माहिती उपलब्ध आहे. भूमक यांच्या नाण्यांवर दोनही बाजू त्याचे नाव लिहिलेले आढळते. नाण्यांच्या एका बाजूस हे नाव संस्कृत भाषेत ब्राम्ही लिपीत आहे तर दुसऱ्या बाजूस प्रकृत भाषेत व खरोष्ठी लिपीत आहे.

नहपान हा या वंशातील बलाढय राजा होता. त्याने आपली चांदीची नाणी पाडली. त्याच्या नाण्यांवर तीन लिपीत लिहिलेले लेख आदळतात. नाण्यांच्या पुढील बाजूस ग्रीक रोमन लिपीतील लेख व मागील बाजूस तेच लेख ब्राम्ही व खरोष्ठी लिपीस आहेत. असे त्रैलिपिक स्वरूप हे शकांच्या नाण्यांचे एक मोठे वैशिष्टये आहे. त्यांची काही तांब्याची नाणीही सापडली आहेत.

**कर्दमक घराणे -** कर्दमक या क्षत्रप शाखेचा संस्थापक म्हणजे चष्टण होय. या शाखेने इ.स. १ ल्या शतकापासून ते ४ थ्या शतकापर्यंत राज्य केले. गुजराथ व माळवा ह्या प्रदेशात त्यांची सत्ता होती. या घराण्यातील रूद्रदमन हा एक बलाढय राजा होता. गुप्त राजा द्वितीय चंद्रगुप्त यांच्या आक्रमणामुळे अखेर इ.स.च्या ४ थ्या शतकात या कर्दमक घराण्याची अखेर झाली.

कर्दमक शंकांची चांदीची नाणी ही तर हुबेहूब ग्रीक आणि रोमन नाण्यांची नक्कल आहे असे वाटते. तसेच त्याच्यावर चंद्रकोर, तर व तीन शिखरांची टेकडी, घोडे, बैल हत्ती ही प्रमुखाय्ने दिसून येतात. या नाण्यांची इतर काही वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) नाण्यांवर ब्राम्ही अक्षरांतील लेख ठळकपणे दिसून येतात.

२) नाण्यांवर राजाच्या नावाबरोबरच 'राजन' , 'क्षत्रप' अथवा 'महाक्षत्रप' ही बिरुदे आढळतात. काहीवेळा राजाच्या नावाबरोबरच त्याच्या पूर्वजांचे नाव व बिरुदही कोरलेले आढळते.

३) शकांची ही प्रामुख्याने चांदीची असून त्यांची तांब्याची शिशाची व पोटीनची नाणी क्वचितच आढळून येतात.,

४) शकांच्या नाण्यांचा एकंदर छाप आणि वजन हे आपणास ग्रीक-रोमन चांदीच्या नाण्यांप्रमाणे असलेली आढळून येते.

५) यापैकी जीवदमन या राजाने नाण्यांवर दर्शनी बाजूस नाणी पडण्याचे संवत लिहिणेही सुरु केले. कालोल्लेख असलेली ही नाणी भारतातील सर्वात प्राचीन नाणी समजली जातात. अशा नाण्यांचा ऐतिहासिक कालनिश्चितीसाठी मोठा उपयोग होतो.

६) प्रत्येक नाण्याला विशिष्ट वजन प्रमाणित झाले व बाजारातील मूल्यांत सुसूत्रता आली हा ग्रीक रोमन नाण्यांचा प्रभाव होतो.

७) दक्षिणेतील सातवाहन आणि उत्तरेतील कुषाणांच्या नाण्यांचाही प्रभाव या नाण्यांवर दिसून येतो. अशा तऱ्हेने शक-क्षत्रपांची नाणी ही प्राचीन भारतीय इतिहासलेखनासाठी उपयुक्त ठरतात.

**गुप्त घराण्याची नाणी -**

भारतीय नाणकशास्त्राच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ठ कालखंड म्हणून गुप्तकाळ मानला जातो. उत्तर भारतात कुषाणांची सत्ता विलयास गेल्यावर यौधेय, मालव, कुणिंद, नाग इ. स्वतंत्र गणराज्ये अस्तित्वात येऊन त्यांनीही आपली स्वतंत्र नाणी पाडली होती हे आपण यापूर्वी पहिलेच आहे. पुढे इसवी सनाच्या चौथ्या शतकाच्या सुरुवातीस गुप्त घराण्याचा उदय झाला. प्राचीन भारतीय इतिहासात हा काल सुवर्णयुगाचा म्हणून ओळखला जातो.

गुप्तांचा उदय होण्यापूर्वी व्यवहारात कुषाणांचा नाण्याचा चलन म्हणून वापर होत असल्याने गुप्तांच्या सुरुवातीच्या नाण्यांवर त्यांचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. मात्र पुढील काळात हा प्रभाव हळूहळू कमी होऊन शेवटी पूर्णपणे नाहीसा झाला. प्रथम चंद्रगुप्त हा या घराण्यातील पहिला महत्त्वाचा राजा. यानेच आपली व आपली राणी कुमारदेवी हिची प्रतिमा असलेले संयुक्त नाणे पाडले. यावरील आलेख 'लिच्छवयः' म्हणजे लिच्छवींचे असा उल्लेख केला असावा असे मानले जाते.

गुप्त राजांनी विविध धातूंची नाणी पाडली होती. या धातूंचे प्रकार म्हणजे १) सुवर्णनाणी २) चांदीची नाणी ३) तांब्याची नाणी ४) शिशाची नाणी ही होत. गुप्तांच्या नाण्यांची प्रमुख वैशिष्टये म्हणजे -

अ) सुरुवातीच्या गुप्त राजांच्या नाण्यांवर राजांच्या नाण्यांवर वरून खाली लिहिण्याच्या चीनी पद्धतीप्रमाणे राजाचे नाव लिहिण्याची पद्धत दिसून येते.

ब) या नाण्यांवर राजाच्या आकृतीभोवती वर्तुळाकार स्वरुपात ब्राम्ही लिपीतील आलेख कोरण्याची प्रथा सुरु केलेली दिसते.

क) सुरुवातीच्या गुप्त राजांच्या नाण्यांवर ग्रीक देवता ओर्दोक्षो ही चितारलेली दिसते. हळूहळू तिची जागा हातात कमळ घेतलेल्या लक्ष्मी या भारतीय देवतेने घेतली.

ड) नाण्यांवर देवतेचे नाव लिहिण्याची कुषाणांची प्रथा बंद करून नाणी पाडणाऱ्या राजाचे नाव लिहिण्याची प्रथा मात्र तशीच ठेवली.

इ) बहुसंख्य गुप्त राजांनी धनुर्धर पद्धतीची नाणी काढली आहेत. त्यात एका हातात धनुष्य घेतलेली तर काही वेळा एका हातात धनुष्य व दुसऱ्या हातात बाण घेतलेली आकृती दिसते.

फ) नाण्यांचे विपुल प्रमाण आणि त्यांच्या चलनव्यवहाराचे विस्तृत क्षेत्र हेही या नाण्यांचे एक वैशिष्ट्ये आहे.

**गुप्तांची सुवर्णनाणी :**

गुप्तकालीन सुवर्ण नाण्यांमध्ये अतिशय चांगले व मोठ्या प्रमाणात कलात्मक बदल करणायत आले. विविध प्रकारची प्रतीके वापरून नाण्यांमध्ये विविधता आणली. उदा. राजाची प्रतिमा ठराविक ढंगात दाखविण्याऐवजी विविध पद्धतींनी दाखविली जाऊ लागली. उदा. काही नाण्यांवरील प्रतिमांमध्ये राजाच्या हाती शस्त्र, तर काहींमध्ये हाती शंख असल्याचे दिसते. काहींवर तो वाघाची शिकार करत असल्याचे, तर काहींवर अश्वमेघ यज्ञ करत असल्याचे दाखविण्यात आले. समुद्रगुप्त आणि कुमारगुप्त या सम्राटांच्या नाण्यात ही विविधता आणखी विस्तृत झाली. त्यांच्या नाण्यांवरील प्रतिमांमध्ये सिंहाची शिकार करणारा राजा, आश्वारूढ झालेला, छत्राखाली बसलेला इ. स्वरूपाच्या आहेत. समुद्रगुप्ताने तर आपल्या पराक्रमाची द्वाही फिरवण्यासाठी जो अश्वमेघ यज्ञ केला होता त्याप्रसंगाचे चित्रण करणारे अश्वमेघ प्रकारचे नाणे काढले. तर द्वितीय चंद्रगुप्ताचे सिंहाची शिकार करत असणारी प्रतिमा असलेले नाणे काढले. ही दोनही नाणी सर्वच बाबतीत उत्कृष्ट समजली जातात.

कुमारगुप्त (प्रथम) हा द्वितीय चंद्रगुप्ताचा वारसा होता. त्यानेही आणखी काही वेगळ्या प्रकारची नाणी आणली ती म्हणजे मयुरासहित राजाची प्रतिमा व हत्तीवर आरूढ झालेल्या राजाची प्रतिमा याच्याच कारकिर्दीत गुप्त साम्राज्यावर हूणांच्या स्वाऱ्या झाल्या. त्यामुळे या काळापासून गुप्तांच्या नाणककलेला काहीसे ग्रहण लागले. काही वेळा त्यांच्या चांदीच्या नाण्यांमधील कस कमी झाल्याचे दिसते. पुढे स्कंदगुप्ताच्या कारकिर्दीतही नाण्यांच्या दर्जात घसरण चालूच राहिली तरी त्याने लक्ष्मीची प्रतिमा असलेली व धनुर्धारी पद्धतीची नवीन नाणी पडली. शिवाय सोन्याच्या नाण्यांतील सोने या धातूचे प्रमाणही कमी झालेले दिसते. त्याच्यानंतरच्या सर्व गुप्त राजांनी फक्त धनुर्धारी प्रतिमा असलेली नाणीच चालू ठेवली.

**गुप्तांची चांदीची नाणी :**

गुप्तांची चांदीची नाणी सर्वप्रथम सुरु करणारा राजा म्हणजे द्वितीय चंद्रगुप्त (विक्रमादित्य) त्याने माळव्यातील शक-क्षत्रपांवर स्वारी करून त्यांचा पराभव केला. शकांची बहुसंख्य नाणी ही चांदीची होती. त्यांच्या नाण्यांप्रमाणेच गुप्तांनी आपली चांदीची नाणीही पाडली. मात्र त्यावरील चिन्ह तीन शिखरांच्या टेकडी ऐवजी आपला गरुड प्रतिमा व शक संवताऐवजी गुप्त संवताचा उल्लेख हे फरक आहेत.

गुप्तांची चांदीची नाणी प्रामुख्याने गुजरात, माळवा या भागातच दिसून येतात. मात्र काही नाणी पूर्वेकडील म्हणजे मगध भागातही आढळतात.

**गुप्तांची तांब्याची नाणी :**

गुप्तांनी तांब्याची नाणीही पाडली होती. परंतु तुलनेने त्यांची संख्या कमी आहे. समुद्रगुप्त, द्वितीय चंद्रगुप्त व कुमारगुप्त यांची नावे असलेली ही तांब्याची नाणी उपलब्ध आहेत. त्यांचे सात-आठ प्रकार आहेत. नाण्यांच्या दर्शनी बाजूवर राजाची प्रतिमा, मागील बाजूस उड्डाणास सिद्ध असलेल्या गरुडाची आकृती व त्याखाली राजाचे नाव व विरुद्ध असलेला लेख आहे.

**गुप्तांची शिशांची नाणी**

गुप्तांनी  काही शिशांची नाणी देखील पडली होती. केवळ द्वितीय चंद्रगुप्त, कुमारगुप्त व स्कंदगुप्त यांची शिशाची नाणी उपलब्ध झाली असून ती चौकोनी आकाराची आहेत. ही नाणी केवळ गुजरात आणि माळवा भागातच सापडली आहेत.

गुप्त राजवटीत अखेरच्या काळात सुवर्णनाणी पाडण्याचे प्रमाण कमी झाले. शिवाय स्कंदगुप्तानंतरच्या काळात नाण्यांच्या सुबकतेची घसरण सुरु झाली. आपल्या नावाची नाणी पाडण्याची प्रथा बुधगुप्त या शेवटच्या राजानेही चालू ठेवली. बुधगुप्त या अखेरच्या राजाच्या मृत्यूनंतर गुप्त घराणे खंडित झाले व गुप्ताची नाणी पाडण्याची प्रथाही खंडीत झाली.

गुप्तांच्या नाण्यांचेही वजन १२० ते १४४ गुंजाच्या वजनाएवढे होते. नाण्यावरील आलेख हा काव्यात्मक संस्कृत भाषेत रचलेला असे. या काळात संस्कृत भाषेस जे प्रोत्साहन मिळत होते तेही त्यातून प्रतिबिंबीत होते. त्याचप्रमाणे राजा (समुद्रगुप्त) वीणावादन करीत असलेल्या अथवा शिकार करत असलेल्या ढंगातील प्रतिमांमुळे त्या काळातील कलेच्या प्रगतीची झलक दिसून येते.

**गुप्तोत्तर काळातील नाणी :**

गुप्तकाळाच्या अखेरच्या काळात नाण्यांच्या दर्जात जी घसरण सुरु झाली, ती पुढील काळातही चालूच राहिली. गुप्तांची अखेर करणाऱ्या हूण राजांनीही आपले चलन सुरु केले. मात्र तिच्यात निकृष्टता आढळून येते. शिवाय ती मर्यादित स्वरुपात चलनात होती. या काळात  एकंदर नाणककलेत अवनती दिसून येते. कारण यावेळी सातवाहन, कुषाण किंवा गुप्त यांसारख्या बलाढ्य सत्तेचा अभाव हे होय. तसेच इ. सनाच्या ६ व्या शतकानंतर भारताच्या परदेश व्यापारातही घट झालेली दिसून येते व त्याच्या भारताच्या आर्थिक भरभराटीवर परिणाम होऊन सोन्याचांदीची आवकही कमी दिसून येते.

यानंतरच्या  काळात बदामीचे चालुक्य, गुर्जर, प्रतिहार आणि राष्ट्रकूट यांसारख्या राजघराण्यांनी आपली नाणी पाडली. परंतु त्यांचा वापर चलन म्हणून करता आपल्या सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून ती काढली, होती. आपल्या राज्यात त्यांनी इतर राजांच्या नाण्यांना चलनी नाणी म्हणून वापरण्याची परवानगी दिली होती.

राष्ट्रकूट काळापासून धातूच्या चलनाचे व्यवहारातील प्रमाण कमी होत गेले आणि व्यवहारात देवाणघेवाण आणि वस्तुविनियम पद्धतीचे पुनरुज्जीवन झाले. तसेच या काळात कवडी (कपर्दी) चा चलनमाध्यम म्हणून वापर सुरु झाला. त्याचा धातू चलनावर परिणाम

झाला तरी धातूचलन संपूर्णपणे नष्ट झाले नाही. याही काळात सुवर्ण, गाद्याण, पण रुप्यक, द्रम्म कलंजु. कासू, अक्कम, होण,हाग, कागिनी, विप आणि पदटंक असे विविध मूल्यांच्या धातूंच्या नाण्यांचे उल्लेख भारताच्या विविध भागांतील कोरीव लेख आणि वाड्मयात आलेले आहेत. काही नाणी प्रत्यक्ष उपलब्ध आहेत तर काहींचे केवळ वाङमयात व कोरीव लेखांमध्ये उल्लेख आहेत.

असे असले तरी नाण्यांचे प्राचीन भारतीय इतिहास लेखनातील योगदान मात्र मोठे आणि महत्त्वाचे आहे.

## [ क ] ४.६ भारतीय इतिहासातील नाणकशास्त्राचे योगदान

नाणकशास्त्र हे प्राचीन भारतीय इतिहास लेखनासाठी उपयुक्त साधनांपैकी एक अत्यंत महत्वाचे साधन आहे. नाणी ही आपणांस विविध तऱ्हेने ऐतिहासिक माहिती देत असतात. विविध राजांची, राज्यांची, गणराज्यांची राजवंशाची नाणी आजपर्यंत उपलब्ध झालेली आहेत. नाण्यांद्वारे आपणास तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

**राजकीय इतिहासाच्या दृष्टीने महत्त्व :**

नाण्यांमधून अनेक राजे आणि राजवंशाची माहिती तर मिळतेच परंतु वाङमयीन साधनांमध्ये अज्ञात असलेल्या कितीतरी राजांचे अस्तित्व केवळ त्यांच्या नाण्यांच्या उपलब्धतेमुळेच मिळते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे इंडो-ग्रीक राजांची नाणी. प्राचीन भारतीय वाङमयात भारतातील केवळ ४-५ इंडो ग्रीक राजांची माहिती मिळते. मात्र जवळजवळ २५-३० इंडो-ग्रीक राजांची नाणी भारतात उपलब्ध झाल्यामुळे ३० ग्रीक राजे व राण्या भारतात राज्य करीत होते असे निदर्शनास आले.

असेच आणखी एक उदाहरण द्यावयाचे झाले तर सातवाहन राजवंशाचे देता येईल. वाङमयीन साधनांमध्ये म्हणजे पुराणांमध्ये या घराण्याविषयी जी माहिती मिळते, त्यानुसार या घराण्याचे एकूण ३० राजे होऊन गेले. मात्र त्यांच्या नाणकशास्त्रीय पुराव्यानुसार या राजवंशातील पहिल्या २१ राजांची नाणी मुळीच उपलब्ध नाहीत. केवळ शेवटच्या राजांची नाणी उपलब्ध आहेत. या शिवाय ज्यांची नावे पुराणांतील यादीमध्ये समाविष्ट नाहीत, अशा आणखी चार सातवाहन राजांची नाणी उपलब्ध झालेली आहेत. हे चार राजे म्हणजे शक सातकर्णी, रुद्र सातकर्णी, कुंभ सातकर्णी आणि कर्ण सातकर्णी.

तसेच मौर्यपूर्व कालखंडात अनेक राज्ये होऊन गेली. या राज्यांची नाणीही उपलब्ध झाल्याने त्यांच्या विषयी बहुमोल माहिती मिळाली. त्याचप्रमाणे कुषाण घराण्यातील अनेक राजेही आपणांस केवल त्यांच्या नाणक शास्त्रीय पुराव्यानुसार ज्ञात झाली आहेत.

नाण्यांद्वारे आणखीही बरीच महत्त्वाची माहिती आपणांस मिळत असते. उदा. अनेक नाण्यांवर कोरीव लेख असतात. त्यावरून त्या राजा व राजवंशासंबंधी माहिती, त्यांनी धारण केलेल्या पदव्या. इ. विषयी माहिती मिळते. उदा. शक आणि गुप्तसम्राट यांनी धारण केलेल्या पदव्या आणि बिरुदे यांची माहिती मिळते.

अनेक नाण्यांवर कालगणना दिली असल्याने अनेक वेळा ऐतिहासिक घटनांचा कालक्रम निश्चित करणे आपणांस शक्य होते. उदा. शक-क्षत्रप आणि गुप्त घराण्यातील राजांची नाणी. या नाण्यावरील कालगणनेमुळे संपूर्ण राजवंशाची अचूक माहिती उपलब्ध झालेली आहे.

अनेक महत्वाच्या राजकीय घडामोडींची नोंदही आपणांस नाण्यांमधून मिळते. उदा. सिथो-पर्थियन आणि कुषाण घराण्यांचा भारतीय भूप्रदेशावर अंमल होता हे आपणांस केवल त्यांच्या येथे आढळून आलेल्या नाण्यांवरून कळते. उदा. डिमिट्रियस हा पर्थियन राजा भारतात राज्य करीत होता. तसेच राजांनी केलेले विविध यज्ञ उदा. प्रथम कुमार गुप्त या गुप्त सम्राटाने अश्वमेध यज्ञ केला होता ही माहिती त्याच्या नाण्यावरून उपलब्ध होते.

घटनात्मक आणि प्रशासकीय स्वरुपाची माहितीही नाण्यांवरून उपलब्ध होते. उदा. उत्तर भारतातील कही प्राचीन नाण्यांवर 'यौधेय गणस्य जय:' व 'मालव गणस्य जय:' असे आलेख असलेली कही नाणी उपलब्ध आहेत. त्यावरून यौधेय आणि मालाव हि उत्तर भारतातील गणराज्ये हे सिद्ध झाले. अशा तऱ्हेने भारताच्या राजकीय इतिहासासाठी नाणकशास्त्राचे महत्त्व हे वादातीत आहे.

**आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्व :**

नाणी ही तत्कालीन अर्थव्यवस्थेवरही चांगलाच प्रकाशझोत पाडतात. तत्कालीन अर्थव्यवस्थेचे विविध पैलू आपण नाण्यांवरून अभ्यासू शकतो. उदा. प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेत नाणी म्हणजे चलन अथवा विनिमयाचे साधन म्हणून वापरले जात होते. म्हणजेच तत्कालीन अर्थव्यवस्था चांगलीच प्रगत झाली हे दिसून येते.

नाणी ही विविध धातूंची असतात. गुप्त सम्राटांनी बव्हंशी सुवर्णनाणी पाडली होती. परंतु गुप्त साम्राज्याच्या अखेरच्या काळात मात्र शुद्ध सोन्याची नाणी पाडणे त्यांना शक्य झाले नही. म्हणून त्यांनी चांदीची व इतर धातूंची नाणी पाडली. अर्थात सोन्यापेक्षा इतर धातूंचे मूल्य कमी असल्याने या नाण्यांच्या उपलब्धीवरून असे अनुमान काढता येते की सुरुवातीच्या गुप्त कालखंडात आर्थिक भरभराट होत असावी तर अखेरच्या काळात हूणांच्या आक्रमणाशी त्यांना वारंवार सामना करावा लागल्यामुळे त्यांना संरक्षणावर मोठा खर्च करावा लागला आणि आर्थिक संकटांशी सामना करावा लागला असावा. म्हणून नाण्यांमधील त्यांच्या धातूचे अवमूल्यन झाले असावे.

नाण्यांचे साठे अथवा नाणी जेथे जेथे सापडले आहेत, तेथील आर्थिक घडामोडींविषयी आपणांस बरीच माहिती मिळते. जेथे नाण्यांचे मोठे निधी (साठे) सापडले आहेत, त्यावरून प्राचीन काळातील व्यापारी घडामोडी, तत्कालीन व्यापारी मार्ग, व्यापारी केंद्रे आणि मोठया व्यापारी शहरांसंबंधी बरीच माहिती मिळते. याचे उदाहरण म्हणजे दक्षिण भारतातील पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी वरून भारताचा भारताचा प्राचीन काळापासून रोमन साम्राज्याशी भरभराटीचा व्यापार चालत असे हे ऐतिहासिक सत्य प्रचंड संख्येने दक्षिण भारतात उपलब्ध झालेल्या रोमन नाण्यांवरून सिद्ध झालेले आहे.

आर्थिक भरभराट ही व्यापारामुळे झालेली अनेक वेळा आढळून येते हा व्यापार देशांतर्गत आणि परदेशी असे. अशाच तऱ्हेचा परदेशी व्यापार नाण्यांवरील जहाजांची प्रतिमा सूचित करते. या जहाज प्रकारची नाणी ही सातवाहन, पल्लव इ. राजवंशातील राजांची उपलब्ध

आहेत. सागरी मार्गाने त्यांचा परदेशांशी व्यापार होत असल्यामुळे त्यांची आर्थिक भरभराट झाली होती. हे सत्य निदर्शनास येते.

काही वेळा कलात्मक दृष्टीने उत्कृष्ट दर्जाची नाणी आढळून येतात. त्यावेळी तेथील अर्थव्यवस्था स्थिर असावी असे मानले जाते. तर काही वेळा कही विशिष्ट कालखंडातील नाणी अजिबात उपलब्ध नाहीत. अशा वेळी एकतर अर्थव्यवस्था मागासलेली असावी. अथवा घसरलेली असावी असेही अनुमान करता येते. अशा तऱ्हेने आर्थिक इतिहासाविषयी नाणकशास्त्रातून माहिती मिळते.

**सामाजिक व सांस्कृतिक इतिहासातील महत्त्व :**

भाषा आणि लिपी हा सांस्कृतिक जीवनाचा एक पैलू समजाला जातो. नाण्यांवर कोरलेल्या आलेखांमुळे विविध भाषा आणि लिपी यांचा विकास कसकसा होत गेला, त्यातील ठळक टप्पे काय याविषयी बहुमोल माहिती मिळते. शिवाय ज्या-ज्या प्रांतामध्ये कोरीव लेखांसहित नाणी उपलब्ध झाली आहेत, त्या त्या प्रांतांमध्ये कोणती भाषा व कोणती लिपी विकसित झाली असेल याचा अंदाज आपण लावू शकतो. तसेच अनेक वेळा द्वैभाषिक व द्वैलिपिक लेखांसाहित नाणी मिळतात. काहीवेळा एकाच नाण्यांवर तीन लिपींमधील लेख आढळून येतात. उदा.कुषाणांची नाणी. त्यांच्या नाण्यावर ब्राम्ही, खरोष्टी आणि ग्रीक लिपींमधील आलेख आहेत. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की कुषाण काळात ब्राम्ही, खरोष्टी आणि ग्रीक या तीनही लिपी भारताच्या वायव्य भागात प्रचारात होत्या आणि लोकप्रियही होत्या.

नाण्यांवरून विविध राजांच्या प्रतिमा आपणास पहावयास मिळतात. त्यावरून हे राजे कसे दिसत असतील याविषयी कल्पना येते. अनेक वेळा राज्यकर्त्यांनी (राजांची) नाण्यावरील प्रतिमा त्यांच्याविषयी अधिक माहिती उपलब्ध करून देतात. त्यांच्या छंद व आवडीनिवडी आपणांस दिसून येतात. उदा. गुप्त सम्राटांच्या नाण्यावर त्यांचा शिकारीचा छंद दिसून येतो. समुद्रगुप्त हा पराक्रमी सम्राट शिकारीसारख्या मर्दानी छंदाचा भोक्ता होता तसेच तो संगीतकलेत, विशेषत: वीणावादनातही प्रवीण असून कलासक्त वृत्तीचा होता हे त्याच्याच विविध रूपांतील चितारलेल्या प्रतिमांमधून आपणांस दिसून येते.

नाण्यांवरील राजा व राण्यांच्या प्रतिमांवरून तत्कालीन केशभूषा, वेशभूषा, दागदागिने यांविषयीही कल्पना येते. उदा. गुप्त राजांची नाणी, सातवाहन घराण्यातील राजांची नाणी इ. अनेक वेळा नाण्यांवर विविध शस्त्रांचे नमुने बघावयास मिळतात. उदा. तलवार, भाला तसेच शिकारीची साधने इ.गुप्त सम्राटांच्या बऱ्याच नाण्यांवर ते वाघ, सिंह यांची शिकार करीत आहेत अशा प्रतिमा त्यावरून त्यांचा शिकारीचा छंद तर दिसतोच परंतु धनुष्यबाण तलवार, भाला इ.सारखी शस्त्रास्त्रेदेखील दिसून येतात.

अनेक वेळा विविध वस्तू ज्या घरगुती वापरातल्या आहेत. अशा वस्तू नाण्यांवर दिसतात. उदा. मंच अथवा घडवंची. कुषाण राजा विम कॅडफिसेस हा कधी घडवंचीवर बसलेला आढळतो तर कधी तो खिडकीत बसल्याची त्याच्या नाण्यांवर प्रतिमा आहे. गुप्त राजा प्रथम चंद्रगुप्ताच्या एका नाण्यावर त्याची पत्नी कुमारदेवी यांच्या प्रतिमा असून चंद्रगुप्त हा तिला करंडकासारखी काही वस्तू देत आहे असे दर्शविले आहे.

अनेक नाण्यांवर विविध चिन्हे आढळून येतात. विशेषत: आहत नाण्यांवर विविध चिन्हे म्हणजे चक्र, सूर्यचिन्ह, वृक्ष, वृक्षशाखा, विविध प्राणी उदा. हत्ती, बैल, कुत्रा, साप, धनुष्य बाण, यांसारखी शस्त्रे, भौमितिक रचना, मानवी आकृती इ. दिसून येतात. तत्कालीन समाजजीवनात या प्रतिमांचे असलेले महत्त्व, वनस्पती व प्राणीसृष्टीशी यांचे असलेले संबंध याविषयी आपणास कल्पना येते. अशा सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे विविध पैलू आपण नाण्यांच्या अभ्यासावरून पाहू शकतो.

**धार्मिक जीवन जाणून घेण्याच्या दृष्टीने महत्त्व :**

ऐतिहासिक कालखंडातील धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी नाणकशास्त्राची आपणास मौलिक मदत होते. उदा. आहत नाण्यांवर असलेली चिन्हे ही धार्मिक स्वरुपाची असावीत असा विद्वानांचा कयास आहे. या आहत नाण्यांनंतरची उपलब्ध असलेली विविध राजवंशांची नाणी ही तत्कालीन धार्मिक परिस्थितीवर चांगलाच प्रकाश टाकतात. अनेक वेळा नाण्यांच्या एका बाजूवर राजाची प्रतिमा तर दुसऱ्या बाजूवर देवतेची प्रतिमा असल्याचे दिसून येते. काहीवेळा नाण्यांवर मंदिराचे अथवा देवतेच्या वाहनाचे चित्र आढळून येते. उदा. कुषाण राजांच्या नाण्यांवर ग्रीक देवता हेराक्लस तसेच देवता मिहिर, माओ, ओडो, अधशो माझदा तसेच भारतीय देवता भारतीय देवता शिव म्हणजे महेश व त्यांची पत्नी उमा, तसेच बुद्धदेवतेसही स्थान मिळाले आहे. कुषाण सम्राट कनिष्काच्या नाण्यांवरील ही बुद्धप्रतिमा सर्वात प्राचीन समजली जाते.

सुरुवातीच्या गुप्त सम्राटाच्या नाण्यांवरही ग्रीक देवता ओर्दोक्षो हिची प्रतिमा आढळते. पुढील कालावधीत हातात कमळ घेतलेली लक्ष्मी प्रतिमा दिसते. गुप्त राजांच्या बहुतेक सर्व नाण्यांवर एका बाजूस देवतेची प्रतिमा तर दुसऱ्या बाजूस राजाची प्रतिमा आढळते. देवतांमध्ये गंगा, दुर्गा, कुमार अथवा कार्तिकेय इत्यादिंच्या प्रतिमा आढळतात.

काही वेळा राजांनी अश्वमेध यज्ञ केले आणि त्याप्रसंगी नाणी काढली. अर्थात अशा वेळी नाण्यांवर राजाची प्रतिमा आढळत नाहीत, तर यज्ञवेदी त्यापुढे यूपाला बांधलेल्या अश्वमेधासाठी तयार असलेल्या अश्वाची प्रतिमा आहे. तसेच काही नाण्यांवर गरुडाची प्रतिमा आहे. पौराणिक परंपरेनुसार गरुड हे विष्णूचे वाहन तर मोर हे कार्तिकेयाचे वाहन असलेल्या नाण्यांवरून तत्कालीन जीवनात लोकप्रिय असलेल्या देवता कोणत्या होत्या याचाही चांगलाच बोध होतो.

भारतीयांची धार्मिक सहिष्णुता ही केवळ आजच्या जीवनाचेच एक वैशिष्टय नही, तर तिलाही प्राचीन परंपरा आहे. वेळोवेळी भारतात आलेल्या परकीयांना भारतीय, समाजाने आपल्या समाजजीवनाच्या प्रवाहात सामावून घेतले आहे. मूळ परकीय असलेले हे लोक भारतीय संस्कृतीच्या मुख्य प्रवाहाशी एकरूप झाले होते हे सत्यही नाणकशास्त्रीय पुराव्यानिशी सिद्ध होते. उदा. भारतात आलेल्या या परकीयांपैकी काहींनी भारतीय भाषांचा स्वीकार केला, भारतीय धर्माचा स्वीकार केला. आपल्या मूळ धर्माचा त्याग करून भारतीय धर्म स्वीकारून काहींनी भारतीय नावही धारण केले. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर इंडो ग्रीक राजा मिनँडर यांने बौद्ध धर्माचा स्वीकार केला व स्वत:ला मिलिंद हे नाव घेतले होते. कुषाण सम्राट कनिष्क हाही बौद्ध धर्मानुयायी झाला होता. तसेच तो शिवभक्तही होता हे

त्याच्या नाण्यांवरून दिसून येते. मिहीरगुल हा हूण राजा परकीय असला तरी त्याच्या नाण्यावर आपणांस शिव या देवतेचे वाहन असलेल्या नंदीची प्रतिमा आढळून येते. अशा तऱ्हेने धार्मिक परिस्थितीविषयी बहुमोल माहिती आपणांस नाणकशास्त्रीय पुराव्यावरून उपलब्ध होते, आणि प्राचीन इतिहासलेखन नाणकशास्त्रीय स्थान महत्त्वपूर्ण आहे. याची साक्ष पटते.

## ४.७ सारांश

अशा तऱ्हेने या पाठात आपण नाणकशास्त्र म्हणजे काय ते जाणून घेतले तसेच भारतातील नाण्यांची सुरुवात, नाणकशास्त्राच्या अभ्यासाचा इतिहास, भारतीय इतिहासातील नाणकशास्त्राचे योगदान आणि प्राचीन भारतीय नाणी यांविषयी उपयुक्त अशी माहिती मिळविली.

## ४.८ प्रश्न

१) भारतातील नाणकशास्त्रविषयक अभ्यासाच्या प्रगतीचा मागोवा घ्या.

२) नाणकशास्त्र म्हणजे काय? प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती यांच्या अभ्यासातील नाणकशास्त्राच्या योगदानाचे परीक्षण करा.

३) 'भारतातील आहत मुद्रा' यावर एक सविस्तर टिपण लिहा.

४) कुषाण नाण्यांची प्रमुख वैशिष्ट्ये विशद करा .

५) सातवाहन नाण्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

६) गुप्तकालीन नाण्यांच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

७) टीपा लिहा.

 १) आहत नाणी

 २) कुषाणकालीन नाणी

 ३) सातवाहन नाणी

 ४) गुप्तकालीन नाणी

munotes.in

## ४.९ संदर्भ


- गुप्ता पी.एल. , प्राचीन भारीय मुद्राएँ, विश्वविद्यालय प्रकाशन,वाराणसी, १९८९.
- ढवळीकर एम के, प्राचीन भारतीय नाणकशास्त्र, कॉन्टिनेंटल प्रकाशन, मुंबई, २०१३.
- धोपटे एस जी, क्वेस्ट इन इंडियन न्युमिस्मॅटिक्स, सातवाहन चॅरिटेबल ट्रस्ट, बदलापूर, २०१४.
- पाठक अरुणचंद्र (संपा.), इतिहास: प्राचीनकाल (खंड-१) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, दर्शनिका विभाग, २०१०.
- मिराशी वा वी, सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७१.
- पाटील आशुतोष, पश्चिमी क्षत्रपांची नाणी, मर्वेन टेक्नॉलॉजीज, पुणे, २०१७.
- रायरीकर कल्पना आणि भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार, डायमंड प्रकाशन, पुणे, २००९.

सांकलिया एच. डी. आणि माटे एम.एस., महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.


❖❖❖❖

munotes.in